नेहरू बाल पुस्तकालय

स्वामी आणि त्याचे दोस्त

आर.के. नारायण

अनुवाद

अशोक जैन

चित्रे

मनोभिराम चक्रवर्ती

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN - 81-237-2354-7

1998 (शके 1920)

Swami and Friends (*Marathi*)

रु. 25.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, ए-5, ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110016 यांनी प्रकाशित केले.

माझ्या आई - वडिलांस

अनुक्रमणिका

एक

सोमवारची सकाळ

1

ती सोमवारची सकाळ होती. डोळे उघडायचं स्वामिनाथनच्या अगदी जिवावर आलं होत. कॅलेंडरमधील सोमवार हा तसा त्याचा नावडता वार होता. शनिवार व रविवारच्या अनिर्बंध स्वातंत्र्यानंतर सोमवारच्या कामाच्या व शिस्तीच्या धबडग्यात झोकून देणं कठीण जाई. शाळेच्या नुसत्या विचारानंच त्याच्या अंगावर काटा उभा राही. ती उदास पिवळट इमारत, जळजळीत नजरेचे वर्गशिक्षक वेदनायकम आणि बारीक, लांब छडी घेतलेले ते मुख्याध्यापक. . .

आठ वाजेपर्यंत तो आपल्या 'खोली' तील टेबलावर हजर झाला. वडिलांच्या ड्रेसिंग रूममधील एक कोपरा म्हणजे त्याची ही खोली होती. त्याच्या टेबलावर त्याचा कोट, टोपी, पाटी, शाईची बाटली आणि पुस्तकं यांचा अस्ताव्यस्त ढिगारा झाला होता. स्टुलावर बसून, डोळे मिटून दिवसभरात काय काय काम उरकायचं आहे याचा तो विचार करू लागला. सर्वात आधी अर्थातच अंकगणित - नफा व तोटा या संबंधीची पाच गणितं सोडवायची होती. त्यानतर इंग्रजी-त्याला आठव्या धड्यातील एक पान उतरून काढायचं होतं, कठीण शब्दांचे शब्दकोशातून अर्थ लिहून काढायचे होते. आणि त्यानंतर भूगोल. . . अवघ्या दोन तासात अभ्यासाचा एवढा ढिगारा उपसून त्याला शाळेत जायला तयार व्हायला हवं होतं.

2

खदिरांगार डोळ्याचे वेदनायकम वर्गात मोठ्या खिडकीकडे पाठ करून उभे होते. खिडकीच्या गजांमधून कवायतीचं मैदान आणि शिशु वर्गाच्या व्हरांड्याचा कोपरा दिसत असे. डावीकडं मोठ्या खिडक्या होत्या. त्यातून टोकाला रेल्वेमार्गाचं कुंपण असलेलं विशाल मैदान दिसत असे.

एकमेकांवर पडणारी, धडपडणारी शिशु वर्गातील मुलं त्या खिडक्यातून निरखणं, तसंच साडेबाराच्या सुमारास शरयूच्या पुलावरून धाडधाड आवाज करीत जाणारी मेल पाहणं हा स्वामिनाथनचा छंद होता, किंबहुना वर्गातील आपलं अस्तित्व कायम राखणं स्वामिनाथनला त्यामुळंच सुसह्य होई.

पहिला तास तर सुरळीत पार पडला. दुसरा तास होता अंकगणिताचा. वेदनायकम बाहेर गेले आणि काही क्षणात अंकगणिताच्या शिक्षकाच्या भूमिकेत परतले. एका सुरात रटाळपणं त्यांचं शिकवणं चालू होतं. स्वामिनाथनला अत्यंत कंटाळा आला. शिक्षकांचा तो आवाजही त्याला सहन होईना, त्याला पेंग येऊ लागली.

मास्तरांनी गृहपाठ दाखवायला सांगितले. स्वामिनाथन उडी मारून शिक्षकांच्या मेजापाशी पोचला आणि मेजावर त्याने आपली वही ठेवली. मास्तर बेरजा तपासू लागले तेव्हा स्वामिनाथन त्यांचा चेहरा निरखू लागला. जवळून त्यांचा चेहरा नीरस वाटत होता. आपल्या मास्तरांचे डोळे वाजवीपेक्षा जास्तच एकमेकांच्या जवळ आहेत आणि आपल्या बाकावरून दिसतात त्यापेक्षा त्यांच्या हनुवटीवर जास्तीच केस आहेत व ते फार कुरुप आहेत असं त्याचं मत बनलं.

त्याची विचार समाधी भंग पावली. डाव्या कोपरावरील मृदु मांसल भागात त्याला एकदम तीव्र वेदना जाणवली. गुरुजी एका हातानं त्याच्या दंडाला चिमटा काढीत होते तर दुसऱ्या हातानं सर्व बेरजांवर फुल्या मारीत होते. पानाच्या शेवटी त्यांनी 'अत्यंत वाईट' असा शेरा मारला. वही स्वामिनाथनच्या तोंडावर भिरकावली आणि त्याच्या जागेवर त्याला पिटाळलं.

पुढचा तास इतिहासाचा होता. मुलं अगदी उत्सुकतेनं त्या तासाची वाट पाहायची. डी. पिल्ले तो तास घेत असत. विनोदबुद्धी आणि प्रेमळ स्वभाव याबद्दल ते प्रसिद्ध होते. ते मुलांवर कधीही ओरडत नसत. इतिहास शिकविण्याची त्यांची पद्धती कोणत्याही ठरीव शैक्षणिक संकेतानुसार नसे. व्हास्को द गामा, क्लाईव्ह, हेस्टिंग्ज आणि अन्य प्रभृतींचा खाजगी इतिहास विपुल तपशीलासह ते विद्यार्थ्यांना सांगत. ऐतिहासिक लढायांचं वर्णन ते करू लागले की जणू तलवारींचा खणखणाट आणि जखमी वीरांचं कण्हणं मुलांना ऐकू येई. मुख्याध्यापक जेव्हा शाळेतून फेरफटका मारत तेव्हा त्यांच्या वर्गाजवळून पाऊल न वाजवता निघून जात.

सकाळच्या सत्रातला शेवटचा तास धर्मशास्त्राचा होता. तो काही तेवढा कंटाळवाणा नसे. इस्रायलींना वाट करून देण्यासाठी दुभंगणारा तांबडा समुद्र, सॅम्सनचे अचाट शारीरिक पराक्रम, कबरीतून प्रकटणारा येशू असे कितीतरी रोमांचक क्षण त्यात असायचे. एकच कटकट होती आणि ती म्हणजे धर्मशास्त्राचे मास्तर एब्नेझार हे धर्मवेडे होते.

"अरे, महामूर्खांनो," मुठी वळवून तावातावानं मास्तर म्हणाले, "तुम्ही घाणेरड्या, निर्जीव, लाकडी, दगडी मूर्तीची पूजा का करता ? त्या बोलू शकतात का ? नाही ! त्या

पाहू शकतात का ? नाही ! तुम्हाला त्या स्वर्गात घेऊन जातात का ? नाही ! का ? कारण त्यांच्यात प्राणच नाही. गझनीच्या मोहंमदाने जेव्हा त्यांना तुडवलं, त्यांचे तुकडे तुकडे केले व त्या तुकड्याचा आपल्या मुतारीच्या पायऱ्या बनवण्यासाठी उपयोग केला तेव्हा तुमच्या देवांनी काय केलं ? त्या मूर्तींना जर जीव असता तर त्यांनी मोहंमदाचा हा अत्याचार सहन का केला ?"

मग त्यांनी आपला मोहरा ख्रिश्चन धर्माकडे वळवला, "आता आमच्या भगवान येशूचं पहा. ते आजाऱ्याला बरं करतात, गरिबांचं दैन्य दूर करतात, आणि आपल्याला स्वर्गाला घेऊन जातात. ते खरेखुरे ईश्वर होते. त्यांच्यावर विश्वास ठेवा आणि ते तुम्हाला स्वर्गात घेऊन जातील. स्वर्गाचं साम्राज्य आपल्यामध्येच आहे." येशूचं चित्र उभं करताना त्यांच्या गालांवरून घळघळा अश्रू ओघळू लागले. पुढच्याच क्षणी त्यांच्या डोक्यात श्रीकृष्णाचा विचार आला आणि त्यांचा चेहरा संतापानं लाल झाला. "तुमच्या कृष्णासारखा आमचा येशू नाचऱ्या गोपींमागे पिंगा घालायला गेला होता काय ? त्या बदमाष कृष्णाप्रमाणं तो लोणी चोरायला गेला होता काय ? आपल्या भोवतालच्या माणसांवर आमच्या येशूनं कपट युक्त्यांचा वापर केला काय ?"

श्वास घेण्यासाठी ते क्षणभर थांबले. मास्तरांच्या सहनशक्तीचा आज जणू अंत झाला होता. स्वामीनाथनचं रक्त तापलं. उभं राहून त्यानं विचारलं, "त्यानं हे जर केलं नाही तर मग त्याला क्रूसावर का लटकाविण्यात आलं ?" "तास संपल्यावर मला भेटायला ये तेव्हा सांगीन," असं ते म्हणाले. त्यांच्या या सौम्य उत्तरानं त्याचं धाडस वाढलं व त्यानं दुसरा प्रश्न विचारला, "जर तो देव आहे, तर तो मांस, मासे का खातो ? वाईन का पितो ?" तो ब्राह्मण असल्यानं त्याला देव मांसाहारी असू शकतो ही कल्पनाच पटत नव्हती. या प्रश्नाचं उत्तर म्हणून एब्नेझार उठले, स्वामिनाथनकडं हलके हलके पावलं टाकीत गेले आणि त्यांनी त्याचा डावा कान जोरात पिरगाळला.

3

दुसऱ्या दिवशी नेहमीपेक्षा जरा लौकरच स्वामीनाथन शाळेत आला. घंटा होण्यास अजून अर्धा तास होता. एरवी तो असा वेळ शाळेत हुंदडण्यात किंवा चिंचेच्या झाडाखाली जाऊन जमीन खोदण्याचा खेळ खेळण्यात घालवी. आज मात्र तो एकाकीच विचार करीत बसला होता. त्याच्या खिशात एक जाडजूड पत्र होतं. त्या पत्राच्या कडेला हात लावून चाचपून पाहताना त्याला अपराध्यासाररखं वाटत होतं.

आदल्या रात्री जेवताना एब्नेझारबद्दल वडिलांना सांगण्याचा आपण महामूर्खपणा केला असं त्याला वाटत होतं.

घंटा होताच मुख्याध्यापकांच्या खोलीत त्यानं प्रवेश केला व त्यांना ते पत्र दिलं. ते

वाचताना मुख्याध्यापकांचा चेहरा गंभीर बनला.

महोदय,

सहाव्या इयत्तेतील, अ तुकडीत शिकत असलेल्या स्वामिनाथन या माझ्या मुलावर धर्मशास्त्र विषयाच्या मास्तरांनी धर्मवेडाच्या भरात हल्ला केला हे नम्रपणाने तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. हिंदू धर्माच्या बाबतीत ते नेहमीच अत्यंत अवमानकारक आणि प्रक्षोभक भूमिका घेतात अशी माझी माहिती आहे. त्याचा मुलांवर अनिष्ट परिणाम होणारच. अशा बाबतीत सहिष्णुता किती आवश्यकता असते ते प्रतिपादन करण्याची गरज नाही.

माझा मुलगा जेव्हा काही शंका विचारण्यासाठी उभा राहिला तेव्हा त्याला याच मास्तरांनी मारझोड केल्याचं मला समजलं. तो काल संध्याकाळी घरी परतला तेव्हा त्याचे कान लाल झालेले होते.

तुम्हाला तुमच्या शाळेत बिगर ख्रिश्चन मुलं नको आहेत असा एक निष्कर्ष मी काढू शकतो. तसं जर असेल तर कृपा करून कळवा. आमच्या मुलांना तुमच्या शाळेतून काढून अन्यत्र पाठवण्यास आम्ही उत्सुक आहोत. या मालगुडी शहरात अल्बर्ट मिशन स्कूल ही एकमेव शाळा आहे या भ्रमात राहू नका. तुम्ही घडलेल्या प्रकाराची चौकशी करून मला उत्तर पाठवायची कृपा कराल अशी आशा आहे. तसं केलं नाही तर तुमच्या या ख्रिस्ती धर्माला न शोभणाऱ्या पध्दतींविरुद्ध वरिष्ठांकडे तक्रार करावी लागेल असे मला खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते.

आपला अत्यंत नम्र सेवक

डब्ल्यू. टी. श्रीनिवासन

स्वामिनाथन जेव्हा त्या खोलीतून बाहेर पडला तेव्हा सारी शाळाच त्याच्याभोवती गोळा झाली होती आणि तो काय सांगतो याच्याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु मग्रुरीनं अनास्थापूर्वक त्याने त्या मुलांचे सारे चौकस प्रश्न दुर्लक्षिले.

त्याने केवळ चौघांना विश्वासात घेतलं. आपल्या वर्गातील ते चौघेजण त्याला खूप आवडत, त्यांचं तो नेहमीच कौतुक करी. पहिला होता सोमू, वर्गाचा मॉनिटर. सफाईनं काम करण्याची त्याची हातोटी होती. कुठलंही काम तो पूर्ण आत्मविश्वासानं व शांतपणे पार पाडत असे. गुरुजींचाही तो अत्यंत लाडका होता. कोणीही मास्तर त्याला वर्गात प्रश्न विचारीत नसत. विद्यार्थी म्हणून त्यानं फारशी चमक दाखविली होती असं म्हणता येणार नाही. पण केवळ मुख्याध्यापकच त्याची कानउघाडणी करू शकतात असा समज होता. सबंध वर्गातील एखाद्या वडिलधाऱ्या माणसाप्रमाणं त्याला वागवलं जाई.

आणि मग तो मणि - अगदीच बिनकामाचा. वर्गातील इतर सर्व मुलांपेक्षा तो आडदांड, उंच. तो वर्गात क्वचितच पुस्तकं आणी व गृहपाठाची त्याला कधीच पर्वा नसे. शेवटच्या बाकावर जणू त्याची मक्तेदारी होती. वर्गात तो येई आणि त्या बाकावर बिनधास्तपणे झोपी जाई. कोणाही मास्तरानं त्याला कधीही डिवचलं नाही. असं म्हणतात

की, एका नव्या शिक्षकानं एकदा तसा प्रयत्न केला तेव्हा त्याच्यावर जवळ जवळ जीव गमावण्याचीच पाळी आली होती. त्याच्या वाटेला जाणाऱ्या सर्व छोट्या-मोठ्या तिऱ्हाईतांना तो धाकदपटशा दाखवी. तो जवळून जात असेल तर लोक त्याच्या वाटेतून दूर होत. विशिष्ट कोन करून घातलेली टोपी व काखेत एखादी तामिळ कादंबरी, या अवतारात त्याला शाळेत येताना कितीतरी वर्षे जुन्या शिपायानं पाहिलेलं आहे. बहुतेक वर्गात आपल्या अन्य मित्रांपेक्षा तो अधिक वर्षे राहिला. स्वामिनाथनला त्याच्या मैत्रीचा अभिमान वाटे. इतर जण त्याला घाबरत असताना स्वामिनाथन मात्र त्याला 'मणि' अशी जोराने हाक मारू शकत असे, त्याच्या पाठीवर थाप मारू शकत असे. "एवढं बळ तुझ्यात येतं कुठून ?" असं स्वामिनाथन कौतुकानं त्याला विचारी. "आपल्या घरी दोन लाकडी सोटे असून जो कोणी आपल्या वाटेला जाईल त्याचं कंबरडंच मोडीन," असं उत्तर त्यावर मणीनं दिलं होतं.

आणखी तिसरा होता शंकर - वर्गातला सर्वात हुशार विद्यार्थी. त्याला विचारलेला कोणताही प्रश्न तो पाच मिनिटात सोडवी आणि नेहमीच तो नव्वद टक्के गुण मिळवी. त्यानं जर गुरुजींची उलटतपासणी करायचं ठरवलं तर त्यांचा फज्जाच उडेल असं विद्यार्थांना वाटायचं. काही विद्यार्थ्यांना मात्र असं वाटायचं की शंकर हा निर्बुद्ध आहे व खुशामतखोरी करून तो सर्व प्रश्न व त्यांची उत्तरं आधीच माहीत करून घेतो. मास्तरांचे तो कपडेही धुतो त्यामुळंही त्याला नव्वद टक्के गुण मिळतात असंही म्हटलं जायचं. वर्गात तो गुरुजींशी इंग्लिशमध्ये बोलू शकत असे. जगातील सर्व देश, नद्या, पर्वत त्याला ठाऊक असत. झोपेत देखील तो इतिहास धडाधड म्हणून दाखवू शकत असे. व्याकरण तर त्याच्या हातचा मळ होता. बुद्धिमत्तेनं त्याचा चेहरा तेजःपुंज वाटे. पण तो केसांची वेणी घालून व फुलं माळून येत असला तरी त्याचं नाक मात्र सदोदित गळत असे. स्वामिनाथनला तो म्हणजे एक आश्चर्यच वाटे. मणि त्याला मित्र मानू लागला व शंकरला त्यानं आपल्या गटात सामील केलं तेव्हा त्याला खूप आनंद झाला, मणीला तो खूप आवडे आणि शंकरच्या पाठीत धपाटा घालून तो आपलं प्रेम व्यक्त करी. "तुझ्यासारख्या काटकुळ्या, आनंदी, मूर्खाच्या डोक्यात एवढी बुद्धिमत्ता आली तरी कोठून आणि त्यातली तू थोडी वाटायला काय हरकत आहे ?" असं तो आपलं डोकं खाजवित विचारी.

चौथ्या दोस्ताचं नाव होतं सॅम्युएल. त्याच्या आकारामुळं ते त्याला 'वाटाणा' म्हणत. त्याच्यात खास असं काहीच नव्हतं. तो अगदीच सामान्य होता, त्याच्यात बौद्धिक वा शारीरिक असे काहीही खास गुण नव्हते. अंकगणितात स्वामीनाथन इतकाच तो कच्चा होता. स्वामिनाथन सारखाच तो भित्रा व दुबळा होता. त्या दोघातला दुवा म्हणजे त्याचं खळखळून हसणं होतं. कोणत्याही गोष्टीतील उणिवा, विसंगती दोघांना सारख्याच समजत. अगदी, क्षुल्लक गोष्टींनी दोघांनाही पोट फुटेपर्यंत हसू येई.

धर्मशास्त्राच्या गुरुजींच्या बाबतीत आपल्या वडिलांनी केलेल्या कारवाईची जेव्हा





स्वामिनाथननं माहिती दिली तेव्हा त्यांनी संमतीदर्शक माना डोलावल्या. सोमूनं मोठं हास्य करीत आपली मान्यता सर्वप्रथम दर्शविली. शंकर गंभीर होत म्हणाला, "कुणी काहीही म्हणो, हे काम तू वडिलांवर सोपवलंस हे योग्यच केलंस." आडदांड मणीनं डोळे अर्धवट किलकिले केले आणि आपलीही मान्यता असल्यासारखं तो गुरगुरला. मात्र ही बाब ज्येष्ठ मंडळींनी हाताळावी हे त्याला पसंत नव्हतं. त्याला काही अर्थ नाही असं त्याचं मत होतं. असल्या गोष्टी शाळेच्या चार भिंतीपल्याड जाता कामा नयेत. स्वामिनाथनच्या जागी जर तो असता आणि इतर काही मोठी वस्तू हाती लागली नसती तर निदान शाईची बाटली मास्तरांवर फेकून हा प्रश्न त्यानं निकालात काढला असता. नुसतं चूप बसण्यापेक्षा स्वामिनाथननं जे केलं ते काही हानिकारक नव्हतं. ते काहीही असलं तरी धर्मशास्त्राच्या मास्तरांची मुंडी पिरगळायची व त्यांची पाठ सडकून काढायची असं मणीनं ठरवलं होतं.

'वाटाणा' सॅम्युएलची स्थिती अत्यंत नाजुक झाली होती. एका बाजूला काहीतरी शेरेबाजी करण्याची आपल्यावर बळजबरी होते आहे असं त्याला वाटत होतं. तर दुसऱ्या बाजूला तो ख्रिश्चन असल्यानं त्याला एब्नेझारच्या निरीक्षणात काही वावगं वाटत नव्हतं. बायबलमधील एका ईश्वरी आज्ञेचाच विस्तार करून त्यांनी सांगितलं इतकंच असं त्याला वाटत होतं. तेव्हा एब्नेझारची बाजू घेणंच योग्य असं त्याचं मत होतं. शेवटी एब्नेझारचा पोशाख आणि त्यांचं रूप यावर कडक शेरेबाजी करून त्यानं आपली सुटका करून घेतली.

या सर्व प्रकरणाची चाहूल वर्गाला लागली होती. जेव्हा धर्मशास्त्राचा तास सुरू झाला तेव्हा काहीतरी नाट्यमय घडेल अशी अपेक्षा होती. पण काहीच घडलं नाही. एब्नेझार नेहमीसारखेच आनंदानं शिकवीत होते. त्यादिवशी भगवद्‌गीतेविषयी ते बोलू लागले. भगवद्‌गीतेचा हवा तसा अन्वयार्थ लावता येतो. एब्नेझार गीतेला हिंदुत्ववादाविरुध्दचं हत्यार म्हणून वापरत होते.

त्यांचा आवाज नेहमीसारखाच जोशपूर्ण होता पण त्यांची टीका अधिक वैचारिक होती. हिंदुत्ववादाचा पाया गीतेवर उभारलेला आहे असं सांगून त्यांनी गीतेच्या पार चिंधड्या उडविल्या. टप्याटप्यानं त्यांचं वक्तृत्व आलंकारिक पातळी गाठत होतं. बायबलची प्रत त्यांच्या टेबलवर दुर्लक्षित पडून होती.

इतक्यात मुख्याध्यापक वर्गात आले.

एब्नेझार बोलताना थांबले, खुर्ची मागे सरकवून ते उभे राहिले, त्यांची धांदल उडाली. त्यांनी मुख्याध्यापकांकडं प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं. मुख्याध्यापकांनी "शिकवणं पुढं चालू करा," असं गंभीर आवाजात सांगितलं. दरम्यानच्या काळात एब्नेझारनी बायबलमध्ये गुपचूप बोट खुपसलं होतं. मुख्याध्यापकांची आज्ञा ऐकताच भीतीनं थरथरणारी भिवई स्थिर ठेवण्याच्या त्यांनी प्रयत्न केला. बायबलमध्ये त्यांनी जेथे बोट खुपसलं होतं ते पान त्यांनी उघडलं आणि सुचेल तेथून वाचायला सुरुवात केली. ते प्रकरण नेमकं येशूच्या जन्मघटिकेचं होतं. ती महान घटना घडली होती. गव्हाणीत तो स्वर्गीय देवदूत अवतरला

होता; आणि पूर्वेकडचे ते 'शहाणे लोक' ताऱ्याच्या दिशेने मार्ग आक्रमित होते.

मुलं नेहमीसारखी शून्यचित्तानं त्यांचं म्हणणं ऐकीत होती. त्यांच्या दृष्टीनं एब्नेझार भगवद्गीतेच्या संदर्भात हिंदुत्ववाद समजावून देतात की, येशूच्या जन्मप्रसंगाचा तपशील सांगतात याला काहीच महत्व नव्हतं.

मुख्याध्यापकांनी त्यांचं शिकवणं जरा वेळ ऐकून घेतलं आणि मग त्यांना खुलासा विचारला. सहामाही परीक्षा जवळ आली तरीही एब्नेझार येशूच्या जन्मप्रसंगाच्या पल्याड पोचलेलेच नाहीत. मग येशूला क्रूसावर चढविण्याच्या आणि त्यानंतर होणाऱ्या त्याच्या पुनरुत्थानाच्या प्रसंगापर्यंत ते पोचणार कधी ? आणि उजळणी तरी कधी घेणार ? एब्नेझार अवाक्च झाले. काय सांगावं हेच त्यांना उमजेना. आठवड्यातील एखाद्या विशिष्ट दिवशी आपण सर्वसाधारण उजळणी घेतो असं सांगून त्यांनी कशीबशी सुटका करून घेतली. आणि एवढं काही त्यांचं शिकवणं मागे पडलेलं नाही. येशूच्या अंतिम भोजनाच्या प्रसंगापर्यंत ते येऊन पोचले आहेतच.

दिवसाच्या अखेरीस स्वामिनाथनला मुख्याध्यापकांच्या खोलीत हजर राहण्यास सांगण्यात आले. त्या बाबतची लेखी सूचना हाती पडली तेव्हा तात्काळ घरी पळून जावं असं त्याला वाटलं. त्यानं तसं म्हटलं तेव्हा मणीनं त्याचा हात पकडून त्याला मुख्याध्यापकांच्या खोलीपर्यंत नेलं आणि हलकेच आत ढकलून दिलं, मुख्याध्यापकांच्या समोर स्वामिनाथन काहीसा लटपटतच उभा राहिला.

एब्नेझार एका स्टुलावर बसले होते आणि ते एखाद्या मेषपात्रासारखे वाटत होते. मुख्याध्यापकांनी विचारलं :

"स्वामिनाथन, तुला कसला त्रास आहे ?"

"कसलाच नाही, सर," स्वामिनाथन उत्तरला.

'काहीच नाही, तर मग हे पत्र कशासाठी ?"

"ओह !" सहजपणे तो म्हणाला.

एब्नेझारनी हसण्याचा प्रयत्न केला. या सर्व भानगडीतून बाहेर पडावं असं स्वामिनाथनला वाटत होतं. ईश्वराबद्दल एब्नेझारसारख्या शंभर जणांनी हजार गोष्टी वाईट सांगितल्या तरी आपल्याला काही वाटायचं नाही असं त्याला वाटत होतं.

"मी कशासाठी इथे आहे, हे तुला ठाऊक आहे ?" मुख्याध्यापकांनी विचारलं.

स्वामिनाथन प्रश्नाचं उत्तर शोधू लागला. बहुधा मुलांच्या पालकांकडून पत्रं स्वीकारण्यासाठी मुख्याध्यापक असावेत; एब्नेझार–सारख्यांना जिवंतपणी फेकून देण्यासाठी असावेत, दर सोमवारी बारा वाजता आपल्या छडीनं मार देण्यासाठी असावेत. परंतु हा प्रश्नच कशासाठी ?

"मला ठाऊक नाही," स्वामिनाथनं निष्पापपणे उत्तर दिलं.

"तुमची काळजी घेण्यासाठी मी इथं आहे," मुख्याध्यापकांनी उत्तर दिलं.

प्रश्नाचं उत्तर इतकं सोपं आहे हे ऐकून स्वामिनाथनला हायसं वाटलं.

मुख्याध्यापक पुढं सांगू लागले, "हे बघ तुला काही मदत हवी असेल तर वडिलांकडे धाव घेण्यापूर्वी माझ्याकडं आलं पाहिजेस." स्वामिनाथननं एब्नेझार यांच्याकडं चोरून बघितलं तेव्हा ते खुर्चीत अगदी कसनुसे वाटत होते.

"एवढ्या साध्या गोष्टीबद्दल तू तुझ्या वडिलांकडे धाव घेण्याचा मूर्खपणा करावा याचा मला खेद होतो. मी यात लक्ष घालीन. हे पत्र तू वडिलांना नेऊन दे," मुख्याध्यापक म्हणाले.

स्वामिनाथन पत्र घेऊन सुटकेचा निःश्वास टाकीत बाहेर पडला.

दोन

राजम आणि मणि

1

शरयू नदी म्हणजे मालगुडीचं भूषणच होतं. शहरातील सर्वात टोकाच्या, तेलव्यापाऱ्यांची वस्ती असणाऱ्या एलमन स्ट्रीटपासून चालत दहा मिनिटांच्या अंतरावर नदी होती.

नदीचा वाळूचा किनारा म्हणजे शहरातील सर्व लोकांचं संध्याकाळचं फिरण्याचं ठिकाण होतं. गावात कोणी बडी असामी आली की, तिला टाऊन हॉलच्या अगदी वर नेऊन चांदण्यात उत्तरेकडं एखाद्या रुपेरी पट्ट्यासारखी चमचमणारी शरयू नदी नगरपालिकेचे अध्यक्ष मोठ्या अभिमानानं दाखवित.

नदीकाठी संध्याकाळी नेहमीची गर्दी झाली होती. नदीच्या पाण्यात पाय सोडून स्वामिनाथन व मणि पायऱ्यांवर बसले होते. नदीवर झुकलेल्या पिंपळाच्या फांद्यांची प्रसन्न सळसळ ऐकू येत होती. खाली पडलेली पानं हलक्याशा झुळुकेनं उडून नदीच्या प्रवाहावर विखुरली जात होती. पक्ष्यांच्या किलबिलाटानं आसमंत भरून गेला होता. दूरवर, जरा खालच्या बाजूला, नलप्पाच्या आमराईजवळ गुरांचा एक कळप नदी पार करीत होता. त्याचवेळी तेथून एक बैलगाडी जात होती आणि गाडीवान हलक्या आवाजात गाणं गुणगुणत होता, सूर्यास्त होऊन पंधरा मिनिटं लोटली होती आणि पश्चिमेकडं फिकट लालिमा पसरला होता.

"इथं पाणी खूप खोल आहे, नाही ?" मणीने विचारलं.

"हो. कां बरं ?"

"त्या राजमला मी इथं आणणार आणि उचलबांगडी करून नदीत फेकून देणार."

सहाव्या इयत्तेच्या अ तुकडीत दाखल झालेला राजम हा नवा मुलगा. दुसऱ्या सत्राच्या पहिल्या दिवशी शाळा पुन्हा सुरू झाली तेव्हा तो वर्गात आला आणि रमत गमत चालत शेवटच्या बाकापर्यंत गेला आणि मणीच्या शेजारी जाऊन बसला. मणीनं त्याला बरगडीत कोपर मारेपर्यंत तो खुशाल होता. अर्थात त्यानंही प्रत्युत्तर कोपर मारूनच दिलं. अगदी

पहिल्याच दिवशी त्यानं साऱ्या वर्गावर छाप टाकली. तो नवखा होता. त्याचा पोशाख एकदम नीटनेटका असे. सबंध वर्गात मोजे व बूट, फरकॅप नि टाय आणि छानदार कोट वापरणारा तो एकमेव मुलगा होता. मोटारीतून तो शाळेत येई. हे सारं तर झालंच शिवाय तो अत्यंत हुशारही होता. मद्रासमधील कुठल्यातरी इंग्लिश शाळेतून तो आला आहे अशी बोलवा होती. अगदी एखाद्या 'युरोपिअन' सारखा तो उत्तम इंग्रजी बोले; त्यामुळे शाळेतील फार कमी लोकांना त्याचं बोलणं समजे. इंग्रजीचे मोडके तोडके ज्ञान असलेल्या त्याच्या बऱ्याचशा वर्गमित्रांना त्याच्याशी बोलताना आत्मविश्वास वाटत नसे. वर्गातील सर्वात बुद्धिमान असलेला शंकरच काय तो त्याच्याशी बोलावयास धजत असे. पण राजमपुढे त्याचं इंग्रजीही मोडकं तोडकं व गावठी वाटे.

हा राजम मणीचा प्रतिस्पर्धी होता. मणीकडे तो दुर्लक्ष करी व अशा वागणुकीची मणीला संवय नव्हती. मणीनं ठोसा लगावला तर राजमही ठोसा देई, मणीनं धक्का मारला तर राजमही धक्का मारी, मणीनं लाथ मारली तर राजमही लाथ लगावी. मणी जर वर्गाचा दादा असेल तर राजमही काही कमी नव्हता. या बरोबरच राजमला नेहमी सत्तर टक्के गुण मिळत, शंकरनंतर तोच हुशार विद्यार्थी होता. वर्गातील नवं शक्तीकेंद्र राजम बनू लागला आहे अशी स्पष्ट चिन्हं दिसत होती. आपल्या जीवनात नवा उपद्रव निर्माण झाला आहे असं मणीला दिवसेंदिवस जाणवू लागलं होतं.

राजमची उचलबांगडी करून त्याला नदीत फेकून देण्याचा निर्णय घेण्यामागे हे सारे विचार त्याच्या मनात घोळत होते. काहीशी भीती व्यक्त करीत स्वामिनाथन म्हणाला : "त्याचे वडील पोलिस निरीक्षक आहेत याचा तुला विसर पडलेला दिसतो." क्षणभर मणि स्तब्ध झाला व नंतर म्हणाला, "मी कशाला त्याची पर्वा करू? एखाद्या रात्री माझ्या सोट्याने मी त्याचे खांदे मोडणारच."

"मी जर तुझ्या जागी असतो तर पोलिसांपासून दूरच राहिलो असतो. ते भयंकर असतात बुवा," असं स्वामिनाथन म्हणाला. "तू माझ्या जागी असतास तर? ॐ! मी तुझ्यासारखा बोळयानं दूध पिण्याइतका लहान नाही या बद्दल परमेश्वराचे आभारच मानायला हवेत."

स्वतःचा ओठ चावीत स्वामिनाथननं एक निःश्वास टाकला.

"आणि हे बघ. एक आठवलं, तुला जरा सावध करायला हवं होतं. त्या राजमभोवती तू फारच घुटमळत असतोस. तेव्हा तू स्वतःची जरा काळजी घेतलेली बरी एवढंच मी म्हणेन," मणि म्हणाला.

स्वामिनाथननं आपली तीव्र नापसंती प्रकट केली. मणीला सोडून दुसऱ्या कोणाबद्दल स्वामिनाथनला आदर वाटेल असं मणीला वाटलं कसं? आपला अत्यंत लाडका दोस्त व मार्गदर्शक मणि. त्याला कशामुळं असं वाटलं असावं? राजमच्या भोवती दहा पावलांच्या परिघातही आपण कधी फिरकल्याचं त्याला आठवत नव्हतं. तो त्याचा किती

द्वेष करायचा! तो नीच, उपटसुंभ कुठला! मणीनं कधी बरं आपल्याला राजमबरोबर पाहिलं? हं, बरोबर. सोमवारी चित्रकलेच्या तासाच्यावेळी असावं. स्वामिनाथननं थंड स्वागत करूनही राजम त्याच्याशी बोलायला आला होता. त्या गाढवाला टोककाढे हवे होते. त्याला त्याने ते दिले नाहीच उलट एवढीच तातडीची गरज असेल तर दुकानात जाऊन विकत घेण्याचा सल्ला दिला होता. छे राजम आणि मणि यांच्यात तुलनाच शक्य नाही.

या स्पष्टीकरणानं मणि खूष झाला. त्या संध्याकाळी तो प्रथमच हसला आणि तेही अगदी मनमुराद. त्यानं स्वामिनाथनला गदगदा हलवलं आणि प्रेमानं त्याचा कान एवढा जोरानं पिरगाळला की तो मोठ्यानं किंचाळलाच. आणि मग त्यानं एकदम विचारलं, "मला हवी असलेली वस्तू आणलीस का?"

"ओह, मणि! तुझी शंभरदा माफी मागतो, माझी आई सतत स्वयंपाकघरातच होती, त्यामुळं मला ती वस्तू आणताच आली नाही." (त्याला लिंबाचं लोणचं हवं होतं.)

"तू किती भित्रा आहेस रे! - ओह, हा नदीचा किनारा आणि रमणीय संध्याकाळ. अशावेळी किती मजा आली असती..."

2

राजम आणि मणि यांच्यामध्ये सुसंवाद घडवणाऱ्या मध्यस्थाची भूमिका स्वामिनाथनला पार पाडावयाची होती. पिवळ्या भिंतीकडं पाठ करून ते शेवटच्या बाकावर बसले होते. राजम आणि मणि यांच्यामध्ये स्वामिनाथन बसला होता. त्यांच्या पुढ्यात पुस्तकं होती, पण त्यांची मनं दुसऱ्याच विचारात गुंग होती.

मणीनं कागदाच्या एका चिटोऱ्यावर लिहिलं, 'तू पुरुष आहेस का.?' आणि तो कागद स्वामिनाथनला दिला. त्यानं तो राजमकडं सरकावला. राजमनं अपमानास्पद कटाक्ष टाकीत तो वाचला नि चुरगाळून फेकून दिला. मणीनं दुसऱ्या चिटोऱ्यावर तोच प्रश्न पुन्हा लिहून, 'या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस तर तू कुत्र्याची अवलाद आहेस असं मी समजेन,' हे वाक्य जोडलं आणि कागद राजमकडं सरकवला. "अरे, बदमाष, मला सतावू नकोस," असं राजम पुटपुटला आणि त्यानं ते पत्र चुरगाळून टाकलं.

यापुढं संभाषणच सरकेना.

"स्वामिनाथन, उभा राहा पाहू," गुरुजींनी फर्मान सोडलं व स्वामिनाथन आज्ञाधारकपणं उभा राहिला.

"लिस्बन कशासाठी प्रसिद्ध आहे?" गुरुजींनी विचारलं.

स्वामिनाथन काहीसा अडखळला आणि मग म्हणाला, "स्पेनची राजधानी

म्हणून. . ."

गुरुजींनी आपली मिशी पिरगाळली व त्यांनी दुसरा प्रश्न विचारला, "भारतीय हवामानाबद्दल तुला काय माहिती आहे ?"

"उन्हाळ्यात ते गरम व हिवाळ्यात थंड असतं."

"बाकावर उभा राहा पाहू," गुरुजी ओरडले. स्वामिनाथन निमूटपणं बाकावर उभा राहिला. छडीच्या माराऐवजी ही शिक्षा मिळाली म्हणून त्याला आनंद झाला.

मास्तरांनी शिकवणं पुढं चालू केलं : "आफ्रिका हा जंगलांचा देश आहे. तेथली सर्वात महत्वाची नदी नाईल आहे. समजलं का तुम्हाला ?" पहिल्या बाकावरील एका विद्यार्थ्याला त्यांनी प्रश्न विचारला. नाईल ही आफ्रिकेतील सर्वात महत्वाची नदी आहे असं त्या मुलानं उत्तर दिलं आणि गुरुजींचं समाधान झालं. "नाईल काय आहे ?" (एक मुलगा पटकन म्हणाला, "आफ्रिकेतील सर्वात महत्वाची नदी." त्यावर विचारल्याशिवाय प्रश्नाचं उत्तर द्यायचं नाही या शब्दात त्याची कानउघाडणी करण्यात आली.) "शांतता, शांतता, वर्गात एवढा गोंगाट कशासाठी बरं ? तुम्ही असाच गोंगाट करत रहा म्हणजे तुम्हाला परीक्षेत मोठा भोपळा मिळेल. मी तशी काळजी घेईन."

स्वामिनाथननं उरलेल्या तासाकडं लक्षच दिलं नाही. बाकावर उभा राहिल्यानं त्याला वर्गातलं सारं दिसत होतं. त्याला कितीतरी डोकी दिसत होती व टोप्यांनुसार त्यानं त्यांचं वर्गीकरण केलं. चार तांबड्या टोप्या, पंचवीस गांधी टोप्या, दहा फर कॅप्स. . . इत्यादी.

शाळा सुटली तेव्हा स्वामिनाथन, राजम व मणि हे आपली मनं मोकळी करण्यासाठी एका निवांत जागी जमले. त्या दोघांच्या मध्ये स्वामिनाथन उभा राहिला. मध्यस्थाची भूमिका स्वामिनाथनला बजावयाची होती. खरं तर ते एकमेकांच्या इतक्या जवळ उभे होते की ते कुजबुजले तरी एकमेकाला ऐकू गेलं असतं. परंतु शत्रूमध्ये मध्यस्थ हवाच ही प्रथा ते पाळत होते. मणीनं स्वामिनाथनकडं रोखून पाहत विचारलं, "तू पुरुष आहेस का ?" स्वामिनाथननं राजमकडं बघून प्रश्न विचारला, "तू पुरुष आहेस का ?" राजम चिडून ओरडला, "कोणा कुत्र्याला शंका आहे ?" स्वामिनाथननं मणीकडं वळून विचारलं, "कोणा घाणेरड्या कुत्र्याला शंका आहे ?"

"तू पुरुष आहेस हे सिध्द करण्याचं धाडस तुझ्यात आहे का ?" मणीनं विचारलं.

स्वामिनाथननं राजमकडं वळून तोच प्रश्न विचारला.

"कसं ?"

"कसं ?" स्वामिनाथननं मणीला विचारलं.

"उद्या सायंकाळी मला नलप्पाच्या आमराईजवळ भेट."

"*नलप्पाच्या आमराईजवळ ?*" प्रश्न पुन्हा विचारताना स्वामिनाथन खूष झाला.

"कशासाठी ?" राजमनं विचारलं.

"अरे, तुकडे करीन. . ." राजम म्हणाला.

स्वामिनाथनच्या सेवेची त्यांना आता गरज उरली नाही. त्याला आपला प्रश्न विचारण्यास ते वेळच देत नव्हते. राजम त्याच्या एका कानात तर मणि दुसऱ्या कानात ओरडत होता.

"तर मग उद्या नदीजवळ भेटायचं ना ?" स्वामिनाथननं विचारलं.

"होय," राजमनं आश्वासन दिलं.

राजम बरोबर साथीदारांना तर नाही आणणार हे मणीला जाणून घ्यायचं होतं.

नाही- तो कोणाला सोबत आणणार नाही. मणीनं दुसरी शंका काढली - "तुला काही झालंच तर तुझ्या वडिलांना यातलं काही सांगणार नाहीस ना ?"

ही सूचनाच झिडकारीत त्यानं तसं काही घडणार नाही असं आश्वासन दिलं.

3

त्यांच्या पुढं काही पावलं अंतरावर नलप्पाची आमराई होती. सहा वाजून गेले होते आणि दोन्ही किनाऱ्यांमधील वाहतूक थांबली होती. नेहमीची संध्याकाळी फिरायला येणारी गर्दी त्यांच्यापासून खूप दूरवर होती. स्वामिनाथन अन् मणि वाळूत बसले होते. ते शांतपणे बसून राहिले होते. मणीच्या बगलेत छोटा लाकडी सोटा होता व तो जमिनीकडं निरखून पाहत होता. तो विचारात गढला होता. थोड्याच वेळात तो राजमचं टाळकं फोडणार होता व त्याची उचलबांगडी करून, त्याला नदीत फेकून देणार होता. पण समजा प्रेत सापडलं तर ? पण आपलंच हे कृत्य हे त्यांना कसं कळणार ? पण राजम भूत बनून आला व रात्री आपल्याला सतावू लागला तर ? आजोबांच्या मृत्यूनंतर तो एकटाच खोलीत झोपत असे. रात्री राजम आला आणि त्यानं आपले केसच उपटले तर ? त्यापेक्षा त्याला ठार न केलेलंच बरं. त्यापेक्षा त्याचे पायच मोडावेत व त्याला सोडून द्यावं. समजा त्यानं त्याचं डोकं फोडलंच तर ते कोणाला कळणार? त्यानं निष्पापपणं डोळे मिचकावणाऱ्या स्वामिनाथनकडं पाहिलं. अर्थात स्वामिनाथननं जर पोलिसांना कळवलं तर मात्र. . .

बुटांचा आवाज येताच त्यांनी वळून पाहिलं. राजम आला होता. त्यानं खाकी पोशाख केला होता व वाढदिवशी त्याला मिळालेली हवाई बंदूक घेऊन तो आला होता. एकदम ताठ उभा राहून तो म्हणाला, "हं, मी तयार आहे."

"तू उशिरा आलास."

"होय."

"चल आपण सुरू करू या."

राजमनं बंदूक खांद्यावर ठेवून हवेत गोळी झाडली. मणि हादरला. तो स्तब्ध उभा



राहिला, त्याचा सोटा त्यानं खालीच धरला होता.

"ऐकलास ना बंदुकीचा आवाज?" राजमनं विचारलं. "मारामारी करायची खुमखुमीच असेल तर पुढची गोळी तुझ्या शरीरातच घुसेल."

"पण हा अन्याय आहे. माझ्याकडं बंदूक नाही, तुझ्याकडं आहे. आपली मारामारी केवळ हातांनी व्हायची होती."

"मग तू कशाला सोटा आणलास? काल तर तू त्याबद्दल काही म्हणाला नव्हतास."

मणीनं डोकं झुकवलं.

"तुझा अपमान होईल असं मी काय केलं?" राजमनं विचारलं.

"तू मला कोणातरीसमोर चहाडखोर म्हणालास."

"खोटं आहे ते."

काही क्षण विचित्र शांतता पसरली.

"हेच तुझ्या संतापाचं कारण असेल तर विसरून जा. आपण मित्र व्हायला माझी काहीही हरकत नाही."

"माझी पण नाही," मणि म्हणाला.

स्वामिनाथनच्या तोंडातून आश्चर्याचा चित्कार बाहेर पडला. मणीच्या समोर तो कितीही मिरवला तरी त्याला राजमबद्दल आदर वाटे अन् त्याच्याशी दोस्ती व्हावी अशी त्याची मनोमन इच्छा होती. सगळ्या कटकटीचा गोड शेवट झाला होता. आनंदानं तो नाचू लागला. राजमनं आपली बंदूक खाली केली आणि मणीनं आपला सोटा टाकून दिला. आपली सदिच्छा व्यक्त करण्यासाठी राजमनं खिशातून अर्धा डझन बिस्किटं काढली.

नदीचा झुळझुळ आवाज, पिंपळाच्या पानांची सळसळ, संध्याकाळचा तो धूसर प्रकाश आणि नव्या मैत्रीच्या आनंदात खात बसलेले ते तिघे दोस्त! स्वामिनाथनला जगातील सर्वोच्च शांती आपण अनुभवत आहोत असंच वाटत होतं.

तीन

स्वामीची आजी

1

पुढची बैठकीची खोली आणि मधलं जेवणघर यांच्यामधील कोंदट अंधाऱ्या बोळकंडीमध्ये स्वामिनाथनची आजी आपल्या सर्व सामान-सुमानासह रहायची. त्या सामानात पाच गालिचे व तीन चादरींनी बनवलेली गादी, पाच उशा, तागापासून बनवलेली चौकोनी पेटी आणि तांब्याची नाणी, दालचिनी, लवंगा, सुपारी ठेवलेली छोटी लाकडी पेटी यांचा समावेश होता.

रात्रीच्या जेवणानंतर स्वामीनाथन आजीच्या मांडीवर डोकं ठेवून तिच्या कुशीत विसावताना त्याला दालचिनी व लवंगांच्या मंद वासात सुखकारक आणि सुरक्षित वाटायचं.

"अग आजी, तुला ठाऊक नाही राजम किती चांगला मुलगा आहे ते !" आनंदानं स्वामिनाथन म्हणाला आणि मग त्यानं राजम व मणि या दोघांमधील आधीचं शत्रुत्व व नंतर झालेली दोस्ती हा सर्व किस्सा सांगितला.

"तुला ठाऊक आहे ? त्याच्याकडे पोलिसाचा खरा पोशाख आहे," स्वामिनाथन म्हणाला.

"खरं ? त्याला कशाला हवा पोलिसाचा पोशाख ?" आजीनं विचारलं.

"त्याचे वडील पोलिस निरीक्षक आहेत, इथल्या सर्व पोलिसांचे ते प्रमुख आहेत." आजी प्रभावित झाली. "त्यांचं ऑफिस मोठं असणार," असं ती म्हणाली व स्वामिनाथनचे आजोबा कसे बडे सब-मॅजिस्ट्रेट होते हे वर्णन करून सांगू लागली. त्यांच्यापुढं पोलिस कसे चळाचळा कापत आणि अट्टल डाकूही पळ काढीत हे ती सांगू लागली. तिचं बोलणं कधी संपेल याची स्वामिनाथन अधिरतेने वाट पाहू लागला. पण तिची टकळी चालूच राहिली. तिच्या बोलण्यात सुसंगती नव्हती, वेगवेगळ्या वेळी घडलेल्या घटनांची सरमिसळ ती करत होती.

"ठीक आहे, आता पुरे आजी," असं काहीसं कठोरपणं तो म्हणाला. "राजमबद्दल मला तुला अजून सांगायचंय. त्याला अंकगणितात किती गुण मिळतात, हे ठाऊक आहे तुला ?"

"अरे पोरा, अंकगणितात त्याला सर्वच्या सर्व गुण मिळतात, असंच ना ?" आजीनं विचारलं.

"छे ! त्याला शंभरपैकी नव्वद गुण मिळतात."

"वा, छान. त्याच्यासारखे गुण मिळावेत म्हणून तू पण प्रयत्न करायला हवा."

"तुला ठाऊक आहे का स्वामी. कधी कधी तुझे आजोबा आपला उत्तरांनी परीक्षकांना



घाबरवून टाकीत. इतरांना लागणाऱ्या वेळेच्या एक दशांश वेळेत ते उत्तर लिहून टाकीत. आणि कधी कधी त्यांची उत्तरे एवढी प्रभावी असत की, त्यांचे मास्तर त्यांना दोनशे गुण देऊन टाकीत. ते एम.ए. उत्तीर्ण झाले ना तेव्हा त्यांना एवढं मोठं पदक मिळालं होतं. कितीतरी वर्ष मी ते गळ्यात घालत असे. कधी बरं मी ते काढलं ? हं, तुझी आत्या जन्मली ना तेव्हा. नाही, नाही. तुझ्या आत्याच्या वेळी नाही. तुझ्या वडिलांचा जन्म झाला ना तेव्हापासून दहाव्या दिवशी. नाही, नाही. माझं आधीचंच बरोबर होतं. तुझी आत्या जन्माला आली ना तेव्हा. कुठं बरं आहे आता ते पदक ? मी ते तुझ्या आत्याला दिलं होतं. तिनं ते वितळवून त्याच्या चार बांगड्या करून घेतल्या. मूर्ख कुठली ! आणि बांगड्याही पातळ, कुचकामी. आपल्या कुटुंबातील ती सर्वांत महामूर्ख असल्याचं माझं पहिल्यापासूनच मत आहे."

"आता पुरे आणि जुन्या अनावश्यक गोष्टींचा तू उगाच त्रास करून घेतेस. राजम बद्दल तुला नाही का काही ऐकायचं ?"

"हो रे बाळ, हो. . ."

"राजमनं लहानपणी एका वाघाला ठार केलं होतं. . ."

"खरं ! किती शूर मुलगा बाई."

"तू केवळ मला खूष करण्यासाठी असं म्हणतेयस. तुझा काही त्यावर विश्वास नाही ना ?"

स्वामीनाथन उत्साहानं तिला सारी गोष्ट ऐकवू लागला. राजमच्या वडिलांचा जंगलात मुक्काम होता, त्यांचा मुलगाही त्यांच्याबरोबर होता. अचानक दोन वाघ त्यांच्यावर झेपावले. एकानं त्यांच्या वडिलांवर पाठीमागून हल्ला केला तर दुसरा राजमचा पाठलाग करू लागला. राजम एका झुडुपाआड लपला आणि बंदुकीनं त्यानं वाघाला ठार केलं. "आजी, तुला झोप लागली का ?" गोष्टीच्या अखेरीस स्वामिनाथननं विचारलं.

"नाही रे, मी ऐकतेय."

"असं ? किती जणांवर किती वाघ तुटून पडले हे सांग पाहू ?

"राजमवर सुमारे दोन वाघ चालून गेले," आजी म्हणाली.

आजीच्या या चुकीमुळं स्वामीनाथन चिडला. तो म्हणाला, "मी आपला जीव तोडून तुला महत्वाच्या गोष्टी सांगतो आहे आणि तू मात्र खुशाल झोपी जातेस, आणि वाटेल ते बोलतेस, मी यापुढं तुला काहीही सांगणार नाही. तू एवढी उदासीन का आहेस हे मला ठाऊक आहे. तू राजमचा द्वेष करतेस ना."

"नाही, नाही. तो किती गोड, छान मुलगा आहे !" आजीनं ठामपणं सांगितलं. राजमला कधीही तिनं पाहिलं मात्र नव्हतं. स्वामिनाथन खूष झाला. पण पुढच्याच क्षणी त्याला नवी शंका सतावू लागली. तो म्हणाला, "बहुधा ही वाघाच्या हल्ल्याची घटना तुला खरी वाटत नसावी."

"अरे बाबा, तुझ्या अगदी प्रत्येक शब्दावर माझा विश्वास आहे," आजीनं म्हटलं. स्वामीनाथन सुखावला पण सावधगिरीचा इशारा देताना तो म्हणाला, "जो कोणी त्याला खोटारडा म्हणेल त्याला तो गोळीच घालेल."

आजीनं त्याला संमती दर्शवली आणि राजा हरिश्चंद्राची गोष्ट सांगण्यास त्याची परवानगी मागितली. सत्यवचनी हरिश्चंद्राला आपलं सिंहासन, पत्नी, मुलगा गमवावे लागले पण अखेरीस हे त्याला सारे परत मिळाले. ही गोष्ट अर्धी सांगून होत असतानाच स्वामिनाथनचं लयबध्द घोरणं ऐकू येऊ लागलं आणि मग तीही झोपी गेली.

2

शनिवारची दुपार. मुळात शनिवार व रविवार वाट्याला येणं दुर्मिळ असल्यानं आजी किंवा आई यांच्या बरोबर गप्पा मारण्यात किंवा बेरजा करण्यात तो वाया घालवणं स्वामिनाथनला मंजूर नव्हतं. दुपारी उगाच न भटकता स्वामिनाथननं घरी राहून अभ्यास करावा अशी वडिलांची सक्त ताकीद होती. परंतु त्यांच्या या आदेशाचं क्वचित् पालन केलं जाई.

स्वामीनाथन त्याच्या 'अभ्यासिकेत' अस्वस्थपणं बसला होता. 'इंग्लिश रीडर' मधील एका कवितेचा अर्थ समजून घेण्याचा तो प्रयत्न करीत होता. त्याचे वडील आरशासमोर उभे राहून डोक्याला फेटा बांधायचा प्रयत्न करत होते. त्यांनी त्यांचा रेशमी कोट घातला होता. आता फक्त डोळ्यांवर चष्मा लावायचा राहिला होता. स्वामिनाथन त्यांच्या हालचाली उत्सुकतेनं निरखीत होता. आता तर त्यांनी चष्माही चढवला. केवळ घड्याळच काय ते लावायचं उरलं होतं.

स्वामिनाथनला आनंद झाला. ही शेवटचीच वस्तू होती. त्यानंतर वडील न्यायालयात जाण्यासाठी बाहेर पडणार होते. आई एका हातात पाण्याचा तांब्या व दुसऱ्या हातात पान सुपारी घेऊन आली. त्यांनी पाणी प्यालं आणि हात पुढे केला. नीट घडी केलेली अर्धा डझन पानं व थोडीशी सुपारी तिनं हातावर ठेवली. त्यांनी ते सारं तोंडात कोंबून मजेत चघळायला सुरुवात केली. एका गलेलठ्ठ मेंढीबद्दलची कविता स्वामीनाथन मोठमोठ्यानं वाचू लागला. आपल्या चांदीच्या तपकिरीच्या डबीचा व आपल्या मळकटलेल्या रुमालाचा त्याच्या वडिलांनी शोध घेतला. त्यांनी हातात छत्री घेतली. घरातून बाहेर पडण्याचा हा अखेरचा संकेत होता. स्वामीनाथन आपलं पुस्तक अर्धवट मिटून उभा राहिला. त्याचे वडील खोलीच्या जवळ जवळ बाहेरच पडले होते. पण – स्वामीनाथननं पाय आपटला. आईनं त्याच्या वडिलांना थांबवलं व ती म्हणाली, "ऐकलंत का, मला जरा सुटे पैसे हवे होते. आज शिंपी येणार आहे. गेले चार दिवस त्यानं तगादा लावलाय."

"त्याला उद्या यायला सांग," वडील म्हणाले. पण आईनं आग्रह धरला. वडील परत आले. आपल्या मेजापाशी गेले, त्यांनी चावी काढली, खण उघडला, त्यातून पाकिट काढलं

व तिला सुटे पैसे दिले. पाकिटात डोकावीत ते म्हणाले, "उरलेला महिना मी कसा काढणार कोण जाणे!" त्यांनी खणाचे कुलुप लावले. आरशासमोर फेटा ठाकठीक केला. भरपूर तपकीर नाकात कोंबली, आपल्या रुमालानं नाक साफ करीत ते बाहेर पडले. स्वामिनाथननं सुटकेचा निःश्वास टाकला.

रस्त्यावरच्या दरवाज्यावरूनच वडिलांनी कडी लावून घ्या असं फर्मान सोडलं. कडी लावल्याचे आवाज स्वामिनाथनला ऐकू आले. खिडकीतून त्यानं वडिलांना कोपऱ्यावर वळताना पाहिलं व मग तो तेथून उठला.

त्याची आई स्वयंपाकघरात आचाऱ्याला दुपारच्या कॉफीबद्दल सूचना देत होती. आजी तिच्या गादीवर उठून बसली होती. त्याला पाहताच ती म्हणाली, "इकडं ये रे बाळा."

"अं हं. मला आता वेळ नाही."

"ये ना. मी तुला तीन पै देईन," आजी आर्जव करीत म्हणाली.

स्वामिनाथननं तिकडं दुर्लक्ष केलं व तो बाहेर जायला निघाला.

"तू कुठं निघालास?" आईनं विचारलं.

"मला जायलाच हवं," चेहरा गंभीर करत स्वामीनाथन म्हणाला.

"उन्हात भटकणार आहेस का?"

"मुळीच नाही," त्यानं ताडकन उत्तर दिलं.

"वाटेल तसं उनाडपणं भटकून ताप येईल."

"नाही आई, मी उगाच भटकणार नाही."

"सुटीच्या दिवशी घरात रहायला तुला बाबांनी सांगितलंय ना?"

"हो. पण माझ्या चित्रकलेच्या गुरुजींनी मला भेटायला बोलावलंय. मला वाटतं तरी सुद्धा मी जाऊ नये." मग तो कडवटपणं म्हणाला, "चित्रकलेच्या परीक्षेत मी नापास झालो तर तुला आनंदच होईल."

3

ग्रोव्ह स्ट्रीटवरून स्वामिनाथन पळत सुटला, तो उजवीकडं वळून, अबू गल्लीतून मार्ग काढीत एका मळकट घरापुढं उभा राहिला. त्यानं हलकेच शिटी वाजवली. क्षणभर तो थांबला आणि त्यानं पुन्हा शिटी वाजवली. दरवाजाच्या कडीचा आवाज झाला, दरवाजा थोडा किलकिला झाला आणि मणीचं डोकं दिसू लागलं. तो म्हणाला, "अरे मूर्खा, माझी मावशी आहे घरात, तेव्हा आत येऊ नकोस. तिकडं जाऊन माझी वाट बघ."

स्वामीनाथन तेथून दूर जाऊन एका झाडाखाली वाट पाहत थांबला. सूर्याचं रखरखीत ऊन अंग भाजून काढत होतं. रस्ता जवळ जवळ निर्मनुष्य होता. गटाराजवळ एक गाढव



उभं होतं व आपलीच सावली पाहत होतं. एक गाय केळीचं हिरवंगार पान चघळत होती त्याच वेळी मणि त्याच्या घरातून गुपचूप बाहेर पडला.

राजमचे वडील लॉले एक्स्टेंशनवर राहायचे. (मालगुडी सर्कलच्या एकेकाळी सुपरिटेंडिंग इंजिनिअर असलेल्या सर फ्रेडरिक लॉले यांचं नाव त्या भागाला दिलेलं होतं). तिथं सुमारे पन्नास टुमदार बंगले होते आणि बहुतेक सरकारी अधिकारी त्यातून राहत होते. या घरांच्या पुढून काही अंतरावरून तिरुचरापल्लीकडं जाणारा ट्रंक रोड - मुख्य रस्ता - होता.

स्वामीनाथन व मणि राजमच्या जवळच असलेल्या घराकडं अस्वस्थपणं निघाले होते. गणवेशातील एका पोलिसाने त्यांना थांबण्याचा आदेश दिला व तो पळत त्यांच्याकडं येऊ लागला. येथून मागे फिरावं आणि धूम ठोकावी असं स्वामिनाथनला वाटू लागलं. "तूच काय ते त्या पोलिसाशी बोल," असं त्यानं मणीला विनवलं." "तुम्ही इथं काय करताय ?" असं पोलिसानं विचारलं. त्यावर मुद्दाम बेफिकिरीचा आव आणीत मणि म्हणाला, "राजम जर घरी असेल तर त्याला भेटायचंय. त्यानंच आम्हाला बोलवलं होतं." पोलिसात एकदम आश्चर्यकारक बदल घडला आणि अगदी आपुलकीनं तो त्यांना राजमच्या खोलीवर घेऊन गेला.

मणि व स्वामिनाथला ती खोली मोठी वाटली. त्या खोलीत खुर्च्या होत्या, अगदी खरोखरच्या खुर्च्या, आणि एक चांगलं मोठं टेबल होतं व त्यावर राजमची पुस्तकं नीट रचून ठेवलेली होती. टेबलावरील घड्याळानं ते सर्वात प्रभावित झाले. एवढ्या तरुण मुलाचं स्वतःचं घड्याळ आहे ! त्याचे वडील असामान्यच असावेत.

त्यावेळी राजम खोलीत आला. आपले मित्र आपली वाट पाहत आहेत हे त्याला ठाऊक होतं. काही वेळ त्यांना वाट पाहायला लावली पाहिजे असं त्याला वाटलं कारण तसं करताना त्यानं आपल्या वडिलांना पाहिलं होतं. म्हणून काही वेळ तो शेजारच्याच खोलीत नखं कुरतडत थांबला होता. जेव्हा त्याला राहवेना तेव्हा मग तो मित्रांना भेटायला आपल्या खोलीत आला.

त्यांना उभं असलेलं पाहून तो म्हणाला, "बसा रे, पोरांनो बसा."

थोड्याच वेळात नाना विषयांवर त्यांच्या गप्पा रंगल्या. गुरुजी, शाळेतील वर्गमित्र, त्यांचे पालक, खेळ व खेळणी अशा कितीतरी विषयांवर ते बोलत बसले.

राजम त्यांना एका कपाटापाशी घेऊन गेला व त्यानं ते उघडलं. त्यातील नाना वस्तू पाहून ते आश्चर्यचकितच झाले. छोट्या आगगाड्या, मोटारी, यांत्रिक अद्‌भुत खेळणी, जादूचा दिवा, मोठमोठी चित्रांची पुस्तकं आणि इतर शेकडो वस्तू त्यात होत्या. एका कोपऱ्यातील हवाई-बंदुकीनं मणीचं लक्ष वेधून घेतलं. हवी ती वस्तू हाताळण्याची राजमनं त्यांना मुभा दिली. थोड्याच वेळात स्वामीनाथन एक इंजिन खोलीभर पळवू लागला. मणि एका धनुष्यातून समोरच्या भिंतीवर एकापाठोपाठ एक बाण सोडू लागला, त्याचा त्याला जेव्हा कंटाळा आला तेव्हा हवाई बंदुकीतील शिशाच्या गोळ्यांचा फर्निचरवर तो वर्षाव करू लागला.

"अरे, तुमच्यापैकी कोणाला भूक लागलीय ?" राजमनं विचारलं.

"अं. नाही," चाचरतच त्यांनी उत्तर दिलं.

"ए." राजमनं हाक मारली. एक पोलिस आत आला.

"जा आणि आचाऱ्याला म्हणावं, तिघासाठी काही खायला आणि कॉफी घेऊन ये !" ज्या सहजतेनं व अधिकारवाणीनं राजम पोलिसाला हुकूम देत होता ते पाहून त्याचे मित्र

चकित झाले व राजमबद्दलचा त्यांच्या मनातील आदर वाढला.

आचारी बशीमध्ये भरपूर खाद्यपदार्थ घेऊन आला. त्यानं टेबलावर बशी ठेवली. आपण आपला अधिकार दाखवायला हवा असं राजमला वाटलं.

"हं, उचल ती बशी टेबलवरून," तो आचाऱ्यावर ओरडला. आचाऱ्यानं बशी उचलून खुर्चीवर ठेवली.

"अरे गाढवा, उचल ती, तिथं नको ठेवूस."

"राजू, कुठं ठेवू मी ती ?"

"अरे बदमाष, हरामखोर, मला उलट बोलतोस," राजम त्याच्यावर ओरडला.

आचाऱ्यानं चेहरा वाकडा केला व तो काहीतरी पुटपुटला.

"टेबलावर ठेव पाहू," राजमनं आज्ञा केली. आचाऱ्यानं त्याचं म्हणणं ऐकलं. तो पुटपुटला, "जर तू उध्दटासारखा वागलास ना, तर मी तुझ्या आईकडं तक्रार करीन."

"जा, जा सांग. मी नाही पर्वा करीत." राजमनं प्रत्युत्तर दिलं.

त्यानं एक कप पाहिला व इतका घाणेरडा कप आणल्याबद्दल आचाऱ्याला शिव्या दिल्या. आचाऱ्यानं क्षणभर रोखून पाहिलं. शांतपणं त्यानं बशी उचलली आणि म्हणाला, "तुम्हाला खायचं असेल तर स्वयंपाकघरात येऊन खा." आणि तो बशी घेऊन गेला.

तोंडाला पाणी सुटलेल्या मणि आणि स्वामीनाथनची त्यामुळे घोर निराशा झाली. राजमची पण फार पंचाईत झाली. आपल्या मित्रांदेखत नोकरानं आपल्यावर मात करावी यानं तो व्यथित झाला. काही क्षण तो स्तब्ध बसला व मग बळेबळेच हसून म्हणाला, "तो आचारी महामूर्ख नि बदमाश आहे. जरा एक मिनिट थांबा." आणि तो बाहेर गेला.

थोड्यावेळानं स्वतःच बशी घेऊन तो परतला. त्याचं हे पराभव पत्करणं पाहून त्याचे मित्र चकितच झाले. आचाऱ्याची त्याला समजूत काढता आली नाही हे उघड होतं. राजमनं त्या आचाऱ्याला ठार का नाही केलं असा प्रश्न स्वामिनाथनला पडला, तर त्या आचाऱ्याला आपल्या पध्दतीनं वठणीवर आणायची संधी मिळायला हवी होती असं मणीला वाटत होतं. पण राजमनं त्यांच्या शंकांचं निरसन केलं. तो म्हणाला, "मलाच हा फराळ आणावा लागला. कारण मी त्या उध्दट आचाऱ्याच्या पेकाटात लाथा घातल्या. तो स्वयंपाकघरात बेशुद्ध होऊन पडलाय."

चार

शेपूट म्हणजे काय ?

1

भूगोलाचे शिक्षक आले नव्हते व त्यामुले सहावी अ मधील मुलांना बुधवारी दुपारी तीन ते पावणेचार वाजेपर्यंत सुटी मिळाली होती.

स्वामीनाथन व त्याच्या मित्रांची चुकामूक झाली होती व त्यामुळं तो एकटाच होता. शिशुवर्गाच्या समोरच्या व्हरांड्यात तो फेरफटका मारीत होता. तो स्वतः जेमतेम चार फूट उंच होता पण त्याला शिशुवर्गातील मुलं फारच लहान वाटायची. आपण फारच श्रेष्ठ व मोठे आहोत असं त्याला वाटायचं. ओल्या मातीत खेळणाऱ्या विविध आकार बनवणाऱ्या त्या छोट्या मुलांबद्दल त्याला तुच्छता वाटे. शाळेत हे करणे किती निरर्थक वाटे। आपल्या घरांच्या परसदाराशी सुद्धा त्यांना असे हत्ती, आंबे आणि नाना आकार बनवता येतील. या गोष्टी करण्यासाठी शाळेत कशाला यायला हवं ? भूगोल, अंकगणित, बायबल व इंग्रजी अशा सारख्या गंभीर विषयांसाठी शाळा असतात.

एका वर्गात त्याला मुलं तामिळ अंकलिपीतील पहिल्या दोन अक्षरांची परत परत उजळणी करत असल्याचं आढळलं. त्यानं कान झाकून घेतले. गुरुजी हे कसं काय सहन करतात असा प्रश्न त्याला पडला. तो पुढं चालू लागला. दुसऱ्या एका वर्गात गबाळा पोशाख केलेल्या मुलांचा एकच गोंगाट चालू होता, बाकावर बसून, पाय हलवत मुलं करत असलेला आवाज ऐकणं त्याला असह्य झालं. त्यानं भुवई उंचावली, चेहरा वाकडा केला. त्यामुळं गुरूजींना आपली नाराजी कळेल अशी त्याची अपेक्षा होती. पण दुर्दैवानं गुरूजींची स्वामिनाथनकडे पाठ होती.

सातवी आणि आठवीच्या वर्गाकडं जाणाऱ्या जिन्याच्या पायथ्याशी तो थबकला. त्या वर्गात दाखल होण्यासाठी तो उत्सुक असल्यानं त्यांची पाहणी त्याला करायची होती. तो दोन-तीन पायऱ्या वर चढून गेलाही पण मग त्यानं आपला बेत बदलला. हे वर्ग मुख्याध्यापक घेत असल्यानं कदाचित् ते वर असतील. तसेच शिक्षकही कडक आणि मुले

तर शिष्ट व दांडगाई करणारी होती. दूरवर त्यानं सँडल्सचा करकर आवाज ऐकला व मुख्याध्यापक येत आहेत हे त्यानं ओळखलं. आपण तिथं पकडले गेलो तर समाधानकारक स्पष्टीकरण देताना नाकी नऊ आले असते.

शाळेला आले नसतील असं वाटणारे आपले वर्गमित्र अचानक भेटताच त्याला आनंद झाला. राजम व मणि सोडून बाकी सर्वजण तिथं होते. चिंचेच्या मोठ्या झाडाखाली ते कसला तरी खेळ खेळत होते. आनंदानं हलकी आरोळी मारीत तो त्यांच्यात सामील झाला. पण त्यांच्या प्रतिसादानं त्याची निराशा झाली. मंद स्मित करून त्यांनी त्याच्याकडं पाठ फिरवली व ते पुन्हा खेळण्यात दंग होऊन गेले. सोमू सुद्धा गंभीर असलेला पाहून स्वामिनाथनला आश्चर्य वाटलं. कुठंतरी काहीतरी नक्कीच बिनसलं होतं. त्यानं नेहमीच्याच सहज सुरात विचारलं, “गड्यांनो, मीही खेळतो ना तुमच्या बरोबर. चालेल ?” कोणीच त्याला उत्तर दिलं नाही. स्वांमिनाथन क्षणभर थांबला व आपल्याला खेळात घेण्याची आपण वाट पाहत आहोत असं त्यानं जाहीर केलं.

“आम्ही आणखी कोणाला घेऊ शकत नाही,” शंकर तुटकपणं म्हणाला.

“काही माणसं शेपूट म्हणून फार उपयोगी असतात,” वाटाणा म्हणाला. त्याचे हे उद्‌गार ऐकून सर्वांनाच हसू आलं.

“तू शेपूट म्हणालास नाही का ?” शंकरनं विचारलं. आता तुला शेपटाबद्दल बोलण्याची का गरज वाटावी ?”

“माझ्या समाधानासाठी. तू कशाला त्याची काळजी करतोस ? एवीतेवी तुला उद्देशून मी म्हणालोच नाही.” वाटाण्यानं उत्तर दिलं.

“हे ऐकून मला [illegible] वाटलं. पण इथं कोणाला ते लागू पडतं का ?” शंकरनं विचारलं.

“शक्य आहे.”

“शेपूट म्हणजे काय ?”

“गाढव किंवा कुत्र्याला जोडलेली एक लांब चीज.” स्वामिनाथनला यातून फारसा बोध झाला नाही पण आपल्याला उद्देशून काहीतरी बोलणं चालू आहे हे त्याला जाणवलं. त्याचे गाल गरम झाले. त्याला रडावसं वाटू लागलं.

घंटा वाजली आणि ते वर्गाकडं पळाले. स्वामिनाथन लालबुंद चेहरा खाली लपवीत आपल्या जागेवर जाऊन बसला.

तो इंग्रजीचा तास होता व वेदनायकम शिकवित होते. एक वृद्ध पुढील पिढ्यांसाठी वृक्षारोपण करीत होता व त्याला राजा दहा रुपये देत असे, त्याची गोष्ट गुरुजी सांगत होते. स्वामिनाथनच्या मेंदूत त्यापैकी एकही शब्द शिरत नव्हता. त्याला जर प्रश्न विचारला असता तर त्यानं चुकीची उत्तरं दिली असती आणि दिवसभर बाकावर उभं राहयची त्याच्यावर पाळी आली असती. परंतु त्या दिवशी त्याचं नशिब बलवत्तर होतं.

तास संपला. जड अंतःकरणानं, हलके हलके पावलं टाकीत तो घराकडे निघाला होता.



त्याच्यापुढं काही पावलं अंतरावर सोमू चालला होता. स्वामीनाथन त्याला जोरजोरानं हाका मारू लागला, "सोमू, सोमू, सोमू. अरे थांबशील की नाही ?" सोमू थबकला.

क्षणभर थांबून स्वामिनाथननं चाचरतच विचारलं, "अरे, आज तुम्हा लोकांना झालंय तरी काय ?"

"काही खास नाही," सोमूनं उत्तर दिलं. तुला नवीन नाव मिळालं आहे. हे ठाऊक आहे कां तुला ? शेपूट ! राजमचं शेपूट. तुझ्या दृष्टीनं आम्ही काही लायक नाही असं मला वाटतं. पण प्रत्येक जण पोलिस निरीक्षकाचा मुलगा कसा असणार ?" एवढं बोलून तो निघून गेला.

स्वामिनाथनच्या जीवनातील हा बहुधा पहिलाच धक्का असावा. त्याची सारी विचार प्रक्रियाच जणू पंगू झाली. त्याचं मन पुन्हा विचार करू लागलं तेव्हा आपण स्वप्नात तर नाही ना असा प्रश्न त्याला पडला. तो शांत सोमू, तो मनमिळावू सोमू, तो वर्गाचा काका असलेला सोमूच, तोच का काही क्षणांपूर्वी हे सारं बोलत होता ? राजम आवडला व त्याच्याबरोबर भटकलं तर त्यात वावगं काय ? त्याचा त्यांना एवढा का राग यावा ?

तो घरी गेला. आपला कोट, टोपी, पुस्तकं त्यानं टेबलावर भिरकावून दिली. त्याच्यासाठी केलेली थंड कॉफी तो घटाघटा प्याला.

तो विनायक मुदली रस्त्यावरील गटार निरखू लागला. त्यातून काळ्याकुट्ट पाण्याचा लोंढा वाहत होता. कागदाचे विविध आकाराचे कपटे, पानं, काड्या त्यावर तरंगत होत्या. डब्याचा एक छोटासा तुकडा हेलकावे खात होता. पाण्यात हात घालून तो उचलून घ्यावा असं स्वामिनाथला क्षणभर वाटलं. पण त्यानं तो तुकडा तसाच पुढं जाऊ दिला. त्याचं मन जड झालं होतं. [illegible]रा तो तुकडा वाहत पुढं चालल्याचं तो पाहत होता. कुंपणाच्या भिंतीच्या टोकाला तो तुकडा पोचला होता, झाडाखालून तो पुढं गेला. एका विटेला डब्याचा तो तुकडा अडकला तेव्हा स्वामिनाथन काहीसा चिडलाच. त्या विटेनं पण वाहत जायला हवं किंवा वाहतूक सुरळीत चालण्यासाठी मार्गातून बाजूला व्हावं असं त्याला वाटलं. डब्याच्या तुकड्यानं आपली सुटका करून घेतली आणि तो वेगानं दौडत पुढं निघाला व रस्त्याच्या वळणावर दिसेनासा झाला. स्वामिनाथननं घरात जाऊन कागद आणला व त्याची होडी बनवली. त्याला एक भरकटत चाललेली मुंगी दिसली. त्यानं अलगद तिला पकडलं नि होडीत ठेवलं. ती होडी त्यानं पाण्यात सोडली. त्या होडीचा भराभर चाललेला प्रवास एकटक नजरेनं तो पाहू लागला. काड्या व इतर वस्तूंच्या अडथळ्यामुळं तयार झालेल्या धोक्याच्या पट्ट्यात होडी आपल्या सामानासह शिरली तेव्हा स्वामिनाथननं श्वास रोखून धरला. होडीनं उजवीकडं सुरेख वळण घेतलं व आपला संभाव्य विनाश टाळला. होडी पुढं चालतच राहिली. पाणी जिथं भोवऱ्यात गरगरा फिरत होतं तिथं होडी पोचली. आपली होडी आता अंतिम क्षण मोजते आहे अशी स्वामिनाथनची खात्री होती. भोवऱ्याच्या तळाशी तिला जलसमाधी मिळणार यात शंकाच नव्हती. होडी वेड्यासारखी गरगरा फिरली,

थरथरली. पण एवढ्यात बहुधा शेजाऱ्यांच्या स्वयंपाकघरातून आलेल्या ताज्या पाण्याच्या पुरवठ्यामुळं मागून ती पुढं ढकलली जाऊन धोक्यातून बाहेर पडली. परंतु अत्यंत जोरदार वेगानं ती पुढे जाऊ लागली व ती उलटी होणार असं स्वामिनाथनला वाटलं. तेवढ्यात होडी स्थिर झाली व नेहमीच्या वेगानं पुढे सरकू लागली. परंतु झाडाखालून जाताना तिच्यावर एक जाडजूड वाळलेलं पान पडलं आणि होडी हेलकावली. निदान मुंगीला तरी वाचवावं म्हणून स्वामिनाथन तिथं धावत गेला. त्यानं पाण्यात खोलवर नजर टाकली पण मुंगीचा पत्ता नव्हता. होडी व तिच्यावरच्या सामानाची पुरी नासधूस झाली होती. त्यानं चिमूटभर माती उचलली व मुंगीच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करून ती माती गटारात सोडून दिली.

2

सोमू आणि कंपनीचे आपण शत्रू आहोत याची काही दिवसात स्वामिनाथनला सवय झाली.

अधून मधून त्याला आपल्या जुन्या मित्रांशी बोलण्याची लहर येई. धर्मशास्त्राचे गुरुजी जेव्हा ओठ मुडपीत व नाक खाजवीत तेव्हा वाटाण्याच्या पायावर पाय देऊन खूप हसण्याची उबळ स्वामिनाथला येई. कारण गेली बरीच वर्षे या प्रकारानं त्यांना हसू यायचं. पण आपली अनिवार इच्छा तो दाबून ठेवी व एकटाच तोंडानं चकचक आवाज काढी. आणि तो तांबडी टोपी घालणारा मुलगा ! त्याला डुलकी लागे व तो अचानक जागा होई तेव्हा स्वामिनाथन दरवेळी वाटाण्याच्या कानात कुजबुजे : "बघितलास का तो मुलगा. पहिल्या बाकावरचा तिसरा, तांबड्या टोपीतला-आता पुन्हा पेंगतो आहे," आणि खुदुखुदु हसे. परंतु आता तो केवळ स्वतःचे ओठ चावीत चूप बसे.

सोमू त्याच्या दिशेनं पाहत होता. स्वामिनाथनला वाटलं त्याच्या नजरेत दोस्तीची भावना आहे. सोमू पुन्हा मैत्री जोडू पाहतो आहे या भावनेनं तो क्षणभर आनंदला. ते एकमेकाकडं रोखून पाहू लागले आणि स्वामिनाथन मित्रत्वानं स्मित करू लागताच सोमूची नजर कठोर बनली व तो दुसरीकडं पाहू लागला.

स्वामिनाथन आवारात भटकत होता. परिचित आवाज ऐकू आले म्हणून त्याने मागं वळून पाहिलं; सोमू, शंकर, वाटाणा त्याच्यामागून येत होते. थांबून त्यांच्यात सामील व्हावं की, ते पुढं निघून गेल्यावर उलट दिशेला चालू लागावं हे काही स्वामिनाथनला कळेना. आपल्या पाठीशी तीन शत्रूंच्या नजरा रोखलेल्या असताना चालत राहणं कठीण होतं. आपल्या शरीराच्या प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवली जात असून त्यावर शेरेबाजी केली जात आहे असं त्याला वाटत होतं. आपली चालण्याची ढब त्यांना पसंत नसावी, तसंच ज्या प्रकारे आपण पुस्तकं हातात धरली आहेत त्यामुळे त्यांना हसू येत असावं.

त्याला मानेवर खाजवावंसं वाटलं, त्यानं हात उंचावला पण तो लागलीच खाली आणला कारण आपलं मान खाजवणंही सहा डोळे बारकाईन निरखतील असं त्याला वाटलं.

उजवीकडं वळून शाळेच्या सभागृहात शिरावं असा त्याचा बेत होता परंतु त्याचा अर्थ तो भित्रा आहे असा काढला गेला असता, आपल्यापासून पळ काढण्यासाठीच त्यानं असं केलं असा त्यांनी नक्कीच अर्थ काढला असता. पळून जावं तर तोही काही बरा मार्ग नव्हता. उलट दिशेनं जावं तर त्यांची समोरासमोरच गाठ पडली असती. तेव्हा आपला पाठलाग करणाऱ्यांची आपल्याला जाणीव आहे असं भासवू न देता सरळच चालत राहणं हाच त्यातल्या त्यात उत्तम मार्ग होता. दहा दिवसांपूर्वी हेच त्याचे मित्र होते आणि तेच आता किती भयंकर बनले होते ! या बदलानं तो आश्चर्यचकित झाला होता.

त्याला हे सारं सहन करणं कठीण जाऊ लागलं. चालताना आपले पाय एकमेकात घुटमळताहेत असं त्याला वाटू लागलं. वळून शाळेच्या सभागृहाकडं धूम ठोकायला आता विलंब झाला होता. तो त्यांच्यापुढं आला होता. सुटकेचा एकच मार्ग उरला होता. त्याला पळच काढायला हवा होता. त्यानं एक युक्ती योजली, तो अचानक थांबला आणि जणू काहीतरी शोधल्यासारखं त्यानं केलं व तो मोठ्यानं म्हणाला, “ओह ! मी माझी वही कुठंतरी विसरलो वाटतं.” त्यानं हात उंचावला व तेथून एखाद्या हरिणाच्या चपळाईनं धावत सुटला.

पाच

बाबांची खोली

1

तो शनिवार होता आणि दुपारी येण्याचं राजमनं वचन दिलं होतं. स्वामिनाथन उत्साहानं उसळत होता. कुठं बरं त्याचं आदरातिथ्य करावं ? बहुतेक आपल्या खोलीत - पण त्याचे बाबा तिथं वारंवार कपडे बदलायला येत. पण नाही, ते तर त्यावेळी न्यायालयात असतील याची स्वामिनाथननं स्वतःलाच आठवण करून देऊन सुटकेचा निःश्वास टाकला, त्यानं आपलं टेबल साफसूफ केलं. पुस्तकं त्यानं एवढी व्यवस्थित लावून ठेवली की बाबांना आश्चर्यच वाटलं. त्यांनी त्याचं कौतुक केलं. स्वामिनाथन आजीकडं गेला नि म्हणाला, "आजी मी तुला राजमविषयी सांगितलं होतं, आठवलं ?"

"हो. तो एकदम ताकदवान आहे, पण कधी परीक्षेत पास होत नाही तोच ना.''

"नाही. नाही. तो मणि."

"ओह. आता आठवलं. त्याला तुम्ही डाळ की काहीतरी म्हणता. आणि तो खूप गमत्या आहे तोच ना."

हताश होऊन स्वामिनाथन म्हणाला, "हे बघ आजी तू वाटाण्यालाच तो समजते आहेस, अग मला राजम बद्दल म्हणायचंय. त्यानं वाघ मारलेत, त्याचे वडील पोलिस निरीक्षक आहेत, तो एकदम महान आहे."

"ओह ! तो मुलगा होय ? तो येणार आहे का ? मला किती आनंद झाला सांगू." आजी म्हणाली.

"हं. पण मला तुला एक सांगायचंय."

"तू त्याला माझ्याकडं आणशील ? मला त्याला बघायचंय."

"बघू या," जरा संदिग्धपणं तो म्हणाला, "मी काही तसं आश्वासन देत नाही. पण तुला मला एक सांगायचंय. तो माझ्याबरोबर असेल ना तेव्हा तू मला बोलवायचं नाही

किंवा माझ्या खोलीतही यायचं नाही."

"का बरं?" आजीनं विचारलं.

"त्याचं काय आहे. तू खूपच म्हातारी आहेस," स्वामिनाथननं निष्कपटपणे निर्दय गोष्ट सांगून टाकली आणि आजीनंही त्या वास्तवाचा हसत स्वीकार केला.

आपल्या दोस्ताला चांगलं खायला दिलं पाहिजे असं त्याला सारखं वाटत होतं. तो आईजवळ गेला. ती केळीची पाने चिरत बसली होती. तो तिच्या समोर बसला. अस्वस्थपणे तो एक पानं घेऊन त्याचे छोटे छोटे तुकडे करू लागला.

"हे तुकडे जमिनीवर फेकू नकोस. आता पुन्हा जमीन झाडायचं त्राण नाही माझ्यात," आई म्हणाली.

"आई, दुपारी खायला काय करणार आहेस?"

"विचार करायला अजून बराच वेळ आहे," आई म्हणाली.

"काहीतरी छान व गोड पदार्थ कर. आज दुपारी राजम येणार आहे. मला देतेस तशी कॉफी बनवू नकोस. एकदम चांगली आणि गरम असायला हवी ती." राजमच्या घरात सर्व पदार्थ कसे आचाऱ्याने आणले होते ते त्याला आठवलं. "कॉफी नि फराळाचं घ्यायला मी इथं आलो नाहीतर चालेल का? ते तू माझ्या खोलीत पाठवून देशील?" आचाऱ्याकडं वळून तो म्हणाला, हे बघ, त्या धोतरात तू माझ्या खोलीवर येऊ नकोस. तू स्वच्छ धोतर नि शर्ट घातला पाहिजेस. थोड्या वेळानं तो आईला म्हणाला, "आई, तू बाबांना त्यांची खोली मला एक-दोन तास वापरू द्यायला सांगशील का?" त्यावर नकार देत ती म्हणाली "मी, खूप कामात आहे. तूच का नाही त्यांना जाऊन विचारीत."

"ओह!" तू विचारलंस तर ते चटकन खोली वापरू देतील," स्वामिनाथन म्हणाला.

पण मग तोच वडिलांकडे गेला आणि म्हणाला, "बाबा, मला तुम्हाला काहीतरी विचारायचंय." काही कागद वाचण्यात गढून गेलेल्या बाबांनी डोकं वर काढून पहिलं.

"बाबा, मला तुमची खोली हवीय."

"कशासाठी?"

"मला माझ्या मित्राचं स्वागत करायचंय," स्वामिनाथननं उत्तर दिलं.

"तुला तुझी खोली आहे की!" वडील म्हणाले.


"मी ती राजमला दाखवू शकत नाही."

"हा कोण एवढा बडा माणूस? कोण आहे राजम?"

"तो पोलिस निरीक्षकाचा मुलगा आहे. तो काही मामुली नाही."

"ओह! असं होय? ठीक आहे तू माझी खोली वापरू शकतोस. पण टेबलावरच्या गोष्टी अस्ताव्यस्त करू नकोस."

"होय. मी अत्यंत काळजी घेईन. तुम्ही किती चांगले आहात, बाबा."



मोठ्यानं हसत वडील म्हणाले, "जा आता पळ आणि पुस्तकं घेऊन बस पाहू."

2

स्वामिनाथनच्या अपेक्षेपेक्षाही राजमची भेट अधिक सुरळीत पार पडली. बाबांनी त्यांची खोली वापरू दिली, आईनं गहू, साखर व बेदाणे घालून अप्रतिम पक्वान्न तयार केलं. कॉफी खरोखरच उत्तम होती. आजीनं दिलेलं वचन पाळलं व ती राजमच्या पुढं आली नाही. आचाऱ्यानं धोतर बदललं नाही याचा मात्र स्वामिनाथनला खेद झाला.

बाबांच्या फिरत्या खुर्चीत स्वामिनाथननं राजमला बसवलं. तो येऊन जवळ जवळ तीन तास झाले होते. मणि, एब्नेझार, आगगाड्या, वाघ, शिकार आणि भुतं अशा सर्व विषयांवर त्यांच्या गप्पा झाल्या.

राजमनं विचारलं, "तुझी खोली कुठली ?"

चेहरा गंभीर ठेवीत स्वामिनाथन उत्तरला, "हीच माझी खोली आहे. का बरं ?"

हे मान्य करायला रा .मला जरा वेळ लागला. टेबलावरची जाडजूड कायद्याची पुस्तकं न्याहाळीत तो म्हणाला, "तू ही सारी पुस्तकं वाचतोस ?" स्वामिनाथन काहीसा अवघडलाच.

दुसरा प्रश्न विचारून राजमनं स्वामिनाथनची आणखीच पंचाईत केली, "आणि तुझी पुस्तकं कुठायत् ?" त्याच्या ओठावर स्मितरेषा उमटली होती.

"खरं तर हे टेबल माझ्या बाबांचे आहे. मी बाहेर जातो तेव्हा ते आपल्या अशिलांना इथंच भेटतात," स्वामिनाथननं उत्तर दिले.

"पण, तू तुझी पुस्तकं कुठं ठेवतोस ?"

विषय बदलण्याचा घाईघाईनं प्रयत्न करत स्वामिनाथन म्हणाला, "तू माझ्या आजीला भेटला आहेस का, राजम ?"

"नाही. तिला भेटायला मला आवडेल," राजमनं उत्तर दिलं.

"मग जरा क्षणभर थांब." असं म्हणून स्वामिनाथन खोलीबाहेर पडला. आपली आजी झोपली असेल अशी आशा त्याला वाटत होती. एखाद्या मित्राला झोपलेली आजी दाखवणं अधिक सुरक्षित असतं.

ती आपल्या गादीवर बसलेली त्यानं पाहिलं. ती आनंदात होती. त्याची निराशा झाली तो तिच्याकडे रोखून पहात स्वतःच्या विचा्रात हरवून गेला.

"काय रे पोरा, तुला काही हवंय का ?" आजीने विचारले.

"नाही. तू झोपली नाहीस आजी ?" तो म्हणाला. "मी तुला भेटायला राजमला घेऊन

आलोय."

"हो का? राजम जवळ ये रे. तुझा चेहरा मला नीट दिसत नाहीए. मी म्हातारी व आंधळी आहे," आजी म्हणाली.

स्वामिनाथन भडकला नि राजमशी हे असं मूर्खासारखं बोलायची आजीला काही गरज नव्हती असं पुटपुटला.

राजम तिच्या गादीवर बसला. राजमचे केस छोटे व खरखरीत होते पण त्याच्या केसातून हात फिरवत ते किती मुलायम व छान आहेत असं आजी सांगत होती. तुझ्या आईचं नाव काय व तिला मुलं किती असं तिनं विचारलं. नंतर तिच्याकडं किती जडजवाहिर आहे असंही तिनं विचारलं. आपल्या आईकडं एक काळी पेटी भरून जडजवाहिर आहे आणि दुसऱ्या हिरव्या पेटीभर सोन्याचांदीची भांडी आहेत असं राजमनं सांगितलं. मग राजमनं तिला मद्रासचं, तेथल्या दीपस्तंभाचं, तेथल्या समुद्राचं, ट्रॅम्स व बसेसचं आणि सिनेमाचं वर्णन ऐकवलं. या प्रत्येकाचं वर्णन ऐकताना आजीच्या तोंडून आश्चर्योद्गार निघत होते.

3

स्वामिनाथन जेव्हा वर्गात शिरला तेव्हा सर्व बाकांवर खसखस पिकली. आपल्या जागेकडं जाताना आपल्यामुळे ही खसखस झालेली नसावी अशी आशा त्याला वाटत होती. पण ती चालूच राहिली. त्यानं इकडं-तिकडं पाहिलं. त्याची नजर फळ्यावर स्थिरावली व त्याचा चेहरा लालबुंद झाला. फळ्यावर मोठ्या अक्षरात लिहिलं होतं - 'शेपूट.' स्वामिनाथन फळ्याजवळ गेला आणि त्यानं ती अक्षरं पुसून टाकली. त्यानं वळून पाहिलं तेव्हा शंकरनं आपलं डोकं वहीत खुपसलं होतं आणि वाटाणा दप्तरातील वस्तू काढण्यात दंग झाला होता. काहीही न बोलता स्वामिनाथन वाटाण्याच्या जवळ गेला आणि त्यानं त्याच्या गालावर एक थप्पड लगावली. वाटाणा रडू लागला आणि आपलं हे कृत्य नव्हे असं शपथेवर सांगू लागला. त्यानं शंकरकडं कटाक्ष टाकला, तो कसल्यातरी कामात गढला होता. स्वामिनाथन वळून त्याच्याकडं गेला व त्याच्याही थोबाडीत त्यानं लगावली.

काही क्षणातच तिथं एकच गडबड उडाली. शंकर, स्वामिनाथन आणि वाटाणा - एकमेकाला ओरबाडत होते. लाथा घालीत होते. घंटा झाली. राजम, सोमू आणि मणि वर्गात आले. गुरुजी आले नि अवाक् होऊन उभे राहिले. बघत राहत व ओरडण्यापलिकडं ते काही करू शकत नव्हते. ते जुने तामिळ पंडित होते व शाळेतील सर्वात भित्रे मास्तर होते.

सोमू आणि मणि यांनी मारामारी करणाऱ्यांना बाजूला केलं. गुरुजी प्लॅटफॉर्मवर चढून आपल्या खुर्चीत बसले. वर्ग शांत झाला. सोमू उभा राहिला व म्हणाला, "आम्हाला बाहेर

जाऊ द्या. वर्गात काही गोंधळ करायची आमची इच्छा नाही." गुरुजी कां कूं करू लागले पण तोवर मणि स्वामिनाथन व वाटाण्याला ढकलीत वर्गाबाहेर पडला होता सोमू व शंकरही त्याच्या पाठोपाठ बाहेर पडले.

शाळेजवळच्या एकाकी शेतावर ते गेले. काही क्षण तणावपूर्ण शांतता होती. तिचा भंग करीत मणि म्हणाला, "तुम्हा तिघा बदमाषांना काय झालंय ?" तिघंही एकाचवेळी बोलू लागले. स्वामिनाथनचा आवाज सर्वात मोठा होता, "तो-तो वाटाण्या त्यानं शेपूट असं लिहिलं, फळ्यावर मोठमोठ्या अक्षरात."

"नाही नाही, मी नाही लिहिलं," वाटाण्या ओरडला. शंकरकडं बोट दाखवत स्वामिनाथन किंचाळला, "इतर दोघानी लिहिलं."

"अरे, हरामखोरा, तू पाह्यलंस का ?" शंकरनं दरडावून विचारलं.

मणीनं त्यांची तोंडे आपल्या हातांनी झाकून घेतली व म्हणाला, "हे शेपूट काय प्रकरण आहे ?" तोवर त्याला त्याबद्दल कोणीच काही सांगितलं नव्हतं.

"मला ते राजमचं शेपूट असं चिडवतात," स्फुंदत स्फुंदत स्वामिनाथन म्हणाला.

मणीच्या चेहऱ्यावरील भाव गोठले व त्यानं विचारलं - "इथं राजमबद्दल बोलयची कोणाची हिंमत आहे ?"

"ओह, हिंमत. . .?" सोमूनं त्याची नक्कल करत म्हटलं.

"तुमच्यापैकी कोणी जर, हिंमत दाखवली असेल तर. . ." मणि गुरगुरला. शंकर व वाटाणा थरथर कापत होते.

"समजा त्यांची हिंमत असेल तर तू काय करू शकणार ?" तुच्छतेनं हसत सोमू म्हणाला.

"तुला काय म्हणायचंय सोमू, काय म्हणायचंय ?"

"हे बघ, मणि," सोमू चढ्या आवाजात म्हणाला, "कधीतरी तुला हे सांगायची मी बरेच दिवस वाट पाहत होतो. तू स्वतःबद्दल व तुझ्या ताकदीबद्दल जरा स्वतःला जादाच समजतोस."

मणीनं आपला हात घुमवला व सोमूच्या मानेवर तो तडाखा देणार एवढ्यात सोमूनं जोरदार ठोसा लगावून तो दूर सारला. मणि एक लाथ मारून सोमूला लोळवणार इतक्यात सोमू दूर झाला व त्यानं मणीला लाथ लगावून जवळ जवळ खालीच पाडलं.

त्या तिघा मुलांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. सोमू व मणि यांची मारामारी ! त्यांना वाटलं या दोघांचीं डोकी काही ठिकाणावर नाहीत. ते एकमेकाला ठार मारणार. त्यांनी एकमेकांकडं अपराध्यासारखं पाहिलं व मग ते शाळेकडे धावत सुटले.

मुख्याध्यापकाकडं जाऊन ते भडभडा बोलू लागले. या क्षणी जवळच्याच शेतात दोन खून पडणार आहेत असा अर्थ त्यांच्या बोलण्यातून मोठ्या मुश्किलीनं मुख्याध्यापकांनी

काढला. हे सारं हसण्यावारी न्यावं असं त्यांना वाटलं. परंतु मुलांच्या चेहऱ्यावरचं गांभीर्य पाहून त्यांनी आपलं हसू आवरलं व ते हनुवटी खाजवू लागले. त्यांनी शिपायाला बोलावलं व त्याच्या सोबत ते शेताकडं निघाले. मारामारी करणारे दोघे शेतात एकमेकावर तुटून पडले होते. मुख्याध्यापक आणि शिपायानं त्यांना सहजगत्या दूर केलं. त्याचं स्वामिनाथनला फारच आश्चर्य वाटलं कारण मणि व सोमू यांच्या इतकी ताकद जगात दुसऱ्या कोणातही नाही असा त्याचा समज होता.

सहा

खरा मित्र

1

तीन आठवड्यानंतर एके दिवशी दुपारी स्वामिनाथननं मणीच्या घरासमोर उभं राहत हलकेच शिटी मारली. मणि बाहेर आला व ते दोघं राजमच्या घराकडं निघाले. दुपारी जर मला भेटायला आलात तर तुम्हाला एक जम्माडी जम्मत देईन असं राजम म्हणाला होता. ती गंमत काय बरं असेल याबाबत दोघं तर्क करू लागले.

“मला वाटतं,” अशी सुरुवात करून स्वामिनाथन म्हणाला, “राजम, केवळ थट्टा करीत असावा. आपण त्याच्या घरी यावं म्हणून बहुधा त्यानं ही युक्ती योजली असावी.” अशी शंका व्यक्त केल्याबद्दल मणीनं त्याला जवळजवळ गटारातच ढकललं.

“बहुधा त्यानं माकड किंवा काहीतरी आणलं असेल,” स्वामिनाथननं पुन्हा प्रयत्न केला. तसं असण्याची शक्यता मणीनं उदारपणं मान्य केली. आपल्याला आश्चर्यचकित करील असं काय बरं असावं यावर त्यांनी खूप विचार केला व अखेरीस तो नाद सोडून दिला.

मग ते आपल्या शत्रूंचा विचार करू लागले, “मी काय करणार आहे तुला ठाऊक आहे ?” मणीनं विचारलं, “मी त्या सोमूचं कंबरडंच मोडणार आहे. तो कुठं राहतो हे मला ठाऊक आहे. बाजारपेठेच्या मागं कबीर रोडवर तो राहतो. बऱ्याचदा रात्री घरातून बाहेर पडून बाजारातील पानवाल्याच्या दुकानी जाताना मी त्याला पाहिलं आहे. आधी मी नगर पालिकेच्या दिव्यावर दगड मारून तो फोडून टाकीन. तुला ठाऊक नाही कबीर रोडवर किती अंधार असतो ते. मी माझा सोटा घेऊन त्याची वाट पाहत थांबीन आणि तो दिसला की मोडलेल्या हाडांनी तो धुळीत लोळत पडेल.” त्या कल्पनेनंच स्वामिनाथन शहारला. “आणि एवढंच नाही काही,” असं सांगून मणि म्हणाला, “त्या वाटाण्याला मी पायेच्या टांचेखाली चिरडणार आणि शंकरला शरयूवरील पिंपळाच्या फांदीला फासावर लटकावं लागणार. . .”



राजमच्या घराजवळ पोचताच त्यांनी बोलणं थांबवलं. फाटक बंद होतं. तेव्हा भिंतीवर चढून त्यांनी आत उड्या मारल्या. एक नोकर त्यांच्या दिशेनं धावत आला व म्हणाला, "भिंतीवर कशाला चढलात ?"

"भिंत काय तुझी मालमत्ता आहे ?" असं विचारून मणि हसत सुटला.

"तुमच्या बरगड्या मोडल्या असत्या म्हणजे. . ." नोकर म्हणाला.

"तुला काय त्याचं ? तुझ्या बरगड्या तर सुरक्षित आहेत, हो की नाही ?" स्वामिनाथननं उद्धटपणे हसत विचारलं.

"आणि एक विचारू," मणि म्हणाला, "तू योगायोगानं पोलिस निरीक्षकाचा तर मुलगा नाहीस ना ?"

"नाही. नाही," नोकरानं उत्तर दिलं.

"मग ठीक आहे तर. आम्ही पोलिस निरीक्षकाच्या मुलाला भेटायला आलोय," हे मणीचं उत्तर ऐकून नोकरानं घाईघाईनं माघार घेतली.

राजमचा दरवाजा त्यांनी जोरजोरानं ठोठावला. दरवाजाची कडी काढण्याचा आवाज येताच दोघंही खांबाआड लपले. राजमनं बाहेर डोकावून पाहिलं व पुन्हा दरवाजा बंद केला.

खांबाआडून ते बाहेर आले आणि दरवाज्यासमोर उभे राहिले. त्यांना काय करावं हे समजेना. स्वामिनाथननं आपलं तोंड कुलुपाच्या भोकाला लावलं व त्यानं मांजरासारखा म्याँव, म्याँव आवाज काढला. मणीनं त्याला दूर केलं व त्या भोकाला तोंड लावीत त्यानं कुत्र्याच्या भुंकण्यासारखा आवाज काढला. पुन्हा कडी काढण्याचा आवाज झाला आणि दार थोडसं किलकिलं झालं. मणि स्वामिनाथनच्या कानात कुजबुजत म्हणाला, "हे बघ, तू आंधळं मांजर नि मी कुत्र्याचं आंधळं पिलू व्हायचं."

मणि गुडघ्यावर वाकला, त्यानं डोळे मिटून घेतले, डोक्यानं दरवाजा ढकलला व आंधळ्या कुत्र्याच्या पिलाच्या भूमिकेत आत रांगत शिरला. डोळे मिटून स्वामिनाथनही रांगत आत शिरला व म्यॉव, म्यॉव करू लागला. ते खोलीभर फिरत राहिले व राजमही हा खेळ पाहत त्यांच्या म्यॉव, म्याँव व भुंकण्याला तसंच प्रत्युत्तर देऊ लागला. कुत्र्याच्या पिलानं एका पायाला अंग घासलं व तो राजमचाच पाय आहे असं समजून पोटरीचा हलकासा चावा घेतला. डोळे उघडले तेव्हा आपण आपला शत्रू सोमूच्या पोटरीचा चावा घेतला हे कळल्यावर उडालेल्या गोंधळाची कल्पनाच केलेली बरी. मांजरीचं पिल्लू एका पायाला ओरखडत होतं, गोंजारत होतं. त्यानं डोळे उघडले तेव्हा आपला शत्रू शंकरचा तो पाय आहे असं लक्षात आलं.

काही क्षण धक्का बसलेल्या अवस्थेतच मणि होता, नंतर त्याचे पाय लटपटले. शरम-संतापानं त्याचा चेहरा थरथरत होता. त्यानं आजूबाजूला पाहिले. कोपऱ्यात बसलेला वाटाणा खट्याळ नजरेनं पाहत होता. त्याच्या नरडीचा घोट घ्यावा असं त्याला वाटलं.

राजम आपल्याकडं लक्षपूर्वक पहातो आहे आणि त्याच्या चेहऱ्यावर गुदमरवून टाकणारं हास्य आहे हे मणीच्या लक्षात आलं.

टेबल किंवा खुर्ची खालील अंधार ही यावेळी आपल्यासाठी सर्वात योग्य जागा आहे असं स्वामिनाथनला वाटत होतं.

"याचा अर्थ काय राजम ?" मणीनं विचारलं.

"तुला एवढं भडकायला काय झालं ?"

"ही सारी तुझीच चूक आहे," तावातावानं मणि म्हणाला, "मला ठाऊक नव्हतं." त्यानं आजूबाजूला पाहिलं.

"ठीक आहे, ठीक आहे. मी काही तुम्हाला रांगायला, भुंकायला सांगितलं नव्हतं. सांगितलं होतं का ?"

सोमू आणि कंपनीला हसू फुटलं. चौफेर नजर टाकीत मणि म्हणाला, "राजम मी जातो. ही काही माझ्यासाठी जागा नाही."

"या पुढं मी तुला कधी भेटू नये, बोलू नये असं वाटत असेल तर खुशाल जा," राजम उत्तरला.

मणि अस्वस्थ होऊन चुळबूळ करू लागला. राजमनं त्याला बाजूला नेऊन शांत केलं. नंतर जणू अनंत वेदनांनी त्रस्त झालेल्या स्वामिनाथनकडं तो वळला. आपल्या आयुष्यात मांजर व कुत्र्याची एवढी चांगली नक्कल आपण कधीच पाहिली नव्हती असं सांगून त्यानं स्वामिनाथनची प्रशंसा केली. काही क्षण तर आपण खरोखरचेच कुत्रा-मांजर तर पाहत नाहीना असा आपल्याला संभ्रम पडल्याचं त्यानं कबूल केलं. जत्रेत त्यांनी हा कार्यक्रम केला तर त्यांना बक्षीसं मिळतील. स्वामिनाथन व मणि पुन्हा जर नक्कल करायला तयार असतील तर त्याला अत्यानंदच होईल व ती पाहायला आपण आपल्या वडिलांनाही बोलवू असं राजमनं सांगितलं.

हे बोलणं राग शमवणारं होतं. स्वामिनाथन व मणीला स्वतःचाच अभिमान वाटला. त्यानंतर आलेला खाद्यपदार्थांचा पुख्खा झोडल्यावर तर दोघं पूर्णतः आनंदी वाटू लागले. मात्र खोलीतील तिघांचा विचार डोक्यात येताच ते कष्टी होत.

ते अशा मनःस्थितीत असताना राजमनं त्यांना दोस्ती या विषयावर व्याख्यान द्यायला सुरुवात केली. मैत्रीबद्दल छाप पडेल अशा गोष्टी तो सांगू लागला. मरायला टेकलेला वृद्ध व त्याची मोळी ही एकतेचं महत्त्व पटवून देणारी गोष्टीच्या पुस्तकातली कहाणी त्यानं वर्णिली. गरजेच्यावेळी उपयोगी पडतो तोच खरा मित्र होय. जे शत्रुत्व वाढवतात त्यांच्या नशिबी काय छळ असतो याची थरारक वर्णनं तो करू लागला. राजमच्या मते वेदांत असं लिहिलं आहे की, जो शत्रुत्व पाळतो त्याला मृत्युनंतर एका छोट्या खोलीत कोंडून ठेवलं जातं. अत्यंत तप्त लोखंडाच्या चौथऱ्यावर त्याला पूर्ण नग्नावस्थेत उभं केलं जातं, त्याच्या भोवती मधमाशाच मधमाशा असतात. लिंबा एवढ्या मधमाशा. सबंध खोलीभर शेकडो

घोणी व वळवळणारे विंचू असतात. त्या पापी इसमानं चौथऱ्यावरून खाली पाय टाकायचा म्हटलं तर तो या घोणी व विंचवावरच पडणार. (ते ऐकताना खोलीतील सोबत्यांच्या अंगावर शहारे उमटले.)

त्या पापी इसमाला महिनाभर असं अन्न पाणी व झोपेविना रहावं लागतं. महिन्यानंतर त्याला दुसरीकडं घेऊन जातात. उकळत्या तेलाच्या तलावावर असलेल्या अत्यंत चिचोळया पुलावर त्याला नेलं जातं. पूल इतका चिंचोळा असतो की, एकावेळी त्यावर एकच पाय ठेवता येतो. पुलावर गांधीलमाशीची घरटी व निवडुंग असतात. त्याला पुलावरून चालत जाण्यासाठी मागून ढकललं जातं. पुलावर एकेक पाय ठेवीत, तोल सांभाळीत त्याला वर्षानुवर्ष चालत रहावं लागतं. तोल गेला तर उकळत्या तलावातच पडायची पाळी येते.

त्याच्या सोबत्यांवर कहाणीचा मोठाच प्रभाव पडला. "चला, पुढं येऊन दिलजमाई करा, यापुढं शत्रुत्व राहिलं नाही असं जाहीर करा पाहू," असं आवाहन राजमनं त्यांना केलं. शकरनं तसं जाहीर केलं तर त्याला बाईंडिग केलेली वही मिळेल, जर स्वामिनाथननं केलं तर त्याला इंजिन मिळेल, सोमू म्हणाला तर त्याला पट्टा दिला जाईल आणि जर मणि म्हणाला तर त्याला छान छोटासा खिशात ठेवायचा चाकू मिळेल आणि वाटाण्याला सुंदर पेन दिलं जाईल.

त्यानं कपाट उघडलं आणि बक्षीसाच्या वस्तू त्यांच्यापुढं खुल्या केल्या प्रत्येक जण नखं कुरतडत बसल्यानं काही क्षण शांतता पसरली. दिलजमाईच्या या प्रयत्नानं राजम घामाघूम झाला होता.

सर्वप्रथम वाटाणा उभा राहिला. कपाटासमोर उभं राहून तो म्हणाला, "मला जरा फौंटन पेन पाहू दे." राजमन त्याला ते दिलं. उलट सुलट करून वाटाण्यानं ते पाहिलं व काहीही शेरा न मारता परत केलं.

"का ? तुला आवडलं नाही वाटतं ?" राजमनं विचारलं.

वाटाणा कपाटातील वस्तूंकडं रोखून पाहत होता. तो म्हणाला, "मी ती पेटी घेतली तर चालेल का ?" पिवळं व काळं नक्षीकाम असलेल्या आणि झाकणावर ताजमहालचं चित्र असलेल्या एका पेटीकडं त्यानं बोट दाखवलं. राजम म्हणाला, "ती मी तुला देऊ शकत नाही. मला ती हवीय." तो थांबला. ट्रंकेत त्याच्याकडं तसल्या अजून दोन पेट्या होत्या. त्यानं आपला विचार बदलला व तो म्हणाला, "नाही मला नकोय ती. तुला हवी असेल तर तू ती घेऊ शकतोस."

थोड्याच वेळात मणि आपल्या तळव्यावर चाकू परजित होता, सोमू पट्टा लावून पाहत होता, शंकर जाडजूड वही हाताळीत होता आणि स्वामिनाथननं एक हिरवं इंजिन आपल्या छातीशी कवटाळलं होतं.

सात

नवा पाहुणा

1

गेले दोन दिवस आई अंथरुणातच पडून होती. स्वयंपाकघरातील तिची गैरहजेरी स्वामिनाथनला जाणवत होती. आपल्याकडं लक्ष द्यायला ती नाही म्हणून तो बेचैन झाला होता. त्याला तिच्या खोलीत नेण्यात आलं तेव्हा ती अंथरुणात निस्तेज, अस्ताव्यस्त पडलेली होती. तिनं त्याला आपल्या जवळ यायला सांगितलं. "तू नीट जेवत का नाहीस, झोपत का नाहीस, एवढा रोड का दिसतो आहेस?" असं आईनं विचारलं. तो तिच्याकडं शून्य नजरेनं पाहत राहिला. आई वेगळीच वाटते आहे. अलिकडं तिच्याशी बोलताना तो कमालीचा थंड व आखडूसारखा वागे. तिला पाहताना त्याला उदास वाटू लागलं. तिच्या मिठीतून सुटका करून घेत त्यानं तिथून पळ काढला.

तुला भाऊ मिळणार आहे असं आजीनं त्याला सांगितलं. या बातमीचं त्यानं अनुत्साहानंच स्वागत केलं.

त्या रात्री त्याला आजीच्या अंथरुणात झोपण्याची परवानगी मिळाली. रात्रभर दिवे जळत होते. जेव्हा जेव्हा त्याला जाग येई तेव्हा तेव्हा बोळकंडीमध्ये चालू असलेली लगबग त्याच्या ध्यानी येई. रात्री खूप उशिरा स्वामिनाथन उठला तेव्हा बैठकीत एक डॉक्टरीण बाई आलेल्या आहेत असं त्यानं पाहिलं. हे सारं घर आपलंच आहे अशा थाटात त्या वावरत होत्या. त्या आईच्या खोलीत शिरल्या. तेथून कुजबुज आणि कण्हण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. त्या गंभीर चेहऱ्यानं बाहेर आल्या आणि प्रत्येकाला हुकूम देऊ लागल्या. त्यांनी बाबांना देखील काहीतरी काम करायला सांगितलं. काही क्षण बाबा अंतर्धान पावले व हातात छोटी बाटली घेऊन प्रकट झाले. ते अस्वस्थपणं येरझाऱ्या घालू लागले. दबत्या स्वरातील आवाज, धावपळ, गांभीर्य, चिडचिड, गरम पाणी, औषधं - नव्या व्यक्तीच्या जगातील आगमनाची ही सर्व पूर्व तयारी स्वामिनाथनला बावचळून टाकणारी होती. दरम्यान आजी येणाऱ्या जाणाऱ्याला काहीतरी विचारीत होती, पण कोणीही तिच्या प्रश्नां

उत्तर देत नव्हता.

स्वामिनाथननं विचार केला हे सारं कशासाठी ? त्यानं काय फरक पडेल ? आजीच्या अंथरुणावरचे पाच गालिचे ऊबदार होते, पाच गुबगुबीत उशा होत्या आणि आजींची आश्वासक सोबत होती आणि त्याच्या पापण्या जड होऊ लागल्या होत्या. त्याला आणखी दुसरं काय हवं होतं ? तो झोपी गेला.



2

दाढी न केलेला चेहरा व नाकावर रूपेरी काड्यांचा चष्मा अशा अवतारातील तामिळ पंडित तामिळ व्याकरणातील गुंतागुंत विद्यार्थ्यांना समजावून देत होते. अनुयायांपेक्षा गुरुजींचाच उत्साह अधिक होता. वर्गात अखंड बडबड चालू होती. छोटे छोटे गट करून मुलं गप्पा मारीत होती. टेबलावर हातानं थपथप करून शांतता प्रस्थापित करण्याचा दुबळा प्रयत्न पंडित करत होते. थोड्या वेळानं त्यांनी तो नाद सोडून दिला व त्यांनी आपलं शिकवण चालू ठेवलं. त्यांचा आवाज फारसा ऐकूच येत नव्हता.

शंकर व काही जण पहिल्या बाकांवर बसले होते. ते लक्षपूर्वक ऐकत होते व टिपणंही काढत होते.

स्वामिनाथन व वाटाणा शेवटच्या बाकावर बसले होते.

"वाटाण्या, ऐकलंस का ? आज सकाळी मला नवा भाऊ मिळाला," स्वामिनाथन म्हणाला.

वाटाण्याला त्यात रस होता. "तुला कितपत आवडला तो ?" त्यानं विचारलं.

"ओह ! आवडला ? तो जवळ जवळ काहीच नाहीय, तो दिसायला इतका गंमतीशीर आहे !" असं स्वामिनाथन म्हणाला. आपला भाऊ कसा दिसतो याची त्यानं आपल्यापरीनं नक्कल केली. त्यानं डोळे मिटून घेतले, ओठ दाबून ठेवले, छातीवर हातांची घडी घातली, जीभ बाहेर काढली आणि डोकं बाजूला झुकवलं. वाटाण्याला ते पाहून हसू आवरेना. "पण," स्वामिनाथन म्हणाला, "त्याचे हात फार सुंदर आहेत. अगदी इटुकले पण गुबगुबीत. पण त्याचा चेहरा मात्र अगदी मिरचीसारखा भयंकर लालेलाल !"

त्यांनी काही क्षण गुरुजींचं व्याख्यान ऐकलं. "स्वामी, या गोष्टी भराभरा वाढतात हं," असं सांगून वाटाणा म्हणाला, "मी एक तुझ्या भावाएवढंच मूल पाहिलं होतं. मी त्याला जेव्हा मायकेलच्या जत्रेत परत पाहिलं तेव्हा ओळखू शकलो नाही."

आठ

परीक्षेपूर्वी

1

एप्रिलमध्ये, परीक्षेला अवघे दोन आठवडे उरले असता आपल्या बाबांमध्ये बदल होतोय आणि तोही आपल्या दृष्टीनं अगदी वाईट असं स्वामिनाथनला जाणवू लागलं. ते कुरकुरे व ताठर बनत चालले होते. आपल्या मुलाला छळायचं असं त्यांनी अचानक ठरवलं असावं. तो आजीशी गप्पा मारताना दिसला तर त्याला बजावलं जायचं, "तुझी परीक्षा आहे हे लक्षात आहे ना? आजी थांबू शकते, परीक्षा नव्हे!" तो आईच्या मागे मागे रेंगाळताना दिसला तर त्याला पकडून अभ्यासाच्या टेबलाशी आणलं जाई. रात्री नऊ वाजता तालुका कचेरीतील टोले वाजल्यानंतरही त्याचा आवाज जर कुठं ऐकू आला तर बाबांच्या खोलीतून आज्ञा सुटे, "स्वामी, अजून झोपायला का नाही गेलास? लौकर उठून अभ्यास केला पाहिजेस." स्वामिनाथनच्या आयुष्यातील हा कसोटीचा काळ होता. एके दिवशी चिडून त्यानं प्रतिप्रश्न केला, "माझ्या परीक्षेबद्दल तुम्हाला एवढं अस्वस्थ व्हायला काय झालं?"

"समजा, तू नापास झालास तर?"

"मी होणार नाही. . ."

"तू जर खूप परिश्रम घेऊन अभ्यास केलास व नीट उत्तरं लिहिलीस तर नाही होणार. समजा तू नापास झालास आणि तुझे वर्गमित्र मात्र तुला मागे टाकून वरच्या वर्गात गेले तर? ज्या दिवशी तुझी परीक्षा संपेल त्या दिवसापासून तुला काय हवं ते तू कर."

स्वामिनाथन विचार करू लागला, खरेच वाटाणा मणि, राजम, आणि शंकर त्याला सोडून सातव्या इयत्तेच्या अ वर्गात जाऊन बसले तर? त्याच्या बाबांचं म्हणणं बरोबरच होतं. आणि मग आपलं म्हणणं पटवताना त्याचे बाबा म्हणाले, "समजा, पाचव्या इयत्तेतील तुला कनिष्ठ असलेले सर्व विद्यार्थी तुझे वर्ग मित्र बनले तर?"

स्वामिनाथन अर्धा तास अंकगणिताचा अभ्यास करीत बसला.



2

परीक्षेच्या विचारानं शाळेतील प्रत्येक जण व्यग्र झाला होता. शंकरच्या चेहऱ्यावर गेले कित्येक आठवडे हसू उमटल्याचं कोणी पाहिलं नव्हतं. सोमू चलाख व जेवढ्यास तेवढंच बोलणारा बनला होता. विनोद कळायला वाटाण्याला वेळ लागत होता व तो स्वतःही विनोद करीत नव्हता, आणि राजम, शाळेची पहिली घंटा होताच शाळेत येई. शिक्षक जे काही सांगतील ते सारं लिहून घेई आणि शेवटची घंटा होताच निघून जाई. या सबंध वेळात तो जेमतेम डझनभर शब्द बोलत असे. मणि चिंताग्रस्त दिसू लागला होता आणि शंकरला बाजूला घेऊन आपल्या शंकांचं (क्रमिक पुस्तकं वाचताना आलेल्या) निरसन करून घेत होता. शाळेतील कारकुनाच्या तो सतत मागं मागं असे. हा कारकून सर्वज्ञ असून सर्व वर्गाच्या सर्व प्रश्नपत्रिका त्याला ठाऊक आहेत असा सर्वसाधारण समज होता.

एके दिवशी मणि कारकुनाच्या घरी गेला व त्यानं ताज्या वांग्यांची एक थैली त्याच्या पायाशी ठेवली. कारकून खूष झाला व त्यानं मणीला बसायला तिपाई दिली.

कारकून खूपच प्रेमळ वाटत होता व त्याक्षणी आपण जे मागू ते तो देईल असं मणीला वाटलं. त्याच्या जवळ घुटमळणाऱ्या व नीट खायला मिळत नसावं असं वाटणाऱ्या त्याच्या मांजराबद्दल कारकून काहीतरी पुटपुटत होता. त्याची बहुतेक बडबड मणीच्या डोक्यात शिरत नव्हती. प्रश्नपत्रिकेचा विषय काढायला तो अत्यंत अधीर झाला होता. दरम्यान कारकुनानं मांजराचा विषय सोडून देऊन माशांबद्दल बडबड चालवली होती. मणीला त्यात काही स्वारस्य नव्हतं, कारकून कधी थांबतो आणि आपण कधी हल्ला चढवतो याची तो वाट पाहत होता. "कधी डोळयांजवळ माशांना गुणगुणू देता कामा नये. डोळ्याचं दुखणं त्यांच्यामुळं होऊ शकतं. डोळा सुजला तर कच्च्या कांद्याचा तुकडा घ्यायचा."

कारकुनाची ही बडबड थांबणं अशक्य आहे हे उमगताच मणि मध्येच म्हणाला, "सर, परीक्षेला आता एक आठवडाच उरला आहे."

कारकून काहीसा बुचकळ्यात पडला, "हो, खरंच एकच आठवडा राहिला की, तुम्ही चांगला रसदार कांदाच घ्यायचा. छोटा नव्हे."

रसदार कांद्याकडं दुर्लक्ष करत मणि म्हणाला, "सर, मला परीक्षेची फार काळजी वाटते," दीनवाणं दिसण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला.

"मला खुशी आहे. तू मन लावून अभ्यास केलास तर पास होशील," त्यानं जणू देववाणीच उच्चारली.

"सर, मला खूप काळजी वाटते हो, परीक्षेच्या विचारानं मला रात्र रात्र झोप लागत नाही. तुम्ही मला काही महत्वाचं सांगू शकलात तर. मला कितीतरी अभ्यास करायचाय

आणि परीक्षेला ज्याची गरज नाही अशा अनावश्यक बाबींचा अभ्यास करायची माझी इच्छा नाही," वळणावळणानं त्यानं आपलं म्हणणं त्याच्यापर्यंत पोचवलं. त्याला काय म्हणायचंय हे कारकुनालाही उमगलं· पण तो म्हणाला, "तू नेमून दिलेला सर्व भाग वाचून काढ म्हणजे पास होशील." युक्ती लढवून आपल्याला हवे ते काढून घेणं आपल्याला जमायचं नाही हे लक्षात आल्यावर मणीनं सरळसरळच विचारलं, "परीक्षेत कुठले प्रश्न येणार हे सांगाल का सर."

"प्रश्नपत्रिकेबाबत आपल्याना काही माहिती नाही," असं कारकून सांगू लागला. "तुम्हाला नाही तर मग दुसऱ्या कोणाला ठाऊक असणार?" असं म्हणत मणि त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवू लागला. त्याची अशीच प्रशंसा करत राहिल्यावर कारकुनानं त्याला, 'मौल्यवान सूचना,' दिल्या असं मणीला वाटलं. सहाव्या इयत्तेचा अभ्यासक्रम ठाऊक नसूनही कारकुनानं त्याला सल्ला दिला की, "भूगोलावर तू खास लक्ष केंद्रित करायला हवं. नकाशा काढायचा तुला खूप सराव करायला लागेल. आणि अंकगणितातील पाच उदाहरणं तरी दररोज सोडवत जा. त्यामुळे तू जितक्या सहजतेनं केळी गट्ट करतोस ना तितक्या सहजतेनं तुला गणितं सोडविता येतील."

"आणि इंग्रजीचं काय?"

"ओह! त्याबद्दल काही काळजी करू नकोस, तू सर्व धडे वाचले आहेस ना?"

"हो, सर," हे उत्तर देताना त्याच्या आवाजात ठामपणा नव्हता.

"मग ठीक आहे. सर्व महत्वाचे धडे तू पुन्हा वाचले पाहिजेस, आणि वेळ असेल तर आणखी एकदा वाचून काढले पाहिजेस, एवढं पुरे होईल."

या उत्तरांनी मणीचं खूप समाधान झालं. वांगी खरेदी करण्यासाठी आपण केलेली चार आण्यांची गुंतवणूक काही अगदीच वाया गेली नाही या बद्दल तो घरी परतताना स्वतःवरच खूष झाला.

3

मणीला स्वतःलाच आपण खूप मोठे महत्वाचे आहोत असं वाटत होतं. महत्वाच्या सूचना न मिळाल्यानं वर्गमित्रांना अभ्यासाठी ढोर मेहनत करावी लागत आहे हे पाहून मनातल्या मनात त्याला त्यांची कींव वाटत होती. आपल्याला कुठून माहिती मिळाली हे न सांगता ती माहिती स्वामिनाथनलाही द्यावी असं त्याला वाटलं.

शाळेतून ते घरी परतत होते. एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वी विनायक मुदली व ग्रोव्ह रस्त्यांच्या नाक्यावर ते काही क्षण थांबले. मणि म्हणाला, "परीक्षेत काय प्रश्न येणार आहेत याची तुला काही कल्पना आहे का?"

"आपल्या क्रमिक पुस्तकाबाहेरचं काही विचारणार नाहीत."

त्याच्या विनोदाकडं दुर्लक्ष करीत मणि म्हणाला, "आता मी काय सांगतो त्याकडं काळजीपूर्वक लक्ष दे. काल रात्री सात ते दहा पर्यत मी काय केलं असेल असं तुला वाटतं ?"

"शेंगदाणे चघळत बसला असशील."

"गाढवा, उगीच विनोद करत बसू नकोस. मी भारताचे दोन नकाशे काढले, दोन आफ्रिकेचे आणि एक युरोपचा."

"म्हणजे ॲटलास मधील सर्वच नकाशे काढलेस असं सांग की."

"हं, शक्य आहे," त्याचं म्हणणं मणीला फारसं रुचलं नव्हतं. "काही विशिष्ट हेतूनं मी हे केलंय. कदाचित मला एक दोन प्रश्न ठाऊक असतील. पण इतरांना यातलं काहीही कळू देऊ नकोस. नाहीतर मला त्रास व्हायचा." स्वामिनाथनवर त्याच्या गंभीर वागण्याचा परिणाम झाला व त्यातून जो काही निष्कर्ष काढायचा त्यानं तो काढला.

4

घरी पोचताना स्वामिनाथनला काहीसं जड, उदास वाटत होतं. त्याची आई घरी नव्हती, आजी काही बोलण्याच्या मूडमध्ये नव्हती. दिवसातील काही रोमांचकारी घटना तो तिला सांगू लागला, "आज आमच्या शाळेत काय झालं असेल याची कल्पना करून बघ. पहिल्या 'क' तुकडीतल्या एका मुलानं दुसऱ्याला छोट्या चाकूनं कोपराच्या खाली भोसकलं."

"का बरं ?" तिनं यांत्रिकपणं विचारलं.

"ते एकमेकाचे शत्रू आहेत." या घटनेचा आजीवर काहीच परिणाम झालेला नाही हे पाहून दिवसातील दुसरी सर्वात मोठी घटना तो सांगू लागला, "आजी, आजी आमचे मुख्याध्यापक दरवाज्याशी ठेचकाळले. किती रक्त आलं म्हणून सांगू ! शाळेत सबंध दिवस ते लंगडतच फिरत होते. त्यांना तिसऱ्या इयत्तेचा वर्गही घेता न आल्यानं सुटी द्यावी लागली. नशिबवान लेकाचे !"

"अस्सं काय ?" आजीनं विचारलं.

आपली आजी अगदी झोपाळली आहे असं पाहून स्वामिनाथन वैतागला.

आपल्या भावाच्या पाळण्याजवळ तो रेंगाळला. सुरुवाती सुरुवातीला त्याच्याबद्दल, त्याच्या दिसण्याबद्दल तो उदास असला तरी अलिकडे दिवसेंदिवस त्याच्याबद्दल त्याला आस्था वाटू लागली होती. तो इटुकला आता सहा महिन्याचा झाला होता नि छान गोंडस दिसू लागला होता. कोणालाही पाहिलं की तो चित्रविचित्र आवाज काढी, आपल्या मुठी तोंडात घाली, कोपरापर्यंत हात ओले करी, हवेत जोरजोरानं लाथा झाडी आणि हसून

आपल्या लाल हिरड्यांचं अधून मधून प्रदर्शन करी. त्याची प्रत्येक गोष्ट स्वामिनाथनला आवडे. पाळण्याच्या काठावर स्वतःचा तोल सावरीत तो तास न् तास उभा राही आणि त्याला "स्वामिनाथन" म्हणायला लावायचा प्रयत्न करी. तो इटुकला गुडगुड आवाज काढी व स्वामिनाथन कर्कश्य आवाज काढी. आपल्या नावाचा छोट्यानं केलेला हा उच्चार आहे हे तो भासवी.

आता त्यानं डोकावून पाहिलं तेव्हा बाळ झोपलेला पाहून त्याची निराशा झाली. तो उठेल या आशेनं तो जोरानं खाकरला. पण तो झोपूनच राहिला. स्वामिनाथन क्षणभर थांबला व मग तेथून बाहेर पडला. बाळाला असंच सोडलेलं बरं कारण झोपेतून उठला की पहिला अर्धा तास तो सारं घर दणाणून सोडत असे.

सायंकाळी घरात बसून राहणं फारच त्रासदायक असे. शरयूचा वाळूचा किनारा आणि मणीची संगत त्याच्या विचारानं त्याला बरं वाटलं. परंतु परीक्षेपर्यंत बाहेर जायला बाबांनी बंदी घातली होती. आपल्याला त्यांच्याबद्दल काय वाटतं हे बाबांना सांगावं असं त्याला नेहेमी वाटे. पण तसं करायचं ठरवलं की ऐनवेळी मात्र धीर होत नसे. कसं का असेना केवळ एक आठवडाभर तर त्रास सहन करायचा आहे या विचारानं त्याला जणू नव्यानं हुरुप आला.

टेबलाशी बसून त्यानं अॅटलास उघडला. युरोपचा राजकीय नकाशा तो पाहू लागला. युरोपसारख्या इतक्या ओबडधोबड देशात लोक राहतात तरी कसे असा प्रश्न त्याला पडला. जेथे देशाचा आकार भूशिरासारखा निमुळता झाला आहे तेथील लोकांचा आकार कसा असेल अशी शंका त्याला सतावू लागली. आपल्या देशाच्या त्या चिंचोळया सीमारेषेत ते गुदमरून कसे जात नाहीत असा प्रश्न त्याला पडे. आणि नेहमीच पडणारा एक प्रश्न त्याला सतावू लागला, हे नकाशे बनवणारे देशाचा आकार कसा आहे हे कसं शोधून काढतात ? युरोप हा उंटाच्या डोक्याच्या आकाराचा आहे हे त्यांनी कसं शोधून काढलं. कदाचित ते उंच मनोऱ्यावर उभं राहून खाली दिसणाऱ्या गोष्टी काढीत असतील. टाऊन हॉलच्या वर उभं राहून नकाशात दिसतो तसा भारत आपल्याला दिसू शकेल का असा प्रश्न त्याला पडला. तो तिथं कधीच गेला नव्हता व तिथं जायची त्याची इच्छा पण नव्हती. टाऊन हॉलच्या वरच्या मजल्यावर एक छळ कोठडी असून तिथं पठाण तरुण मुलांना नेत असतात असं त्याला रंगा शिंपी नेहमी सांगत असे.

त्यानं आपल्या अभ्यासिकेत युरोपचा नकाशा काढला. त्यानं मूळ नकाशा व आपण काढलेला नकाशा जवळ जवळ ठेवला तेव्हा स्वतःच्या चित्रकलेचं त्यालाच कौतुक वाटलं. खरं तर त्याचा नकाशा म्हणजे एक विचित्र प्राणीच वाटत होता, काही भाग बैलाच्या तोंडासारखा व काही उंटाच्या तोंडासारखा दिसत होता.

सात वाजून गेले होते व त्याचे बाबा घरी आले होते. आपला मुलगा घरी अभ्यास करीत बसलेला पाहून त्यांना अत्यानंद झाला. नकाशाकडं पाहत ते म्हणाले, "वा अगदी



बरोबर." आपली सध्याची काळजी विसरावयाला लावील असा तो क्षण स्वामिनाथनला वाटला. त्यानं पानं उलटली व आफ्रिकेचा नकाशा काढला.

5

परीक्षेच्या आधी दोन दिवस आपल्याला लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची यादी करण्यासाठी तो बसला. एका कागदाच्या चिटोऱ्यावर त्यानं लिहिलं :

बिनरेघांचे शुभ्र कागद	20 ताव
निफा	6
शाई	2 बाटल्या
क्लिपा	–
टांचण्या	–

पेन्सिल कुरतडत त्यानं यादी पुन्हा वाचली. ती निराशाजनक होती. आपल्या गरजा इतक्या कमी आहेत याची त्याला कधी जाणीव झालेली नव्हती. तो प्रथम यादी करायला बसला तेव्हा निदान दोन किंवा तीन पानं तरी भरतील अशी त्याची अपेक्षा होती. परंतु कागदावरच्या अवघ्या पाच ओळीच भरल्या होत्या. त्यानं यादी पुन्हा नजरेखालून घातली. बिनरेघांचे कागद : वीस ताव. आपण बिनरेघांचेच कागद वापरण्याबाबत आग्रही का

असतो असा सवाल त्यानं स्वतःलाच केला. लिहिताना कागदाच्या उजव्या कोपऱ्यात त्याच्या ओळी तिरक्या होत जात हे त्याला ठाऊक होतं. हे परीक्षेत चालणार नव्हतं. तेव्हा रेघांचे कागद बरोबर घेणे आवश्यक आहे. आणि निफा. परीक्षेत एखाद्याला किती निफांची आवश्यकता असते. एक ? दोन ? पाच. . .? आणि शाई पण त्याला सतावू लागली. शाई तरी किती खरेदी करून ठेवायची ? क्लिपा व टाचण्याबद्दलही त्याच्या मनात गोंधळ उडाला होता. त्या आपल्याला निश्चित किती लागतील याची त्याला मुळीच कल्पना नव्हती व त्या कोणत्या प्रमाणात खरेदी करतात याबद्दल तो पूर्णतः अनभिज्ञ होता. दुकानदाराकडं जाऊन सहा टांचण्या व सहा क्लिपा मागितल्या तर त्याला त्याचा अपमान झाल्यासारखं नाही ना वाटणार ?

शेवटी त्यानं यादी सुधारली ती अशी :

बिनरेघांचे शुभ्र कागद	20 ताव
रेघांचे शुभ्र कागद	10 ताव
काळी शाई	1 बाटली
क्लिपा	12
टांचण्या	12

तरीसुध्दा यादी समाधानकारक नव्हती. थोडावेळ विचार केल्यावर त्यानं पुठ्ठ्याचा तक्ता एक आणि जादा खर्चासाठी एक रुपया अशी यादीत भर घातली.

त्याचे बाबा त्यांच्या कार्यालयात कामात गढले होते. यादी हातात घेऊन स्वामिनाथन त्यांच्या पुढ्यात उभा राहिला. त्याचे बाबा कामात इतके गुंग झाले होते की, स्वामिनाथन तिथं आलाय हे त्यांना समजलंच नव्हतं. दुसऱ्या कोठल्या तरी वेळेस बाबांना गाठावं असं स्वामिनाथनला अचानक जाणवलं. जेवणानंतर जर आपण हा विषय काढला तर अधिक बरं असं त्याला वाटलं. तो हळूच बाहेर पडला. तो दरवाज्या बाहेर पडत असताना त्याच्या बाबांनी विचारलं, "कोण आहे तिथं ?" त्यांच्या आवाजात मैत्रीचा सूर नव्हता. "मी विचारतोय कोण आहे तिथं ?" बाबा गर्जले. इथून पोबारा करावा की थांबून उत्तर द्यावे हे ठरवेपर्यंत रागीट मुद्रेनं बाबाच त्याच्याजवळ येऊन उभे ठाकले.

"तू आहेस काय ?"

"होय."

"अरे, मूर्खा, मग तुला उत्तर द्यायला काय झालं ? मी आपला कोण आहे ? कोण आहे ? असं ओरडत धावतोय. या घरात क्षणभर देखील शांतता मिळणं कठीण आहे. मी आपला इथं काम करतोय पण प्रत्येक पाचव्या सेकंदाला कोणी ना कोणी मूर्खासारखा प्रश्न घेऊन येतोय. मी माझं काम कसं करू ? जा आणि तुझ्या आईला सांग की, तिनं उरलेल्या सबंध दिवसात माझ्या खोलीत येता कामा नये. सर्व तेलवाल्यांची पलटण आली अथवा भाजीवाल्यांनी पैशांसाठी भुणभुण लावली तरी मला त्याची पर्वा नाही. त्यांना बाहेर

हाकून लाव म्हणावं. तुझ्या आईला वाटतं की. . . हं, तुझ्या हातात तो कागद कसला आहे ?"

"काही नाही, काही नाही बाबा," खिशात तो कागद कोंबीत स्वामिनाथननं उत्तर दिलं.

"काय ते ?" असं ओरडत त्यांनी यादी हिसकावून घेतली. रागारागानं त्यांनी यादीवर नजर टाकली. ते खुर्चीत जाऊन बसले व विचारलं, "हे काय बरं आहे ?"

तोंडातून शब्द फुटण्याआधी स्वामिनाथनला दोनदा खाकरावं लागलं. "ती-ती माझी परीक्षेची यादी आहे."

"कसली परीक्षेची यादी ?"

"परवा माझ्या परीक्षेला सुरुवात होणार आहे."

"आणि तरी देखील तू एखाद्या मोकाट गाढवासारखा घरभर भटकतो आहेस ! आणि ही कसली वेडपटासारखी यादी आहे ? तुला काय वाटतं रुपये, आणे, पै आभाळातून पडतात ?"

अगदी तसंच नसलं तरी जवळपास तसंच स्वामिनाथनला वाटत होतं. बाबांनी खण उघडला व त्यात डोकावीत ते म्हणाले, "यातून तुला काय हवं ते घे. माझ्याकडे क्लिपा नाहीत. तुला त्यांची गरजही नाही. आणि हा तक्ता ? कशाला हवाय तुला तक्ता ? तुमच्या वर्गात बाकं नाहीत काय ? आमच्या काळात पाट्या पुरेशा असत. पण आता तुला पेन, कागद, कागदाखाली धरायला तक्ता हवा ?" त्यांनी एक खराब तांबडी पेन्सिल काढली व यादीतील "तक्ता" शब्दावर फुली मारली. त्यामुळे जणू सबंध यादीलाच जखम झाली. त्यांनी ती यादी स्वामिनाथनकडं भिरकावली. तिच्याकडं त्यानं दुःखानं पाह्यलं. हातात नाणी खुळखुळवत अमीर मार्टमधे जाऊन वस्तू खरेदी करण्याचं किती रम्य चित्र त्यानं रंगवलं होतं !

तो बाहेर पडत असताना त्याला परत बोलावून बाबा म्हणाले, "हे बघ जाताना बाळाला बैठकीतून हलव बरं. त्याचं मूर्खासारखं रडणं मला सहन होत नाही. त्याला झालंय तरी काय ? तुझी आई बहिरी आहे की ती कठोर बनलीय ? रडून रडून त्या बाळाला फेफरं येईल पण तिला त्याची काही पर्वा आहे का ?"

नऊ

शाळेला सुटी लागते तेव्हा. . .

1

अखेरच्या दिवशी तो परीक्षा दालनातून बाहेर पडला तेव्हा त्याचे ओठ कोरडे पडले होते, घसा शुष्क झाला होता, बोटं शाईनं बरबटलेली होती. तो खूप थकला होता. त्याला सुटका झाल्याचा अत्यानंदही झाला होता.

व्हरांड्यात उभं राहून त्यानं दालनात नजर टाकली तेव्हा तो काहीसा अस्वस्थ झाला. वेळ संपण्याआधी वीस मिनिटं त्यानं जशी उत्तरपत्रिका देऊन टाकली तशीच सर्व मुलांनी दिली असती तर त्याला अधिक बरं वाटलं असतं. भितीवर डावा खांदा टेकवून बसलेल्या शंकरला जणू जगाचाच विसर पडला होता. दुसऱ्या लहान खिडकीखाली आठव्या इयत्तेतील दोन मुलांच्या मध्ये बसलेला राजम तर जणू लिहिणारं यंत्रच वाटत होता. मणि अजूनही छपराच्या वाश्यांकडं पाहत पेननं हनुवटी खाजवीत होता. वाटाणा आपल्या जागेवर मागे रेलून उत्तरांची उजळणी करत होता. एक निरीक्षक खुर्चीतच डुलक्या घेत होते तर दुसरे शून्य नजरेनं येरझाऱ्या घालत होते. भरभरा लिहिणाऱ्या निफांचे आवाज, कागदांची सळसळ आणि घसे खाकरण्याचे आवाज त्या खोलीतून येत होते.

आपण एवढ्या लौकर बाहेर पडायला नको होतं असं स्वामिनाथनला वाटलं. पण तो परीक्षा हॉलमध्ये आणखी किती वेळ बसू शकला असता ? तमिळच्या प्रश्नपत्रिकेची वेळ सायंकाळी पाचपर्यंत होती. तो शेवटच्या प्रश्नाच्या उत्तराची अखेरची ओळ लिहित होता तेव्हा साडेचार वाजले होते. एकूण सहा प्रश्नांपैकी पहिला त्यानं समाधानकारकपणं सोडवला होता, दुसऱ्याबद्दल तो साशंक होता, तिसरा समाधानकारक होता, चौथा अगदी चुकीचा होता (पण त्याला बरोबर उत्तर ठाऊक नव्हतं). सर्वात उत्तम उत्तर सहाव्या प्रश्नाचं देता आलं होतं. त्याचं उत्तर लिहायला एक मिनिटच लागलं होतं. साडेचारला दोन मिनिटं उरली असताना त्यानं प्रश्न वाचला, एक मिनिटानंतर त्यानं उत्तर लिहायला घेतलं व साडे चार पर्यंत त्याचं लिहून झालंही. प्रश्न होता "ब्राह्मण आणि वाघ, या गोष्टीचं काय तात्पर्य

काढाल?" (एक ब्राह्मण तळ्याच्या काठानं चालला होता. दुसऱ्या किनाऱ्यावरून एका वाघानं त्याला हाक मारली आणि सोन्याची बांगडी देऊ केली. सुरुवातीला ती घ्यायला ब्राह्मणानं नकार दिला पण जेव्हा वाघ आपण प्रामाणिक आहोत हे वारंवार सांगू लागला व बांगडी घेण्याचा आग्रह करू लागला, तेव्हा पाण्यातून वाट काढीत तो गेला पण बांगडीसाठी हात पुढं करण्याआधी तो वाघाच्या पोटात गेला होता.) या गोष्टीला काही तात्पर्य आहे असं स्वामिनाथनला वाटत नव्हतं. परंतु प्रश्नपत्रिकेत विचारलंय त्या अर्थी काही तरी तात्पर्य असणारच. त्यानं क्षणभर विचार केला 'वाघानं सोन्याच्या बांगड्या दिल्या तर त्या आपण कधी घेता कामा नयेत,' हे तात्पर्य असेल की, 'सोन्याच्या बांगड्याच्या लोभानं जीव गमवावा लागतो' हे असेल असा त्याला प्रश्न पडला. पण दुसरं तात्पर्य हे अधिक तर्कसंगत आहे असं वाटल्यानं त्यानं ते लिहून टाकलं. त्यानंतर त्यानं हॉलमधील मोठ्या घड्याळावर नजर टाकली. अजून अर्धा तास होता. एवढा वेळ करायचं काय? प्रथम बाहेर पडणं त्याला जरा विचित्र वाटत होतं. इतरही त्याच्या इतकीच झटपट आणि नेमकी उत्तरं का बरं नाही देत?

वेळ कसा घालवावा हे त्याला उमजेना. तीन तासांऐवजी अडीच तासच प्रश्नपत्रिका सोडवायला वेळ का नाही ठेवला? बाहेरच्या व्हरांड्याकडं त्यानं उत्सुकतेनं पाहिलं. उत्तरपत्रिका देऊन बाहेर पडण्याचं धैर्य त्यानं दाखवलं की मग बराच काळ त्याला परीक्षेला बसावं लागणार नव्हतं - त्याला जे हवं ते तो करू शकणार होता-संध्याकाळी दुपारी, सकाळी शहरात भटकू शकणार होता. पुस्तक भिरकावून देऊ शकणार होता आणि न संपणाऱ्या गोष्टी ऐकव असा आजीला हुकूम सोडू शकणार होता.

निरीक्षकाचं आपल्याकडे लक्ष आहे असं ध्यानात येताच आपण उत्तरपत्रिका सोडवण्यात गर्क असल्याचं तो भासवू लागला. तसं करताना थोडी उजळणी करून टाकावी असं त्याला वाटलं. पहिल्या प्रश्नाच्या काही ओळी तो वाचू लागला व त्याला कंटाळा आला. त्यानं पानं उलटली व शेवटच्या उत्तराकडं तो रोखून पाहत बसला, तो उत्तर पुन्हा तपासतो आहे असं त्याला भासवायचं होतं. वाघाच्या गोष्टीचं तात्पर्य तो इतक्या वेळ बघत बसला की त्याचा जणू अर्थच गमावला. त्यानं पेन काढून कामाला सुरुवात केली. शेवटच्या ओळीनंतर जी आडवी लहान रेघ त्यानं उत्तर पत्रिका संपल्याची खूण म्हणून केली होती ती रेघ तो गिरवीत बसला. त्या रेघेचा गुंतागुंतीचा आकार बनेपर्यंत त्याचं हे गिरवणं चालूच होतं.

आता जवळ जवळ पाच वाजले असावेत या अपेक्षेनं त्यानं घड्याळाकडं पाहिलं. साडेचार वाजून दहाच मिनिटं झाली होती - त्यानं दोन -तीन मुलांना उत्तर पत्रिका देऊन बाहेर पडताना पाहिलं तेव्हा त्याला हायसं वाटलं. त्यानं उत्तरपत्रिकेची घडी केली व त्यावर लिहिलं –

तमिळ   तमिळ

डब्लू एस. स्वामिनाथन
सहावी अ
अल्बर्ट मिशन स्कूल
मालगुडी
दक्षिण भारत
आशिया

2

घंटा घणघणली. दोन-दोन, तीन-तीनच्या गटागटानं मुलं वर्गाबाहेर पडली. तीन तासापूर्वी पेक्षा आता अगदी वेगळं वातावरण होतं. उत्साही बडबडीचा आवाज वाढला होता.

"शेवटच्या प्रश्नाचं काय उत्तर लिहिलंस," स्वामिनाथननं एका वर्गमित्राला विचारलं.

"कोणता?" तात्पर्यवाल्या प्रश्न ना?' तुला गुरुजींनी वर्गात सांगितलेलं आठवत नाही का? सोन्याच्या लोभानं ब्राह्मणाला त्याचा जीव गमवावा लागला?"

"तिथं सोन्याचा काय संबंध?" स्वामिनाथननं आक्षेप घेतला. "तिथं तर एक सोन्याची बांगडी होती. तू किती मोठं उत्तर लिहिलंस?"

"एक पानभर," वर्गमित्रानं उत्तर दिलं.

स्वामिनाथनला त्याचं हे उत्तर आवडलं नाही. त्यानं फक्त एका ओळीत उत्तर लिहिलं होतं. "अरे! एवढं तू लिहायला नको होतंस."

थोड्या वेळानं त्याला राजम व शंकर भेटले. "गड्यांनो, तुम्हाला कसे वाटले प्रश्न?"

"तुला कसे वाटले?" शंकरनं विचारलं.

"वाईट नव्हते," स्वामिनाथन म्हणाला.

"मला फक्त तमिळचीच भीती वाटत होती," असं सांगून राजम म्हणाला, "आता मात्र मला निश्चित वाटतंय. मला पास होण्याइतके गुण मिळतील असं वाटतंय."

"छे! नक्कीच जास्तच मिळतील. 'अ' दर्जा," शंकर म्हणाला.

"अरे तुला कळलं का? काही मूर्खांनी त्या तात्पर्यवाल्या प्रश्नाचं पानभर उत्तर लिहून ठेवलं," स्वामिनाथन म्हणाला.

"मी पाऊण पानच उत्तर लिहिलं," राजम म्हणाला.

"आणि मी अर्ध्यापेक्षा जरा जास्त," शंकर म्हणाला. तो या बाबतीत अगदी प्रवीण होता.

"मी पण बहुतेक तेवढंच लांब-म्हणजे अर्धापान उत्तर लिहिलं," स्वामिनाथननं थाप ठोकली. क्षणभर त्याचाही त्यावर विश्वास बसला.

"उद्यापासून आपल्याला शाळा नाही हे ठाऊक आहे ना?"

"ओह! मी विसरलोच होतो," राजम म्हणाला.

"तुम्ही काय करणार आहात?" कोणीतरी विचारलं.

"स्वयंपाकघरात जळण म्हणून मी माझ्या पुस्तकांचा वापर करणार आहे," स्वामिनाथन म्हणाला.

"सुटीत वाचायसाठी माझ्या वडीलांनी खूप पुस्तकं आणली आहेत. खलाशी सिंदबाद, अलिबाबा आणि इतर खूप," शंकर म्हणाला.

आपले हात फैलावीत व कुरकुरतच मणि आला. "वेळ फारच कमी पडला. शेवटचा प्रश्न मी लिहू शकलो असतो."



कुठूनतरी वाटाणा उगवला. त्याच्या डाव्या गालावर शाईचा मोठा फराटा होता. "काय शंकर, पहिला वर्ग मिळणार ना?"

"अहं. कसेबसे पस्तीस टक्के मिळतील."

"तू हरामखोर आहेस, खोटं बोलतोयस. तुला पहिला वर्ग मिळाला तर तुझ्या केसाचा एक झुबकाच कापून टाकीन," मणीनं म्हटलं.

पंधरा मिनिटानंतर पुन्हा घंटा घणघणली. सर्व शाळा मोठ्या हॉलमध्ये भरली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता व शब्दातून मैत्री पाझरत होती. गुरुजीदेखील प्रेमळ व प्रसन्न वागायचा प्रयत्न करत होते. एब्नेझारची नजर मणीवर गेली व त्यांनी विचारलं, "काय रे टोण्या, तू तुझी सुटी कशी वाया घालवणार?"

आपल्या मित्रांकडे पाहून डोळे मिचकावित तो म्हणाला, "मी झोपणार आहे, सर."

"पुन्हा शाळेत येशील तेव्हा तुझ्या डोक्यात सुधारणा झाली असेल का?"

"तुम्ही जोवर शंकरचं डोकं उडवून मला देत नाही तोवर सुधारणा होणं कसं शक्य आहे?" या उत्तरानं जोरदार हशा उसळला. ते वातावरणच असं होतं की, कशानंही हास्याची कारंजी उसळत होती. चित्रकलेचे शिक्षक गंमतीनं काहींच्या पायांवर छडी मारत होते कारण त्यांना तळवे फारच लांब वाटत होते म्हणे!

व्यासपीठावर मुख्याध्यापक आले, आवाज कमी होण्यासाठी काही क्षण ते थांबले व मग एक छोटसं भाषण त्यांनी केलं. 19 जूनपर्यंत शाळा बंद राहणार असून 20 जूनला ती पुन्हा सुरू होईल असं त्यांनी सांगितलं. वेळ वाया न घालवता मुलं गोष्टीची पुस्तकं वाचतील तसंच पुढच्या वर्गासाठी नेमलेली पुस्तकं वाचतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. बहुतेक मुलं पुढच्या वर्गात जातील अशी आशाही त्यांनी प्रकट केली. "हं आता एकच मिनिट. आता प्रार्थना होईल व मग मुलं घरी जाऊ शकतात," असं त्यांनी जाहीर केलं.

प्रार्थनेच्या शेवटी जणू भन्नाट वादळच घोंघावू लागलं. प्रचंड आवाज, आरडा ओरडा करीत सर्वजण हॉलमधून बाहेर पडू लागले. त्या गडबड, गोंधळ व बेशिस्तीतही स्वामिनाथन मणीला धरून होता. अखेरच्या दिवशी शत्रुत्व असलेले विद्यार्थी एकमेकांना भोसकतात असा सर्वसाधारण समज होता. आपल्याला कोणी शत्रू नाही असं स्वामिनाथनला वाटत होतं. पण काही भरवसा नव्हता. शाळा तशी वाईट जागा होती.

मणीनं प्रवेशद्वाराशी झटपट कामागिरी पार पाडली. जमेल तेवढ्यांच्या शाईच्या बाटल्या, पेने हिसकावून घेऊन त्यानं ती नष्ट करून टाकली. त्याच्या भोवती आनंदानं, चैतन्यानं उसळणारी गर्दी होती. प्रत्येक वस्तू नष्ट करताना जोरजोरानं आरोळ्या दिल्या जात होत्या. एक-दोन मुलांनी कुरकुर करायचा प्रयत्न केला पण मणीनं त्यांच्या हातातून शाईच्या बाटल्या हिसकावून घेतल्या, त्यांच्या टोप्या फाडल्या व शाई त्यांच्या कपड्यांवर ओतली. त्याला काही जण मदत करत होते. त्यात स्वामिनाथन प्रामुख्यानं दिसत होता.

त्या वातावरणाचा त्याच्यावर एवढा परिणाम झाला की, त्यानं स्वतःच शाईची बाटली आपल्या डोक्यावर उपडी केली ! त्यामुळं त्याच्या डोळ्याखाली गडद वर्तुळं उमटली व शाईचे थेंब ठिबकू लागले.

रस्त्यानं एक पोलिस जात होता. मणीनं ओरडून त्याला सांगितलं, "अहो पोलिसदादा, पोलिसदादा, या मुलाना अटक करा." शेकडो गळ्यातून विजयोन्मादाच्या आरोळ्या उमटल्या. आणखी काही शाईच्या बाटल्या जमिनीवर आपटून फोडण्यात आल्या आणि काही पेनं मोडून टाकण्यात आली. मध्येच मणि म्हणाला, "मला सिंगारामची पगडी कोण आणून देईल ? मला ती रंगवायची आहे."

त्या मुक्त वातावरणाचा काहीही परिणाम न झालेला शाळेचा शिपाई सिंगाराम ही एकमेव व्यक्ती होती. आपली पगडी रंगवायचा बेत आहे हे त्याच्या कानावर येताच मोठी काठी घेऊन विद्यार्थ्यांना पांगविण्यासाठी तो त्या घोळक्यात घुसला.

दहा

गाडीवानाचा मुलगा

1

स्वामिनाथनला दोन प्रकारचे मित्र होते. सोमू, शंकर व वाटाणा हे शाळेपुरते मित्र. शाळेचे दरवाजे बंद झाले की आपोआप ही मैत्रीही संपुष्टात येई. राजम व मणि यांच्याशी त्याची असलेली दोस्ती ही अधिक नैसर्गिक जिव्हाळ्याची होती. आता त्यांना शाळा नसल्यानं वेळेचं कसलंही बंधन नव्हतं, ते नेहमी बरोबरच असत व सुटीचा काळ धावपळीत घालवीत.

एक वर्तुळाकार चकरी मिळवायचीच असा स्वामिनाथनला ध्यास लागला होता. रात्रंदिवस त्याला त्याचीच स्वप्नं पडत होती. टायर आणि स्पोक्स नसलेल्या सायकलच्या चाकाची तो कल्पना करी. खाचेत काठी दाबली की चाक उडू लागेल. छोटे अडथळे ओलांडून जाताना आणि सफाईनं वळणं घेताना ते किती मोहक दिसेल ! चाक पळताना त्याचा सतत गुणगुण आवाज होत असतो व ते कानांना संगीत असतं. या आवाजामुळे तो येतोय हे मालगुडीतील कोणालाही एक मैलावरूनही कळेल असं स्वामिनाथनला वाटलं. या लोखंडी चकरीचा विचार करीत तो कधीकधी रात्री साडेदहापर्यंत जागा असे. जो कोणी भेटेल-अगदी वडिलांच्या मित्रापासून ते त्याला माहीत असलेल्या नगरपालिकेच्या झाडूवाल्यापर्यंत - त्याला तो सायकलचं एखादं चाक मला आणून द्या अशी विनवणी करत होता. कोणतीही छान सायकल पाहिली की तिच्या चाकांबद्दल त्याच्या मनात विचारचक्र चालू होई. एकदा तर नलप्पाच्या आमराईजवळ आपण शरयू नदी आपल्या सायकलच्या चाकावरून पार केली असं स्वप्नही त्याला पडलं. स्वप्न खूप तपशीलवार होतं. ते पोलादी चाक नदीच्या वाळूनं भरलेल्या पात्रात करकर आवाज करीत धडपडत पलिकडं गेलं. पल्याडच्या किनाऱ्यावर ते पोचलं तेव्हा जणू एखाद्या घोड्यासारखं ते बनलं. ते एका उडीत त्याला घरी घेऊन गेलं, ते त्याला स्वयंपाकघरात घेऊन गेलं, मग त्याच्या अंथरुणापर्यंत त्यानं त्याला नेलं व मग त्याच्या शेजारी पडून राहिलं. हे सारं

अद्भुतच होतं. त्याच्या स्वप्नाचा आधीचा भाग खरा होता. सकाळी उठल्यावर चाक नाही हे पाहून त्याला वेड लागायची पाळी आली.

जुजबी तोंडओळख असलेल्या एका गाडीवानाजवळ त्यानं अखेर हताश होऊन आपलं मन खुलं केलं. तो गाडीवान खूपच दयाळू होता, चकरी शिवाय जीवन जगणं कठीण आहे या मताशी तो सहमत होता. जर स्वामिनाथननं त्याला पाच रुपये दिले तर काही तासात त्याला तो चकरी देऊ शकणार होता. आता ही फार मोठी रक्कम होती व बाबांएवढे आपण मोठे होऊ तेव्हा भविष्यात केव्हातरी एवढे पैसे आपल्याकडे असतील अशी त्याला आशा वाटत होती. स्वामिनाथननं हे बोलून दाखवलं. तेव्हा हे पैसे कसे मिळवायचे याबद्दल गाडीवानानं पटेल अशी माहिती दिली. सुरुवातीला त्याला फक्त सहा पै हव्या होत्या, थोड्याच अवधित तो त्याचे सहा आणे करणार होता आणि त्यानंतर तो त्यांचे रुपांतर सहा रुपयात करणार होता. स्वामिनाथन त्यापैकी पाच रुपये चकरीवर खर्च करू शकणार होता व उरलेला रुपया त्याला हवा तसा तो खर्च करण्याची मुभा होती. तो जादा रुपया गाडीवानाला देण्याइतका दुसरा आनंद नाही असं स्वामिनाथननं जाहीर केलं. स्वामिनाथनला ज्या काही शंका होत्या त्याही गाडीवानाच्या रसाळ वक्तृत्वानं विरून गेल्या. मोठी नाणी पाडण्याची गाडीवानाची प्रक्रिया अशी होती: त्याच्या घरी असलेल्या धातूच्या खास भांड्यात तो तांब्याची नाणी व काही तरी गूढ वनस्पती (जिचं नाव त्याला छळ करण्याची धमकी दिली तरी तो सांगायला तयार नसे) ठेवी. हे सारं तो जमिनीत गाडून ठेवी व मध्यरात्री तो तेथे बैठक मारून बसे. काहीतरी योगासनं करी आणि मग सर्व तांब्याची चांदी बनत असे. तो सोनंही बनवू शकतो. परंतु त्यासाठी त्याला अडीचशे मैल, चित्र विचित्र ठिकाणी जावं लागेल. एवढे कष्ट घेण्याची काही गरज नाही असं त्याचं म्हणणं होतं.

सहा पै कशा मिळवायच्या याची योजना बनवायला वेळ लागेल तेव्हा परत कधी भेटणार असं स्वामिनाथननं गाडीवानाला विचारलं. जर पैसे ताबडतोब दिले नाहीत तर मग बरेच आठवडे तो भेटू शकणार नाही कारण त्याचा मालक दूरवर जाणार होता व त्यालाही त्याच्या बरोबर जावं लागणार होतं. मला सहा तास वेळ दे अशी आर्जवं, विनवणी करून स्वामिनाथननं घराकडं धाव घेतली.

त्यानं सर्वप्रथम आजीला विचारून पाहिलं. डोळ्यात जवळजवळ आसवं आणून ती म्हणाली, "माझ्याकडं पैसे नाहीत." आपली लाकडी पेटी खालीवर करून तिनं आपली अवस्था किती कठीण हेच दाखवून दिलं.

"आजी, तुझ्या उशाखाली खूप नाणी आहेत हे मला ठाऊक आहे."

"नाही रे पोरा, हवं तर तूच बघ." अंथरुणावरून आजीला उठायला सांगून त्यानं उशा व गालिचाखाली शोध घेतला.

"तुला आता पैसे कशाला हवेत?" आजीनं विचारलं.

"तुझ्याकडं पैसे असतील तर ते देण्याचा चांगुलपणा दाखव. नसतील तर उगाच निरर्थक प्रश्न कशाला."

आजी आईला म्हणाली, "अग, तुझ्याकडं सहा पया असतील तर याला दे पाहू." पण स्वामिनाथनला पैसे द्यायला कोणी तयार नव्हतं. बाबांनी तर त्याची विनंती तात्काळ धुडकावून लावली. तेव्हा अशिलाकडून मिळणाऱ्या एवढ्या पैशांचं बाबा करतात तरी काय असा प्रश्न त्याला पडला.

त्यानं अखेरचा निकराचा प्रयत्न केला. आपल्या बाबांच्या कपड्यांच्या कपाटाखालील अंधाऱ्या जागेत त्यानं वाकून जमिनीला गाल लावून डोकावण्याचा प्रयत्न केला. तिथं काही विखुरलेली नाणी पडलेली असावीत असं त्याला वाटत होतं. कपाटाखाली हात घालून त्यानं सर्व दिशेला चाचपणी करून पाहिली. त्याला धुळीनं माखलेलं, कोळीष्टक चढलेलं एक न वापरलेलं पाकिट, एक झुरळ व धूळ काय ती हाताशी लागली.

त्याला कधी कधी वाटे की, मनापासून प्रयत्न केला तर आपल्याला जादू करता येईल. जो ईश्वराची प्रार्थना करतो त्याला तो मदत करतो हे एब्नेझारचं म्हणणंही त्याला आठवलं.

त्यानं पुठ्ठ्याचं एक छोटं खोकं घेतलं. त्यात काही दगड गोटे ठेवले. त्यावर रेती व पानं घातली. पूजेच्या खोलीत त्यानं ते खोकं नेलं व एका कोपऱ्यात ठेवून दिलं. ती छोटीशी खोली होती त्यात देवांचे फोटो भिंतीला लावलेले होते आणि छोटयाशा नक्षीदार लाकडी पाटावर काही देवांच्या पितळी मूर्ती होत्या. त्या स्वामिनाथनकडं जणू रोखून पाहत होत्या. त्या खोलीत कायमच फुलं, कापूर व उदबत्तीचा वास येत असे.

देवांसमोर उभं राहून अत्यंत भक्तीभावानं त्यानं खोक्यात काय ठेवलंय याची माहिती दिली. त्यातील दोन गोट्यांचे तीन पईच्या दोन नाण्यात रुपांतर कर अशी विनवणी केली व हे पैसे कशासाठी हवेत हेही सांगितलं. देवांनी जर आपल्याला मदत केली तर अंगठा चोखणं थांबवण्याचं वचनही त्यानं दिलं. डोळे मिटून तो पुटपुटला - "ओह ! श्री रामा ! तू दहा तोंडं असलेल्या रावणालाही ठार केलंस, मग तू मला सहा पया देऊ शकत नाहीस का ? मी जर तुला आता सहा पया दिल्या तर तू मला चकरी कधी देशील ? ती वनस्पती कुठली हे तू मला सांगशील अशी आशा मला वाटते. मणि, चकरी मिळवण्याचं गुपित मी तुला सांगू ? ओह ! रामा ! मला सहा पया दे, मी वर्षभर अंगठा चोखण्याचं थांबविन."

थोड्याच वेळात आपण पूजेच्या खोलीत जाऊन दगड गोट्याचे झालेले पैसे घेऊ शकतो असा विचार परसदारी येरझाऱ्या घालताना तो करीत होता. त्यानं स्वतःच अर्ध्या तासाची मुदत ठरवली.

पण दहा मिनिटांनंतरच तो पूजेच्या खोलीत शिरला, देवापुढं नम्रपणं वाकून नमस्कार केला, तो उठला आणि ते खोकं घेऊन परसदारी सामसूम कोपऱ्यात धावला. धडधडत्या काळजानंच त्यानं खोकं उघडलं. त्यानं ते जमिनीवर उपडं केलं. रेती व पानांमधून तो हात फिरवून चाचपू लागला. त्याच्या हाती दोन गोटे लागले. ते पुठ्ठयाचं खोकं, विखुरलेली

पानं, रेती आणि न बदललेले ते गोटे पाहून त्याला संताप आला. देवांनी आपल्याकडे दुर्लक्ष केलं याचा त्याला राग आला व त्याच्या डोळ्यात पाणी तरळलं. देवाला शिव्या घालाव्यात असं त्याला वाटत होतं पण त्याला भीती वाटत होती. त्या ऐवजी त्यानं सारा राग त्या पुठ्ठ्याच्या खोक्यावर काढला. त्यानं लाथेनं ते इकडून तिकडे उडवून दिलं आणि रेती व पानांना त्यानं पायाखाली तुडवलं. काही क्षण तो थांबला व देवाला हे तरी आवडेल की नाही याबद्दल त्याला शंका आली. कदाचित देवाचा अवमान व्हायचा. एकवेळ पैशाविना चालू शकेल पण देवाचा प्रकोप होणं महाभयंकर. ते त्याला परीक्षेत नापास करू शकतात, किंवा बाबा, आई, आजी अथवा बाळाला ठार करू शकतात. त्यानं खोकं पुन्हा उचललं, काही मिनिटांपूर्वीच त्यानं चिरडलेल्या लाथाडलेल्या रेती पानं, गोटे या वस्तू त्यात ठेवल्या. एका केळीच्या झाडापाशी त्यानं छोटा खड्डा खोदून त्यात पूज्य भावनेनं ते खोकं पुरलं.

2

त्यानंतर दहा मिनिटांनी अबू गल्लीतील मणीच्या घरासमोर तो उभा होता. त्यानं दोन-तीनदा शिटी वाजवली. पण मणि काही आला नाही. पायऱ्या चढून स्वामिनाथन वर गेला व त्यानं दरवाजा ठोठावला, दरवाजाच्या कडीचा आवाज झाला तेव्हा उत्कंठेनं तो वाट पाहत उभा राहिला. मणि सोडून दुसऱ्या कोणी दरवाजा उघडला तर आपल्याला आपण कशासाठी तिथं आलो हे सांगणं शक्य होणार नाही असं त्याला वाटलं. दरवाजा उघडला आणि त्याची घोर निराशा झाली. दाट भिवया असलेला एक जाडजूड माणूस त्याच्या समोर उभा होता. "कोण तू ?" त्यानं विचारलं.

स्वामिनाथननं विचारलं, "तुम्ही कोण ? आणि मणि कुठाय ?" तो मणीला भेटायला आला असून हा दुसराच इसम भेटल्यानं त्याला आश्चर्य वाटलंय हे कळावं, तसंच तो आहे तरी कोण हे समजावं या हेतूनं तो बोलला खरा परंतु मनात उडालेल्या गोंधळामुळे आपलं म्हणणं अधिक चांगल्या शब्दात तो मांडू शकला नाही.

"माझ्याच घरात मी कोण आहे असं तू मला विचारतो आहेस ?" जाड भिवईवाला डाफरला. स्वामिनाथन वळला आणि पळून जाण्यासाठी त्यानं खालच्या पायरीवर उडी मारली. पण जाड भिवईवाल्यानं हुकूम सोडला - "इकडं ये पाहू." त्याचा हुकूम मोडणं अशक्यच होतं. तो हळू हळू पायऱ्या चढू लागला, त्याच्या डोळ्यात मूर्तीमंत भीती उभी राहिली होती. जाड भुवईवाला म्हणाला, "अरे, पळतोस कशासाठी ? तू मणीला भेटायला आला आहेस ना ? मग त्याला भेटत का नाहीस ?" त्याचं हे तर्कशास्त्र वादातीत होतं.

"ठीक आहे," स्वामिनाथन उगाचच म्हणाला.

"जा, आणि भेट त्याला."

स्वामिनाथन भेदरलेल्या कोकरासारखा घरात शिरला. मणि दरवाज्यामागं उभा होता. त्याच्या घरात तो दीनवाणा व प्रभावहीन वाटत होता. तो आणि स्वामिनाथन एकमेकाकडं काहीही न बोलता रोखून पाहत होते. त्यांच्याकडं पाठ करून दरवाज्यात जाड भिवईवाला उभा होता. व रस्त्याकडं पाहत होता. स्वामिनाथननं त्याच्याकडं थरथरणारं बोट दाखवत डोकं प्रश्नार्थक हलवलं. मणि कुजबुजला, "काका." काका एकदम मागे वळले व म्हणाले, "अरे एकमेकांकडं काय नुस्तं पाहत बसलाय. तेवढ्यासाठी तू इथं आलायस का ? तुमच्या जिभा चालवा ना पोरांनो," हा सल्ला देऊन ते घराबाहेर रस्त्यावर पडले. घरासमोर जोरजोरानं भांडणाऱ्या कुत्र्यांना पिटाळण्यासाठी ते रस्त्यावर गेले होते. आता त्यांना काही ऐकू जाणं शक्य नव्हतं. स्वामिनाथन म्हणाला, "तुझे काका ? मला ठाऊकच नव्हतं. मणि, तू आता बाहेर नाही पडू शकत ?. . . नाही ?. . . माझं फार महत्वाचं काम होतं. मला तातडीनं सहा पया दे पाहू - मला त्या हव्याच आहेत - गाडीवान बरेच आठवडे दूर जाणार आहे - पुन्हा संधी मिळायची नाही - चकरीशिवाय काय करायचं हे मला उमजत नाही." त्यानं बोलणं थांबवलं. मणीचे काका कुत्र्यांभोवती चकरा मारत होते, त्यांना शिव्या घालत होते व दगड शोधत होते. स्वामिनाथन पुढं बोलू लागला, "माझं जीवन त्यावर अवलंबून आहे. तू जर दिले नाहीस तर माझं काही खरं नाही. तेव्हा चल दे लौकर पैसे."

"माझ्याकडं पैसे नाहीत. मला कोणीही पैसे देत नाही," मणि म्हणाला.

स्वामिनाथनला सारं शून्यवत वाटू लागलं. "तुझे काका पैसे कुठं ठेवतात ? त्यांच्या पेटीत शोध ना."

"मला ठाऊक नाही."

"मणि इकडं ये पाहू," त्याचे काका रस्त्यावरूनच ओरडले, या सैतानांना हाकल पाहू. मला जरा दगड आणून दे पाहू."

3

दोन आठवड्यानंतर स्वामिनाथन म्हणाला, "राजम तू मला एक पोलिस उसनवारीनं देशील ?"

"पोलीस ! कशासाठी ?"

"या शहरातील एका बदमाषानं मला लुटलंय." त्यानं गाडीवानाशी केलेला व्यवहार राजमला सांगितला. "आणि आता, जेव्हा केव्हा त्याची गाठ पडते तेव्हा तो मला ओळखसुद्धा दाखवत नाही." आपली करुण कहाणी सांगत स्वामिनाथन म्हणाला, "मी त्याच्या घरी गेलो तर तो घरी नाही म्हणून सांगतात. खरंतर तो घरातच कोणावर तरी डाफरतोय हे बाहेर ऐकू येत असतं. मी त्याला भेटायचा आग्रहच धरला तर तो निरोप पाठवतो की, माझ्या कुत्र्याला तुझ्यावर सोडून तुला ठार करीन."

"त्याच्याकडं कुत्रा आहे का ?" राजमनं विचारलं.

"मला तर काही दिसला नाही."

"मग त्याच्या घरात घुसून त्याला लाथा का घालू नयेत ?"

"हे बोलायला सोपं आहे. मी जेव्हा त्याला भेटायला म्हणून जातो तेव्हा माझा थरकाप उडतो. गाडीवानांच्या घरात काय असतं काही कल्पना नाही. समजा त्यानं त्याचा घोडाच माझ्यावर सोडला तर ?"

"सोडू तर दे. तो काही तुला खाणार नाही," मणि म्हणाला.

"अस्सं होय ? हे कळल्यानं मला आनंद झाला. एकदा तू माझ्याबरोबर रंगा शिंप्याकडं चल आणि घोड्यांबद्दल तो काय सांगतो ते ऐक. कधी कधी ते वाघापेक्षाही धोकादायक असतात म्हणे !" स्वामिनाथन मनापासून म्हणाला.

"समजा, एखाद दिवशी तू फाटकाशी थांबूनच त्याला गाठलंस तर ?" राजमनं सुचवलं.

"मी ते ही करून पाहिलं. पण तो जेव्हा बाहेर पडतो तेव्हा घोडागाडी घेऊन बाहेर पडतो. मला पाहताच तो त्याचा लांब चाबूक काढतो. त्याच्या टप्प्यात येणार नाही अशा ठिकाणी उभं राहून मी ओरडतो. पण त्याचा काय उपयोग ? तो घोडा वाऱ्याच्या वेगानं पळवतो ! त्यानं मला दोन आण्याला ठकवलं हा विचार सतावत राहतो."

"सहा पया होत्या ना ?"

"त्यानं नंतर आणखी दोनदा माझ्याकडनं पैसे घेतले. दरवेळेस सहा पया."

"मग याचा अर्थ दीड आणाच झाला," "राजम म्हणाला.


"नाही, राजम, दोन आणे !"

"अरे बाबा, बारा पया म्हणजे एक आणा होतो. आणि तू तीन खेपेस त्याला दरवेळी सहा-सहा पया दिल्यास - म्हणजे एकूण अठरा पया झाल्या. त्याला अर्थ दीडच आणा झाला."

"या साऱ्या वायफळ गोष्टी आहेत. किती पयांचा आणा होतो याची कोणाला पर्वा आहे ?" स्वामिनाथन म्हणाला.

"पैशाच्या बाबतीत तुम्हाला काटेकोर असायला हवं - ठीक आहे - तू पुढं सांग स्वामी."

"गाडीवानानं प्रथम माझ्याकडून सहा पया घेतल्या व दोन दिवसात चांदीची नाणी देण्याचं वचन दिलं. त्यानं चार दिवस मला हुलकावणी दिली व बारा पयांच्या मी वनस्पती खरीदल्या असं सांगून आणखी सहा पया देण्याची मागणी केली. मग तो पुन्हा मला हुलकावणी देऊ लागला व मी आणखी सहा पया दिल्या नाही तर सारा प्रयोग ओम्‌फस होईल असं सांगू लागला. त्यानंतर मी जेव्हा जेव्हा त्याच्याकडं गेलो तेव्हा काही ना काही सबब तो पुढं करू लागला. हवामानामुळं प्रयोगाला वेळ लागत आहे अशी सतत तक्रार



करू लागला. आणि दोन दिवसापूर्वी त्यानं मला सांगितलं की, तो मला ओळखत नाही व माझ्या पैशाबद्दल त्याला काहीही ठाऊक नाही. आणि आता तो कसा वागतोय हे तुला माहीत आहेच. मला पैशाचं काही वाटत नाही - पण मला त्याच्या त्या काळ्याकुट्ट, बदमाष मुलाचा तिरस्कार वाटतो. मला पाहिलं की, तो वाकुल्या दाखवतो आणि माझ्या डोक्यावर गटाराचं घाणेरडं पाणी भरलेली बादली उपडी करण्याची धमकी त्यानं दिली आहे. एकदा तर त्यानं छोटा चाकूच काढला होता. मला त्याला बदडून काढायचं आहे, म्हणजे त्याचे वडील माझे दोन आणे मला परत करतील."

4

दुसऱ्या दिवशी स्वामिनाथन आणि मणि गाडीवानाच्या घराच्या दिशेनं निघाले. आपल्या मित्रांसमोर आपण हा विषय काढला याचा आता स्वामिनाथनला पश्चाताप होत होता. हे सारं प्रकरण त्याच्या हाताबाहेर चाललं होतं. राजम व मणि या प्रकरणात जी आस्था दाखवत होते त्यामुळं ते कुठवर जाऊन पोचेल याचा काही भरवसा नव्हता. गाडीवानाच्या मुलाला फसवून पळवून नेण्याची राजमनं योजना आखली होती व मणि ती अंमलात आणणार होता, तो गाडीवानाच्या मुलाशी मैत्री करणार होता. आरंभीच्या योजनेत स्वामिनाथनला फारच कमी काम होतं. मणीला गाडीवानाचं घर दाखवलं की, त्याचं काम संपणार होतं.

स्वामिनाथनच्या घरापासून पश्चिमेकडं एक मैलभर अंतरावर असलेल्या किलाचेरी इथं गाडीवानाचं घर होतं. सुमारे डझनभर शाकारलेल्या झोपड्या व कोंदट खोपटी असलेली, उग्र वास येणारी व एकमेकाला कशीबशी खेटून असलेली ही वस्ती होती.

त्या जागेपासून ते थोड्याच अंतरावरच होते. सूडाचा हा प्रवास थांबवायचा स्वामिनाथननं अखेरचा निकराचा प्रयत्न केला.

"मणि, मला वाटतं गाडीवानाच्या मुलानं पैसे परत केले."

"काय ?"

"मला वाटतं. . ."

"असं तुला वाटतं तू मला दाखवू शकशील ते पैसे."

"मणि, सोडून दे ना त्याला, त्याला छेडलं तर कसली आफत आपल्यावर कोसळेल याची तुला कल्पना नाही," स्वामिनाथननं विनवलं.

"चूप बस पाहू. नाहीतर तुझी मुंडी मुरगाळीन."

"ओह, मणि पोलिस अथवा तो मुलगाच - एकदम बेडर आहे, काय वाटेल ते करू शकेल." त्या मुलाबद्दल त्याच्या मनात खूप दहशत होती. कधी कधी रात्री त्याच्यापुढं एक क्रूर घाणेरडा काळा चेहरा तरळत असे तो त्याचा थरकाप उडवी. तो चेहरा गाडीवानाच्या मुलाचा असे.

"तो तिसऱ्या घरात राहतो," स्वामिनाथननं खूण करीत म्हटलं.

शेवटच्या क्षणी मणीनं आपला बेत बदलला व गाडीवानाच्या घरी स्वामिनाथननंही यावं असा आग्रह धरला. निषेध म्हणून स्वामिनाथननं रस्त्यावरच बसकण मारली. पण मणि ऐकूनच घेईना, तो अडूनच बसला. गाडीवानाचं घर येईपर्यंत त्यानं त्याला ओढीतच आणलं व मग तो त्याच्यावर ओरडू लागला.

"मणि, मणि, अरे, झालं तरी काय ?" "अरे, गाढवाच्या लेका," असं म्हणत त्यानं स्वामिनाथनला लगावून द्यायला हात उगारला.



स्वामिनाथनला रडूच कोसळलं. मणि त्याचा गळा दाबायचा प्रयत्न करत होता. त्यांच्या भोवती गर्दी जमली. त्यात ढेरपोटी पोरं, काळ्याकुंद्रया बायका व त्यांचे नवरे होते, रोगट कोंबड्या इकडून तिकडं नाचानाच करीत होत्या. सूर्य तळपतच होता. दोन तीन कुत्रे झाडाच्या सावलीत घोरत पडले होते. खुराडी व न धुतलेल्या कपड्यांची दुर्गंधी सर्वत्र पसरली होती.

स्वामिनाथननं गाडीवानाचं म्हणून जे खोपटं दाखवलं होतं त्यातून तीन फूट उंचीचा आंघोळ न केलेला व बेंगरूळ कपडे घातलेला एक मुलगा बाहेर आला. गर्दीतून तो वाट काढीत पुढे आला व अंगठा चोखीत एकाग्रतेनं मारामारी पाहू लागला. स्वामिनाथनकडं बोट दाखवून मणि त्वेषानं म्हणाला, "हे कोण कार्ट आहे मला ठाऊक नाही. दोन आणे दे म्हणून माझ्या मागं लागला आहे. मी त्याला कधी पाहिलं देखील नाही. मी त्याला हे पैसे देणं लागतो असं त्याचं म्हणणं आहे." पंधरा मिनिटं याच आवाजात मणि बडबडत होता. गाडीवानाच्या मुलानं तोंडांतून अंगठा काढीत म्हटलं, "त्याला फासावर लटकवलं पाहिजे."

त्याबद्दल समाधान व्यक्त करत मणीनं त्याला विचारलं, "याला पोलिस ठाण्यावर न्यायला तू मला मदत करशील ?"

"नाही," तो स्वतःच पोलिस ठाण्याला घाबरत असल्यानं गाडीवानाच्या मुलानं नकार दिला.

"त्याला पोलिस ठाण्यावर नेलं पाहिजे हे तुला काय ठाऊक ?" मणिनं विचारलं.

"मला ठाऊक आहे !"

"तुलाही त्यानं असा कधी त्रास दिला होता काय ?" मणीनं विचारलं.

"नाही," त्या मुलानं उत्तर दिलं.

"तुझ्या वडिलांनी माझ्याकडून घेतलेले दोन आणे कुठं आहेत ?" अश्रूनं थबथबलेला आपला चेहरा त्या मुलाकडं वळवून स्वामिनाथननं विचारलं. दरम्यान शांतता प्रस्थापित करण्याचा अर्धवट प्रयत्न करून जमाव पांगला होता. मणीनं त्या मुलाला एकदम विचारलं, "तुला हा भोवरा हवा का ?" त्यानं एक चकचकीत तांबडा भोवरा त्याच्यापुढं धरला. तो घेण्यासाठी मुलानं हात पुढं केला.

"हा नाही मी तुला देऊ शकत. तू जर माझ्याबरोबर आलास तर याहून मोठा देईन. चल, आपण दोस्त बनू या," मणि म्हणाला.

त्या मुलाची काही हरकत नव्हती. "मला बघायला नाही देणार ?" त्यानं विचारलं. मणिनं त्याला तो दिला. त्यानं तो दोन-तीनदा हातात उलट सुलट केला व डोळ्याची पापणी लवायच्या आत तो तेथून नाहीसा झाला. नेमकं काय घडलं हे समजायला थोडा वेळ लागला. पण त्याला जेव्हा ते उमगलं तेव्हा दूरवरच्या एका खोपटात तो मुलगा शिरताना त्याला दिसला. तो त्याच्यामागं धावला.

त्या खोपटापाशी तो पोचला तेव्हा दार बंद होतं. डझनभर वेळा दरवाजा ठोठावल्यावर तो उघडला गेला व एका खाष्ट इसमानं मुलगा घरात नाही असं सांगितलं. दरवाजा बंद झाला. मणि पुन्हा दरवाजा ठोठावू लागला. आजूबाजूचे दोन-तीन उग्र चेहऱ्याचे शेजारी आले व आमच्याच मोहल्ल्यात येऊन आम्हाला सतावलंस तर तुला जिवंतच गाडू अशी धमकी देऊन निघून गेले. मणीला तेथून निघून येण्याची स्वामिनाथन जोरजोरानं विनंती करीत होता. पण त्याला तेथून दूर करणं कठीण होतं. तो दरवाजा ठोठावतच राहिला.

शेजारी काही अंतरावर हातात दगड घेऊन आपापली जागा घेऊन बसले. त्यांनी झाडाखाली झोपलेल्या कुत्र्यांनाही उठवलं.

जेव्हा कुत्रे त्यांच्याकडं वेगानं झेपावू लागले तेव्हा मणि स्वामिनाथनला म्हणाला, "पळ" व त्यानं स्वतःही धूम ठोकली.

स्वामिनाथनच्या पाठीवर काही दगड पडले एक-दोन मणीलाही लागले. मणीच्या उजव्या टाचेला एका अणकुचीदार दगडानं जखमही केली. आपल्या समोरच्या रस्त्याखेरीज त्यांना काही दिसत अथवा जाणवत नव्हतं.

अकरा

बाबांबरोबर

1

उन्हाळ्यात मालगुडी हे दक्षिण भारतातील अगदी तिरस्करणीय शहर बने. सावलीत देखील कधीकधी तापमान 110 च्यावर जाई. उन्हाळ्यात कोणत्याही दिवशी दुपारी बारा ते तीनच्या दरम्यान धुळीनं माखलेले रस्ते ओस पडलेले असत. मोकाट भटकणारी गाढवं आणि कुत्रीदेखील पश्चिमेकडं कलणाऱ्या सूर्याचं भाजणारं ऊन टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारती व झाडांच्या सावलीचा आश्रय घेत.

या उकाड्याचीही मोठी गंमतच होती. जो त्याचा विचार करी त्याला तो जाणवत असे. मालगुडीचं ऊन सहन करण्यासारखं नाही हे सिध्द करण्याचा कोणी खटाटोप केला असता तर त्याचं स्वामिनाथन, मणि व राजमला आश्चर्यच वाटलं असतं. मध्यान्ह व दुपार हा त्यांना दिवसातील सर्वात मोह पाडणारा काळ होता. कापड गिरणीचा व्यवस्थापक हेन्टेलचं डोकं तापवून त्याला कोडाईकनॉलला जायला भाग पाडणाऱ्या किंवा कार्यकारी इंजिनिअर कृष्णनची पगडी गरम केल्यानं, "माझा व्यवसायच असा ऊन आणि वादळात भटकण्याचा आहे," अशी त्याला तक्रार करायला लावणाऱ्या सूर्याचा स्वामिनाथनच्या कुरळ्या केसांवर, मणिच्या जटासारख्या झालेल्या केसांवर व राजमच्या काट्यांसारख्या उभ्या चिवट केसांवर मात्र काहीही परिणाम होत नसे. हाच सूर्य जमीन एवढी भाजून काढत असे की सर्वाधिक "भारतीय" बनलेले युरोपिअन रॅटी (त्यांची गावाबाहेरील ओस बंगल्यात तांदूळ सडण्याची गिरणी होती. ते एकूण गूढ व्यक्तिमत्व होते. ते कोण आहेत कुठून आले, हे कोणालाच ठाऊक नव्हतं. ते नोकराशी, ग्राहकांशी अचूक तामिळमध्ये बोलत, शर्ट, अर्धी चड्डी व पायात सँडल्स या वेशात ते भटकत असत). त्यांनी चुकून अनवाणी चालायला सुरुवात केली तेव्हा ते किंचाळलेच. हाच सूर्य या तिघांना मात्र छताखाली राहणं मुश्किल करी.

ट्रंक रोडवर नगरपालिकेच्या हद्दीपासून अर्धामैल दूरवर एका छोट्या नाल्यापाशी ते

बसले होते. वाळूच्या लहानशा पट्टयावरून वाहणारं पाणी खालच्या नाल्यात येत होतं व पुढं शरयूत जाऊन मिसळत होतं. ते बसले होते तिथं एकही झाड नव्हतं व त्यांच्या डोक्याला थेट ऊन लागत होतं. रस्त्याच्या बाजूला भाताची शेतं होती पण आता तिथं कापणी झाल्यानंतर उन्हात भाजून निघणारे खुंट उरले होते, लांबच लांब पसरलेले खुंटांचे पट्टे-अधून मधून आंब्यांची वा नारळाची झाडं काय ती होती. ट्रंक रोडही जवळ जवळ निर्मनुष्यच होता, अधून मधून एखादी बैलगाडी रखडत चाललेली दिसत होती.

"मला वाटतं मी तुला सांगितलं तेवढंच तू करायला हवं होतंस," राजम मणीला म्हणाला.

"खरं आहे राजम. मी त्याला गाडीवानाचा मुलगा दाखवल्यावर आधी ठरल्याप्रमाणं तेथून निघणार होतो, पण अचानक यानं माझा खूनच करायचा प्रयत्न केला. . ." स्वामिनाथननं मणिकडं रागीट नजरेनं पाहत तक्रार केली.

मणि हतबल झाला होता. तो म्हणाला, "गड्यांनो, मी मूर्ख आहे हे मी कबूल करतो. त्याक्षणी माझ्या डोक्यात जी योजना स्फुरली त्यानुसार मी काम निभावून नेईन असं मला वाटत होतं. मी तो भोवरा जर घट्ट पकडला असता, तर ना त्याला फसवता आलं असतं व तो एव्हाना एकाकी केकाटत पडला असता." त्याच्या आवाजात अपराधीपणाची भावना होती.

आपल्या मानेवर हळुवारपणं हात फिरवित स्वामिनाथन म्हणाला, "अजून इथं दुखतंय." किलाचेरी येथील घटनेनंतर स्वामिनाथनवर केलेला हल्ला म्हणजे एक बहाणा होता हे त्याला पटवून द्यायला मणीला तीन तास लागले.

"तू स्वामीशी एवढं भयंकर वागायची गरज नव्हती," राजम म्हणाला.

हात जोडून मणि म्हणाला, "बाबांनो, शिक्षा म्हणून हवंतर मी दहा मिनिटं शीर्षासन करतो. मी स्वामीचा शत्रू आहे असं गाडीवानाच्या मुलाला वाटावं म्हणून मी त्याला ओरबाडण्याचं नाटक केलं इतकंच."

आता घुंगुरांचा आवाज ऐकू येऊ लागला. एक पांढरा बैल जोडलेली चटईचं छप्पर लावलेली गाडी येत होती. ती नाल्यापासून यार्डभर अंतरावर असताना ते उठले, पुढे सरसावले व एका रांगेत उभे राहिले आणि ओरडले, "ए, जरा तुझ्या बैलाला थोपीव पाहू." एक खेडवळ लहान मुलगा गाडी चालवत होता.

"ए, मूर्खा, गाडी थांबव," राजम ओरडला. "तो जर थांबला नाही तर त्याला आपण अटक करू व त्याची गाडी जप्त करू. . ." स्वामिनाथन म्हणाला.

बैलगाडीचा चालक म्हणाला, "मला कशासाठी थांबवता आहात ?"

"चूप, बोलू नकोस," असा आदेश देऊन गंभीर चेहऱ्यानं मणीनं सबंध गाडीभोवती चक्कर मारली व तो चाकं तपासू लागला. खाली वाकून त्यानं गाडीच्या बुडाची पाहणी केली, "ए गाडीवाना, खाली उतर पाहू."

"अरे मुलांनो, मला जायला हवं," तो गाडीवान आर्जव करीत म्हणाला.

"मुलांनो, कोणाला म्हणतोस ? तुला ठाऊक नाही आम्ही कोण आहोत ते ?" राजमनं दरडावून विचारले.

"आम्ही सरकारी पोलिस असून तुझ्यासारख्या भोंदूंना पकडण्यासाठी बाहेर पडलो आहोत," स्वामिनाथननं पुस्ती जोडली.

"एक शब्द जरी उच्चारलास तर गोळी घालीन," राजमनं त्याला सुनावलं. त्याचा विश्वास बसला नाही पण ही पोरं बोलतायत म्हणजे त्यात काहीतरी तथ्यांश आहे असं त्याला वाटत होतं.

एका चाकावर बोटानं टकटक आवाज करीत मणि म्हणाला, "नाल्यावरचा पूल कमकुवत आहे. तू जोवर परवाना दाखवत नाहीस तोवर त्याच्यावरून तुला आम्ही जाऊ देणार नाही."

गाडीवान चाचरत म्हणाला, "सोडा ना, जाऊ द्या ना मला - मला तिथं पोचायलाच हवं."

"चूप बस," राजमनं आदेश सोडला.

स्वामिनाथननं बैलाची पाहणी केली व म्हणाला, "इकडे ये पाहू." गाडीवानाला खाली उतरवण्यात आलं व मणीनं त्याला स्वामिनाथनच्या पुढ्यात ढकललं. त्याच्यावर गुरगुरत व बैलाच्या बाजूकडं निर्देश करीत स्वामिनाथन म्हणाला, "अरे टोणग्या बैलाला आंघोळ का नाही घातलीस ?

घाबरत घाबरत खेडूत म्हणाला, "सर, मी त्याला आंघोळ घातली आहे."

"मग इथं हे असं का राहिलंय ?" एका किरमिजी पट्ट्याकडं बोट दाखवत स्वामिनाथन म्हणाला.

"ते होय ? बैलाला तो पट्टा तर जन्मापासूनच आहे, साहेब."

"जन्मापासून ? तू मला शिकवतोस काय ?" असं म्हणत त्या गाडीवानास मारण्यासाठी स्वामिनाथनं लाथ उगारली.

मग दयाळूपणाची चिह्नं त्यांच्या वागण्यात दिसू लागली.

"त्या बदमाषाला एक परवाना द्या व हे प्रकरण निकालात काढा पाहू," राजमनं फर्मावलं. स्वामीनाथनं खिशातून एक छोटी नोंद वही व पेन्सिलचा तुकडा बाहेर काढला. काहीही व कसलीही नोंद करण्यासाठी तो या वस्तू नेहमीच बरोबर बाळगी. किती सायकली आपल्या समोरून गेल्या, किती माणसं अनवाणी गेली, किती जणांनी सँडल्स वा जोडे घातले होते अशा व अन्य कितीतरी गोष्टी तो नोंदवत असे.

कागद व पेन्सिल त्यानं तयार ठेवली. मणीनं बैलाचा कासरा पकडला. त्याला मागे ढकलून त्याचं तोंड दुसऱ्या बाजूला वळवून ठेवलं. गाडीवान कुरकुरू लागला. पण मणि म्हणाला, "काळजी करू नकोस. त्याला तिथंच उभं केलं पाहिजे. ही सीमारेखा आहे."



"पण साहेब मला जायचंय."

"तू त्याला वळवून घेऊन जाऊ शकतोस."

"तुझं नाव काय ?" राजमनं विचारलं.

"कारूप्पन," त्या मुलानं उत्तर दिलं.

स्वामिनाथननं ते लिहून घेतलं.

"वय ?"

"मला ठाऊक नाही, साहेब."

"तुला ठाऊक नाही ? स्वामी, लिही वय-शंभर," राजम म्हणाला.

"नाही जी, नाही जी, मी काही शंभर वर्षांचा नाही."

"आता चूप बसतोस की नाही. तू शंभर वर्षाचा आहेस. तू नाही म्हणालास तर मी तुला ठार करीन. तुझ्या बैलाचं नाव काय ?"

"मला ठाऊक नाही, जी."

"स्वामी, परत 'कारूप्पन' लिही.

"सर, ते तर माझं नाव आहे, बैलांचं नव्हे." त्यांनी त्याच्याकडं दुर्लक्ष केलं व बैलाच्या नावापुढं स्वामिनाथननं 'कारूप्पन' असं लिहिलं.

"तू कुठं चालला आहेस ?"

"सेथूर."

"स्वामिनाथननं ते लिहून घेतलं.

"तिथं किती दिवस राहणार ?"

"ते तर माझं गाव आहे, जी."

"अच्छा, मग इकडं कशाला आला होतास ?"

"आमच्या म्होरक्यानं रेल्वे शेडमध्ये नारळाची दहा पोती पाठवली होती."

स्वामिनाथननं त्याच्या छोट्या वहीत प्रत्येक शब्दाची नोंद केली. मग त्या तिघांनी त्या कागदावर सह्या केल्या, तो बैल गाडीवानास दिला आणि पुढचा प्रवास सुरू करण्यास त्याला परवानगी दिली.

2

मेच्या दुसऱ्याच आठवड्यात न्यायालयांना उन्हाळ्याची सुटी लागली व त्याचे बाबा घरीच दुपार घालवू लागले हे काही स्वामिनाथनला रुचलं नाही. राजम व मणि बरोबर आपण दुपारी ज्या उनाडक्या करतो त्यात त्यामुळं व्यत्यय येईल असं त्याला वाटलं. आणि घडलं ही तसंच. त्याच्या सुटीच्या तिसऱ्या दिवशी तो घराबाहेर पडत असताना बाबांनी हुकूम

सोडला, "स्वामी, इकडे ये."

घरापुढील छोट्याशा अंगणात, धोतर व बनियन घालून बाबा उभे होते. या पोशाखात बाबांना पाह्याला स्वामिनाथनला आवडत नसे. त्यांच्या या पोशाखाचा अर्थ नजिकच्या भविष्यकाळात त्यांना बाहेर जायचं नाही असा असे.

"तू कोठे चाललायस ?"

"कुठं नाही."

"काल तू याचवेळी कुठं होतास ?"

"इथंच."

"तू खोटं बोलतोयस. तू काल इथं नव्हतास व आता तुला बाहेर जाता येणार नाही."

"हं, अगदी बरोबर आहे," आई अचानक कुठून तरी उगवली. "त्याच्या उन्हात भटकण्याला काहीच सुमार राहिलेला नाही. त्यानं असंच फिरणं चालू ठेवलं तर ऊन लागून जीव गमावायची पाळी येईल."

आईचं प्रोत्साहन नसतं तर बाबांची टकळी चालू राहिली असती पण आता त्यांनी प्रत्यक्ष कृतीच करायचं ठरवलं. आपल्या ड्रेसिग रुममधील त्याच्या 'खोलीत' चल असं त्यांनी त्याला सांगितलं.

"तू किती दिवसांपास्नं पुस्तकांना हात सुध्दा लावलेला नाहीस बरं ?" असं पुस्तकावरचा धुळीचा थर फुंकरीनं उडवून लावीत आणि पुस्तकांची चवड व टेबलाच्या कोपऱ्याच्या मध्ये कोळ्यानं विणलेलं कोळीष्टक काढून टाकीत त्याच्या बाबांनी विचारलं.

हा प्रश्न म्हणजे जणू आश्वासनांची पायमल्लीच आहे असं स्वामिनाथनला वाटलं.

"शाळा नसतानाही मी वाचायचं का ?"

"तुला काय वाटतं तू बी.ए. पास झालास ?" त्यांनी विचारलं.

"बाबा, मला असं म्हणायचं आहे की, जेव्हा शाळेला सुटी आहे, जेव्हा परीक्षा नाही तेव्हाही मी वाचायचं का ?"

"वा ! काय प्रश्न आहे ! तू वाचन करायलाच हवं !"

"पण बाबा तुम्हीच म्हणाला होता ना की एकदा परीक्षा संपली की तुला वाचायची काही गरज नाही म्हणून. राजम सुद्धा वाचत नाही." शेवटचं वाक्य उच्चारताना ते खरं असावं असं मानण्याचा त्यानं प्रयत्न केला. कारण आठवड्यातून तीन दिवस रोज दोन तास आपल्याला घरी शिकवायला येणारे मास्तर अभ्यास करायला भाग पाडतात अशी राजम तक्रार करत होता हे त्याला स्पष्टपणं आठवत होतं. स्वामिनाथनच्या शेऱ्याकडं बाबांनी कानाडोळा केला. ते तिथं उभे राहिले व स्वामिनाथनला पुस्तकं व टेबल स्वच्छ करायला लावलं. पुस्तकांच्या वेष्टनांवरची धूळ तो जोरजोरानं फुंकर मारून उडवू लागला. त्यानं अगदी अलगद कोळ्याला पकडलं व त्याला फेकून देण्यासाठी तो खिडकीपाशी गेला. खिडकीबाहेर पकडून त्यानं क्षणभर त्याला न्याहाळलं. तो एका धाग्याला लोंबकळत

हेलकावे खात होता व धागा शेकडो रंग छटात चमकत होता.

"तुला तो कोळी फेकून द्यायला काय सबंध दिवस लागतो काय रे?" बाबांनी विचारलं. स्वामिनाथनला अचानक वाटलं की त्या कोळ्याला पाळावं, त्यामुळं त्याला फेकून देणं म्हणजे नासाडीच ठरली असती. त्यानं गुपचुप तो कोळी खिशात टाकला व खिडकीबाहेर रिकामा हात आपटीत तो आपल्या बाकापाशी परतला.

"तू इंग्रजीचं पुस्तक कसं ठेवलंयस ते बघ. तुला लाज नाही वाटत?" त्यानं तेलकट झालेलं तांबड्या रंगाचं 'फोर्थ रीडर' उघडलं व ते जोरात आपटून धूळ झटकली मग तेलकट वेष्टन त्यानं आपल्या हातानं जोरजोरानं पुसायचा प्रयत्न केला.

"जा, फडकं घेऊन ये पाहू. या वस्तू साफ करण्याची ही काही पद्धत नाही. एक फडकं आण स्वामी," बाबा म्हणाले. त्यांच्या आवाजात काहीसा प्रेमळपणा व काहीशी अधीरता होती.

स्वामिनाथननं इकडं तिकडं पाहिलं व म्हणाला, "इथं तर मला काही सापडत नाही."

"जा पळ, शोधून काढ."

ही सूचना स्वागतार्ह होती. स्वामिनाथन घाईघाईनं बाहेर पडला. सर्वप्रथम तो आजीकडं गेला.

"आजी, मला कापडाचा बोळा दे ना, लौकर."

"आता मी कुठून आणून देऊ कापडाचा बोळा?"

"आता कुठून आणू?" त्यानं तिरसटपणं विचारलं. तो पुढं म्हणाला, "एखाद्याला सुटीतही वाचावंच लागत असेल तर मग सुटी तरी द्यायची कशाला?"

"का, काय झालं?"

सहानुभूती मिळवायची हीच संधी आहे हे त्यानं ताडलं. जवळ जवळ रडतच तो म्हणाला, "मी इथं वेड्यासारखा वेळ घालवत बसलो तर माझी तिथं वाट पाहत बसलेल्या राजम आणि मणीला काय वाटेल? आजी, बाबांना काही दुसरा उद्योग नसेल तर ते झोप का नाही काढीत?"

हॉलमधून बाबांचा ओरडण्याचा आवाज आला, "काय मिळालं का फडकं?"

स्वामिनाथन उत्तरला, "आजीकडं नाहीय. आता आईकडं आहे का बघतो." मागीलदारी व्हरांड्यात आई चटईवर बसली होती. बाळ तिच्या मांडीवर झोपलं होतं. स्वामिनाथननं तिच्याकडं रोखून पाहिलं. काही मिनिटांपूर्वी तिनं आपल्या पतीला दिलेला सल्ला त्याच्या मनात सलत होता. "आई तू किती चांगली आहेस. तू आम्हा गरिबांना मोकळं का नाही सोडत?" त्यानं हलक्या सुरात विचारलं.

उपहासाची तिला जाणीव झाली नाही व काही मिनिटांपूर्वी आपण पतीला काय सांगितलं होतं याचा तिला विसर पडला होता. तिनं विचारलं, "का?"

"तू जाऊन माझ्या विरुध्द चहाड्या करायची काही गरज नव्हती. मी तुझं काय वाकडं

केलंय कोण जाणे!" हे बोलणं चालू ठेवायला त्याला आवडलं असतं पण तिथे फडक्यासाठी बाबा ताटकळत होते.

"तू जरा मला एखादं फडकं देशील का?" त्यानं आपलं काम सांगितलं.

"कसलं फडकं?"

"कसलं फडकं! आता मला तरी काय ठाऊक? माझी पुस्तकं साफसूफ करावी लागणार आहेत. सुटी घालवायचा फारच छान मार्ग आहे नाही!"

"मला नाही सापडत फडकं."

"हं. तुला नाही सापडत? नाही ना?" त्यानं अवती भवती पाहिलं. बाळाच्या खाली एक फडकं होतं. त्यानं झटकन बाळाला कुशीवर वळवलं, फडकं खेचून काढलं व तो निघाला, आपल्या या सर्व कटकटीला आईच जबाबदार आहे असं त्याचं मत होतं. त्यामुळं बाळाची झोप मोडून, त्याच्या खालचं फडकं हिसकावून आणल्यानं त्याला बरं वाटत होतं.

आसुरी आनंदाने त्यानं टेबल तिरपं केलं व त्याच्यावरील सर्व वस्तू जमिनीवर टाकल्या. नंतर एकेक वस्तू उचलून त्यानं त्या टेबलावर नीट रचून ठेवल्या. बाबा त्याच्याकडं पाहत होते. "अशा वस्तू रचून ठेवतोस वाटतं तू? सर्व हलक्या वस्तू तू तळाशी ठेवल्या आहेस व जड वस्तू वर ठेवल्या आहेस. त्या वह्या काढ पाहू. आणि ॲटलास तळाशी ठेव." आई बाळाला कडेवर घेऊन आली व बाबांकडे तक्रार करत म्हणाली, "आता या पोराकडं पहा. त्यानं बाळाचंच दुपटं हिसकावून आणलं. या घरात त्याला धाकात ठेवणारं कोणी नाही का? किती काळ त्याची शाळा बंद राहणार आहे कोण जाणे!" स्वामिनाथन अगदी लक्षपूर्वक आपलं काम करीत होता. वडिलांनी आईच्या तक्रारीकडं दुर्लक्ष केलं. त्यांनी केवळ झोपलेल्या बाळाच्या गालाला चिमटा काढला त्यामुळं आई वैतागली व तेथून निघून गेली.

अर्ध्या तासानंतर हातात पाटी व पेन्सिल घेऊन स्वामिनाथन बाबांच्या खोलीत खुर्चीवर बसला होता. बाबा अंकगणिताचं पुस्तक हातात धरून स्वामीला लिहून घ्यायला सांगत होते: "रामाकडं दहा आंबे होते व त्यांच्यापासून त्याला पंधरा आणे उत्पन्न हवं होतं. कृष्णाला चारच आंबे हवे होते. त्यासाठी कृष्णाला किती पैसे द्यावे लागतील?"

स्वामिनाथन परत परत या बेरजेकडं पाहत होता व दरखेपेस ती वाचताना त्याचा नवीनच अर्थ वाटत होता. आपण एखाद्या भीतिदायक जाळ्यातच शिरतोय की काय असं त्याला वाटत होतं.

आंब्याच्या विचारानं त्याच्या तोंडाला पाणी सुटलं होतं. दहा आंब्याची किंमत रामानं पंधरा आणे का बरं ठेवली हे त्याला कळेना, असल्या कसल्या स्वभावाचा राम? बहुधा तो शंकरसारखा असावा. दहा आंबे व त्यासाठी पंधरा आणे मिळवायचा त्याचा पोलादी निर्धार पाहता त्याची शंकरशी तुलना केल्याविना राहणं शक्य नव्हतं. राम जर शंकरसारखा असेल तर मग कृष्णा हा वाटाण्यासारखा असणार. स्वामिनाथनला कृष्णाबद्दल उगाचच

सहानुभूती वाटू लागली.

वर्तमानपत्रातून डोकं वर काढून वडिलांनी विचारलं, "काय झालं का गणित सोडवून ?"

"बाबा, एक सांगाल ? आंबे पिकलेले होते का ?" वडिलांनी क्षणभर त्याला न्याहाळलं व मग हसत ते म्हणाले, "आधी गणित सोडव. मग ती फळं पिकली होती की नाही ते सांगीन."

स्वामिनाथनला केविलवाणं वाटू लागलं. रामा पिकलेले आंबे विकत होता की बिन पिकलेले हे बाबांनी सांगितलं तर! त्याला ते नंतर सांगून काय उपयोग ? या सबंध गणिताचं उत्तर या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहे असं त्याला वाटत होतं. कच्च्या आंब्यांसाठी पंधरा आणे द्यायचे म्हणजे गजबच झाला असता. आणि समजा त्यानं तसं केलं तर ते रामाला शोभलं असतं का ? मनातल्या मनात तो त्याचा द्वेष करू लागला; त्याचं अगदी काळंकुट्ट चित्र रंगवू लागला.

पाटी बाजूला सारीत स्वामिनाथन म्हणाला, "बाबा, मला नाही सोडवता येत।"

"अरे, तुला झालंय तरी काय ? इतकं साध्या समीकरणाचं, साधं गणित तुला येत नाही ?"

"आमच्या शाळेत आम्हाला असं काही शिकवलेलं नाही !"

"तुझी पाटी इकडं आण पाहू. मी शिकवतो तुला." स्वामिनाथन उत्कंठेनं ते अद्भुत घडण्याची वाट पाहू लागला. बाबांनी क्षणभर गणित अभ्यासलं व विचारलं, "दहा आंब्यांची किंमत किती ?"

स्वामिनाथननं मांडून ठेवलेल्या गणितातील आकडे पाहिले व म्हणाला, "मला ठाऊक नाही."

"तू म्हणजे अगदी महामूर्खच दिसतोस. आता नीट गणित वाच पाहू. दहा आंब्यांसाठी रामला, किती पैसे हवे होते ?"

"अर्थात, पंधरा आणे," स्वामिनाथननं विचार केला, परंतु ती किंमत कशी असेल ? नुसती किंमत ? लोभापोटी रामला ती अपेक्षित असेलही. पण ती योग्य किंमत होती काय ? आणि आंबे पिकलेले होते की नव्हते हा मुद्दा होताच. ते जर पिकलेले असतील तर पंधरा आणे ही किंमत अशक्य वाटत नाही. पण त्याला या मुद्याबाबत अधिक माहिती मिळाली असती तर!

"रामला त्याच्या आंब्याचे किती पैसे हवेत ?"

"पंधरा आणे," स्वामिनाथनचा सूर विश्वासदर्शक नव्हता.

"फारच छान. कृष्णाला किती आंबे पाहिजेत ?"

"चार."

"चारांची किंमत किती ?"

आपल्याला सतावण्यात बाबांना मजा वाटत असावी. त्याला कसं ठाऊक असणार ? तो मूर्ख कृष्णा किती पैसे देईल हे त्याला काय माहीत ?

"हे बघ, तुला झोडपून काढावं असं माझं एक मन म्हणतंय. तुझ्या डोक्यात काय भरलंय ? दहा आंब्याला पंधरा आणे पडतात. तर एकाची किंमत काय ? चल, सांग पाहू. तुला नाही आलं तर. . ." त्यांनी स्वामिनाथनचा कान हलकेच पिरगाळला. स्वामिनाथन तोंड उघडू शकत नव्हता कारण या प्रश्नांचं उत्तर बेरीज, वजाबाकी, गुणाकार की भागाकारात आहे हेच त्याला कळत नव्हतं. त्याला जसा वेळ लागू लागला तसा त्याचा कान जोरानं पिरगाळला जाऊ लागला. क्रुद्ध मुद्रेनं वडील उत्तराची वाट पाहत असताना स्वामिनाथननं किंकाळी फोडली. पंधरा आण्याला दहा आंबे तर एका आंब्याला किती पैसे हे सांगेपर्यंत मी तुला सोडणार नाही." बाबांना झालंय तरी काय ? स्वामिनाथन डोळे मिचकावित बसला. त्याची किंमत जाणून घेण्याची एवढी काय तातडीची निकड आहे ? आणि वडिलांना एवढी गरज असेलच तर त्याला छळण्यापेक्षा त्याला बाजारपेठेत ते चौकशी करायला का नाही पाठवत ? राम व कृष्णा आणि त्यांचे विषम संख्येच्या आंब्यांचे आणि पैशांचे व्यवहार यानं नुसता वैताग आणला होता.

पराभव पत्करीत बाबा म्हणाले, "एका आंब्याला पंधरा दशांश आणे. हे सोपं करून सांग पाहू."

अंकगणितातील अत्यंत भयंकर प्रांतात त्याला जायला सांगितलं जात होतं - अपूर्णांक ! "बाबा, मला पाटी द्या, मी शोधून काढतो." त्यानं आकडेमोड केली व पंधरा मिनिटानं उत्तर काढलं - एका आंब्याची किंमत होईल तीन द्वितीयांश आणे : कोठल्याही क्षणी आपलं उत्तर खोडून काढलं जाईल असं त्याला वाटत होतं. पण वडील म्हणाले, "वा, उत्तम. आता आणखी सोपं कर पाहू." अर्ध्यातासाच्या त्रासदायक खटपटीनंतर स्वामिनाथननं जाहीर केलं, "कृष्णाला सहा आणे द्यावे लागतील," व त्याला रडूच फुटलं.

3

पाच वाजता ते क्लबमध्ये जायची तयारी करू लागले तेव्हा सबंध दुपारभर स्वामिनाथनला वेठीला धरल्याबद्दल त्याच्या वडिलांना पश्चाताप झाला. "तुला माझ्याबरोबर क्लबमध्ये यायचंय का ?" त्यांनी विचारलं. एका खांबामागं स्वामिनाथन खिन्न मुद्रेनं उभा होता. क्षणभर नाहीसा होत व मग कोट टोपी घालून तयार होऊनच त्यानं उत्तर दिलं. त्याला नखाशिखान्त न्याहाळून बाबा म्हणाले, "आणखी थोडं नीट नेटकं राहयला काय झालं ?" स्वामिनाथन अवघडला.

"लक्ष्मी," वडिलांनी आईला हाक मारली व ते म्हणाले, "पेटीत स्वच्छ कपडे असतील. त्यातला दे त्याला एखादा."

"आता उगाच जास्त काळजी करत बसू नका. तो ठीक आहे. कोण पेटी उघडत बसणार? किल्ल्याही कुठंतरी ठेवल्यात. त्यातून मी आताच बाळासाठी दूध तयार केलंय." आई म्हणाली.

"त्याच्या इतक्या सर्व कपड्यांचं काय झालं?"



"कुठले कपडे ? गेल्या उन्हाळ्यानंतर तुम्ही इंचभर देखील कापड आणलेलं नाही !"

"तुला म्हणायचं तरी काय ? काही महिन्यांपूर्वी मी आणलेल्या सुरेख रेघांच्या कापडाचं काय झालं ?" काहीशा साशंक सुरातच वडिलांनी विचारलं. तसंच बुधवारी स्वामिनाथनला शिंप्याकडं घेऊन जायचं त्यांनी मनोमन ठरवलं. आपली आई नवीन पोशाख द्यायला तयार नाही हे पाहून स्वामिनाथनला बरंच वाटलं. आपण कपडे बदलायला आत गेलो तर बाबा आपल्याला न घेताच निघून जातील अशी भीती त्याला वाटत होती.

एका मोटारीचा भोंगा घराच्या दरवाज्यापाशी वाजला. टेबलावरची टेनिसची रॅकेट घेऊन बाबांनी धाव घेतली व स्वामिनाथनही त्यांच्या मागून निघाला. ब्लेझर कोट घातलेला एक सभ्य गृहस्थ ड्रायव्हरच्या जागेवर बसला होता. त्याचा कोट स्वामिनाथनला आवडला. हसून स्वागत करीत तो म्हणाला, "गुड इव्हिनिंग." हा गृहस्थ आपल्याला मोटारीत घ्यायला नकार देईल की काय अशी शंका स्वामिनाथनला आली. पण त्याची ही भीती क्षणार्धात दूर झाली कारण तो भला गृहस्थ प्रेमळपणे म्हणाला, "हॅलो, श्रीनिवासन, तुझ्या मुलालाही क्लब मध्ये घेऊन येतोयस का ? वा, छान !" त्याचे बाबा व त्यांचे दोस्त हे पुढे बसले तर स्वामिनाथन मागे बसला.

गाडी सुळकन निघाली. अशावेळी आपल्या एखाद्या मित्रानं आपल्याला बघावं असं स्वामिनाथनला वाटलं. गाडी एका प्रवेशद्वारातून आत शिरली आणि अर्ध्या डझन मोटारींमध्ये येऊन थांबली.

वडिलांना टेनिस खेळताना तो पाहत होता. शेजार-शेजारच्या तिन्ही मैदानांवर चाललेल्या खेळात आपले बाबा हेच सर्वोत्कृष्ट खेळाडू आहेत असा निष्कर्ष त्यानं काढला. जेव्हा जेव्हा त्याचे बाबा चेंडूला फटका मारीत तेव्हा त्यांचे प्रतिस्पर्धी त्याला परत टोलवू शकत नसत, त्यामुळे ते तो तसाच जाऊ देत नि जाळीवर फटका मारीत. चेंडू उचलणाऱ्याला आपला जीव धोक्यात घालावा लागतो असंही त्याच्या लक्षात आलं.

स्वामिनाथनचं मन प्रसन्नतेच्या लाटेवर विहरत होतं. तेथे हजर राहून खेळ पाहण्याची परवानगी मिळाल्यानं आपण कोणीतरी महत्वाचे आहोत असं त्याला वाटत होतं. आपल्या मित्रांना उद्या सांगण्यासारखं त्याच्यापाशी काहीतरी होतं. हळू हळू तो सरकत जाळीजवळ, आपल्या बाबांच्या मागे उभा राहिला. तेथे उभं राहण्यापूर्वी खाकी कपड्यातला तो बुटका हरकत तर घेणार नाही ना अशी शंका त्याच्या मनाला चाटून गेली. पण तो बुटका इसम चेंडू उचलून खेळाडूकडे टाकण्यात रममाण झाला होता. स्वामिनाथन तिथं दहा मिनिटं थांबला. पाठीमागून त्याच्या वडिलांच्या हालचाली स्पष्टपणे दिसू शकत होत्या व चेंडू फटकावताना त्यांच्या रॅकेटचा होणारा टणत्कार कानाला खूप गोड वाटे.

काहीतरी चाळा म्हणून खाकी कपड्यातील त्या मुलाकडे स्वामिनाथन रोखून पाहू लागला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलू लागले, त्याच्या पापण्यांची जोरानं उघडझाप होऊ लागली, जणू त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. तो गाडीवानाचा मुलगा

होता ! खाकी पोशाखामुळं तो थोडाफार वेगळा दिसत होता इतकंच ! तो मुलगा वळला आणि त्यानंही त्याला पाहिलं. त्यानं कुत्सित हास्य केलं व छोटा चाकू काढून हातात धरला. स्वामिनाथन एकदम घाबरला. पूर्वीच्या जागी तो पळत जाऊन उभा राहिला. ती जागा त्याच्या शत्रूपासून दूर, सुरक्षित होती.

सेट खेळून झाल्यावर त्याचे बाबा जेव्हा इमारतीच्या दिशेनं चालू लागले तेव्हा त्यांच्या पुढं चालण्याची दक्षता स्वामिनाथननं घेतली. कारण मागून चाललो तर कोठल्याही क्षणी आपल्या पाठीत चाकू खुपसला जाईल अशी भीती त्याला वाटत होती.

"स्वामी, पुढं नको चालूस. तू माझ्या पायात अडमडतो आहेस," स्वामिनाथननं अनिच्छेनंच ती आज्ञा पाळली. चालताना तो पाठीमागं व बाजूला नजर टाकीत होता. मध्येच थांबून त्यानं एक अणकुचीदार दगड उचलला व तातडीची गरज लागली तर असावा म्हणून हातात तयार ठेवला. टेनिसचं मैदान व इमारत यांच्यातलं अंतर वीस पंचवीस पावलांचंच होतं. पण स्वामिनाथनला ते दीडमैल असावं असं भासत होतं. पत्ते खेळण्याच्या खोलीत बाबांच्या शेजारी खुर्चीवर बसल्यावर त्याला सुरक्षित वाटलं. सबंध खोली धुरानं भरली होती. बाबा जोरजोरानं पत्ते पिसत होते व टाकीत होते. जगातील ही सर्वात सुरक्षित जागा होती. त्याचे बाबा व त्यांचे कितीतरी मित्र तिथं होते. त्या गाडीवानाच्या मुलाला प्रयत्न करायचा असला तर करूच दे. थोड्या वेळानं स्वामिनाथननं खिडकीतून पाहिलं तेव्हा त्याला तारे दिसले, तो काहीसा अस्वस्थ झाला. पत्त्याचा डाव संपवून बाबा घरी जायला निघेपर्यंत तर आणखीच अंधार होईल.

तासाभरानंतर बाबा टेबलवरून उठले. इमारतीच्या अखेरच्या पायऱ्या उतरताना स्वामिनाथनला फारच बेचैन वाटलं होतं. भोवतालच्या अंधारात अज्ञात धोके दबा धरून बसले असतील. बाबा व त्यांचे मित्र यांच्यामध्ये तो सुरक्षित होता यात शंका नव्हती. किंबहुना हा विचार हुरूप वाढवणारा होता. पण तरीही त्याला वाटलं की पत्त्याच्या खोलीतील सर्वजणांनी त्याला मोटारीपर्यंत पोचवायला यायला हवं होतं. मिळेल तेवढं आणि जमलं तर जास्तच संरक्षण त्याला हवंसं वाटत होतं. आतापर्यंत त्या मुलानं बाहेर जाऊन हल्लेखोरांची टोळीच जमा केली असेल व तो आपली वाट पाहत असेल. त्याला पुढं चालणं शक्यच नव्हतं. एकतर वडिलांच्या पायात अडमडण्याचा प्रश्न होता व कोणत्या दिशेनं जायचं हे त्याला ठाऊक नव्हतं. वडिलांच्या पाठोपाठ चालणं तर शक्यच नव्हतं. एकाचवेळी मागचं व पुढचंही दिसेल अशा पद्धतीनं तो बाजूनं चालू लागला. अंतर कधी संपेल असं वाटतच नव्हतं. आपल्याला असलेला धोका वडिलांना सांगून त्यांचं संरक्षण मिळवावं असं त्यानं ठरवलं.

"बाबा."

"हं. काय रे ?"

परिस्थिती कितीही गंभीर असली तरी बाबांना गाडीवानाच्या मुलाबद्दल न

समजलेलंच बरं असं स्वामिनाथनला अचानक वाटू लागलं.

"काय हवं तुला ?" वडिलांनी पुन्हा विचारलं.

"बाबा, आपण आता घरीच जाणार ना ?"

"होय."

"चालत ?"

"नाही. गाडी आहे ना, फाटकापाशी."

ते जेव्हा मोटारीजवळ आले तेव्हा सर्वप्रथम आत शिरून मागील सीटच्या मध्यभागी जाऊन स्वामिनाथन बसला. त्याला अजूनही धाकधूक वाटत होती. वडिलांच्या मित्राला गाडी सुरू करायला वेळ लागत होता. स्वामिनाथन बाबा व त्यांच्या मित्राच्या मागे दूरवर एकटाच मागील सीटवर बसला होता, आतादेखील गाडीवानाचा मुलगा व त्याचे साथीदार त्याला बाहेर खेचून त्याचा खिमा करू शकले असते.

गाडी सुरू झाली. इंजिनाचा घरघर आवाज त्याला एखाद्या रक्षणकर्त्यासारखा वाटू लागला. गाडी फाटकातून बाहेर पडली व तिनं वेग घेतला. स्वामिनाथननं आपल्या धोतराच्या सोग्यानं कपाळावरचा घाम पुसला.

बारा

फुटकी तावदाने

1

मुंबईचे एक प्रख्यात राजकीय कार्यकर्ते गौरीशंकर यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी 15 ऑगस्ट 1930 रोजी मालगुडीचे सुमारे दोन हजार नागरिक शरयूच्या उजवीकडील तीरावर जमले होते. एक खादीधारी व इमानदार दिसणारा इसम लाकडी चौथऱ्यावर उभं राहून जमावापुढं भाषण करीत होता. कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात त्यानं गौरीशंकर यांचं चरित्र व कामगिरी वर्णन केली व नंतर तो सर्वसाधारण गोष्टीकडं वळला, "आपण आज गुलाम आहोत," तो किंचाळत म्हणाला, "पूर्वीपेक्षाही आपली स्थिती अत्यंत वाईट आहे. आपल्या प्राचीन सांस्कृतिक वारशाचं स्मरण करू या. रामायण व महाभारताच्या वैभवशाली काळाचा आपल्याला विसर पडला काय ? जगाला एक कालिदास, एक बुद्ध, एक महादेव देणारा हा देश आहे. जेव्हा इंग्रज जंगलात नग्नावस्थेत भटकत होते व कच्चं मांस खात होते तेव्हा आपल्या नौका महासागरातून संचार करत होत्या आणि संस्कृतीची परमोच्च पातळी आपण गाठली होती. पण आता आपली अवस्था काय आहे ?" क्षणभर थांबून आणि अर्थाचा फारसा विचार न करता एकदम उत्स्फूर्तपणं तो म्हणाला, "आपण गुलामांचे गुलाम आहोत." स्वामिनाथन आणि मणीलाही भाषणातील हा भाग अनाकलनीय वाटला. परंतु पाच मिनिटानंतर वक्त्यानं जे सांगितलं ते शक्य वाटत होतं. "जरा विचार करा. आपण साडे तेहेतीस कोटी आहोत व आपला देश रशिया वगळून असलेल्या युरोपपेक्षा मोठा आहे. इंग्लंड आपल्या मद्रास प्रेसिडेन्सीपेक्षा मोठा नाही व तो हजारो मैल दूर आहे आणि तेथे मूठभर गोरे बदमाष राहतात. आणि तरीही आपण इंग्रजांपुढं झुकतो ! आपला काहीही दोष नसताना आपण असे दीन व भित्रे का बनलो ? दडपशाही व उपासमारीनं नोकरशाहीनं आपल्याला असं बनवलं आहे. यापुढं तुम्हाला हे सहन करायची गरज नाही. प्रत्येक भारतीयानं इंग्लंडवर थुंकलं पाहिजे या थुंकीचाच एवढा मोठा लोट असेल की त्यात इंग्लंड बुडून जाईल. . .!"

"गांधीजी की जय," वक्त्याच्या वक्तृत्वानं भारून जाऊन स्वामिनाथननं घोषणा दिली. पण मणीनं त्याला टोकलं, "मूर्खा, तुला चूप बसायला काय झालं ?"

"हे खरं आहे का ?" स्वामिनाथननं विचारलं.

"काय ?"

"थुंकायचं व फिरंग्यांना बुडवायचं ?"

"खरंच असणार, नाहीतर कशाला तो सुचवील ?"

"मग का करू नये तसं. किती सोपं आहे ते."

"गोरे आपल्याला गोळ्या घालतील. ते फार निर्दय आहेत," मणि म्हणाला.

हे उत्तर समाधानकारक वाटलं. आणखीही शंकेचं निरसन करून घेण्याचा स्वामिनाथनचा विचार होता. परंतु आजूबाजूस बसलेल्या एक-दोघांनी रागावून पाहिलं म्हणून त्यानं तो बेत सोडून दिला.

उरलेली सायंकाळ स्वामिनाथन भाषण करणाऱ्याच्या वक्तृत्वानं भारून गेला होता. मणीचीही तीच अवस्था होती. वक्त्यासमवेत त्यांनीही भारतीय शेतकऱ्याच्या अवस्थेबद्दल अश्रू ढाळले, इंग्लिश वस्तूंवर, बहिष्कार टाकण्याचा संकल्प केला, खास करून लँकेशायर व मॅचेस्टर येथील कापडावर - कारण तेथील गिरणी मालकांनी डाक्क्यातील तलम मलमल बनवणाऱ्या विणकरांचे अंगठे तोडून टाकले होते. डाक्क्याच्या मलमलीसाठी एकेकाळी भारत प्रसिद्ध होता. ही मलमल म्हणजे काय चीज होती ! चाळीस वार लांबीची मलमल तपकिरीच्या डबीत ठेवता येत असे. अशा विणकरांचे अंगठे तोडणाऱ्यांना सर्वात कडक शिक्षा व्हायला हवी. खरबरीत स्वदेशी खादी घालून स्वामिनाथन ही शिक्षा करणार होता. आपल्या पोशाखाकडं खजिलपणं पाहत त्यानं मणीला विचारलं, "मी कसले कपडे घातले आहेत याची तुला कल्पना आहे का ?"

स्वामिनाथनचा कोट निरखीत तो म्हणाला, "हे लँकेशायरचं कापड आहे."

"तुला कसं ठाऊक ?"

स्वामिनाथननं उत्तराच्या अपेक्षेनं त्याच्याकडे पाहिलं.

"तू कशाचे कपडे घातले आहेस ?" स्वामिनाथननं विचारलं.

"अर्थात खादी ! तुला काय वाटलं मी त्या लँकेशायरच्या सैतानांना कवडी तरी देईन ? छे ! शक्यच नाही. माझ्याकडून त्यांना काही मिळणार नाही."

त्याच्या या विधानाबद्दल स्वामिनाथनला शंका वाटत होती. पण त्यानं चूप राहणंच पसंत केलं. आपण ज्याला लँकेशायरचं कापड समजतो त्याचे कपडे घालण्यापेक्षा नागडं आलो असतं तर बरं झालं असतं असं त्याला वाटलं.

जमावातून जोरदार घोषणा उठली - "भारत माता की जय." त्यानंतर "गांधीजी की जय" च्या घोषणा दिल्या गेल्या. त्यानंतर राष्ट्रगीत झालं. विदेशी कापडाची होळी करून सायंकाळचा कार्यक्रम संपला. अंधार पडला होता. अचानक तांबड्या प्रकाशानं अंधार

उजळला. कोणीतरी आग पेटवली होती. गांधी टोपी घातलेली काही मुलं लोकांकडे होळी करण्यासाठी विदेशी कपडे मागत होते. कोट, टोप्या व कमरेवरील वस्त्रे हवेतून भिरभिरत आगीत येऊन पडत होती. आगीच्या ज्वाळा वाढत होत्या, हवेत धूर पसरला होता व जळका वासही येत होता. तांबड्या प्रकाशात मंद सावल्यांसारखी माणसं इकडून तिकडं जाताना दिसत होती. स्वामिनाथनच्या अंगातून आनंदाच्या लहरी उसळत होत्या. कोणीतरी त्याला विचारलं, "अरे तरूण पोरा, आपला देश अनंत काळपर्यंत गुलामगिरीत खितपत पडावा असं तुला वाटतं का ?"

"नाही. नाही." स्वामिनाथननं उत्तर दिलं.

"पण तू तर विदेशी टोपी घातलीय."

स्वामिनाथन शरमला. "ओह, माझ्या लक्षातच आलं नाही," असं म्हणत त्यानं आपण देश वाचवतो आहोत या भावनेनं टोपी काढून ती आगीत भिरकावून दिली.

2

:

दुसऱ्या दिवशी पहाटे आपल्या अंथरुणानजिक धुळीचे कण चमकविणारा सूर्यकिरण पाहता पाहता, जाग येत असलेल्या त्याच्या मनाला कसल्याशा अंधुक काळजीची जाणीव झाली. कसली बरं आपल्याला चिंता वाटते आहे याचा तो विचार करू लागला. काहीतरी शाळेशीच संबंधित असणार. गृहपाठ ? छे ! त्याबाबत सारं ठीक होतं. काहीतरी पोशाखाबद्दल असणार. होळी. कपड्यांची होळी. हं आता आठवलं. आदल्या दिवशी सायंकाळी त्यानं त्या देशभक्तीपूर्ण होळीत आपली टोपी भिरकावून दिली होती व त्याच्या वडिलांना त्याबद्दल काहीही माहीत नव्हतं.

आज शाळेत जाताना काय घालायचं ? बाबांना सारं सांगून नवी टोपी मागणं व्यवहार्य नव्हतं. तसंच बोडक्या डोक्यानं त्याला शाळेत जाणं शक्य नव्हतं.

तो बिनटोपीचा केवळ कोट घालून शाळेकडं निघाला. दैववादावरच त्यानं सारं सोडून दिलं होतं. आणि त्याचं नशिब खरंच सुदैवी होतं. शाळेच्या समोर गलका करणाऱ्या जमावाच्या स्वरुपात मुलं जमलेली पाहताच या मागं काहीतरी ईश्वरी हात असावा असं स्वामिनाथनला वाटलं.

शाळेच्या प्रवेशद्वारापर्यंत पोचेस्तोवर त्याची कोणी दखल घेतली नाही. आठव्या इयत्तेतील एका पूर्णतः अनोळखी विद्यार्थ्याने त्याला थांबवून विचारलं, "कुठं निघालास ?"

या प्रश्नात काही युक्ती तर नाही ना याचा अंदाज घेण्यासाठी तो का कू करत म्हणाला, "का बरं ? अर्थात. . ."

"आज शाळा बंद," असं ठामपणं जाहीर करून तो अनोळखी विद्यार्थी भावनेनं भारलेल्या आवाजात म्हणाला, "मातृभूमीच्या एका महान सुपुत्राला फासावर चढवण्यात

आलं... गुलामांचे गुलाम... "

"मी शाळेत जाणार नाही," आपल्या टोपीची समस्या अशी अनपेक्षितरीत्या निकालात निघालेली पाहून सुटकेचा निःश्वास टाकीत तो म्हणाला.

शाळेच्या पुढच्या बाजूच्या व्हरांड्यात मुख्याध्यापक व शिक्षक उभे होते. मुख्याध्यापक चिंताग्रस्त दिसत होते. एब्नेझार आपली छडी हलवित वर-खाली येरझाऱ्या घालीत होते. इतिहासाचे मास्तर डी. पिल्ले यांची विद्यार्थ्यांनी प्रथमच गंभीर मुद्रा पाहिली. रागारागानं ते स्वतःच्या टोकदार मिशा पिळीत होते. रस्त्यावरच्या जमावाचा गलका वाढला होता व शाळा पोरकी दिसत होती. दहाला पाच मिनिटं असताना पहिली घंटा झाली, प्रवेशद्वाराजवळ उभे असलेले काही जण सोडून इतरांना ती ऐकू गेली नाही. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यात काहीतरी बोलणं चालू होतं. आपलं घड्याळ काढून पाहताना मुख्याध्यापकांचा हात थरथरत होता. त्यांनी दुसरी घंटा देण्याचा आदेश दिला. एरवी खणखणीत वाटणारा घंटेचा आवाज आज क्षीण व अस्पष्ट भासत होता. मुख्याध्यापक व शिक्षक प्रवेशद्वाराकडं येताना दिसू लागले आणि जमावात शांतता पसरली.

विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात शांतपणं परतावं असं आवाहन मुख्याध्यापकांनी केलं. परंतु विद्यार्थी आपल्या भूमिकेशी ठाम होते. डी. पिल्ले यांच्यासह शिक्षकांनीही प्रयत्न करून पाहिला पण त्यांना यश आलं नाही. ऐकलं नाहीत तर कडक शिक्षा होईल असा इशारा देऊन मुख्याध्यापक परत फिरले. "भारत माता की जय," "गांधीजी की जय," "गौरी शंकर की जय" या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेलं.

विद्यार्थ्यांच्या जमावात सर्व प्रकारचे लोक सामील झाले होते. "गांधीजी की जय" च्या आरोळ्यात प्रौढांचे आवाज ओळखू येत होते.

अर्धा डझन मुलांनी स्वतःच आपल्या हाती सूत्रं घेतली होती. ते ओरडत होते : "ध्यानात ठेवा, हा हरताळ आहे. शोक पाळायचा आहे. दुःख आणि शांततेच्या वातावरणात तो पार पाडावयाचा आहे."

त्या संबंध गर्दीत कोणाचंही लक्ष नसलेला स्वामिनाथन हा क्षुद्र प्राणी होता. दुसरा असाच कोणाचं लक्ष नसलेला क्षुद्र प्राणी त्याच्यापुढं छोटे छोटे दगड गोळा करून त्यांचा ढीग रचत होता, शाळेच्या खिडक्यांच्या तावदानावर नेम धरून तो ते दगड फेकीत होता. त्याचं अनुकरण केल्यावाचून स्वामिनाथनला राहवेना. त्यानं मूठभर दगड हातात घेऊन शाळेच्या इमारतीचं निरीक्षण केलं. किमान सत्तर टक्के तावदानांची आधीच 'काळजी' घेतली गेली असल्याचं पाहून तो निराश झाला.

मुख्याध्यापकांच्या खोलीची एक खिडकी छोट्या काचेच्या चौकटीसह शाबूत असल्याचं पाहून त्याला अत्यानंद झाला. त्यानं एक दगड त्या दिशेनं भिरकावला. काचेला दगड लागताच फुटण्याचा खळकन होणारा आवाज व त्यानंतर क्षणभरात जमिनीवर काचा पडून होणारा थरारक आवाज त्याच्या आतुर कानांनी ऐकला.

इतक्यात एक हडकुळा इसम जमावाकडं धावत आला नि म्हणाला, "बोर्ड हायस्कूल चालू आहे."

ही भयंकर बातमी ऐकून जमावात खळबळ उडाली. बाजार रस्त्याच्या टोकाला असलेल्या बोर्ड हायस्कूलच्या दिशेनं जमाव पुढं सरकू लागला.

तो जेव्हा बोर्ड हायस्कूलजवळ पोचला तेव्हा स्वतःच पुढारीपण घेतलेल्या मंडळींनी जमावाला बाहेरच शांतपणं उभं राहण्याची हात जोडून विनंती केली व ते शाळेत गेले. त्यानंतर पंधरा मिनिटांनी दोन-दोन, तीन-तीनच्या गटानं सारा जमाव शाळेच्या सभागृहात येऊन दाखल झाला.

जमावाचा एक प्रवक्ता मुख्याध्यापकांना म्हणाला, "आम्ही गोंधळ माजविण्यासाठी आलेलो नाही. तुम्ही शाळा बंद करावी एवढीच आमची इच्छा आहे. तसं करणं आवश्यक आहे. आमचे नेते फासावर गेले आहेत. आमची मातृभूमी युद्धाच्या खाईत आहे."

घुबडासारखा सुरकतलेला चेहरा असलेले मुख्याध्यापक ओरडले, "कोणाच्या परवानगीनं तुम्ही इमारतीत घुसलात ? आधी चालते व्हा, नाहीतर मी पोलिसांना बोलवीन."

आरडा ओरडा, हुर्रे करीत त्यांच्या या बोलण्याचं स्वागत झालं. आणि नंतर टेबले, बाके उलटी पालटी करण्यात आली, मोडण्यात आली आणि खिडक्यांची तावदानं फोडण्यात आली. बोर्ड स्कूलचे बहुतेक विद्यार्थी जमावात सामील झाले. काहीजण मात्र बाजूला उभे होते. त्यांना बाहेर येण्याची विनंती करण्यात आली. पण त्यांनी जेव्हा विरोध केला तेव्हा त्यांना खेचून बाहेर काढण्यात आलं.

या सर्व घडामोडीत स्वामिनाथनची कामगिरी दुर्लक्षिण्याजोगी नव्हती. मुख्याध्यापकांनी पोलिसांचं नाव काढताच तो ओरडला होता, "आम्ही पोलिसांवर थुंकतो." (कोलाहलात त्याचं हे बोलणं कोणाला ऐकू गेलं नाही हा भाग वेगळा). पोलिसांचं नाव घेतल्यानं त्याचं रक्त तापलं होतं. लॅंकेशायर आंगठे तोडणाऱ्यांचे दुष्ट हस्तक असणाऱ्या पोलिसांचं नाव घेण्याचा हा किती कोडगेपणा, बेशरमपणा ! जेव्हा गडबड सुरू झाली तेव्हा शाळेच्या लाकडी सामानाची मोडतोड करण्यात तो मागं नव्हता. अनेक तावदानं अजून शाबूत असल्याचं पाहून त्याला अत्यानंद झाला होता. तावदानं फोडण्याची त्याची इच्छा त्याच्या शाळेत पूर्णतः पुरी झाली नव्हती. त्यानं मिळतील तेथून शाईच्या बाटल्या गोळा केल्या व दृष्टीस पडतील ती तावदानं तो फोडीत सुटला. बोर्ड स्कूलच्या विद्यार्थ्यांना जेव्हा बाहेर खेचून काढलं जात होतं तेव्हा ती मुलं आपल्या एवढीच मोठी असल्यानं आपल्याला फारसं काही करणं शक्य नाही हे त्याला उमगलं होतं. त्याला अचानक एक कल्पना सुचली. घोळक्यातून बाहेर पडत तो शिशु वर्गांचा शोध घेऊ लागला. तिथं छोटी बालकं एका खोलीत कोंबलेली व भीतीनं थरथरत असलेली त्याला आढळली. तो अशा आवेशानं त्यांच्यात घुसला की मुलं भयभीत होऊन सैरावैरा पळू लागली, एकमेकांवर पडू लागली. पळत असलेल्या एका बालकाकडं त्याची नजर गेली. स्वामिनाथन त्याच्यावर

झेपावला. त्याची टोपी काढून घेऊन त्यानं ती पायाखाली तुडविली. त्या मुलाला तो शिव्या घालीत होता, त्याला ढकलत त्यानं बाहेर खेचलं व डोक्यावर एक ठोसा लगावून त्याला तसंच सोडून दिलं.

बोर्ड स्कूलमधील काम बंद पाडल्यावर जमावानं मार्केट रस्त्यावरून मिरवणूक काढली. शेकडो मुलांनी विविध सुरात म्हटलेल्या गाण्यांनी व घोषणांनी वातावरण भरून गेलं. शेवटच्या रांगेत बऱ्याचशा अनोळखी लोकात आपण आहोत असं स्वामिनाथनला आढळलं. झाडं नसलेल्या त्या मार्केट रस्त्यावरील झगझगीत प्रकाशानं डोळ्यापुढं अंधेरी येत होती. मिरवणुकीमुळं उडणारी पांढरी धूळ हवेत तरंगत होती व त्याला गुदमरवून टाकीत होती. त्याला आपल्यापुढं हलणारे खांदे, पाठी आणि अधूनमधून काही इमारतींचे भाग दिसत होते. ओरडल्यानं त्याचा घसा सुकला होता व त्याला भूकही लागली होती. येथून हळूच सटकावं व घरी जावं असा विचार तो करीत असतानाच जमाव अचानक थांबला. काय झालं हे पाहण्यासाठी मागचे लोक पुढं येऊ लागले.

चौकातील कारंज्यासमोर, मार्केट रस्त्याच्या मध्यभागी जमाव पोचला होता. कारंज्याच्या दुसऱ्या बाजूस लाठीधारी पन्नास पोलिस उभे होते. त्यातील डझनभर सोजिरांनी मिरवणूक अडवली होती. हातात छडी घेतलेला व कमरेच्या पट्ट्याला रिव्हॉल्व्हर लटकत असलेला एक जाडजूड माणूस मिरवणुकीच्या दिशेनं येऊ लागला. त्याचा चामडी पट्टा, त्याचे चकचकीत बूट मोजे यामुळं स्वामिनाथनला तो रुबाबदार वाटला. त्यानं जेव्हा डोकं वर केलं तेव्हा स्वामिनाथनला धक्काच बसला. ते राजमचे वडील होते ? ते राजमचे वडील असावेत याचा त्याला खेद वाटला. राजमचे वडील ! या देशद्रोह्यांचे प्रमुख राजमचे वडील असावेत ! मनगटावरील आपल्या घड्याळाकडं पाहत ते म्हणाले, "हा जमाव बेकायदेशीर आहे असं मी जाहीर करत आहे व येथून निघून जाण्यास मी तुम्हाला पाच मिनिटांच्या अवधी देत आहे." पाच मिनिटं संपली तेव्हा त्यांनी इकडं तिकडं पाहिलं नि हळू आवाजात म्हणाले, "चढाई सुरू करा. . ."

त्यानंतर उडालेल्या गडबड-गोंधळात स्वामिनाथनवर जवळ जवळ चेंगरून ठार व्हायचीच पाळी आली होती. पोलिस जमावात घुसले होते, प्रत्येकाला ढकलत, झोडपत होते. घाबरून पळ काढणाऱ्या एका छोट्या गटात स्वामिनाथन सामील झाला होता. लाठ्या उगारत पोलिस त्यांच्यावर धावून आले. स्वामिनाथन काकुळतीनं म्हणाला, "मला ठार मारू नका, मला काही ठाऊक नाही." त्याच्या आजूबाजूला उभ्या असलेल्यांवर लाठ्या पडल्या व त्यांचे मंद आवाज ऐकू येऊ लागले. एकाच्या डोक्यातून रक्त ओघळताना स्वामिनाथननं पाहिलं. पुन्हा लाठ्यांचा वर्षाव होऊ लागला. दुसरा पळणारा कण्हत खाली पडला. तिसऱ्याच्या पाठीवर पुन्हा पुन्हा लाठ्या पडत होत्या.

स्वामिनाथनची भीतीनं गाळण उडाली. शक्य होईल तितक्या वेगानं तो पळत होता. पण पोलिस त्याच्यापाठीमागं धावत होते. एकानं त्याचे केस पकडले व विचारलं, "तुझं



इथं काय काम होतं ?"

"मल काहीही माहीत नाही. मला सोडा, सर," स्वामिनाथननं विनवलं.

"काही करत नव्हता काय ? खट्याळ माकड कुठलं !" तो गंभीर व हिडिस चेहऱ्याचा पोलिस म्हणाला. जवळून पोलिस किती हिडिस दिसतात नाही ? - लाठीनं त्याच्या डोक्यावर हलकेच मारीत, "लाथ खाण्यापूर्वी इथून धूम ठोक पाहू" असं त्यानं फर्माविलं.

3

त्या दिवशीच्या घटनेची वडिलांपुढं चर्चा करायची नाही असं स्वामिनाथननं ठरवलं होतं. पण बाबांनी घरी येताच कोट काढून ठेवण्यापूर्वीच दिवसभरात घडलेल्या घटनांचा गोषवारा आईला सांगितला. ते खूप जिव्हाळ्यानं बोलत होते. "हा पोलीस उपनिरीक्षक म्हणजे कसाई आहे," कपडे बदलायला जाताना बाबा म्हणाले. कत्तलीचा आदेश देण्यापूर्वी घड्याळातील सेकंद गंभीर चेहऱ्यानं मोजणारे राजमचे वडील त्याला आठवले आणि उपनिरीक्षक कसाई आहेत या मताशी सहमत होण्याकडे त्याचा कल होता. आपला टाय काढण्यापूर्वी बाबा ड्रेसिंग रूममधून बाहेर आले व म्हणाले, "गंभीररीत्या जखमी झालेल्या पन्नास जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एक दोघे जण ठारही झाले असावेत असा संशय आहे." स्वामिनाथनकडं वळून ते म्हणाले, "शाळेतील विद्यार्थ्यांनी खूप त्रास दिल्याचं ऐकलं. तू काय, केलंस ?"

"तिथं हरताळ होता." त्यानं उत्तर दिलं. आपल्या टोपीचा प्रश्न सोडविण्याची ही नामी संधी आहे असं त्याला वाटलं. तो म्हणाला, "त्या गडबडीत कोणीतरी माझी टोपीच हिसकावून तिचे तुकडे तुकडे केले. उद्या शाळेत जाण्यापूर्वी मला दुसरी टोपी हवीय."

"कोण होता तो ?"

"मला ठाऊक नाही. जमावातील कोणीतरी गुंड."

"त्यानं असं का केलं ?"

"कारण ती विदेशी होती."

"कोण म्हणालं ? मी दोन रुपये देऊन खादीच्या दुकानातून ती आणली होती. ती काळ्या खादीची टोपी होती. आपल्याला सारं ठाऊक आहे असं तू का समजतोस ?"

"मी काहीही केलं नाही. मी जेव्हा विरोध केला तेव्हा माझ्यावर जवळ जवळ हल्लाच झाला."

"तू पण त्याला लगावून द्यायला हवी होती. त्याच दिवशी मी खादीच्या दुकानातून तुझ्या कोटासाठी कापड व टोपी खरेदी केली होती. जो कोणी ती खादी नाही असं म्हणाला असेल तो आंधळाच असणार !"

"ती लँकेशायरमध्ये बनवलेली आहे असं लोकं म्हणतात."

"अगदीच मूर्खपणाचं बोलणं आहे हे ! त्यांना म्हणावं तुम्ही तुमच्यापुरतं पाहा. आणि तूही तुझे कपडे अमुक नि तमुक आहे असं ठरवणाऱ्यांना ते "फाडू देत राहिलास तर नागडं फिरायची पाळी तुझ्यावर येईल. मी माझी एकही दमडी परदेशी जाऊ देणार नाही, मला माझी कर्तव्यं समजतात हे तू त्यांना बजावून सांग. आणि ते काही असो, तुम्ही पोराटोरांनी राजकारणात ढवळाढवळ करायचं कारणच काय ? आपल्या देशात आधीच खूप उपद्रव आहे. तेव्हा तुम्हाला धुडगूस घालायची काही गरज नाही."

स्वामिनाथन अंथरुणात बराच वेळ जागाच होता. जसजसा वेळ जात चालला आणि घरातील एकेक दिवे बंद होऊ लागले तसतसे त्याचे शरीर दिवसभरात ठिकठिकाणी झालेल्या विविध जखमांचा हिशेब घेऊ लागले. त्याची कोपरं व गुडघे यांची वेगळी कहाणी होती. दिवसभरात तीन-चारदा आपण कसे पडलो हे त्याला आठवलं. एकदा कधी बरं ? - हां राजम जेव्हा त्याच्या गाडीतून उतरून शाळेकडं येऊ लागला तेव्हा ! स्वामिनाथनला लपावसं वाटलं, घाईघाईत दगडांच्या ढिगावर आदळून तो पडला आणि त्याच्या गुडघ्यांची चांगलीच सालटी निघाली होती. आणि पोलिस त्याच्या पाठीशी लागला तेव्हा तर एका दुकानासमोर तो सपशेल आडवा झाला, त्यावेळी कोणीतरी सैतान एका पायानं त्याला जमिनीत गाडत त्याच्यावरून चालत गेला होता.

तो कुशीवर वळला तेव्हा त्याच्या कमरेतून कळा येत होत्या व मांड्या भरून आल्या होत्या. डोकं एकसारखं दुखत होतं. निर्दय हैवान कुठचे ! पोलिसाच्या लाठीचा फटकाही काही तेवढा नाजुक नव्हता. बरं मलाच माकड म्हणतो काय ? मी पण त्याला माकड म्हणून हिणवीन. मी काही माकड नाही. तेच पोलिस माकडासारखे दिसतात व माकडासारखे वागतात असे विचार त्याच्या मनात तरळत होते.

4

मुख्याध्यापक वर्गात आले. त्यांचा चेहरा काहीसा लालबुंद व त्यांची नजर रागीट वाटत होती. आपण या क्षणी तिथं नसतो तर किती बरं झालं असतं असं स्वामिनाथनला वाटलं. मुख्याध्यापकांनी काही क्षण वर्गावर नजर टाकली व ते म्हणाले, "काल तुम्ही जो काही प्रकार केला त्यानंतर इथं येऊन बसायला तुम्हाला लाज नाही वाटत ?" काल जे डझनभर विद्यार्थी हजर राहिले, त्यांची नावे जणू गौरव करतो आहोत, अशा थाटात त्यांनी वाचून दाखवली. त्यानंतर जे गैरहजर होते त्यांची नावे त्यांनी घेतली व त्यांना बाकावर उभं राहण्यास सांगितलं. परंतु ही शिक्षा पुरेशी वाटली नाही म्हणून टेबलवर उभं राहण्याचा त्यांनी आदेश दिला. त्यात स्वामिनाथनही होता व त्याला आपला अपमान केला जात आहे याची जाणीव होत होती. मग मुख्याध्यापकांनी चांगलंच व्याख्यान झोडलं. त्यानंतर



एकेकाला खुलासा करण्यास सांगण्यात आलं. "माझं डोकं दुखत होतं म्हणून मी आलो नव्हतो" असं एकानं सांगितलं. तेव्हा "डॉक्टरांचं सर्टिफिकेट घेऊन ये" असं त्याला सांगण्यात आलं. आपण शाळेकडं येत असताना वाटेतच "आज शाळा नाही" असं कोणीतरी सांगितल्याने आपण घरी परत गेलो असा खुलासा दुसऱ्या विद्यार्थ्यानं केला. "शाळा नाही" असं सांगणाऱ्या प्रत्येक भिक्कारड्यावर विश्वास ठेवला ना तर काठीनं फोडूनच काढीन असा दम मुख्याध्यापकांनी त्याला भरला. "ते काही असो, तू शाळेत येऊन खात्री का नाही करून घेतलीस?" या प्रश्नाला काही उत्तर मिळलं नाही. दहा दिवसाची उपस्थिती रद्द, दोन रुपये दंड व आज दिवसभर बाकावरच उभं राहयचं अशी शिक्षा त्याला फर्मविण्यात आली. तिसऱ्यानं, "माझं डोकं दुखत होतं,"चौथ्यानं, "माझ्या पोटात दुखत होतं," अशी कारणं सांगितली. "मी शाळेत यायला निघत असतानाच माझी आजी वारली,"असं पाचवा म्हणाला. तुझ्या वडिलांची चिट्ठी आणशील का? असं मुख्याध्यापकांनी विचारता त्यानं "नाही" असं उत्तर दिलं. कारण त्याला वडील नव्हते. "मग तुझे पालक कोण?" "त्याची आजी."

"पण आजी तर वारली ना?" "नाही. ती दुसरी आजी."

"एका माणसाला किती आज्या असतात?" असं मुख्याध्यापकांनी विचारलं तेव्हा त्याला काही उत्तर देता आलं नाही. ''मग शेजाऱ्यांची तरी चिट्ठी आणू शकशील?" "नाही. ते शक्य नाही." कारण एलमन रस्त्याच्या अशिक्षित भागात तो राहत असल्यानं त्याच्या शेजाऱ्यांना लिहिता वाचता येत नव्हतं म्हणे! त्यावर या अशिक्षित वस्तीत एका शिक्षकाला पाठवून "तुझी आजी खरोखरच वारली काय याची खात्री करून घेतो," असं मुख्याध्यापकांनी म्हणताच तो विद्यार्थी गडबडला, घामाघूम झाला. "शेजारी काहीच सांगू शकणार नाहीत कारण आजी खेड्यात वारली आहे," असं त्यानं सांगितलं. मुख्याध्यापकांनी त्याच्या ढोपरावर छडी मारली, "कुत्तरडा" अशी शिवी हासडली आणि त्याला पंधरा दिवस निलंबित करण्यात आल्याची शिक्षा सुनावली.

जेव्हा स्वामिनाथनची पाळी आली तेव्हा त्यानं असहायपणं भोवताली नजर टाकली. राजम तिसऱ्या बाकावर बसला होता व तो फळ्याकडं एकटक पाहत होता. परंतु पाठीमागून त्याचं डोकं व कानाच्या लालसर पाळ्या स्वामिनाथनला दिसत होत्या. ते दृश्य सहन होण्यासारखं नव्हतं. जर का त्यानं मागं वळून आपल्याकडं पाहिलं तर टेबलावरून आपण खालीच पडू असं त्याला वाटलं. तीन बाके दूर असलेल्या त्या कानांनी त्याची वाचाच बंद केली होती. त्याच्यात व त्या कानांमध्ये कोणीतरी फळा ठेवला तर किती बरं होईल असं त्याला वाटलं.

मुख्याध्यापक विचारत असलेल्या प्रश्नाकडे त्याचं लक्ष नव्हतं. त्यांनी छडी मारली तेव्हा कोठे त्याचं लक्ष गेलं.

"काल तू का आला नाहीस?" मुख्याध्यापकांनी वर पाहत विचारलं.

मी हजर होतो असं सांगून टाकावं असं त्याला सुरुवातीला वाटलं. पण हजेरी वही तिथं होती ना ! 'नाही, नाही, माझ्यावर दगडफेक झाली. मी यायचा प्रयत्न केला. पण त्यांनी माझी टोपीच काढून घेऊन जाळून टाकली. मी यायला लागलो तेव्हा काही आडदांड माणसांनी मला रोखून ठेवलं. . . एक महान व्यक्ती फासावर गेली. . . इंग्रजांच्या गुलाम असलेल्या तुला पाहून मला धक्काच बसला. . . त्यांनी ढाक्क्याची मलमल बनवणाऱ्यांचे हात तोडले ना. . . गुलामांचे गुलाम. . .' असं तुटक तुटक काही तरी सांगावं असं त्याला वाटत होतं, पण त्या क्षणी ते त्यानं सांगितलं नाही. डोकेदुखीचं कारण सांगायचा विचारही त्याच्या मनात आला पण इतरांनीही तेच सांगितले होतं. "तू आता तोंड उघडणार आहेस की नाही ?" मुख्याध्यापकांनी दरडावून विचारलं. स्वामिनाथनच्या उजव्या खांद्यावर छडी जोरानं हाणली. डाव्या हातानं छडीचा मार बसला ती जागा चोळीत डबडबलेल्या डोळ्यांनी स्वामीनाथन मुख्याध्यापकांकडे पाहत होता. "तू जर माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता नुसता पाहत राहिलास तर तुला ठार करीन," मुख्याध्यापक ओरडले.

"मी - मी येऊ शकलो नाही," स्वामिनाथन चांचरत म्हणाला.

"असं का ?" असं म्हणत मुख्याध्यापकांनी एका मुलाला" शिपायाला घेऊन ये'' असं फर्मान सोडलं.

आपल्याला बडवायला ते शिपायला सांगणार की काय ? त्यांनी तसं केलं तर मी प्रत्येकाचे चावे घेऊन त्याला ठार करीन, असा विचार स्वामिनाथनच्या डोक्यात घोळत होता. तेवढ्यात शिपाई हजर झाला. मुख्याध्यापक त्याला म्हणाले. "या टेबलावर उभ्या असलेल्या बदमाषाबद्दल तुला जे ठाऊक आहे ते सांग पाहू."

स्वामिनाथनकडं दुष्ट नजर टाकीत तो म्हणाला, "तावदानं फोडत होतास ना तू ?"

"माझ्या खोलीतील छोट्या खिडक्यांची ना ?" मुख्याध्यापकांनी उत्साहानं पुस्ती जोडली.

यातून सुटका होण्याचा काही मार्गच नव्हता. वेडगळपणं तो नुसता पहात राहिला, तोवर त्याच्या पाठीवर आणखी एक छडी बसली. याबद्दल तुला काय म्हणायचंय असं मुख्याध्यापक विचारत होते. त्यानं तावदानं फोडली हे खरं होतं. त्यांनी ते पाह्यलं होतं. नकळत तो उद्दाम बनला व आरोप नाकारण्याची त्यानं पर्वा केली नाही. जेव्हा पाठीवर आणखी एक छडी बसली तेव्हा तो म्हणाला, "मला मारू नका सर, छडी लागते." त्यामुळं मुख्याध्यापकांनी आणखी चार वेळा छडीचा चोप त्याला दिला, ते म्हणाले, "मी तुझी हकालपट्टी करीपर्यंत असाच मूर्खासारखा बघत उभा रहा."

छडीच्या मारानं त्याचं सारं अंग ठणकू लागलं. त्याच्यात एकदम अवसान आलं, निराशेच्या पोटी येतं तसं धाडस आलं. डोळ्यातून घळघळा वाहू पाहणारे अश्रू त्यानं रोखले, खाली उडी मारली, आपली पुस्तकं गोळा केली आणि "असल्या घाणेरड्या शाळेची मला पर्वा नाही," असं पुटपुटत तो बाहेर पडला.

तेरा

'एम.सी.सी.'

1

सहा आठवड्यानंतर राजम स्वामिनाथनच्या घरी आला आणि त्याला सर्व अपराध माफ केल्याचं त्यानं सांगून टाकलं. या अपराधात त्याच्या राजकीय हालचाली व त्याच्यात बोर्ड हायस्कूलचं नव्यानं शिरलेलं वारं - त्याचा अर्थ थोडासा मठ्ठपणा, मूर्खपणा व मेंदूच्या नाशाचा धोका असा होतो - यांचा समावेश होता.

अल्बर्ट मिशन स्कूल मधून नाट्यपूर्णरीतीनं (संपानंतरच्या दुसऱ्या दिवशी) बाहेर पडल्यानंतर स्वामिनाथन इतका हटवादी बनला की, त्याच्या वडिलांनी काही दिवसानंतर त्याला बोर्ड स्कूलमध्ये दाखल केलं. नव्या शाळेत आपण कितपत समाधानी राहू याबद्दल स्वामिनाथन साशंक होता, पण नव्या मुलांबद्दल जसं औत्सुक्य निर्माण होतं तसं त्याच्याबद्दल झालं व सातवी "क" वर्गातील तो मुख्य आकर्षण केंद्र बनला. त्याच्या वर्गातील नवे सहकारी त्याच्या भोवती नेहमी त्याला पाहयला व ऐकायला जमत. ज्यांना दोस्त म्हणता येईल अशा काही जणांची त्यानं अद्याप निवड केली नव्हती. अल्बर्ट मिशन शाळेतील आपलं मित्रांचं कोंडाळं शाबूत आहे असा त्याचा समज होता. पण शंकर गायब झाला होता, त्याच्या वडिलांची बदली झाल्याचं सांगण्यात येत होतं, सोमू वरच्या वर्गात न गेल्यानं तो आपोआपच कोंडाळ्यातून बाहेर पडला होता कारण तसा दंडकच होता, वाटाणा वरच्या वर्गात गेला होता पण तो शाळेला तीन महिने उशिरा आला. वैद्यकीय सर्टिफिकेटं व खुलासे घेऊन तो आला होता. शेकडो कटकटींनी तो बेजार झाला होता आणि जुन्या मित्राशी तो जणू अपरिचिताप्रमाणं वागत होता. स्वामिनाथनच्या दृष्टीनं फक्त राजम व मणि यांच्यात काही फरक पडला नव्हता. मणि त्याला दररोज भेटत असे. राजम मात्र त्याच्या राजकीय हालचाली उघड झाल्यानंतर त्याला भेटला नव्हता.

आणि आज दुपारी घरातील एका काळोख्या कोपऱ्यात पुठ्ठयाचं खोकं व चष्म्याचं भिंग घेऊन स्वामिनाथन कॅमेरा बनवत होता. खोक्याचं छिद्र थोडसं मोठं असल्यानं भिंग

काही त्यात राहत नव्हतं त्यामुळे तो चिडणार इतक्यात त्याला हाका मारणारा परिचित आवाज ऐकू आला. तो दाराकडं धावला.

"हॅलो, हॅलो, राजम अरे तू येणार आहेस हे मला आधी का नाही सांगितलंस ?" तो म्हणाला.

"तुझ्या हातात काय आहे ?" राजमनं विचारलं.

"ओह !" स्वामिनाथननं लाजत म्हटलं.

"बघू तरी काय आहे ते."

"ओह, काही नाही रे," असं म्हणत स्वामिनाथननं त्याला ते खोकं दिलं.

पुठ्ठयाच्या खोक्यातील छिद्रातून राजम बाहेर पहात असताना स्वामिनाथन म्हणाला, "आमच्या वर्गातील अकबर अलीनं झकास कॅमेरा बनवला आहे."

"खरं ? त्याचं काय करतो तो ?"

"त्याच्या सहाय्यानं त्यानं खूप फोटो काढलेत."

"खरं की काय ? कसले फोटो काढले ?"

"अजून त्यानं मला ते दाखवले नाहीत. पण घरं, माणसं, झाडं यांचे ते फोटो असणार, असा माझा अंदाज आहे."

दरवाजाच्या पायरीवर बसत राजमनं विचारलं, "आणि हा अकबर अली कोण ?"

"तो आमच्या वर्गातला एक छान मुसलमान मुलगा आहे."

"बोर्ड हायस्कूल मध्ये ?" त्याच्या आवाजात संशय होता. स्वामिनाथननं या प्रश्नाकडं दुर्लक्ष केलं आणि म्हणाला, "त्याच्याकडे सायकल आहे. तो खूपच चांगला मुसलमान आहे, गझनीच्या महम्मदाला व औरंगजेबास तो बदमाष म्हणतो."

"तुला ते तसे होते असं का वाटतं ?"

"त्यांनी आपली मंदिरं उध्वस्त केली व हिंदूचा छळ नाही का केला ? तुला सोमनाथाच्या देवालयाचा विसर पडला नाही का ?"

"आपल्या ब्राह्मणांना अशीच किंवा याहूनही जास्त वाईट वागणूक मिळायला हवी," असं राजम म्हणाला. "आमच्या घरात अमावस्येची बाबा फिकिर बाळगत नाहीत व मृत व्यक्तीसाठी वार्षिक श्राद्ध करीत नाहीत." त्याला वाद घालायची खुमखुमी आली आहे हे स्वामिनाथननं ताडलं व तो चूप राहिला. "त्या तुझ्या बोर्ड हायस्कूलमुळं तुझी अशी मनोवृत्ती बनली आहे."

त्याच्याशी सहमत होणंच बरं असं वाटून स्वामिनाथन म्हणाला, "एक प्रकारे तू म्हणतोस ते बरोबरच आहे. मला बोर्ड हायस्कूल आवडत नाही."

"मग तू कशाला त्या शाळेत दाखल झालास ?"

"माझा नाइलाज झाला. आपले मुख्याध्यापक किती पशुसारखे वागत होते हे तुला ठाऊकच आहे. तू माझ्याजागी असतास तर त्यांच्या थोबाडावर लाथच मारली असतीस."

या प्रशंसेनं राजम हुरळून गेला नाही. तो म्हणाला, "मी जर तुझ्या जागी असतो तर घाणेरडं राजकारण, संप यापासून मी दूर राहिलो असतो." त्याचे वडील सरकारी नोकर होते. त्यामुळं त्याचं कुटुंब हे राजकारण विरोधी होतं.

स्वामिनाथन म्हणाला, "तू म्हणतोस ते बरोबरच आहे. संपाच्या दिवशी मी घरीच राहायला हवं होतं." त्याच्या या सपशेल शरणागतीनं राजम हेलावून गेला. त्याच्या पूर्वीच्या अपराधाबद्दल क्षमा करायला आपली तयारी आहे व त्यानं बोर्ड स्कूलमध्ये जायलाही आपली हरकत नाही असं राजमनं स्पष्ट केलं. पूर्वी सारखेच पुन्हा मित्र म्हणून वागायचं त्यांनी ठरवलं. "क्रिकेटच्या संघाबद्दल तुझं काय म्हणणं आहे?" राजमनं विचारलं.

आपण क्रिकेट खेळू शकू असा त्यानं कधी विचार केला नव्हता. हॉब्स, ब्रॅडमन, दुलीप त्याला ठाऊक होते व राजमप्रमाणं त्यांचा स्कोअर स्मरणात ठेवायचा तो प्रयत्न करी. राजमप्रमाणं क्रिकेटपटुंची चित्रं चोरून तो ती आल्बममध्ये डकवून ठेवी खरी पण मनापासून तो काही या चित्रांची फारशी पर्वा करत नसे, ती त्याला एकसारखी वाटत. आल्बमच्या प्रत्येक पानावर एकच चित्र लावलेलं आहे असे त्याला वाटे.

"नाही राजम, मला नाही वाटत मला खेळता येईल. कसं खेळायचं हेच मला ठाऊक नाही."

"असं प्रत्येकालाच वाटतं," असं सांगून राजम म्हणाला, "मी चित्रं व स्कोअर जमा करीत असलो तरी मला स्वतःला तरी कुठं ठाऊक आहे."

हे ऐकायला खूप बरं वाटत होतं. कदाचित बॅट घेऊन ती फटकावण्यापूर्वी - हॉब्सही लाजाळू आणि अश्रद्ध असेल. "आपण बऱ्याच संघांना आव्हान देऊ शकतो. आपल्या शाळेच्या टीमला पण. आपल्याला कोणीच हरवू शकत नाही असा त्यांचा समज आहे." स्वामिनाथन म्हणाला.

"काय? बोर्ड स्कूलच्या मठ्ठोबांना असं वाटतं? आम्ही त्यांचा धुव्वा उडवू, होय धुव्वा."

"आपण नाव काय द्यायचं?"

"तुला ठाऊक नाही? एम.सी.सी." राजम म्हणाला.

"ते तर हॉब्सच्या संघाचं नाव आहे ना? आपण जर त्यांच नाव घेतलं तर ते आपल्याविरुद्ध न्यायालयात खटला भरतील."

"कोण म्हणतो? तशीच जर वेळ आली तर मी न्यायमूर्तीपुढं सांगीन की, एम.सी.सी. म्हणजे मालगुडी क्रिकेट क्लब."

स्वामिनाथनची थोडी निराशाच झाली. एम.सी.सी. हे नाव जरा भारदस्त वाटलं तरी ते प्रत्यक्षात काहीसं निस्तेज होतं. "राजम, मला वाटतं आपण दुसरं कुठलं तरी नाव देऊ या."

"तू काय सुचवशील?"

"अं. मला वाटतं "फ्रेंडस इलेव्हन."

"फ्रेंड्स इलेव्हन ?"

"किंवा "जम्पिंग स्टार्स ?" स्वामिनाथन म्हणाला.

"हं. काही वाईट नाही नाव."

"मला वाटतं आपण स्वतःला 'जम्पिंग स्टार्स' म्हणवून घेणं ऐटबाज वाटेल नाही ?"

राजमच्या नजरेपुढं वर्तमानपत्रात बातम्या कशा झळकतील ते तरळू लागलं. 'जम्पिंग स्टार्सने बोर्ड हायस्कूल संघाचा धुव्वा उडवला.' "मला वाटतं. छानच होईल." कागद-पेन्सिल घेऊन तो म्हणाला, "स्वामी, तुला जी काही नावं सुचतील ती सांग पाहू. नावाची निवड करायला मोठी यादी असलेली बरी. "जम्पिंग स्टार्स" व "एम.सी.सी." या नावाखाली रेघ मारून त्यांना आपण खास स्थान देऊ या. चल सांग पाहू."

स्वामिनाथन विचारात पडला व मग म्हणाला, "फ्रेंड्स इलेव्हन. . ." "जम्पिंग स्टार्स. . ." "फ्रेंड्स युनियन."

यादीकडं बोट दाखवत राजम म्हणाला, "फ्रेंड्स युनियन आधीच लिहिलय."

स्वामिनाथनचं नाव सुचवणं चालू होतं. - "एक्सलसियर्स."

"हं, ते आहे माझ्याकडं."

"एक्सलसियर युनियन, चँपियन इलेव्हन."

मग काही क्षण तो थांबला.

"संपल्या का तुझ्या कल्पना ?" राजमनं विचारलं.

"नाही. मणि इथं असता तर त्यानं काही नावं सुचवली असती. चँपियन इलेव्हन."

"ते तू आधी सुचवलंयस."

"व्हिक्टरी युनियन इलेव्हन."

"वा, फारच छान. मला वाटतं हे फारच उत्तम नाव आहे. लोकं आपल्याला घाबरून असतील. यादी वाचून त्याला खूप समाधान झालं. काल रात्री नावांची यादी बनवायचा त्यानं खूप प्रयत्न केला पण 'फ्रेंड्स युनियन' आणि 'एक्सलसियर्स' शिवाय त्याला नावंच सुचेनात. पण स्वामिनाथननं कितीतरी नावं सुचवली होती ! "स्वामी, उद्या सायंकाळी मला भेटशील का ? मी मणीलाही बोलावतो. आपण नाव पक्कं करू या."

काही क्षणानंतर स्वामिनाथननं विचारलं, "आपण संघ स्थापन केल्यावर सरकारला काही कर द्यावा लागेल असं तुला वाटतं का ?"

"जगातील कोणत्याही वस्तूवर सरकार कर लादतं असं दिसतं. माझ्या बाबांचा पगार सुमारे पाचशे रुपये आहे. पण जवळ जवळ दोनशे रुपयाहून अधिक पैसे सरकार मागते. ते जाऊ दे. आपल्याला कर द्यावा लागेल असं तुला कशामुळं वाटतं ?"

"आपण जर कर दिला नाही तर सरकार बहुधा आपल्या संघाला व नावाला मान्यता देणार नाही आणि मग इतर शेकडो संघ आपलं नाव घेतील. त्यामुळं गोंधळ उडेल असं

मला म्हणायचं होतं."

"समजा, आपण दोन नावं ठेवली तर?" राजमनं विचारलं.

"तशी पद्धत नाही."

"काही संघाना दोन-दोन नावं असतात हे मला ठाऊक आहे. मी बिशप वॅलर्समध्ये होतो ना तेव्हा आमच्या क्रिकेटचा संघ होता. मला वाटतं, मला आता आठवत नाही त्याचं नाव, मला वाटतं आम्ही 'क्रिकेट इलेव्हन' आणि 'वॅलर्स क्रिकेट इलेव्हन' असं म्हणत असू. म्हणजे असं बघ एक नाव सर्वसाधारण वापरासाठी व दुसरं नाव सामन्याच्या वेळी वापरण्यासाठी."

"तुमच्या वॅलर्स सारख्या श्रीमंत संघाचं ठीक आहे. पण समजा सरकारने दोन कर मागितले तर?"

क्रिकेटचा संघ स्थापन करणं हे जगातलं सर्वात किचकट काम आहे याची जाणीव राजमला झाली. आपल्या कुंपणाबाहेरील मैदानात डझनभर पोरं गोळा करून खेळायचं व साऱ्या जगाला आव्हान द्यायचं की झाले असं त्याला वाटत होतं. पण इथं तर प्रश्न संपणारच नाहीत असं वाटत होतं. नाव वेगळं, खास असलं पाहिजे, सरकारी कर व अन्य प्रश्न होते. आपण कुठं ढवळाढवळ करावी व करू नये हे सरकारला समजत नसावं. त्याला क्षणभर गांधीजींबद्दल सहानुभूती वाटली. ते सरकारविरुद्ध होते यात काहीच आश्चर्य नव्हतं.

अडचणींचा विचार करण्याबाबत स्वामिनाथन तज्ज्ञ वाटत होता. तो म्हणाला, "समजा आपली कर द्यायची इच्छा आहे, तरी तो द्यायचा कुणाला? राजाला किंवा व्हाईसरायला नक्कीच नाही. कोण सरकार आहे? समजा कोणी आपले पैसे घेऊन आपल्याला फसवलं तर? कोणी आपण सरकार आहोत अशी बतावणी केली तर? बहुधा सरकारला कर मनीऑर्डरनं पाठवावा लागेल. पण ती फितुरी ठरेल. आणि कराची रक्कम तरी किती द्यायची?"

2

राजमच्या खोलीतील टेबलाभोवती ते जमले होते. क्रीडावस्तू विकणाऱ्या मेसर्स बिन्स या दुकानाचा कॅटलॉग उघडून मणि वाचत होता: "ज्युनियर विलार्ड बॅटस, 7-8, उत्कृष्ट टिकाऊ लाकडापासून बनविलेल्या, केंब्रिज ज्युनियर बॉईज इलेव्हनने वापरलेल्या."

"मला बघू दे," असं म्हणत टेबलावर वाकून पाहत तो म्हणाला, "चांगली बॅट असावी असं वाटतंय, तू बघ रे स्वामी," स्वामिनाथननंही मान उंचावून पाहिलं व ती चांगली बॅट आहे याच्याशी तो सहमत झाला पण "कॅटलॉग मधील इतर बॅटीप्रमाणेच ती दिसते आहे" असंही तो म्हणाला. मणीनं डाव्या हातानं त्याची मानगूट पकडून त्याचा चेहरा छायाचित्राजवळ नेत विचारलं, "तुला ज्यूनियर विलार्ड आणि इतर बॅटीमधील फरक जर



समजत नसेल तर आपण क्रिकेट खेळाडू असल्याचा आव कशाला आणतोस? आमच्या संघात झाडूवाला व्हायची पण तुझी लायकी नाही." अशी कानउघाडणी केल्यावर त्यानं त्याच्या वरची पकड सैल केली.

राजमनं विचारलं, "स्वामी, त्या कॅटलॉग मध्ये ज्यूनियर विलार्ड का म्हटलंय हे तुला ठाउक नाही का? ज्यूनियर बॅटसमध्ये ती बॅट रोल्स रॉईस वाटते. रोल्स रॉईस व अन्य मोटारी यातला फरक तुला माहीत नाही का?"

"रोल्स रॉईस व अन्य मोटारी यात फरक नाही असं मी कुठं म्हटलं?" स्वामिनाथन म्हणाला.

"काय फरक आहे, बरं?" राजमनं विचारलं.

हसत, त्याला चिडवित मणि म्हणाला, "सांग ना, आता सांग, तुला जर खरंच फरक ठाऊक असेल तर सांगत का नाहीस?"

"रोल्सला एक लाख रूपये पडतात तर इतर मोटारी दहा हजारात मिळतात, रोल्सचं इंजिन चांदीचं असतं, तर इतर मोटारींची इंजिनं लोखंडाची असतात," स्वामिनाथननं उत्तर दिलं.

"ओह, ओह," राजम म्हणाला.

"रोल्स मोटार कधी त्रास देत नाही, तर इतर मोटारींची सतत कटकट असते. रोल्सचं इंजिन कधी बंद पडत नाही, रोल्स रॉईस कधी आवाज करत नाही, इतर मोटारी मात्र कितीतरी आवाज करतात."

"तू रोल्स रॉईस वर एखादं भाषणच का नाही झोडीत?" मणीनं विचारलं.

"स्वामी, तुला रोल्स रॉईसची एवढी माहिती आहे हे पाहून खूप आनंद झाला. पण तुला ज्यूनियर विलार्डबद्दल फारच थोडी माहिती असल्याचं पाहून मला लाज वाटते. मी बिशप वॅलर्समध्ये होतो ना तेव्हा आमच्याकडं डझनभर ज्यूनियर विलार्ड होत्या, वा, काय बॅटी होत्या! त्यात खरोखर स्प्रिंग असे व चेंडूला स्पर्श करताच तो उडू लागे. बॅटीच्या मुठीभोवती उत्तम रेशीमधागा गुंडाळलेला असे. तुला काही माहीत नाही तरी तू आपला बोलत सुटलास. स्प्रिंग व रेशीम धागा असलेली विलार्ड सारखी दुसरी बॅट मला दाखव पाहू."

क्षणभर स्तब्धता पसरली. मग राजम म्हणाला, "स्वामी, लिहून घे पाहू." एका कागदावर स्वामी लिहू लागला, "विलार्ड ज्यूनियर बॅट." मग डोकं करून त्यानं विचारलं "किती?"

"हं तीन लिही. तेवढ्या पुरे ना मणि?"

"तीन बॅटीवर कशाला पैसे उधळायचे? दोन पुरेत."

"पण समजा सामना चालू असताना मध्येच एखादी मोडली तर?" राजमनं विचारलं.

"आपल्या प्रतिस्पर्ध्यांना आपण बॅटी पुरवायच्या काय? त्यांनी त्यांच्या बॅटी आणायला हव्या. आपण हे आधीच स्पष्ट करायला हवं."

"असं असलं तरी, समजा आपली बॅट मोडली तर आपल्याला खेळ थांबवायला लागेल."

"तरी दोन पुरेत राजम. आता तुला पैसेच वाया घालवायचे असतील तर गोष्ट वेगळी."

राजमचा उत्साह दांडगा होता. तो खुर्चीतून उठला आणि मणीच्या खुर्चीच्या हातावर बसत कॅटलॉगमधील बॅटींची चित्रं पाहू लागला. स्वामिनाथनही उत्साहानं खुर्चीच्या दुसऱ्या हातावर जाऊन बसला. तिघंही क्रिकेटचे चेंडू, बॅट्स, व जाळं यांची चकचकीत चित्रं विस्फारलेल्या डोळ्यांनी पाहू लागले.

आपल्या संघाला लागणाऱ्या वस्तूंची निवड त्यांनी तासाभरात केली. त्यानंतर सर्वात कठीण बाब पार पाडायची वेळ झाली व ती म्हणजे मेसर्स बिन्स यांना या वस्तूंची मागणी करणारे पत्र पाठवणं. राजमनं एक सौजन्य म्हणून मणीला पत्र लिहायची विनंती केली पण त्यानं ती नाकारली. स्वामिनाथननं कुरकुर केली पण तरी त्याच्यावर पत्र लिहिण्याची जबाबदारी लादण्यात आली. बराच वेळ एकही शब्द न लिहिता पेन्सिल दातानं चावत तो बसला. स्पेलिंगच्या बाबतीत त्याचा कमालीचा गोंधळ उडत होता आणि तो जितका अचूक स्पेलिंग लिहायला प्रयत्न करी तितका त्याचा गोंधळ वाढतच जाई. शेवटी स्पेलिंगबाबत तो इतका विचार करत बसू लागला की 'द्' आणि 'ॲन्ड' या शब्दांच्या स्पेलिंग्ज बाबतही त्याला शंका येऊ लागली. मग राजमनंच पत्र लिहायचं काम स्वतःकडं घेतलं. अर्ध्या तासानं त्यानं तयार केलेलं पत्र टेबलावर ठेवलं.

एम.सी.सी.(आणि व्हिक्टरी युनियन इलेव्हन),
मालगुडी यांजकडून

प्रति -

मेसर्स बिन्स
स्पोर्टसमेन,
माउंट रोड,
मद्रास

प्रिय महोदय,

आमच्या संघासाठी कृपया दोन ज्यूनियर विलार्ड बॅट्स, सहा चेंडू, विकेट्स आणि अन्य वस्तू तात्काळ पाठवाव्यात. अत्यंत तातडीची गरज आहे. आम्ही तुम्हाला नंतर पैसे पाठवू. काळजी करू नये. कृपया तात्काळ पाठवणे.

तुमचा नम्र
कॅप्टन राजम (कॅप्टन)

या पत्राला स्वामिनाथनने मान डोलावली. मणीनं मात्र काही शंका उपस्थित केल्या. पूर्णतः अनोळखी व्यक्तीला 'प्रिय' कसं म्हणता येईल असा त्याचा मुद्दा होता. 'बिन्सला 'प्रिय महोदय' कसं म्हणता येईल? नुसतं 'महोदय', म्हणावं.

त्यावर राजम म्हणाला मी नुसतं 'महोदय' म्हणणार नाही. केवळ कारकून असं म्हणतात. मी काही बिन्स यांचा कारकून नव्हे. तेव्हा मी 'महोदय' असे त्यांना संबोधणार नाही."

तेव्हा राजमने लिहिलेलं पत्र तसंच रवाना करण्यात आलं.

एवढी कामगिरी पार पाडल्यावर ते विश्रांती घेत होते एवढ्यात पोस्टमन राजमसाठी एक पत्र घेऊन आला. राजमनं ते वाचलं व विचारलं, "ओळखा पाहू, कुणाचं पत्र असेल ?"

"बिन्स."

"छे ! आपल्या मुख्याध्यापकांचं असणार."

"कोणाचं तरी."

"जे.बी. हॉब्स."

"हे पत्र शंकरचं आहे," राजमनं आनंदानं जाहीर केलं.

"शंकर ! त्या लुच्च्याला आपण जवळ जवळ विसरलोच होतो !" असं म्हणत स्वामिनाथन व मणि यांनी राजमच्या हातातून पत्र हिसकावून घेतलं व ते वाचू लागले -

माझ्या प्रिय मित्रा,

माझे बाबा इथं आल्यानं मी इथं शाळेत शिकत आहे. माझी आई पण इथंच आहे. आम्ही सर्वच इथं आहोत. आणि आम्ही इथंच राहणार आहोत. माझं छान चाललंय. तुमचं पण छान चाललं असेल अशी आशा आहे. इथं खूप उकाडा आहे. मला तीन दिवस ताप होता, मी औषधं घेतली. मला वाटतं मी खूप वाचन करीन व परीक्षा पास होईन. स्वामी आणि मणीचं ठीक चाललं आहे ना ? इथं खूप उकाडा आहे. मी सध्या क्रिकेट खेळत असतो. याहून जास्त लिहू शकत नाही.

तुझा प्रिय मित्र

शंकर

ता.क. - मला विसरू नकोस.

'शं'.

या पत्रानं ते भारावून गेले आणि त्याला ताबडतोब उत्तर पाठवायचं त्यांनी ठरवलं.

तासाभरात तीन पत्रं तयार झाली. मणीनं शंकरच्या पत्राची शब्दशः नक्कल केली. स्वामिनाथन व राजमनं जवळ जवळ सारखीच पत्रं लिहिली. ईश्वरकृपेनं त्यांचं बरं चाललं आहे आणि शंकर पास होईल अशी आशा त्यांनी पत्रात व्यक्त केली होती. मग त्यांनी आपल्या क्रिकेट संघाबद्दल खूप लिहिलं होतं व शंकर पण सदस्य बनेल अशी आशा व्यक्त केली होती. कदाचित शंकरचा क्रिकेट संघ आमच्या संघाला आव्हान देईल असंही त्यांनी म्हटलं होतं.

तिकिट लावलेल्या एका लिफाफ्यात त्यांनी पत्रं घातली व तो बंद केला. तेव्हा त्यांना कोठे शंकरच्या पत्त्याची आठवण आली. शंकरनं पाठवलेल्या पोस्टकार्डचा कोपरान् कोपरा

त्यांनी धुंडाळला पण त्याचा पत्ता कुठं लिहिलेला नव्हता, कोणत्या शहरातून पत्र लिहिलं आहे हे पण त्यानं नमूद केलं नव्हतं. पोस्टाच्या शिक्यावरून तरी गावाचं नाव कळतंय का म्हणूनही त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्या गडद वर्तुळकार डागावरून काही समजणं शक्यच नव्हतं.

3

'कॅप्टन, एम.सी.सी., मालगुडी' असा पत्ता लिहिलेलं पत्र बिन्सकडून आलं तेव्हा आपण किती महत्वपूर्ण आहोत याचा तो भक्कम पुरावाच एम.सी.सी. व त्याच्या संघटकांना वाटला. त्या सुंदर लिफाफ्याला स्पर्श करणं व हातातल्या हातात ते उलट सुलट करणं यात किती मौज वाटत होती ! एम.सी.सी. ला मान्यता देणारी बिन्स ही पहिलीच कंपनी होती. त्यामुळं आपल्या संघाला लागणारी प्रत्येक वस्तू त्या विख्यात कंपनीकडूनच खरेदी करायची असा निर्धार राजमनं केला होता. या पत्रातून सूचित होणाऱ्या तीन गोष्टींमुळे त्यांना अत्यानंद झाला होता. (1) कॅप्टनला पाठवण्यात आलेलं पत्र ताबडतोब देऊन ब्रिटिश सम्राटाच्या टपाल खात्यानं त्यांच्या संघाला मान्यता दिल्याचं सिद्ध झालं. (2) मद्रास येथील प्रख्यात बिन्स कंपनीनं पोस्टकार्ड नव्हे तर पानभर पत्र पाठवून व तेही टाईप करून याचा अर्थ तिनं त्यांच्या संघाला खरोखरच मान्यता दिली होती. (3) चार आण्याचं तिकिट लावलेल्या दुसऱ्या एका पाकिटातून बिन्सनं कॅटलॉगही पाठवला होता. वा ! ही तर अगदी खासच वागणूक होती !

मेसर्स बिन्सनं कॅप्टनचे त्याच्या पत्राबद्दल आभार मानले होते. मागणीबरोबर जर त्यानं कृपया 25 टक्के रक्कमेचा भरणा केला तर आपण उपकृत होऊ असं म्हटलं होतं. रेल्वे पावतीच्या व्ही.पी.पी. घेतल्यावर उरलेली रक्कम द्यावी असंही त्यांनी स्पष्ट केलं होतं.

या पत्राचा अर्थ तरी काय याचा ती तीन डोकी विचार करू लागली. बिन्स आपल्याला हव्या असणाऱ्या वस्तू पाठवणार आहे की नाही हे काही त्यांना स्पष्ट होत नव्हतं. 'उपकृत' शब्दाचा अर्थ जर कोणी सांगितला तर आपण या पत्राचा अर्थ लावू शकतो असं मणि म्हणाला. शब्दकोश चाळून त्यांनी जेव्हा 'उपकृत' चा अर्थ शोधून काढला तेव्हा तो वाचूनही काही प्रकाश पडेना. पत्रात हा शब्द वापरणंच निरर्थक आहे असं त्यांना वाटलं. राजम म्हणाला, "एक गोष्ट स्पष्ट आहे की, आपल्या पत्राबद्दल बिन्सने आभार मानले आहेत, तेव्हा आपल्या वस्तू पुरवण्यास नकार दिला आहे असा अर्थ या पत्रातून निघत नाही असं मला वाटतं." स्वामिनाथन त्याच्याशी सहमत झाला. बरोबर आहे, तुला जर वस्तू पुरवायच्या नसतील तर तो कशाला आभार मानील ? त्यानं तुला शिव्याच दिल्या असत्या, आभार मानण्याबाबत तर काही गफलत नाही ना झाली याची शहनिशा करण्यासाठी त्यानं पत्रावर पुन्हा एकवार नजर टाकली.

"त्या मूर्खानं हा शब्द कशाला वापरलाय ?" 'उपकृत' शब्दाकडं बोट दाखवून तो म्हणाला. त्याचा त्याला नीट उच्चारही करता येत नव्हता, "त्याला काहीच अर्थ नाही. तो आपली चेष्टा तर नाही ना करीत ?"

"त्यांनी 25 टक्क्याबद्दल काहीतरी उल्लेख केला आहे. तो कसला हे समजलं असतं तर बरं झालं असतं," राजम म्हणाला.

स्वामिनाथनला न राहवून तो म्हणाला, "राजम तुला देखील हे पत्र समजू नये याचं मला फार आश्चर्य वाटतंय. गेल्या परीक्षेत तुला 60 टक्के गुण मिळाले ना ?"

"तुझं डोकं ठिकाणावर आहे ना ? त्याचा याच्याशी काय संबंध ? बी.ए. झालेल्याला देखील हे पत्र समजायचं नाही."

हे पत्र आपल्याला चुकून पाठवण्यात आलं असावं असा निष्कर्ष त्यांनी शेवटी काढला. त्यांनी 'उपकृत' 'भरणा करा' व '25 टक्के' असे शब्द प्रयोग करण्यासारखे आपल्या पत्रात तर काही नव्हते असे त्यांना वाटत होते. बिन्स सारखी मोठी कंपनी आपली टर उडविण्याची शक्यता नाही. पत्राच्या आरंभी 'एम.सी.सी. चे कॅप्टन यांस." असा उल्लेख होता. त्याच्याकडं स्वामिनाथननं लक्ष वेधलं. परंतु तेही चुकीनंच झालं असावं असं त्याला सांगण्यात आलं.

बिन्स कंपनीचं पत्र एका लिफाफ्यात घालण्यात आलं त्याच्या सोबत एक पत्र जोडण्यात आलं. त्यात म्हटलं होतं : "तुम्ही आम्हाला दुसऱ्या कोणाचं तरी पत्र पाठवलं याबद्दल आम्हाला खेद होतो. हे दुसऱ्या कोणाचं तरी पत्र आम्ही परत पाठवत आहोत. कृपया आमच्या वस्तू ताबडतोब पाठवाव्यात."

4.

एम.सी.सी. ची मंडळी आशावादी होती. त्यांच्या दुसऱ्या पत्राला अजून उत्तर आलं नव्हतं तरी प्रत्येक टपालाबरोबर आपल्या वस्तू येतील अशी आशा त्यांना वाटत होती. खऱ्या बॅट्स व अन्य वस्तू मिळेपर्यंत आपल्यापाशी ज्या काही वस्तू आहेत त्यानंच खेळायला सुरुवात करावी असं त्यांनी दहा दिवस वाट पाहिल्यावर ठरवलं. देवदाराच्या एका पेटीच्या फळ्या काढून त्यांनी तीन बॅटस बनवल्या आणि राजमनं त्याच्या वडिलांच्या क्लबमधून तीन वापरलेले टेनिसचे चेंडू मिळवले. आपल्या घरात कुठंतरी चार यष्टी (स्टंप्स) आहेत त्या मी आणीन असं वाटाण्यानं आश्वासन दिलं. राजमच्या बंगल्याजवळ असलेला मैदानाचा पट्टा हे खेळायचं ठिकाण ठरलं. एम.सी.सी. ला लागणाऱ्या वस्तू बनवायला आता बिन्सला भले महिना लागला तरी प्रॅक्टिस सुरू करायला विलंब करायची आता गरज नव्हती. खऱ्याखुऱ्या बॅट्स व चेंडू येतील तोवर सामने खेळण्यासाठी ते सज्ज असतील.

एम.सी.सी. चे सदस्य होण्यास पात्र ठरतील अशा आपल्या वर्गातील काही मुलांची राजमनं निवड केली.

खेळाच्या पहिल्या दिवशी पाच वाजता एम.सी.सी. चे सर्व सदस्य जमले. फक्त वाटाणा आला नव्हता. राजम त्याची अधीरतेनं वाट पाहत होता. त्यानं खऱ्याखुऱ्या यष्टी आणण्याचं वचन दिलं होतं. अर्धातास झाला तरी त्याचा काही पत्ता नव्हता.

दूरवर त्याची जाडजूड आकृती दिसू लागली. त्याला पाहताच राजमच्या मनात शंकेची पाल चुकचुकू लागली. वाटाण्याच्या हातात वस्तू आहेत की नाहीत हे तो डोळे फाडून पाहू लागला. तो पश्चिमेकडून येत असल्यानं सायंकाळच्या सूर्याच्या उजेडात त्याची आकृती धूसर दिसत होती. बाराही जण मैदानात जमून त्याच्याकडं रोखून पाहू लागले. त्याच्या हातात कसलं तरी पुडकं आहे असं काहींचं मत पडलं, तर तो दोन्ही हात पुढं-मागं हलवत येत आहे असं काहींचं म्हणणं होतं.

तो आला तेव्हा राजमनं विचारलं, "तुझ्याकडे यष्टी नाहीत असं का नाही सांगितलंस ?

"माझ्याकडं आहेत त्या. मी त्या उद्या घेऊन येईन. त्या कुठं ठेवल्या आहेत ते माझ्या बाबांना ठाऊक असणार याबद्दल माझी खात्री आहे," वाटाणा म्हणाला.

"तू एवढा वेळ आम्हाला ताटकळत ठेवलंस ? त्या सापडत नाही असं आधी येऊन का नाही सांगितलंस ?"

"घरात सर्वत्र कितीतरी वेळ मी त्याच शोधत होतो. तुम्हाला आधी इथं येऊन सांगू व शोधही घेऊ या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कशा करणार ?"

निराशेचं सावट त्यांच्यावर पडलं. झोकात बॅट घुमवायची, चेंडू फेकायचा असं स्वप्न प्रत्येकजण गेले वीस तास पाहत होता, केवळ वाटाण्याच्या दुष्टपणामुळं त्यांचं स्वप्न पुरं होत नव्हतं. त्याच्याकडं प्रत्येकजण कडवटपणं पहात होता. मैदानावर पडलेल्या देवदाराच्या फळ्या व टेनिसचे चेंडू पाहून राजमला तर रडावसं वाटत होतं. यष्टी आणल्या असत्या तर ती संध्याकाळ किती आनंदात घालवता आली असती !

या निराशेच्या अंधारात कुणीतरी प्रकाशाचा किरण दाखवला. राजमच्या बंगल्याच्या कुंपणाच्या भिंतीचा तात्पुरती यष्टी म्हणून वापर करावा असं त्यानं सुचवलं.

भिंतीवर कोळशानं यष्टी काढण्यात आल्या. कॅप्टननं क्षेत्ररचना केली व फलंदाजीला त्यानंच सुरुवात केली. स्वामिनाथन चेंडू टाकायला सिद्ध झाला. त्याच्या हातात टेनिसचा चेंडू होता. त्यानं भरभरा पावलं उचलून चेंडू टाकला, राजमनं बॅट घुमवली पण ती चेंडूला लागली नाही. भिंतीवर कोळशानं काढलेल्या यष्टीवर चेंडू लागला. पहिल्याच चेंडूत राजम बाद झाला होता. आनंदाच्या आरोळ्या ठोकण्यात आल्या. खेळाडूंनी स्वामिनाथनच्या पाठीवर थाप मारून शाबासकी दिली व त्याला तिथंच "टेट" ही पदवी बहाल करण्यात आली.

चौदा

आजीचे अज्ञान

1

बोर्ड हायस्कूलमध्ये अभ्यास खूप करावा लागे. अल्बर्ट मिशनमध्ये दिला जाणारा गृहपाठ बोर्डच्या ढीगभर गृहपाठापुढं काहीच नव्हता. मुलाला केवळ आपल्याच विषयाचा अभ्यास करायचा आहे असा प्रत्येक शिक्षकाचा समज होता. अंकगणितातील सहा बेरजा, चार पानं उतरून काढणे, अनेक कठीण शब्दांचे शब्दकोशातून अर्थ काढणे, दोन नकाशे, तामिळ कवितेची पाच कडवी एवढा सरासरी गृहपाठ दररोज असे. आपण जुनी शाळा सोडली नसती तर बरं झालं असतं असं स्वामिनाथनला कधीकधी वाटे. या शाळेतले शिक्षक अगदीच निर्दय होते. आठवड्यातून तीन संध्याकाळी कवायती, बालवीर वर्ग, सक्तीचे खेळ, इत्यादी होतेच. हे सारे रोजचे तास झाल्यावर एखाद्या वर्गाला दांडी मारली तर दुसऱ्या दिवशी छडीचा मार ठरलेलाच. शाळेचे हेडमास्तर कर्कश्श्य आवाजाचे, चष्मा घातलेले, तिटकारा वाटेल असे होते. अल्बर्ट मिशनच्या प्रमुखात काही दोष असले तरी त्यांची वेगळीच ऐट होती.

काटेकोर व कडक शिस्तीच्या जीवनामुळं आराम करायला वेळच मिळत नसे. स्वामिनाथन खूप लौकर उठे, घाईघाईनं गृहपाठ पुरा करी, जेवण संपवून पहिली घंटा होत असताना तो शाळेत पोहोचे. मार्केट रस्त्यावरील कापडाच्या दुकानावरून जात असताना त्याला दररोज पहिली घंटा ऐकू येई. धापा टाकीत वर्गात प्रवेश करेपर्यंत दुसरी घंटा झालेली असे. अल्बर्ट मिशन शाळतील घंटेचा जो घुमणारा मधुर नाद होता तो काही या घंटेत नव्हता. त्यात गेंगाण्यासारखा आवाज होता. पण हळूहळू त्याला त्याची संवय झाली.

दुपारचा एक तास सोडला तर सायंकाळी साडेचार पर्यंत त्याला आपल्या जागेवरच बसून रहावं लागे. शेवटच्या बाकावर बसायची त्याची संवय आता सुटली होती. (वर्गात मणीची सोबत नसल्यानं असं झालं असावं), तो दुसऱ्या रांगेत बसे. तेथे थातुर मातुर चाळे करायला वावच नव्हता कारण शिक्षकांच्या अगदी नाकासमोरच बसावं लागे. साडेचार

वाजता घंटा झाली की, स्वामिनाथन पेन्सिल खिशात टाकी व आखडलेली आपली बोटं सरळ करी. साडेचार वाजताच्या घंटेत रोमहर्षक असं काही नव्हतं. आनंदानं ओरडत लागलीच वर्गाबाहेर पडता येत नसे. कवायतीच्या मैदानावर जाऊन तुम्हाला रांगेत उभं रहावं लागे. मग तेथे कवायत मास्तर तुम्ही जणू त्याचा कुत्रा आहात असं पाऊण तास तुम्हाला वागवतो. लेफ्ट-राईट करत चालायला लावतो, ताठ उभं राहयला सांगतो, तुम्हाला आवडो किंवा नावडो. तो तुम्हाला आडव्या समांतर खांबावर खालीवर चढायला लावतो. असे चढणे एखाद्याला येवो किंवा न येवो, माहीत असो वा नसो. त्याची कुणाला फिकीर ? हे सारं करताना तुमचा तोल गेला आणि आडव्या दांड्यावर तुमच्या डोक्याच्या चिंधड्या झाल्या तरी कुणाला त्याची पर्वा ?

हे आटोपताच तुम्ही कॉफी प्यायला घरी धावता, पुस्तकं भिरकावून देता, आणि दूरवर असलेल्या क्रिकेट मैदानाकडं निघता ते अर्ध अंतर धावत, अर्ध चालत तुम्ही कापता. वाळलेल्या गवतानं मळकट बनलेल्या मैदानावर सूर्यास्ताच्या तिरप्या किरणांचा उजेड पडलेला असतो आणि दाणदाण पावलं आपटत चाललेल्या खेळाडूंचा आवाज येत असतो. चेंडू फटकारताना बॅटचा आवाज ऐकू येत असतो. लॉली एक्स्टेंशनकडे जाणाऱ्या रस्त्याकडं वळताना क्षितिजावर एखाद्या नाण्याएवढा तांबडा सूर्य दिसत असतो. तो बुडू नये असं वाटतं, पण तुम्ही मैदानावर पोचेपर्यंत सूर्य अस्ताला गेलेला असतो, मागे रंगाचा पट्टा व आकाशात उजेड शिल्लक असतो. सावल्या आधीच पडू लागलेल्या असतात आणि नगरपालिकेचे एक-दोन दिवे चमकू लागलेले असतात. खेळ ऐन रंगात असताना आपण पोहोचू असं अजूनही तुम्हाला वाटत असतं. पण अर्ध्या फर्लांगावर असलेल्या मैदानाभोवती खेळाडू बेफिकिरपणं हिंडताना दिसतात. सुस्तावल्यासारखी कोणीतरी बॅट धरलेली असते व गोलंदाज व इतर खेळाडूही तितकेच सुस्तावलेले दिसत असतात. दिवसभर खूप काम केल्यानं संध्याकाळी सुस्ती यावी तसंच सारं वातावरण असतं.

या निराशेत व दु:खात भर म्हणजे राजम काहीसा चिडलेला असतो. त्याला कधी दुसऱ्याच्या अडचणी समजतच नाहीत.

"ओह, स्वामी, तुला पुन्हा उशीर का झाला ?"

"वैतागवाण्या कवायतीच्या तासामुळं."

"उडत गेले तुझे कवायतीचे व बालवीर वर्ग. तू लौकर का येत नाहीस ?"

"मी तरी काय करणार, राजम, माझा नाईलाज आहे."

"ठीक, ठीक. मला त्याची पर्वा नाही. तुझी काही ना काही सबब सदैव तयार असतेच. नवीन बॅट, चेंडू आल्यापासून तू फक्त चार वेळा खेळला आहेस."

खूप दमल्यानं दुसरं कुणीही खेळायला तयार नसल्यानं संघातल्या सर्वात तरूण मुलाचं (पाचव्या इयत्तेतील नम्र आज्ञाधारक मुलगा. त्याने आपल्याला पण संघात घ्यावं म्हणून राजमला फार विनवणी केली होती. त्यामुळं त्याला प्रवेश देण्यात आला होता) मन

गोलंदाजी करायला वळवावं लागे. फलंदाजी करताना तुम्हीही थकला की, मग त्याला बॅट देऊन तुम्ही चेंडू फेकायला सुरुवात करायची. तुम्ही संघातील 'टेट' असल्यानं तो छोटा मुलगा काहीसा घाबरूनच जायचा. मग पुन्हा तुम्ही फलंदाजी करायची, नंतर परत गोलंदाजी आणि खेळ चालू राहयचा. अर्धवट काळोखात चेंडू सापडणं कठीण होऊ लागेपर्यंत व मैदानावरील गडद रंगाच्या वस्तू चेंडू समजून उचलल्ला जाऊ लागेपर्यंत खेळ चालू राही. या सुमारास चेंडू हरवला अशी अफवा पसरून खळबळ उडे. मैदानावर बसून वेळ घालवणाऱ्या आकृत्या खडबडून उठत आणि चेंडू शोधून काढला जात असे. त्यानंतर खेळ थांबवण्याचा हुकूम कॅप्टन देई आणि लौकरच खेळाडू अंधारात अदृश्य होत. राजमच्या कुंपणाच्या भिंतीवर राजम व मणिबरोबर तुम्ही गप्पा मारीत बसता. आजचा खेळ व खेळाडू, झालेली प्रगती किंवा प्रत्येक खेळाडूत आलेला तोच तोचपणा अथवा खराब झालेला खेळ याची चर्चा करत बसता. तुझे शिकवणीचे मास्तर आले आहेत असं राजमचा शिपाई सांगायला येईपर्यंत ही चर्चा चालू राही.

2

एके दिवशी सायंकाळी ग्रोव्ह रस्त्याच्या चौकात मणीचा निरोप घेऊन क्रिकेट मैदानावरून परतताना स्वामिनाथनचं मन त्याला खाऊ लागलं. शाळेतून घरी परतल्यावर त्यानं पुस्तकं भिरकावून दिली होती व क्रिकेट मैदानावर तो जायला निघणार होता तेव्हा एक छोटीशी घटना घडली होती. पुस्तकं टाकून तो स्वयंपाक घराकडं निघाला असताना आजीनं त्याला हाक मारली, "स्वामी, स्वामी, अरे जरा इकडे ये पाहू."

"नाही," असं नेहमीप्रमाणं उत्तर देत तो स्वयंपाकघरात शिरला आणि घटाघटा कॉफी पिऊ लागला. थरथरत्या आवाजातील आजीच्या हाका त्याला ऐकू येत होत्या. त्या दुबळ्या आवाजात आर्तता होती. आपल्याकडं लक्ष न देणाऱ्या मंडळींना हाका मारत बसणाऱ्या आजीबद्दल त्याला कींव वाटली. कॉफी पिऊन संपताच तो तिच्याकडं गेला व त्यानं विचारलं, "काय हवं तुला ?"

तिनं त्याच्याकडं पाहयलं व त्याला बसायला सांगितलं. त्याला काहीसा राग आला व क्षणापूर्वी तिच्याबद्दल वाटणारी सहानुभूती लोप पावली. तो म्हणाला, "तुला जे काही सांगायचंय ते चटकन सांग पाहू. सांगणार नसशील तर मला काही मूर्ख समजू नकोस."

ती म्हणाली, "हे बघ, मी तुला सहा पया देते. तू तीन पया घे व उरलेल्या तीन मधून मला लिंबू आणून दे." त्याच्याकडून हे काम करवून घेण्यासाठी हळू पण चतुराईनं ती पावलं टाकीत होती. कारण आपला नातू काय करील याची तिला कल्पना होती. त्याला बसायला सांगणं हा तिच्या चतुराईचा पहिला टप्पा होता.

हो किंवा नाही असं काहीच न सांगता स्वामिनाथननं पैशासाठी हात पुढं केला. "मी

दहा अंक मोजायच्या आता तू परत आलं पाहिजेस," आजी म्हणाली. या कालमर्यादेमुळे स्वामिनाथन वैतागला. जमिनीवर नाणी फेकून देत तो म्हणाला, "तुला एवढी घाई असेल तर तूच जाऊन आण." तेव्हा सुमारे साडेपाच वाजायला आले होते आणि सूर्यास्तापूर्वी त्याला मैदान गाठायचं होतं. त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. मी खेळून परतल्यावर उशीरा लिंबू मिळेल नाही तर मिळणारच नाही असं तो जणू सुचवत होता. आजी



काकुळतीनं म्हणाली, "अरे माझ्या पोटात खूप दुखतं आहे. जा ना लौकर लिंबू घेऊन ये." पण तिचं काही ऐकून घेण्याआधी तो तेथून पसार झाला.

परंतु आता खेळाची मौजमजा संपवून व सवंगड्यांना 'गुड नाईट' केल्यावर ग्रोव्ह व विनायक मुदली रस्त्याच्या चौकात त्याला आपण आपल्या आत्म्याच्या समोर आमने सामने उभे आहोत असं वाटत होतं. आजीची आठवण येऊन त्याला अपराध्यासारखं वाटलं. कदाचित त्याक्षणी ती वेदनेनं कण्हत असेल. आजीचे डबडबलेले डोळे व करूण चेहेरा त्याला आठवला. त्याने स्वतःलाच कृतघ्न, चोर, निर्दय, खलनायक अशी दूषणं दिली.

अशा आत्मपरीक्षणाच्या झटक्यातच तो घरी आला. आजीच्या शेजारी हलकेच बसून तो तिच्याकडं पाहू लागला. त्याच्या नेहमीच्या वागण्याशी हे विसंगतच होतं. एरवी तो घरी आला की, स्वयंपाकघरात धूम ठोकी व आचाऱ्याच्या मागं भुणभुण लावी. पण त्यावेळी मात्र त्याला भुकेची पर्वा वाटत नव्हती.

आजीचा ज्या बोळकंडीत मुक्काम होता तिथं उजेड नव्हता. दिवाणखान्यातील दिव्याची तिरीप तेथे येई. अर्धवट काळोखात त्याला तिचा चेहरा नीट दिसत नव्हता. ती शांत पडून होती. पोटदुखीनं ती मरून बिरून तर गेली नाही ना या विचारानं स्वामिनाथन हादरून गेला. आपल्या आवाजावर नियंत्रण ठेवीत त्यानं विचारलं. "आजी. तुला बरं वाटतंय का ?" आजीनं हालचाल केली. डोळे उघडीत ती म्हणाली, "स्वामी, तू आलास वाटतं ? खाल्लंस का काही ?"

"अजून नाही. पण तुझी पोटदुखी कशी आहे, आजी ?"

"हं, ठीक आहे. ठीक आहे."

आवाजात कसंबसं बळ आणीत त्यानं विचारलं, "तुला लिंबू मिळालं का ?" त्याला ते जाणून घ्यायचं होतं. त्याला मनापासून त्याबद्दल काळजी वाटत होती. आजीनं लगेच उत्तर दिलं खरं. पण त्याला वाटलं किती वेळ लागतोय उत्तर द्यायला. तेवढ्या वेळात काहीही घडू शकलं असतं. ती काहीही म्हणू शकली असती, त्याच्यावर रागावली असती, या पुढं तुझ्याशी मला काही देणं घेणं नाही असं सांगू शकली असती किंवा जर तू वेळेवर लिंबू आणून दिले असते तर आपले प्राण वाचू शकले असते. पण आता आपण थोड्याच वेळात मरण पावणार असंही सांगू शकली असती. पण ती एवढंच म्हणाली, की, "तू लिंबं आणायला गेला नाहीस हे बरंच केलंस. तुझ्या आईनं स्वयंपाकघरात डझनभर ठेवली होती."

ही चांगली बातमी ऐकून स्वामिनाथनला अत्यानंद झाला. त्याच आनंदी मूडमध्ये तो म्हणाला, "तुला माझं नवं नाव ठाऊक आहे ? मी 'टेट' आहे !"

"काय ?"

"टेट."

"टेट हे काय आहे ?" तिनं निष्पापपणं विचारलं. स्वामिनाथन त्यामुळं निराश झाला.

एकतर आजीला त्याच्या या नव्या पदवी बद्दल काही माहीत नव्हतं व दुसरं म्हणजे सांगितल्यावर देखील त्याचं महत्व तिला उमगलं नव्हतं. एरवी तो आजीवर ओरडला असता. पण त्या दिवशी त्याला पश्चाताप वाटत असल्यानं त्यानं प्रेमळपणानं विचारलं, "तुला "टेट" म्हणजे काय हे ठाऊक नाही असं म्हणायचंय का तुला ?"

"तू काय म्हणतो आहेस हेच मला समजत नाही."

"अग 'टेट'. महान क्रिकेट खेळाडू ! जगातला सर्वश्रेष्ठ गोलंदाज. तुला क्रिकेट म्हणजे काय हे ठाऊक आहे ना ?"

"ते काय असतं ?" आजीनं विचारलं. तिचं हे अज्ञान पाहून स्वामिनाथनला धक्काच बसला. "तुला क्रिकेट म्हणजे काय हे ठाऊक नाही असं तुला म्हणायचंय की तू उगीच माझी थट्टा करत आहेस ?"

"तू काय म्हणतो आहेस ते काही मला कळत नाही."

"तुझ्या काळात संध्याकाळी मुलं - मुली काय करत असतील असा मला प्रश्न पडतो. बहुधा ते देवाधर्माच्या गोष्टी करण्यात चोवीस तास घालवित असावेत !"

त्यानं क्षणभर स्वतःशीच विचार केला. इथं त्याची आजी भयंकर अज्ञानाच्या खाईत खितपत पडली होती आणि त्यातून तिला वाचवणं हे आपलं कर्तव्यच आहे असं त्याला वाटत होतं. मग त्यानं एक छोटेखानी भाषण दिलं. क्रिकेटच्या खेळातील तत्वं, उद्दिष्ट, तत्वज्ञान विशद करून त्यानं सांगितलं व या क्षेत्रातील झगमगत्या थोर खेळाडूंची नावंही उल्लेखिली. दर काही सेकंदानं तो "समजलं ना तुला ?" असा सवाल विचारीत असे व त्याच्या बोलण्यातील तीन टक्केच कळत असूनही आजी होकारार्थी मान डोलावीत होती. एम.सी.सी. चा इतिहास व भवितव्य सांगून त्यानं आपलं भाषण आटोपतं घेतलं. "आजी, राजम नसता तर आमचं काय झालं असतं हे सांगता येत नाही. त्यानं आमच्या संघावर शेकडो रुपये खर्च केले आहेत," असं सांगून तो म्हणाला, "बॅट, चेंडू खरेदी करायचे म्हणजे काय चेष्टा नाही. त्याच्या पेटीत खूप पैसे आहेत. सरकारला सुद्धा आमचा संघ ठाऊक आहे. तुला हवं तर तू एम.सी.सी. ला पत्र पाठव. ते आम्हाला तात्काळ आणून दिलं जाईल. मालगुडीतील सर्व चषक आम्ही जिंकू हे तुला दिसेलच आणि लौकरच क्रिकेट म्हणजे काय हे आम्ही मद्रासच्या मुलांनाही दाखवून देऊ !" आपल्या या भाषणाला एक महत्वाची पुस्ती जोडीत तो म्हणाला, "आमच्या संघात कोणाही येरागबाळ्याला सामील करून घेतात अशा भ्रमात राहू नकोस."

त्याचे बाबा बाळाला कडेवर घेऊन त्याच्या पाठीशी येऊन उभे राहिले होते. त्यांनी विचारलं, "काय रे, कशाबद्दल तुझं एवढं भाषण चालू आहे ?"

एवढा वेळ आपल्या वडिलांचं अस्तित्वच त्याला जाणवलं नव्हतं. त्यांच्याकडं लक्ष जाताच त्याची काहीशी पंचाईत झाली. "अं. काही नाही, काही नाही बाबा," असं चाचरत त्यानं उत्तर दिलं.

"चल, सांग पाहू, मलाही कळू दे ना."

"तसं काही नाही. आजीला क्रिकेटबद्दल काही माहिती हवी होती व मी तिला ती सांगत होतो."

"खरं ? वा ! आई एवढी क्रीडाप्रेमी आहे हे मला ठाऊकच नव्हतं. आई, स्वामीनं तुला क्रिकेटच्या ज्ञानात अगदी आकंठ बुडवलं का ?"

आजी म्हणाली, "उगाच त्या पोराला चिडवू नका. त्याला माझा फार लळा आहे. गरीब बिचारा. तो मला सर्व प्रकारच्या गोष्टी सांगत बसला होता. तू मला खुलासेवार कधी काही सांगतच नाहीस. तुम्ही सारी मोठी माणसं ना."

कडेवरील बाळाकडं निर्देश करीत वडील म्हणाले, "जरा काही दिवस कळ काढ हा छोटा आहे ना तोच तुला जगाचं तत्वज्ञान व राजकारण सांगू लागेल." त्यांनी बाळाचा हळूच गालगुच्चा घेतला तेव्हा त्यानं आनंदानं आरोळ्या ठोकल्या. "त्यानं भाषण द्यायला सुरुवातही केलीय. तेव्हा ध्यान देऊन ऐक." बाळाला जवळ घेण्यासाठी आजीनं हात पुढं केले. पण त्याला घट्ट आवळीत वडील म्हणाले, "नाही, नाही. या छकुल्यासाठी तर मी लौकर घरी आलो. चल स्वामी, आपण जेवायला बसू या. तुझी आई कुठाय ?"

3

स्वामिनाथनच्या वागण्यावर कॅप्टन नाराज झाला होता, "स्वामी, तुझं खेळाकडं दुर्लक्ष होतंय. तू काहीच सराव करीत नाहीस. मी तुला बजावून ठेवतोय."

"या बोर्ड शाळेचा एवढा गृहपाठ असतो ना."

"तुला कोणी सांगितलं होतं त्या शाळेत जायला ? ते काही तुला बोलवायला आले नव्हते. ठीक आहे. पण ब्रॅडमन, टेट आणि इतर सगळे दररोज चार ते पाच तास र.ाव करतात. तू त्यांच्यापेक्षा स्वतःला मोठा समजतोस काय ?"

"कॅप्टन, माझं ऐकून तर घे. मैदानावर पाचच्या आधीच पोहोचण्याची मी शिकस्त करतो. पण बोर्ड हायस्कूलचं वेळापत्रकच असं काही विचित्र आहे ना. . ."

काहीतरी मार्ग काढायलाच हवा होता. कॅप्टननं सुचवलं, "तू तुझ्या मुख्याध्यापकांना भेट. सामना होईपर्यंत त्यांनी तुला जादा कामातून सूट दिली पाहिजे." हे बोलायला सोपं असलं तरी प्रत्यक्षात करणं अवघड आहे याकडं स्वामिनाथननं लक्ष वेधलं. त्याला मुख्याध्यापकांचा सुरकतलेला चेहरा व त्यांचा तो छोटासा धुरकटलेला चष्मा आठवला.

"त्या सैतानाला विचारायची मला भीती वाटते," असं सांगून स्वामिनाथन म्हणाला, "ते मला सातवीतच वर्षानुवर्षे डांबून ठेवतील असं वाटतं."

"खरं ? तुझ्या मुख्याध्यापकाची तुला इतकी दहशत वाटते असं तुला म्हणायचंय

का ? समजा मी त्यांना भेटलो तर ?"

"ओह, नको कॅप्टन. दया कर, पण तू नको भेटूस. ते किती भयंकर आहेत हे तुला ठाऊक नाही. तुला ते नीट वागवणार नाहीत. आणि वागवलं तरी तू गेल्यावर मला ठारच करतील."

"अरे, तुला झालंय तरी काय स्वामी ? तुझ्या डोक्यात बकवास गोष्टी भरल्या आहेत. आपण करायचं तरी काय ? आपण आपला संघ सुरू केल्याला दोन महिने झाले पण तू दहा दिवस देखील खेळलेला नाहीस."

एवढा वेळ कुंपणाच्या भिंतीवर पहुडलेला मणि म्हणाला, "तुझे मुख्याध्यापक काय करतात ते तर पाहू या. त्यांना हो किंवा नाही जे काय म्हणायचं असेल ते म्हणू दे. त्यांनी तुला ठार केलं तर मी त्यांचा चेंदामेंदा करीन, नाहीतरी माझ्या सोट्यांना बऱ्याच दिवस काही काम मिळालेलं नाही."

राजमला थांबवणं शक्यच नव्हतं. दुसऱ्या दिवशी शाळेत येऊन मी मुख्याध्यापकांना भेटणार असा आग्रहच त्यानं धरला. त्यापायी आपल्या वर्गातील काही तास बुडाले तरी त्याची त्याला पर्वा नव्हती. "मी पण तुझ्याबरोबर येतो," असं मणीनं सुचवलं पण त्याला नकार देण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता स्वामिनाथननं आपले डोळे पाच मिनिटं चोळून लाल होऊ दिले आणि मग आपलं डोकं दुखतं आहे अशी तक्रार त्यानं केली. त्याच्या वडिलांनी त्याच्या कपाळाला हात लावून पाहिला. "जरा कपाळावर थंड पाणी मार म्हणजे बरं वाटेल," असा सल्ला त्यांनी दिला.

"होय, बाबा," असं म्हणून स्वामिनाथन तेथून बाहेर पडला. थंड पाण्याचा शिडकावा हा डोकेदुखीवर जर उपाय असेल तर आपण तो टाळायला हवा. कारण ही डोकेदुखीची सबब त्यानं त्यावेळीच शोधून काढली होती. राजम आज सकाळी त्याच्या शाळेला येणार होता तेव्हा त्यानं शाळेला जाणं शहाणपणाचं नव्हतं. तो पुन्हा बाबांच्या खोलीत गेला व विचारलं, "बाबा, तुम्ही काय थंड पाणीच म्हणालात ना ?"

"हो."

"पण त्यामुळं मला न्यूमोनिया किंवा तसलंच काही होईल असं वाटत नाही का तुम्हाला ? मला अंगात थोडी कणकण पण वाटते आहे."

"वडिलांनी त्याची नाडी पाहिली व ते म्हणाले, "आता तू शाळेत जा पाहू. तुला बरं वाटेल." एकवेळ दगडातूनही दूध काढता येणं शक्य आहे पण शाळेला न जाण्यासाठी वडिलांची परवानगी मिळणं शक्य नव्हतं.

तो आजीच्या कानात पुटपुटला, "आजी, मी मेलो ना तरी माझ्या प्रेताला देखील शाळेत जायचा बाबा आग्रह करतील याची मला खात्री आहे." त्याच्या असल्या बोलण्याबद्दल आजीनं नापसंती प्रकट केली.

"आजी, भयंकर तापानं माझं अंग फणफणले आहे आणि डोकेदुखीनं माझं माथं फुटायची पाळी आली आहे. तरीही मी शाळेला जायलाच हवं ?"

"जाऊ नकोस शाळेला," आजी म्हणाली. मग आईला बोलावून ती म्हणाली, "अग, याला ताप आहे. मग त्यानं शाळेत कशाला जायचं ?"

"खरं की काय ?" असं काळजीयुक्त स्वरात विचारून तिनं त्याच्या अंगाला हात लावून पाहिला. "त्याला ताप आहे" असं ती म्हणाली. स्वामिनाथन रडवेला होत म्हणाला, "आई, मला दूध किंवा काहीतरी दे. शाळेत जायला मला उशीर होतोय." "मुळीच जायचं नाही," असं आईनं सांगून टाकलं. त्यावर क्षीण आवाजात तो म्हणाला, "पण बाबांना नाही आवडणार." तिनं त्याला पलंगावर पडून राहयला सांगितलं व ती बाबांच्या खोलीत शिरली, "स्वामिनाथनला ताप आहे. तो शाळेत जाऊ शकणार नाही," तिनं सांगून टाकलं.

"तू किती ताप आहे हे पाहिलंस का ?"

"अजून नाही. पण एक दिवस शाळा बुडाली तर काही बिघडत नाही."

"ठीक आहे. किती ताप आहे ते तर बघ." आपल्या बोलण्यातला उपहास कदाचित आपल्या पत्नीला जाणवेल म्हणून ते म्हणाले, "आपल्याला डॉक्टरला बोलवावं की नाही हे समजेल."

स्वामिनाथनच्या तोंडात तापमापक अर्धा मिनिट ठेवल्यावर आईनं पाहिलं तेव्हा त्याता नेहमीचं तापमान दिसत होतं. तिनं परत तापमापक त्याच्या तोंडात खुपसला, पुन्हा नेहमीचं 'नॉर्मल' तापमान तो दाखवत होता, पतीकडं तो नेत ती म्हणाली, "यात तर 'नॉर्मल' आहे. या तापमापकात काहीतरी बिघाड आहे असं मला वाटतच होतं. पोराला ताप आहे. माझ्या हाताइतका दुसरा चांगला तापमापक नाही. मी नक्की सांगते की, त्याच्या अंगात आता साडेशंभर एवढा ताप आहे."

"शक्य आहे." वडील म्हणाले. आणि स्वामिनाथन शाळेत जाण्याऐवजी डोळे मिटून त्याच्या अंथरुणात पडून राहिला, अंथरुणाजवळ पावलांचा आवाज झाला म्हणून त्यानं डोळे उघडले. पुढं वाकून बाबा हळू आवाजात म्हणाले, "नशिबवान आहेस पोरा तू. तुला शाळेत जायचं नसलं की, तुला पाठिंबा देणारे या घरात कितीतरी जण आहेत नाही ?" आपल्यावर हा पाठीमागून होणारा अचानक व अनपेक्षित वार आहे असं स्वामिनाथनला वाटलं, त्यानं डोळे मिटले व भिंतीकडं कुशीवर वळत तो कण्हत झोपून गेला.

दुपारपर्यंत अंथरुणातच पडून राहिल्यानं त्याची पाठ दुखू लगली. सायंकाळपर्यंत असंच पडून राहायची त्याची इच्छा नव्हती. राजम तर सकाळीच शाळेत येऊन गेला असेल.

आईकडं जाऊन त्यानं "मी आता शाळेत जातो" असं सांगितलं. तिनं तात्काळ विरोध केला, त्याच्या अंगाला हात लावून ती म्हणाली, "आता तुला बरं वाटत असलं तरी शाळेत जाण्यासारखी काही तुझी स्थिती नाही." त्यावर स्वामिनाथन म्हणाला, "आई मला आता खूपच बरं वाटतंय. तू उगाच काळजी करू नकोस."



शाळेला जात असताना त्याला वाटेतच राजम व मणि भेटले. मणीच्या बगलेत त्याचा सोटा होता. या दोघांनी काहीतरी भयंकर कृत्य तर केलं नसेल ना अशी शंका स्वामिनाथनच्या मनाला चाटून गेली.

राजम म्हणाला, "तुझी कमालच आहे ! आज सकाळी कुठं होतास तू ?"

"तू मुख्याध्यापकांना भेटलास का राजम ?"

"अजून तू शाळेत आलेला नाहीस हे पाहिल्यावर मी काही त्यांना भेटलो नाही. मी त्यांना भेटेन तेव्हा मला तूही सोबत हवा आहेस. शेवटी तुझ्याबद्दलच बोलायचं आहे ना."

"राजमच्या या बोलण्यानं स्वामिनाथनच्या मनात भावनिक गोंधळ उडाला. त्यातून बाहेर येत त्यानं विचारलं, "मणि काय करतोय इथं ?"

"मला ठाऊक नाही," राजम म्हणाला, "तो त्याच्या वर्गात असण्याऐवजी तुझ्या शाळेबाहेर सोटा घेऊन उभा असलेला मला दिसला."

"मणि, तुझ्या वर्गाचं काय ?"

"ठीक आहे. आज मी गेलोच नाही," मणीनं उत्तर दिलं.

"आणि सोटा कशासाठी आणलास ?" स्वामिनाथननं विचारलं.

"असाच आपला सहज घेऊन आलो."

"तुला कालच सांगितलं होतं ना की तू तुझ्या वर्गात जा व या भानगडीत पडू नकोस म्हणून." राजमनं विचारलं.

"मला तर काय आठवत नाही. मी तुझ्याबरोबर येऊ का असं विचारलं तेव्हा तू यात पडू नकोस असं मला सांगितलं होतं. मी काही तुझ्यासोबत आलो नाही. मी असा इकडून रस्त्यानं चालला होतो व तूही तिकडून आलास. हा सार्वजनिक रस्ता आहे." मणीच्या या बडबडीचा त्यांच्यावर परिणाम झाला नाही. कारण ते दोघे मुख्याध्यापकांच्या भावी भेटीविषयी विचार करण्यात गढले होते.

"दोस्ता, काही चिंता करू नकोस," असं सांगून मणि म्हणाला, "मी तुझ्या अडचणीतून मार्ग काढतो. तुझी हरकत नसेल तर मी तुझ्या मुख्याध्यापकांशी बोलेन."

"तू त्यांच्या खोलीत शिरलास तर ते पोलिसांना बोलावतील," स्वामिनाथन म्हणाला.

ते जेव्हा शाळेजवळ पोचले तेव्हा मणीला निघून तरी जा किंवा फारतर रस्त्यावर थांब असं सांगण्यात आलं. राजम आत गेला व मुख्याध्यापकाच्या खोलीपर्यंत त्याच्याबरोबर जाणं स्वामिनाथनला भाग पडलं. टेबलावर कोपर टेकवून हातात डोकं ठेवून मुख्याध्यापक झोपले होते. त्या घुसमटत्या खोलीत एकच खिडकी होती व दुकानाच्या बाजूच्या भिंतीच्या दिशेनं ती उघडणारी होती. खोलीत धुळीनं भरलेले नकाशे, पृथ्वीगोल व भूमितीचे तक्ते पडले होते. दोन शाईच्या बाटल्या व कागदांच्या मध्ये मुख्याध्यापकांची पांढरी छडी टेबलावर पडली होती. सूर्याचे धुळीनं भरलेले किरण मुख्याध्यापकांच्या नाकावर व टेबलावर पडले होते. मुख्याध्यापक मंद स्वरात घोरत होते. अशा दृश्याला

आपल्याला सामोरं जावं लागेल याची राजमला कल्पना नव्हती.

"आता आपण काय बरं करावं," स्वामिनाथननं कुजबुजत्या स्वरात विचारलं.

"जरा थांब," राजमनं हुकूम सोडला.

ते दहा मिनिटं थांबले..मग पायानं हलका आवाज करू लागले. मुख्याध्यापकांनी डोळे उघडले पण हातातून डोकं वर न काढता, त्यांच्याकडं ते शून्य नजरेनं पाहू लागले. त्यांना ओळखल्याचा भाव त्यांच्या नजरेत नव्हता त्यांनी डोळे चोळले, तीनदा भिवया उंचावल्या, जांभई दिली व सुस्तावलेल्या आवाजात त्यांनी विचारलं, "तुम्हाला काही तास वगैरे नाही वाटतं ?" आपला चष्मा शोधताना ते काहीसे धडपडले. त्यानी चष्मा चढवला. आता चित्र पुरं झालं होतं, सुरकुतलेला चेहरा व धुरकटलेला चष्मा - स्वामिनाथनची छाती भीतीनं धडधडू लागली. त्यांनी पुन्हा विचारलं, "तुम्ही कोणत्या वर्गात आहात ? तुम्हाला आता तास नाहीत का ?"

"मी तुमच्या शाळेतील नाही," राजमनं सांगितलं.

"ओह ! मग कुठल्या स्वर्गातून बरं तू अवतरलास ?"

"मी एम.सी.सी. चा कॅप्टन असून कामासाठी तुम्हाला भेटायला आलो आहे," राजम म्हणाला.

"काय काम आहे ?"

"हा माझा मित्र डब्लू.एस. स्वामिनाथन, तो तुमच्या शाळेला सातवी क च्या वर्गात आहे."

"वा, तुझ्या भेटीनं मला गौरवच झाल्यासारखं वाटतंय," स्वामिनाथनकडं वळून मुख्याध्यापक म्हणाले. बोर्ड हायस्कूलला लौकिक कोठून प्राप्त झाला हे त्या क्षणी राजमला उमजलं.

"मी एम.सी.सी. चा कॅप्टन आहे."

"वा, अत्यानंद झाला."

"तो माझ्या संघात आहे. तो चांगला गोलंदाज आहे."

"खरं का ?" स्वामिनाथनकडं वळत त्यांनी विचारलं.

"मी मुद्यावर येऊ का ?" राजमनं विचारलं.

"हो. हो. एकदाचं सांगून टाक काय ते," मुख्याध्यापक म्हणाले.

"त्याचं असं आहे की, हा चांगला गोलंदाज आहे व त्याला थोडी सरावाची गरज आहे. पण त्याला दररोज साडेचार नंतर शाळेत रहावं लागत असल्यानं तो मैदानावर लौकर येऊ शकत नाही," राजमनं सांगितलं.

"मग, मी काय करावं असं तुझं म्हणणं आहे ?"

"सर, साडेचार नंतर त्याला घरी जायची परवानगी तुम्ही देऊ शकणार नाही काय ?"

मुख्याध्यापक आपल्या खुर्चीत रेलले व काही क्षण स्तब्ध राहिले.

राजमनं पुन्हा विचारलं, "सांगा ना सर, द्याल ना परवानगी ?"

"या शाळेचा मुख्याध्यापक कोण आहे ? मी का तू ?"

"अर्थात् तुम्हीच मुख्याध्यापक आहात सर. अल्बर्ट मिशन शाळेत साडेचार नंतर एक क्षणभर देखील आम्हाला ठेवीत नाहीत. आम्ही जर खेळात भाग घेणार असलो तर आम्हाला कवायतेतून सूट देतात."

"त्या क्षुद्र शाळेबद्दल तुमची बडबड ऐकून घ्यायची तयारी नाही. चालते व्हा इथून."

आपल्या मित्रांना बराच वेळ झालेला पाहून व काही बरं वाईट तर नाही ना घडलं या भीतीनं बाहेर उभा असलेला मणि आत आला.

मणिकडं कडवट नजर टाकीत मुख्याध्यापकांनी विचारलं, "हा कोण आहे ? काय हवंय तुला ?"

"काही नाही," असं उत्तर देऊन तो शांतपणं कोपऱ्यात जाऊन उभा राहिला.

"काही काम नसलेला प्रत्येक जण माझ्या खोलीत येऊन का उभा राहतोय हेच मला कळत नाही."

"मी पोलिस निरीक्षकाचा मुलगा आहे," राजमनं सांगितलं.

"असं का ? छोट्या बदमाषांच्या टोळीनं येऊन खिडक्यांची तावदानं फोडली तेव्हा ते काय करीत होते हे विचार. त्या पोराच्या हातात ते काय आहे बरं ?"

"माझा लाकडी सोटा," मणीनं उत्तर दिलं.

"त्यानं तो डोकी फोडत असतो," अशी पुस्ती जोडत राजम म्हणाला, "चल, मणि, स्वामी. या-या. . . वेडपटाकडं काही दाद लागणं शक्य नाही."

पंधरा

सामन्यापूर्वी

1

'मित्रत्वाचा' सामना खेळायचं एम.सी.सी. चं आव्हान यंग मेन्स युनियननं स्वीकारलं होतं. वाचनालयाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवर यंग मेन्स युनियननं अविरत सराव करून जोरदार तयारी केलेली होती. जागेच्या मालकानं जेव्हा हरकत घेतली तेव्हा कुलाम रस्त्याच्या मध्ये ते सराव करीत. हा सामना नावापुरताच मित्रत्वाचा होता.

एम.सी.सी. नं दिलेल्या आव्हानात लढाईचा सूर होता.

या आव्हानाबरोबरच्या शर्ती कठीण होत्या. पहिली अट होती की बरोबर सकाळी अकरा वाजता खेळाडूंनी मैदानावर हजर झालं पाहिजे. दुसरी अट होती सर्वांनी आपापल्या बॅटी आणाव्यात. एम.सी.सी. मोठ्या उदारपणं यष्टी पुरवणार होते. तिसरी निश्चित अट अशी नव्हती पण पुरेसा चेंडूचा साठा ठेवावा असं सुचवण्यात आलं होतं. 'तुमचे फलंदाज तुमचेच चेंडू फटकावतील. आमचे चेंडू फोडणार नाहीत,' हे कारण त्यासाठी दिलं होतं. पुढची अट काही तेवढी 'मित्रत्वाची' नव्हती. जर जेवायचं झालं तर त्यांनी आपापली व्यवस्था करावी ही ती अट होती. शेवटची अट गुंतागुंतीची होती व त्याबाबत बरीच वादावादीही झाली. ही अट होती 'चेंडू, बॅटी, यष्टी यांची मोडतोड व अन्य नुकसान झाल्यास त्याची भरपाई तुम्हाला करून द्यावी लागेल.'

वाय. एम. यूचा कॅप्टन या अटीनं बुचकळ्यात पडला. अट क्रमांक 2 व 3 नुसार जर काही बॅटी व चेंडू मोडलेच तरी ती त्यांचीच मालमत्ता असणार होती तेव्हा त्याच्या नुकसान भरपाई बाबत एम.सी.सी. नं चिता करायची काही गरज नव्हती. काहीही झालं तरी यष्टी एम.सी.सी. च्याच राहणार आहेत व 2 आणि 3 क्रमांकाची अट नीट वाचलेली दिसत नाही असं त्याला सांगण्यात आलं. त्यामुळं वाय.एम.यू.चा कॅप्टन फारच संतापला. 'एम.सी.सी. संघाला एवढीच भीक लागली असेल तर आमच्या खेळपट्टीवर येऊन खेळायचे तरी कष्ट कशाला घेता?' असं त्यानं सुनावलं. तो कॅप्टन गेल्यानंतर वीस मिनिटानं राजमला

झणझणीत प्रत्युत्तर सुचलं होतं, वाचनालयाजवळील रिकाम्या जागेच्या मालकानं आक्षेप घेतला तर कुलाम रस्त्यावर सामना खेळण्यात एम.सी.सी. ला काही स्वारस्य वाटत नाही असं त्याला ऐकवावंसं वाटलं. शेवटच्या अटीतील 'अन्य नुकसान' म्हणजे काय असं तेथून जाण्यापूर्वी वाय.एम.यू. च्या कॅप्टननं विचारलं. तेव्हा राजम क्षणभर थांबला, त्यानं इकडं तिकडं पाहिलं व एम.सी.सी. च्या मैदानाजवळील एका घराच्या खिडक्या व फरश्यांकडे बोट दाखवलं.

दोन पंधरवडयानंतर येणाऱ्या रविवारी सामना होणार होता.

राजमची मनःशांती हरपली होती. आपला संघ वाय. एम.यू. ला झोडपून काढील, असा विश्वास त्याला वाटत होता. संघानं त्याच्यावर अवलंबून राहायला काही हरकत नव्हती, त्यानं काही संघाला मान खाली घालायला लावलं नसतं. मणीचा प्रभाव पडत नसला तरी तो स्थिरवृत्तीचा होता. गरज पडली तर तो डोक्याने कोणताही चेंडू अडवू शकत असे. त्याची फलंदाजीही काही वाईट नव्हती. त्याची खास पद्धत होती. यष्टीकडे येणाऱ्या चेंडूच्या सर्व वाटा तो बॅटने रोखू शकत असे. भल्या भल्या गोलंदाजांच्या तोंडाला त्याच्या फलंदाजीमुळं फेस येई. संघातील इतर खेळाडूंचा विचार करण्याची राजमला काही गरज वाटली नाही. रात्रंदिवस त्याला एकाच खेळाडूबद्दल चिंता वाटत होती. तो छुपा रुस्तुम होता. त्याच्यावर फार मोठी जबाबदारी होती. तो संघातील 'टेट' होता व प्रतिस्पर्धी संघातील अकराही फलंदाजांना त्यानं बाद करायलाच हवं होतं. पण तो काहीसा अनिश्चित वाटत होता. सामन्याला अवघा पंधरवडा उरला असूनही तो सरावाची पर्वा करत नव्हता. या भूतलावर अंधार पडू लागला की मैदानावर उगवायची त्याची जुनी संवय बदलली नव्हती. "स्वामी," राजम विनवणी करत म्हणाला, "सायंकाळी निदान एक तास तरी सराव करण्याचा प्रयत्न करशील का ?"

"अगदी निश्चित राजम, पण तू काही मार्ग सुचवलास तरच शक्य आहे."

"तुझ्या मुख्याध्यापकांना का नाही सांगत ?"

"ओ, नको रे नको. तुझ्या सूचनेबद्दल आभार पण. त्या माणसाचा विचारही करायला नको. तुझी मागच्यावेळची भेट ते अद्याप विसरलेले नाहीत."

"मी त्याची पर्वा करत नाही. तू चांगला सराव करायला हवास. पाच मिनिटाच्यावर तू एखाद्या फलंदाजाला टिकवून ठेवलंस ना तर मी तुझं तोंडही पाहणार नाही. तू किती धावा झाल्या याची काळजी करू नकोस. ते तू आमच्यावर सोड."

2

सामन्याला अवघे सात दिवस उरले असताना आपल्या संध्याकाळच्या वेळा किती मौल्यवान आहेत याची जाणीव स्वामिनाथनला होऊ लागली. सायंकाळची घंटा होताच

इतरांबरोबर तो कवायतीसाठी रांगेत उभा राहत असे. मात्र नेहमीप्रमाणे त्यानं कोट, टोपी काढली नाही. इतर सर्व शर्ट धोतरात खुपसून तयार होते. टोकदार मोठ्या मिशा असलेले, रेशमी फेटा लष्करी धर्तीनं डोक्याला गुंडाळलेले कवायतीचे मास्तर पुढे छाती काढून जणू कॅमेऱ्यासमोर उभे होते. विद्यार्थ्यांकडे ते तुच्छतेनं नजर टाकीत होते. कळकट नोंदवहीतून मॉनिटर एकेकाची नावं पुकारत होता. एकदाची हजेरी संपली व रांगेत उभ्या असलेल्या मुलांची एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत कडक नजरेनं मास्तरांनी पाहणी केली. स्वामिनाथन बुटका असल्यानं तो रांगेच्या शेवटी उभा होता. मास्तर त्याच्यापुढं थांबले, त्यांनी त्याला नखशिखांत न्याहाळलं व ते पुटपुटले, "तुला सूट मिळणार नाही. कोट आणि टोपी काढ." स्वामिनाथन अजीजीनं म्हणाला, "सर माझी तब्येत ठीक नाही. मी आज कवायत करू शकत नाही. जर केली तर मी मरेनच. सर मला वाटतं. . ." तो मास्तरांच्या मागे मागे चालत बोलू लागला.

मास्तर शेवटच्या मुलाजवळ पोचले तरी स्वामिनाथन त्यांचा पिच्छा सोडत नव्हता, स्वामिनाथनकडं वळून त्यांनी दरडावून विचारलं, "तुला काय झालंय ?"

"सर, तुम्हाला मला काय त्रास होतोय हे ठाऊक नाही. मला काय दुखणं आहे हे देखील तुम्ही जाणून घेत नाही."

"ठीक आहे. आता नेमकं काय होतंय बरं तुला ?"

आधी डोकेदुखीची सबब सांगावी असं स्वामिनाथनला वाटलं पण कितीही गंभीर डोकेदुखी असली तरी ती तुच्छ समजण्याचा मास्तरांचा मूड पाहून तो म्हणाला, "काल रात्रभर मला वात झाला होता." ते एकून मास्तर अवाकच झाले. "तुला वात झाला होता ? तुला वेड तर नाही लागलं ?" "नाही, सर, मला रात्रभर क्षणभरही झोप लागली नाही. मला वात झाला होता. आमचे डॉक्टर तसं म्हणाले. निदान आठवडाभर तरी कवायतीत भाग घेऊ नकोस असं त्यांनी बजावलंय, जर मी भाग घेतला तर मी मरेन असं ते म्हणाले."

"जा, निघ इथून. मी तुझा गळा घोटण्याआधी तोंड काळं कर, तुझ्या एकाही शब्दावर माझा विश्वास नाही. पण तू खनपटीलाच बसून राहणारा डुक्कर आहेस. चालता हो."

कवायतीचं मैदान सोडून क्रिकेटच्या मैदानावर पोचायला त्याला अर्धातास लागला. घाईघाईनं व धापा टाकीतच त्यानं मैदान गाठलं. त्याला एवढ्या लवकर आलेला पाहून सर्वांनाच अत्यानंद झाला. राजमनं तर आनंदानं उडीच मारली.

वरकरणी सारं काही कुशल होतं. कवायतीचे मास्तर आपल्यावर पाळत ठेवतील की काय एवढी एक शंका मात्र त्याला सतावत होती. त्यामुळं खेळ संपल्यावर पूर्ण अंधार पडेपर्यंत तो राजमच्या घरीच थांबला. रस्त्यांवरील दुकानांतून येणारा प्रकाश काळजीपूर्वक चुकवत त्यानं घर गाठलं.

आठवड्यातील सर्व संध्याकाळच्या वेळा मोकळ्या मिळाव्यात म्हणून त्यानं दुसऱ्या दिवशी सकाळी एक बेत आखला. त्याच्या टेबलावर व्याकरणाचं पुस्तक उघडं पडलं होतं.



सकाळचे साडेसात वाजले होते व शाळेत जायला अजून अडीच तासाचा अवधि होता.

त्यानं घरातल्या घरात टेहेळणी केली. बाळाच्या खोलीत पाळण्याची लयबध्द करकर ऐकू येत होती म्हणजे आई त्या खोलीत होती. पुढच्या खोलीतून बाबांचा आवाज येत होता, ते आपल्या अशिलांशी बोलण्यात मग्न होते. स्वामिनाथन हळूच घरातून बाहेर पडला.

'डॉक्टर टी. केशवन, एल.एम. अॅन्ड एस; श्रीकृष्ण दवाखाना' असं लिहिलेल्या एका दुकानासमोर तो उभा राहिला. रस्त्याकडं तोंड केलेल्या एका लांब टेबलाशी डॉक्टर बसले होते. डॉक्टर एकटेच व मोकळे आहेत हे पाहून स्वामिनाथन आत शिरला.

"हॅलो, स्वामिनाथन काय झालं ?"

"काही नाही, थोडं काम होतं."

"घरी सारे कुशल आहेत ना ?"

"होय डॉक्टर. मला तात्काळ डॉक्टरचं सर्टिफिकेट हवं आहे."

"तुला काय झालंय ?"

"मी तुम्हाला खरं सांगून टाकतो. त्याचं काय आहे की, मला पुढच्या आठवड्याला यंग मेन्स युनियन बरोबर सामना खेळायचाय. त्यासाठी मला सराव करायलाच हवा. पण रोज संध्याकाळी कवायतीचा तास, बालवीर व अन्य कसला न कसला तास असतोच. पण मला रोज साडेचार वाजता मोकळं करावं असं जर तुम्ही सर्टिफिकेट दिलंत ना, तर हा सामना जिंकायला एम.सी.सी. ला मदत होईल."

"ठीक आहे. मी तसं करू शकेन. पण तुला काही होतंय का ?"

काय उत्तर द्यावं यावर अर्धा सेकंद विचार करून तो म्हणाला, "अलिकडं मला वात झाल्यासारखं वाटतंय."

"काय म्हणालास ?" डॉक्टरांनी काळजीयुक्त स्वरात विचारलं.

डॉक्टरांवर आपला एवढा प्रभाव पडल्याचं पाहून स्वामिनाथन खूष झाला. आणि आपल्याला अत्यंत भयंकर वात झाल्याचं त्यानं पुन्हा एकवार सांगितलं.

"वात झालाय म्हणतोस ? म्हणजे नेमकं काय झालं आहे असं तुला म्हणायचंय ?"

उलट तपासणीस ती योग्य वेळ आहे असं स्वामिनाथनला वाटत नव्हतं पण त्याला डॉक्टरांची मर्जी संपादन करायची होती. त्यानं उत्तर दिलं, "मला काहीतरी होतंय एवढं खरं. नक्की काय ते सांगता येत नाही. पण ती एक प्रकारची पोटदुखीच असते ना ?"

डॉक्टरना जोरदार हसू आलं व ठसका लागून जीव घाबरा घुबरा होईपर्यंत ते हसतच राहिले. मग त्यांनी त्याचे डोळे, जीभ तपासली, छातीवर ठकठक करून पाहिलं व त्याची तब्येत उत्तम आहे असं जाहीर केलं. किंबहुना वातापासून सुटका व्हायची असेल तर त्यानं रोज कवायतीत भाग घेणं इष्ट असा सल्लाही दिला. आपल्याला रोज संध्याकाठी मोकळा वेळ मिळणं किती जरूरीचं आहे हे त्यानं पुन्हा पटवून द्यायचा प्रयत्न केला. त्यावर डॉक्टर

म्हणाले, "ते सारं ठीक आहे. पण मी जर असं सर्टिफिकेट दिलं तर माझ्यावर ते खटलाच भरतील."

"कोणाला कळणार आहे, डॉक्टर? आमच्या एम.सी.सी. नं सामन्यात पराभूत व्हावं असं तुम्हाला वाटतं का?"

"मी तुम्हाला सुयश चिंतितो. काही काळजी करू नकोस. पण मी तुला सर्टिफिकेट काही देऊ शकणार नाही. मात्र मी तुझ्या मुख्याध्यापकांशी तुझ्याबद्दल बोलेन व तुला साडेचारला सोडत जा असं सांगेन."

"चालेल. तुम्ही किती चांगले आहात डॉक्टर!"

त्या दिवशी सायंकाळी, शाळेच्या चौकातील बालवीर तासाला विशेष विचार न करता स्वामिनाथन घरी परतला व तेथून क्रिकेट मैदानावर गेला. दुसऱ्या दिवशी असलेल्या कवायतीच्या तासाचीही त्यानं पर्वा केली नाही. त्यानं भरपूर सराव चालवला होता, राजम म्हणाला, "स्वामी, तुझी कमाल आहे! तुला थोड्या सरावाचीच काय ती गरज होती. तू सायंकाळच्या तासांबाबत काय केलंस?"

"अरे जरा डोकं लढवलं. साडेचार नंतर जर मी शाळेत राहिलो तर मरेन असं माझ्या डॉक्टरांनी आमच्या मुख्याध्यापकाना सांगितलं. मी त्यांना ते करायला लावलं. तुला काय वाटतं याबद्दल?"

त्याच्या बरगडयांना गुदगुल्या करत मणि म्हणाला, "तुझ्याइतका डोकेबाज मुलगा मी बघितला नव्हता." राजमही त्याच्याशी सहमत झाला. मग एकदम काळजीनं तो म्हणाला, "आपण सामना जिकू की, नाही हे सांगता येत नाही. आपण जर हरलो ना तर मी मरेनच."

"हे बघ, राजम, तुझं पराभवाचं बोलणं ऐकून मला पार वीट आलाय. तुला काय वाटतं त्या माकडछाप मूर्खांचा आपल्यापुढं टिकाव लागेल?" मणि म्हणाला.

"आपण जिंकलो तर मी वृत्तपत्रांना बातमी पाठवीन," राजम म्हणाला.

"ते आपली छायाचित्रं छापतील काय?" टेटनं विचारलं.

"निश्चितच!"

3

शुक्रवारी भूगोलाच्या तासाच्यावेळी हातात छडी घेऊन मुख्याध्यापक वर्गात आले. सौम्य प्रकृतीचे भूगोलाचे मास्तर राम राव आदरानं उभे राहिले. आपल्या सुरकुतलेल्या चेहऱ्याने त्यांनी सर्व वर्गभर नजर टाकली. घुबडासारखे डोळे त्यांनी स्वामिनाथनवर रोखले व ते म्हणाले:

"उभा रहा."

स्वामिनाथन उभा राहिला.

"इकडं ये."

तो लगबगीनं त्यांच्या जवळ गेला.

"तुझा बेशरम चेहरा सर्व वर्गाला पाहू दे."

स्वामिनाथन आपला चेहरा लपवू लागला. तेव्हा त्याचं मानगूट पकडून मुख्याध्यापकांनी त्याला चेहरा वर्गासमोर दाखवायला लावला. ते म्हणाले, "या थोर इसमाला कवायत किंवा स्काऊटसारख्या क्षुल्लक तासांची पर्वा नाही. गेल्या सोमवार पासून तो या तासांना हजर राहिलेला नाही." त्यांनी केलेलं छद्मी हास्य पाहून त्यापासून आपणही बोध घ्यावा असं वाटून मुलांतही हलकी खसखस पिकली. भूगोलाच्या मास्तरांच्या चेहऱ्यावरही मंद स्मित झळकलं.

"सर, तुम्हाला काही खुलासा करायचाय ?" मुख्याध्यापकांनी विचारलं.

स्वामिनाथनला कसाबसा कंठ फुटला व तो म्हणाला, "डॉक्टर... माझ्याबद्दल तुम्हाला डॉक्टर काही बोलले नाहीत, सर ?"

"कोठले डॉक्टर ? व कशाबद्दल बोलणार होते ?"

"ते तर म्हणाले होते की, मी बोलेन म्हणून," स्वामिनाथन अस्पष्टपणं म्हणाला.

"कोड्यातल्या सारखा तू बोलत राहिलास ना तर तुझे कपडे काढून मी तुला झोडपीन."

"डॉ. केशवन म्हणाले होते..."

"काय झालं डॉ. केशवनांचं ?"

"माझ्याबद्दल तुमच्याशी बोलून मला कवायतीच्या व अन्य तासातून सूट मिळवून देतील असं त्यांनी मला सांगितलं होतं. मी काही दिवस कवायतीच्या तासांना हजर राहिलो तर मी मरेन असं ते म्हणत होते."

"का ? तुला काय बरं झालंय ?"

"त्यांना वाटतं, मला कसला तरी वात झाला असावा. डॉक्टरना भेटल्यानंतर हा शब्द टाळायचं त्यानं ठरवलं होतं पण केवळ संवयीमुळं त्यानं तो सांगण्याची चूक केली.

मास्तरांकडं वळून मुख्याध्यापकांनी भिवई उंचावून पाहिलं. काही क्षण थांबून ते म्हणाले, "तुझ्या तोंडून आणखी काय विद्वत्तापूर्ण शब्द व सत्य बाहेर पडत आहे याची मी वाट पाहतो आहे."

"सर, मला वाटलं ते तुमच्याशी बोलले असतील. आपण बोलू असं ते म्हणाले होते."

"रस्त्यावरच्या कुणीही उठून माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांचं मी काय करावं हे सांगू लागला तर मी त्याची पर्वा करत नाही. हा कोण सर्जन-जनरल, आला नाही हे बरंच झालं. आला असता तर मी त्याचं डोकं टेबलावर आपटायला शिपायाला सांगितलं असतं."

आपल्याला डॉक्टरनं फसवलं हे स्वामिनाथनच्या लक्षात आलं. आपण

मुख्याध्यापकाला भेटू असं सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं प्रसन्न स्मित त्याला आठवलं. डॉ. केशवन यांच्या त्या प्रसन्न स्मितामागं किती निर्दयी खलनायक दडलेला होता हे त्याला आता उमगलं. त्या खलनायकाला चांगलाच धडा शिकवीन, त्याच्या टेबलाच्या खणात साप ठेवून देईन व तापानं अगदी तो (स्वामिनाथन) मरायला टेकला तरी त्याला नाडी तपासू देणार नाही. ढोपरावर छडी बसल्यानं सूड घेण्याचे त्याचे विचारचक्र थांबले. हातात छडी घेऊन मुख्याध्यापक ओरडले, "हात पुढं कर. प्रत्येक गैरहजर दिवसासाठी प्रत्येक हातावर सहा फटके आणि पुढचा संबंध तास बाकावर उभं राहयचं. मॉनिटर तू लक्ष ठेव. आणि डब्लू.एस. स्वामिनाथन याद राख, या पुढं एका तासाला जरी दांडी मारलीस ना तर शाळेच्या सभागृहात तुझे कपडे काढीन व छडीनं बडवायला शिपायाला सांगेन. तुझा पोलिस अधिकारी, त्यांची मुलं, नातू किंवा आजोबा यांची भिती तू मला घालू शकत नाहीस. तू थेट सम्राटाकडं तक्रार केलीस तरी मला त्याची पर्वा नाही." त्यांनी त्याची मानगूट सोडली व छडी उगारली.

पुढच्याच क्षणी सापासारखी लवलवणारी ती दुष्ट छडी स्वामिनाथनच्या तळव्यावर बसणार होती. भीती, विरोध व संताप या भावनांचं मिश्रण त्याच्यात संचारलं. आपण काय करतो आहोत हे त्याला उमगेना. त्यानं हात पुढे करून मुख्याध्यापकांच्या हातातली छडी हिसकावून घेतली व खिडकीतून बाहेर फेकून दिली. आपल्या बाकाकडं तो धावला, त्यानं त्याची पुस्तके गोळा केली व तो वर्गाबाहेर पळत सुटला. धावतच त्यानं हॉल व व्हरांडा ओलांडला, शाळेच्या दरवाज्याची अवजड कडी काढणं शक्य नसल्यानं दरवाज्यावर चढून त्यानं मार्केट रस्त्यावर उडी ठोकली.

रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका झाडाखाली थांबून तो विचार करू लागला. तो सैतान असेपर्यंत पुन्हा त्या शाळेत जायची त्याची इच्छा नव्हती. बाबांना कळल्यावर ते काय करतील हे ईश्वरच जाणे. ते पुन्हा शाळेत जायला त्याला भाग पाडतील. पण ते तर अशक्य होतं. या प्रकारे त्यानं दोन शाळा सोडल्या होत्या. मालगुडीत आता आणखी शाळाच नव्हत्या. तेव्हा त्याच्या बाबांना त्याला त्रिचनापल्ली किंवा मद्रासला पाठवावं लागलं असतं. पण कदाचित् बोर्ड हायस्कूलचे मुख्याध्यापक सर्व शाळांना पत्रं पाठवून स्वामिनाथन कोण आहे हे कळवतील. मग त्याला कुठल्याच शाळेत प्रवेश मिळणार नाही. काम करून त्याला शिक्षण घ्यावं लागेल... त्याला काही रुपये मिळण्याची शक्यता आहे. मग हवं तेव्हा त्याला हॉटेलात जाऊन कॉफी पिता येईल, जेवता येईल. बॉम्बे आनंद भवन काय लाजबाब मिठाई बनवतात! त्यांच्या स्टॉलवर डावीकडच्या कोपऱ्यावर हिरव्या रंगाची मोठी वडी असे. त्यावर बदाम पेरलेले असत. ती खायची त्याला खूप इच्छा होई पण ती बहुधा फार महाग असल्यानं हॉटेलवाल्याला विचारायचं धैर्यच होत नसे. तो शाळेत गेला नाही. त्याला बाबा घरात बसू तर देणार नाहीत. कदाचित ते मार देतील. त्यादिवशी

किंवा आता आपण कधीच घरी परतणार नाही. आपल्या बाबांसामोरं जाण्याची हिंमत त्याच्यात नव्हती पण मग जायचं तरी कुठं असा प्रश्न त्याला पडला. कुठंही, समजा मार्केट रस्त्यावरून आपण चालत राहिलो तर कुठं बरं पोहोचू ? बहुधा मद्रास, त्याही पुढे चालत राहिलो तर मुंबई आणि इंग्लंड गाठता येईल काय ? या पैकी कुठंही तो नोकरी करू शकेल, पैसे मिळवू शकेल व त्याला जे वाटेल ते तो करू शकेल. पण समजा आगगाडीनं गेलो तर. . . पण मग पैसे कोठून आणायचे ? बहुधा काही त्रास व्हायचा नाही. कारण स्टेशन मास्तर प्रेमळ होते व स्वामिनाथन त्यांना ओळखत होता.

शाळेची घंटा झाली व स्वामिनाथन घाईघाईनं निघाला. मुलं कदाचित बाहेर येतील व त्याच्या भोवती जमून गंमतीची वस्तू असल्यासारखं त्याच्याकडं पाहतील.

मार्केट रस्त्यावरून तो झपाझप निघाला. उजवीकडं तो स्मिथ रस्त्यावर वळला. गल्ली बोळातून वाट काढीत तो अल्बर्ट मिशन या त्याच्या जुन्या शाळेजवळ पोचला. ती पिवळट इमारत पाहताच जुन्या आठवणी जाग्या झाल्या. ही शाळा सोडायलाच नको होती असं त्याला वाटलं. तिथलं सारं कसं आता शानदार वाटत होतं. मुख्याध्यापक त्यांच्या पगडीत किती प्रतिष्ठित दिसत ! बोर्ड स्कूलच्या मळकट मुख्याध्यापकांपेक्षा ते वेगळे होते. वेदनायकम व एब्नेझार, हो एब्नेझार सुद्धा ! डी.पी. पिल्ले. त्यांचे इतिहासाचे तास किती सुखकर व जिव्हाळ्याचे वाटायचे. सोमू व वाटाण्याच्या आठवणीनं तर स्वामिनाथनच्या डोळ्यात पाणीच तरळलं. त्याचे सारे मित्र तिथं होते. राजम, सोमू, मणि व वाटाणा. अल्बर्ट मिशन स्कूलच्या भिंतीचं संरक्षण लाभलेले आनंदी जीव. तोच एकटा काय तो बाहेर होता, जणू महारोग्यासारखा वाळीत टाकलेला.

आपण बहिष्कृत आहोत बहिष्कृत ! त्याला स्वतःचीच कींव आली. जुन्या शाळेला जायला मिळावं म्हणून तो काय करणार नाही ? पण तेच त्याला परत घेणार नाहीत. काही उपयोग नव्हता. त्याच्यासाठी मालगुडीत शाळा नव्हती. मद्रासला पळून जाऊन नोकरी करायला हवी. पण जाण्यापूर्वी राजम व मणीला भेटलेलं बरं.

शाळेच्या प्रवेशद्वारासमोर तो रेंगाळत होता. आत प्रवेश करण्याचं धाडस त्याच्यात नव्हतं, तो शाळेचा शत्रू होता. सिंगाराम शिपायानं जर आपल्याला पाह्यलं तर चोप देऊन तो आपल्याला पिटाळून लावील. तो दरवाज्यावरील भिंतीलगत सरकला. राजम व मणीला तर भेटायलाच हवं होतं. पण कसं ? काही मिनिटं थांबून त्यानं विचार केला व मनोमन एक योजना पक्की केली.

तो शाळेच्या पिछाडीस गेला. इमारतीच्या त्या बाजूला सहसा कोणी येत नसे. शाळेलगतचं ते एक पडिक शेत होतं व रेल्वेच्या कुंपणापर्यंत ते पसरलेलं होतं. शाळेत त्यानं घालवलेल्या सहा-सात वर्षात त्यानं कधीही हा भाग पाहिलेला नव्हता. शाळेच्या कुंपणाच्या तेथल्या भिंतीवर अर्ध अधिक शेवाळ होतं. तेथून शाळेचा मागील भाग मोठा

मजेशीर दिसे. तेथून खरं तर स्वामिनाथनला शाळेचा वरचाच अर्धा भाग दिसत होता. पण तोही गूढ, विचित्र वाटे. त्याचा जुना वर्ग नेमका कोठे आहे हे त्याला सांगता येत नव्हतं. भिंतीजवळ त्यानं एक दगड ठेवला व त्यावर उभं राहून तो पाहू लागला. आता त्याला फक्त शाळेचं आवारच दिसत होतं. बारा वाजायला आले होते, शाळेतील ती सर्वात कामाची वेळ होती, आवारात चिटपांखरूही दिसत नव्हतं. तो वाट पाहत थांबून राहिला. हे असं वाट पाहणं जिकिरीचं होतं. थोड्या वेळानं एक अगदी छोटी व्यक्ती पहिल्या वर्गातून नाक शिंकरण्यासाठी बाहेर पडली, स्वामिनाथनपासून पंधरा पावलांवर दूर पहिलीच्या तिन्ही तुकड्या होत्या.

स्वामिनाथननं हलकेच शीळ वाजवली पण ती त्या अगदी छोट्याला ऐकू गेली नाही. स्वामिनाथननं पुन्हा शीळ घातली तेव्हा जणू काय भूत दिसलं असा चेहरा त्या छोट्यानं केला. स्वामिनाथननं त्याला खूण करून बोलावून घेतलं. त्याच्याकडं जावं की वर्गाकडं पुन्हा धूम ठोकावी या बाबत त्या छोट्यानं क्षणभर विचार केला. स्वामिनाथननं पुन्हा त्याला बोलावलं. तेव्हा जणू झपाटून गेल्यासारखा डोळे विस्फारीत तो त्याच्याजवळ आला.

स्वामिनाथननं विचारलं, "तुला बदामाचं पेपरमिंट हवंय ?"

त्या छोट्याचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना. इथं साक्षात एक माणूस आपल्याला बदामाचे पेपरमिंट देतोय ! हे काही खरं नसणार. त्यात काहीतरी भानगड असणार. स्वामिनाथननं पेपरमिंट देण्याची पुन्हा तयारी दर्शवली त्यावर त्यानं सावधपणं होकार दिला.

"हं, ठीक आहे," स्वामिनाथन म्हणाला, "पण तुला ते काही लागलीच मिळणार नाही."

"सातवी अ'च्या वर्गातील एम. राजमकडं जाऊन सांग की, त्याच्या कुटुंबातील कोणीतरी त्याला ताबडतोब बोलवलंय, त्याला इथं घेऊन आलास की, तुझ्या हातात पेपरमिंट पडेल. कदाचित तुला दोन पेपरमिंटसही मिळतील."

तो क्षणभर घुटमळला मग त्यानं भिवई उंचावून विचारलं, "पण सातवी अ चा वर्ग आहे तरी कोठे ?"

"वरच्या मजल्यावर."

"ओह !" असा उद्‌गार काढून तो मुलगा विचारात गढून गेला.

"तुझं काय म्हणणं आहे ?" असं विचारून स्वामिनाथन म्हणाला, "मी दहा अंक मोजायच्या आत मला उत्तर हवंय. नाहीतर माझा प्रस्ताव रद्द समजायचा, हं एक, दोन, तीन. . ."

"तू म्हणतोस, वर्ग वरच्या मजल्यावर आहे ?" त्या मुलानं विचारलं.

"हो, निश्चितच."

"पण मी तिथं कधी गेलेलोच नाही."

"आता तुला तिथं जावं लागेल."

"तिथं कसं जायचं हे मला ठाऊक नाही."

"नुसता जिना चढून जायचं."

"मी तिथं दृष्टीस पडलो तर मला कदाचित ते मारतील."

"तुला जर बदामाचं पेपरमिंट हवं असेल तर एवढा धोका पत्करायलाच हवा, तेव्हा तू जातोस की, नाही हे सांग पाहू."

"ठीक आहे. इथंच माझी वाट पहा," एवढं बोलून तो छोट्या गायब झाला.

दहा मिनिटानंतर तो राजमसह परतला. भिंती पलिकडं स्वामिनाथनचं डोकं पाहून राजम आश्चर्यचकित झाला. "तू इथं काय करतोयस ?"

"भिंतीवरून उडी मारून इकडं ये पाहू. माझं फार तातडीचं काम आहे, राजम."

"मला तास आहे. मी आता येऊ नाही शकत."

"वेडेपणा करू नकोस. ये ना. मला खूप महत्वाचं बोलयचंय."

"उडी मारून राजम त्याच्याजवळ आला. स्वामिनाथनचं डोकं दिसेनासं झालं. भिंतीपलिकडून एक दीनवाणा आवाज आला, "माझं पेपरमिंट कुठाय ?"

"ओह, मला तुझा विसरच पडला," डोकं वर काढून स्वामिनाथन म्हणाला. 'हं, हे घे असं म्हणून त्यानं तीन पैचं नाणं भिंती पलीकडं फेकलं.

"तू बदामाचं पेपरमिंट म्हणाला होतास," त्या मुलानं आठवण करून दिली.

"मी काय हजार गोष्टी म्हणालो असेन," असं उत्तर देत स्वामिनाथन म्हणाला, "तीन पैचं नाणं पुरेसं नाही का ? त्यातून तुला हवं तर तू बदामाचं पेपरमिंट घेऊ शकतोस."

"पण तू बदामाची दोन पेपरमिंटं म्हणाला होतास."

"आता इथून निघ पाहू, वांगी विकणाऱ्या भाजीवाल्यासारखी माझ्याशी हुज्जत घालू नकोस. मिळालं त्यात समाधान मान," असं सांगून स्वामिनाथननं दगडावरून खाली उडी मारली.

"राजम, आज शाळेत काय घडलं तुला ठाऊक आहे ? मी मुख्याध्यापकांबरोबर भांडलो. मला काढून टाकलंय. आता मला शाळा, तास काही नाही."

"तू मुख्याध्यापकांबरोबर भांडलास ?"

"हो. कवायतीच्या तासांना मी हजर राहत नाही म्हणून ते मला चोप देऊ लागले. पण मी त्यांच्या हातातून छडी हिसकावून घेतली. मला नाही वाटत आता मी कधी शाळेला परत जाईन म्हणून. जर मी गेलो तर खूपच गडबड होईल असं वाटतं."

"तू पण धन्यच आहेस बुवा !" राजम उद्‌गारला, "जिथं कुठं तू जातोस तिथं काही ना काही उपद्‌व्याप करून ठेवतोस. नेहमीच तुझं हे असं आहे."

"माझा काही दोष नाही रे यात, राजम," असं म्हणून डॉ. केशवन यांनी केलेला



दुष्टपणा त्यानं वर्णन केला.

"तुला काही अक्कलच नाही. तू विचित्रच आहेस."

"सराव करण्यासाठी संध्याकाळी वेळ मिळावा म्हणून दुसरं मला काय करता येणार होतं ? वाय.एम.यू. बरोबर सामना खेळायचा म्हणजे काही चेष्टा नव्हे."

"तुझं बरोबर आहे, स्वामी. आज सकाळी त्यांना मी सराव करताना पाहिलं. ते सकाळीही सराव करतात. ते काही वाईट खेळाडू नाहीत. त्यांच्यात एक मोहिद्दिन आहे, काळा सावळा. वा ! तुला त्याच्यावर लक्ष ठेवावं लागेल. तो ब्रॅडमन सारखी फलंदाजी करतो. तुला त्याच्यावर नजर ठेवावी लागेल. दुसरा एक षण्मुगम आहे. तो धोकादायक गोलंदाज आहे. मोहिद्दिनमध्ये एक उणीव आहे. 'लेगसाईडला' खेळताना तो स्थिर नसतो. स्वामी, तू काही काळ चिंता करू नकोस. उद्या तू सकाळी पण ये. त्यांचा आपल्याला धुव्वा उडवायला हवा."

खरं तर स्वामिनाथन राजमचा अखेरचा निरोप घ्यायला आला होता पण त्यानं आपला बेत बदलला. त्याच्या धाडसी योजनेबद्दल कळले तर राजमनं त्याला रोखलं असतं. तेव्हा तो त्याबद्दल राजमला, कोणालाही, एवढंच काय मणीलाही काहीही सांगणार नव्हता. त्याला जर त्यांनी रोखलं असतं तर त्याला रहायला जागाच उरली नसती. सामन्याला अजून दोन दिवस होते. कोणालाही न सांगता तो निघून जाणार होता, वाटेत तो काहीतरी करून सराव करणार होता, सामन्याच्या दिवशी तो काही तासासाठी परत येणार होता, मग तो पुन्हा गायब होणार होता आणि मग मालगुडीला कधीच परतणार नव्हता. मालगुडी-तिथं त्याचे बाबा होते -कडक नि हट्टी आणि सैतानासारखे मुख्याध्यापक होते. बाबांना त्यानं कितीही समजावून सांगितलं तरी त्यांच्याशी पटणं आता शक्य नव्हतं. तो जर घरी गेला असता तर बाबांनी त्याला चोपलं, बदडलं असतं, त्याला ठार करून टाकलं असतं किंवा पुन्हा बोर्ड हायस्कूलला जायला भाग पाडलं असतं. त्याचे बाबा अत्यंत कडक स्वभावाचे होते. कोणालाही कळू न देता त्याला सामन्याच्या दिवशी परत यावं लागणार होतं. कदाचित त्याची काही आवश्यकता नव्हती. त्यानं अचानक राजमला विचारलं, "राजम, सामन्यासाठी माझी गरज आहे असं तुला वाटतं का ?"

त्याच्याकडं संशयानं पाहत राजम म्हणाला, "असले प्रश्न विचारू नकोस. तुझ्याशिवाय आमचं चालायचं नाही. स्वामी आम्ही तुझ्यावर अवलंबून आहोत, आमच्याकडचा तू सर्वात उत्कृष्ट गोलंदाज आहेस. त्यांच्या संघाला चांगलं नमवलंच पाहिजे. आपण जर हरलो तर मी आत्महत्याच करीन. ओ, स्वामी तू काय घोटाळा करून ठेवलायस ? शाळेविना तू काय करणार ?"

"मला एखाद्या वर्कशॉप मध्ये किंवा तसंच कुठं तरी काम बघावं लागेल."

"तुझ्या वडिलांना कळलं तर ते काय म्हणतील ?"

"ओह, काही म्हणणार नाहीत. ते म्हणतील ठीक आहे. ते काही मला त्रास देणार नाहीत," स्वामिनाथन म्हणाला.

"स्वामी, मला उशीर होतोय. मला वर्गात जायला हवं." राजम उठला व शाळेकडं निघाला. जाताना त्यानं बजावलं, "मैदानावर लौकर ये. खूप लौकर ये. आता तू मोकळाच आहेस ना. . ."

सोळा

स्वामी नाहीसा होतो

1

एलमन स्ट्रीट या शहराच्या शेवटच्या रस्त्याकडं जाताना स्वामिनाथनचे वडील खजिल झाले होते. खडबडीत असलेला तो रस्ता वळून शरयू नदीच्या वाळूपर्यंत जात होता. मार्केट रस्त्याच्या टोकाला ते पोचले तेव्हा ते क्षणभर विचलीत झाले. दुकानं उशिरापर्यंत उघडी असल्यानं आणि रस्त्यावरच्या गॅसच्या दिव्यामुळं रस्ता प्रकाशानं लखलखला होता. तो ओलांडून ते अंधाऱ्या व शांत एलमन स्ट्रीटवर पोचले. गॅसच्या दिव्यांचा हिरवट प्रकाश रस्त्यावर पडला होता. त्यामुळं रस्त्याचा काही भाग उजळून गेला होता तरी उरलेला भाग काळोखात बुडालेला होता, नगरपालिकेचे काही मिणमिणते कंदील आजूबाजूच्या काळोखाचा गडदपणाच लक्षात आणून देत होते.

स्वामिनाथनच्या वडिलांना स्वतःचीच लाज वाटत होती. ते रस्ता ओलांडून, वाळूतून चालत शरयू नदीत डोकावणार होते – आपल्या मुलाचं प्रेत शोधण्यासाठी ! त्यांचा मुलगा - स्वामी, त्याचं प्रेत शरयूत शोधायची पाळी आली होती. हे त्यांना हास्यास्पद वाटत होतं, पण ते तरी काय करणार ? आपल्या मुलाबद्दल बरी-वाईट काहीतरी बातमी समजल्याविना घरी परतणं शक्य नव्हतं. त्यांची पत्नी व म्हातारी आई हतबुद्ध झाल्या होत्या. तालुक्याच्या कचेरीतील घड्याळांचे रात्रीचे दहा वाजताचे टोले पडेपर्यंत त्यांच्या पत्नीनं आनंदी राह्यचा प्रयत्न केला पण मग तिचा चेहरा पांढराफटक पडला. स्वामिनाथनचं काय झालं याचा शोध त्याचे मित्र, शिक्षक यांच्याकडं जाऊन घ्या असं तिनं त्यांना बजावलं होतं.

स्वामिनाथनचे मुख्याध्यापक कोठे राहतात हे त्यांना माहीत नव्हतं. बोर्ड हायस्कूलच्या पहारेकऱ्याकडं जाऊन त्यांनी त्यांचा पत्ता विचारला. त्यानं चुकीचा पत्ता दिल्यामुळं अर्ध शहर ते उगाच शोध घेत भटकले. मणीचं घरही त्यांना सापडलं नाही. ते राजमच्या घरी गेले तेव्हा तिथं काळोख होता. सर्वजण झोपी गेले होते. आपला मुलगा कोठे आहे हे विचारण्यासाठी त्यांना उठवणं काही स्वामिनाथनच्या वडिलांना बरोबर वाटलं नाही.

व्हरांड्यात नोकर झोपला होता. त्यानं स्वामिनाथन संध्याकाळी राजमच्या घरी आलेला नव्हता अशी माहिती दिली. मग ते रस्त्यातून भटकत राहिले. पत्नी व आईच्या समाधानासाठी ते हे सारं करीत होते. आपल्या पत्नीसारखी त्यांना मुळीच काळजी वाटत नव्हती. आपला मुलगा कुठं तरी गेला असेल व तो परत येईल तेव्हा त्याला चांगलीच कडक समज देऊन असली वृत्ती मुळातूनच उखडून टाकण्याचं त्यांनी ठरवलं होतं. एक तासभर असा शोध घेऊन ते घरी परतले. त्यांची आई अंथरूण सोडून घरात लंगडत येरझाऱ्या घालत होती. स्वामिनाथन जर घरी सुखरूप परतला तर मोठी पूजा करीन अशी तिरूपतीच्या बालाजीची ती प्रार्थना करीत होती. त्यांची पत्नी जणू एखाद्या दगडासारखी निश्चल होऊन रस्त्याकडं पाहत होती. घरातल्या त्या उदास वातावरणात छोट्या बाळाचा पाळण्यातून येणारा श्वासोच्छ्वासाचा काय तो एकमेव आवाज ऐकू येत होता.

एवढा वेळ भटकून गोळा केलेली स्वामिनाथन बद्दलची बातमी – खरं तर काहीच नसलेली बातमी – आपल्या पत्नीला सांगताना स्वामिनाथनच्या वडिलांनी काही विशेष घडलेलंच नाही असा आव आणून प्रसन्न चेहरा राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण त्यांचा हा आव थोडाच वेळ टिकला. घरातील दोन्हीही स्त्रियांना वाटणाऱ्या चिंतेने त्यांनाही घेरलं. आपल्या मुलाला काहीतरी झालं असणार असं त्यांना वाटू लागलं. त्याला पळवून नेलं असणार किंवा त्याला अपघात झाला असावा अशी शंका त्यांना येऊ लागली. आपल्या मनातील या शंका दूर सारण्याचा प्रयत्न ते करीत असताना त्यांच्या पत्नीनं थरथरत्या आवाजात विचारलं, "तुम्ही रुग्णालयात चौकशी केली का ?" तिला नंतर रडूच कोसळलं. वरकरणी या प्रश्नाकडं तुच्छतेनं त्यांनी पाहिलं खरं पण आपला मुलगा रुग्णालयात लोळागोळा होऊन पडलेला आहे असं दृश्य त्यांच्या डोळ्यापुढं तरळू लागलं. आपल्या मनातून ही दृश्यं पुसून टाकण्याचा कसोशीनं ते प्रयत्न करीत असतानाच त्यांच्या आईनं विचारलं, "कुठं बरं गेला असेल तो ? आज सकाळी तू त्याच्यावर रागावला होतास का ?" हा प्रश्न ऐकून ते काहीसे चिडलेच. स्वामिनाथन गायब झाला याबद्दल जो तो त्यांनाच दोषी धरत होता. नऊ वाजल्यापासून आडून आडून मारलेले सूचक शेरे व संशयास्पद कटाक्ष ते सहन करीत होते. पण आईच्या या उद्‌गारांनी ते अस्वस्थ झाले आणि त्यांनी आईला, "गुपचूप जाऊन झोप आणि मूर्खासारखे प्रश्न विचारू नकोस," असं सुनावलं.

सकाळपासून आपण आपल्या मुलाशी कसं बरं वागलो याचा ते जेव्हा विचार करू लागले तेव्हा दिवसभरात आपल्याला तो भेटलेलाच नाही हे उमजताच त्यांना हायसं वाटलं. स्वामिनाथन सकाळी अंथरुणातून उठला, त्यानं अभ्यास केला व तो शाळेला गेला होता. त्यावेळी ते आपल्या खोलीत अशिलांशी चर्चा करीत होते. गेल्या दोन-तीन दिवसात आपल्याकडून तर काही वावगं घडलं नाही ना या बाबत ते विचार करू लागले. त्यांना निश्चित आठवत नव्हतं पण आपलं वागणं निर्दोष होतं याची खात्री त्यांना वाटत होती.



त्यांच्या आठवणीनुसार त्यांच्या हातून असं काही घडलं नव्हतं किंवा त्यांच्या तोंडून असा काही शब्द गेला नव्हता की त्यामुळं संतापून स्वामिनाथननं काहीतरी भलतं सलतं करावं. बारा वाजायला आले होते व त्यांची पत्नी अजूनही हुंदके देत होती. तिची समजूत काढायचा त्यांनी प्रयत्न केला आणि बाहेर पडण्यासाठी उठत आणि आपला आवाज नेहमीचा ठेवायचा प्रयत्न करीत ते म्हणाले, "मी त्याला शोधायला जातोय. मी परतायच्या आत तो आला तर कृपा करून मी कशासाठी बाहेर गेलोय हे त्याला सांगू नकोस. त्याच्या दृष्टीनं माझं वागणं मूर्खपणाचं ठरू नये."

ते काहीसे झपझप चालतच दवाखान्याच्या रस्त्याकडं निघाले पण रुग्णालयाचे उंच लोखंडी प्रवेशद्वार पाहून माघारी फिरले. रुग्णालयात जायची गरज नाही अशी त्यांनी स्वतःचीच समजूत घातली, पण प्रत्यक्षात आत जायचं धाडसच त्यांना होत नव्हतं. अंधुक प्रकाश असलेल्या त्या खिडकीच्या पल्याड पलंगावर लोळागोळा झालेला व बँडेज बांधलेला स्वामिनाथन कदाचित पडलेला असेल. हॉस्पिटल रस्त्यावरून ते बाहेर पडले व दोन चार गल्ली बोळातून निरुद्देश भटकत राहिले. जसजसा तास पुढे सरकत होता त्यांचं अंतःकरण जड होत होतं. बाजार रस्ता ओलांडून ते एलमन स्ट्रीटवर आले.

एलमन स्ट्रीट भराभरा पार करून नदीकडे जाणाऱ्या फूटपाथवर ते पोचले. नदीजवळ जाताना त्यांची गती मंदावली. आपण आता जे करायला जाणार आहोत तो निव्वळ फार्स आहे अशी त्यांनी स्वतःचीच समजूत घातली. पण दलदलीत अडकलेले व हळू हळू हेलकावणारे आपल्या मुलाचे फुगलेले प्रेत दिसले तर? डोळे मिटून त्यांनी 'देवा आता तूच रक्षण कर' अशी प्रार्थना केली.

मंद नाद करीत वाहणाऱ्या नदीवर त्यांनी दूरवर दृष्टिक्षेप टाकला. काठावर ओणवी झालेली पिंपळाची झाडे सुस्कारे टाकत होती. पाण्यावर पडलेली एका फांदीची सावली पाहून आणि शेवाळानं भरलेल्या बांधाला धडका देणारी कसलीशी वस्तू तरंगताना पाहून ते धावून गेले.

आणि नंतर स्वतःलाच वेड्यात काढीत ते मालगुडी रेल्वे स्टेशनवर गेले आणि रुळावरून मैलभर चालत राहिले. रूळ व स्लीपर्स यांची बारकाईनं त्यांनी पाहणी केली. रातकिड्यांची अखंड किरकिर, वटवाघळांची फडफड आणि बेडकांचे डरांव डरांव रात्रीची शांतता भंग करीत होते. रूळातील एका ओलसर जागेत त्यांनी बोट खुपसलं. चांदण्यात त्यांनी आपलं बोट पाहिलं तेव्हा त्याला रक्त लागलेलं नसून पाणीच आहे हे लक्षात आलं तेव्हा त्यांना हायसं वाटलं व त्यांनी ईश्वराचे आभार मानले.

सतरा


सामन्याचा दिवस

1

ट्रंक रस्त्याच्या डावीकडं जाणाऱ्या वाटेवर फळांनी लगडलेली झाडं असल्यानं स्वामिनाथनचं तिकडे लक्ष वेधलं गेलं. पांढऱ्या चेंडूसारखी दिसणारी सफरचंदं, हिरवी अंजिरं, आणि इतर फळं त्या हिरवाईतून डोकावत होती. तो मैलभर चालत राहिला पण त्याला रस्ता आवडला नाही. तो रस्ता अगदी निर्मनुष्य व शांत होता. ट्रंक रस्त्यावर गेलेलं बरं असं त्याला वाटू लागलं. ट्रंक रस्त्यावर निदान वर्दळ असे. अर्थात् तीही फारच तुरळक व अधून मधून. एखादी बैलगाडी रखडत चाललेली असे किंवा पाठीमागं ट्रंका व बाड बिस्तरा बांधलेली एखादी मोटार येई व धुळीच्या ढगात अदृश्य होई. अधून मधून काही शेतकरी रस्त्याच्या कडेनं चाललेले दिसत. या छोटया रस्त्यावरची शांतता मात्र त्याला असह्य होत होती. तसंच घरापासून दूर कितीतरी तास तो भटकत राहिला होता व आता त्याला घरी जायची ओढ लागली होती. घराचा विचार मनात येताच तो अगदी अधीर झाला. आपला आचारी किती चवदार पदार्थ बनवतो, आणि आई स्वतः तूप अन् दही खायचा आग्रह करते! आपण पानावर बसलो आहोत आणि कपाट उघडून आई ॲल्युमिनियमचं दह्याचं भांडं काढते आहे, आणि ते शुभ्र व घट्ट दही पानावरील भाताच्या ढीगावर पडतं आहे हे दृश्य त्याला आठवलं. त्याला प्रचंड भूक लागली होती. त्याच्या मांड्या भरून आल्या होत्या व कंबर दुखू लागली होती. पश्चिमेकडून येणारी सूर्याची तिरपी किरणं व घरी परतू लागलेले पक्षी याकडे त्याचं लक्षच गेलं नव्हतं.

जेव्हा त्याला भूक अगदीच असह्य झाली तेव्हा त्यानं झाडावरची फळं तोडून खाल्ली. जवळच एक स्वच्छ तळं होतं.

त्यानं काही काळ विश्रांती घेतली व मग तो घरी परतायच्या वाटेवर निघाला. बोर्ड स्कूल मध्ये घडलेला प्रकार त्याला क्षुल्लक वाटू लागला. आपण तो गांभीर्यानं घेऊन निष्कारण संकट ओढवून घेतलं असं त्याला वाटू लागलं. किती मूर्ख आहोत आपण!



मुख्याध्यापकांनी छडी उगारली तेव्हा आपण हात पुढं करायला हवा होता. समजा नसता केला तर घरी जाऊन बाबांना सारं सांगायला हवं होतं. बाबा थोडेसे रागावले असते. (ते खूपच संतापले असते तर आई व आजी या दोघी आपल्या बचावासाठी धावल्या असत्या). बाबांचं रागावणं, चिडणं चाललं असतं कारण अडचणीतून मार्ग काढायला त्यांचीच मदत झाली असती. लोक त्यांना घाबरत असत. दोनच दिवसांवर सामना आला असताना सराव न करण्याचा किती हा मूर्खपणा ! जर का सामना हरलो तर राजम काय करील याचा नेम नव्हता.

दरम्यान स्वामिनाथन ट्रंक रस्त्याकडं परत चालला होता. आता तो रस्ता येईलच, मग तेथून सरळ गेलं की तो मार्केट रस्त्यावर पोचणार होता व तेथून डोळे मिटून घर गाठता आलं असतं. एवढ्या उशिरा तो घरी गेला तर आई बाबा रागावतील, पण त्यांना आपण रस्ता चुकलो असं सांगता येईल. पण हे कारण फार मामुली वाटेल काय? समजा, आपल्याला पठाणांनी पळवून नेलं होतं व मोठ्या मुश्किलीनं आपण सोडवणूक करून घेतली असं सांगितलं तर. . .

आपण खूप वेळ चालत राहिलो आहोत हे त्याच्या लक्षात आलं. ट्रंक रस्ता तर केव्हाच यायला हवा होता. त्यानं थांबून अवती भवती नजर टाकली. आपण अजून घनदाट वृक्षराजीतच आहोत हे त्याच्या ध्यानात आलं. रस्त्यावर चेंदामेंदा झालेली फळं व पाचोळा पडलेला होता. परतताना रस्ता खूप लांब वाटत होता. खरं तर नकळत एक वळण घेऊन तो मेम्पी जंगल रस्त्यावर आला होता. तेथून सत्तर मैलांवर त्या रस्त्याला घनदाट जंगलात नाहिशा होणाऱ्या अनेक वाटा फुटत होत्या. ते फसवं वळण त्यानं जर टाळलं असतं तर तो ट्रंक रस्त्यावर केव्हाच पोचला असता.

अचानक रात्र झाली व त्याचं काळीज धडधडू लागलं. आपण ट्रंक रस्त्यावर पोचलो नाही हे पाहून त्याच्या घशाला कोरड पडली. रस्ता अजूनही अरुंद होता व झाडांची गर्दी तशीच होती. ट्रंक रस्ता रुंद व तिथं आकाश फांद्यांनी झाकोळलेलं नसतं पण इथं तर आकाश जवळ जवळ दिसतच नव्हतं. मधल्या फटीमधून तारे दिसत होते. थकलेला असूनही त्यानं चालण्याचा वेग वाढवला. थोडं अंतर तो धावत गेला पण पाचोळ्यानं भरलेल्या जमिनीवर त्याचा आवाज होऊ लागला. त्या आवाजानं झाडांवरचे पक्षी जागे होऊन पंख फडफडवू लागले. त्या गडद काळोखात व नीरव शांततेत पंखांचं हे फडफडणं भीतीदायक वाटत होतं. स्वामिनाथन घाबरला व स्तब्ध उभा राहिला. ट्रंक रस्त्यावर पोचून घर गाठायलाच हवं होतं. रस्त्यावर पोचायला बारा वाजले असते तरी त्याला त्याची हरकत नव्हती. तो रस्ता मोठा रुंद असल्यानं व त्यावर कमी झाडी असल्यानं तो अधिक सुरक्षित वाटे. पण इथल्या या रस्त्यावरील झाडांची खोडं, फांद्या यामुळं तो एखाद्या गुहेत जाणारा आणि भुताखेतांचं सावट असलेला रस्ता वाटत होता.

अस्वस्थ झालेल्या पक्ष्यांचा आवाज कमी झाला, तो पुन्हा चालू लागला. त्याला खरं

तर पळत सुटायचं होतं व ट्रंक रस्त्यावर जाऊन थेट घर गाठायचं होतं. पण पक्ष्यांना पुन्हा त्रास होऊ नये म्हणून तो हलके हलके पावलं टाकीत निघाला. पळत जाण्याची उर्मी व सावधपणा यांच्याबाबत त्याच्या मनात संघर्ष सुरू झाला. सुसाट पळण्याची इच्छा दाबून ठेवीत आवाज न करता, सावकाश चालताना त्याच्यावर प्रचंड ताण पडत होता. एखाद्या वादळात दोरावरून चालल्यासारखंच त्याला वाटत होतं.

त्याची श्रवणशक्ती अत्यंत तीव्र बनली होती. आपल्या चालण्याचा आवाज, त्यात होणाऱ्या छोट्याशा बदलाचाही आवाज त्याचे कान टिपत होते. पायाखाली येणारी वाळकी डहाळी, अर्धवट हिरवी पाने किंवा वाळक्या पाचोळ्याचा थर यानुसार कधी टक टक, कधी हलकी करकर तर कधी छम छम असे आवाज येत होते. कधी जमिनीचा मोकळ्या पट्ट्यावर नुसताच धब् धब् आवाज होई किंवा एका सुरात थड् थड् असा आवाज येत राही. प्रत्येक नाद स्वामिनाथनला स्पष्ट ऐकू येत होता. काही वेळ त्याला दुसरं कशाचंच भान नव्हतं. त्याचे पाय जणू 'धब् धब्, थड्, थड्, छन् छन्, कर कर' असं बोलत होते. हे सारे आवाज एका तालात, अविरत त्याच्या मेंदूत घुसत होते. जणू गूढ कातर आवाजातील कुजबूज त्याला बळी जाण्यासाठी पुकारत होती. त्याला त्याचं नाव कुजबुजलेलं स्पष्ट ऐकू आलं. त्याबाबत शंकाच नव्हती. 'स्वामी. . . स्वामी स्वामी. . . स्वामी. . . स्वामी' असा आवाज येत होता व मग बळी जाण्याचा तो सूचक सूर. जणू कोणी सैतान पाऊल न वाजवता त्याच्या मागं मागं येत होता व तेच तेच पुन्हा पुन्हा त्याच्या कानात खोलवर पुटपुटत होता. तो थांबला व त्यानं सभोवार नजर टाकली. प्रचंड काळेकुट्ट पाय फैलावून एक मोठा सैतान वाकून उभा होता, त्याचे हात डोक्यावर होते. तो थोडासा हलला. कदाचित तो आपल्यावर झडप घालील म्हणून स्वामिनाथन त्याच्यावरची आपली नजर ढळू देत नव्हता. तो थिजल्यासारखा उभा राहून त्या सैतानाकडं रोखून पाहू लागला. आपण मागे वळताच त्यानं त्याची ती भयंकर कुजबुज का बरं थांबवली ? तो रोखून पहात उभाच राहिला. तो असा पाच मिनिटं उभा राहिला असेल. भीतीची पहिली लाट ओसरल्यावर त्याला अधिक स्पष्टपणं दिसू लागलं. तेव्हा हा सैतान म्हणजे झाडांची खोडं व त्याच्या वरच्या फांद्या आहेत हे लक्षात आलं.

त्यानं आपला प्रवास चालू ठेवला. ट्रंक रस्ता बहुधा दहा पावले दूर असावा. तिथं पोचलं की, गाणं गुणगुणतच तो घर गाठील. रस्त्यावर पोचल्यावर क्षणभर विश्रांती घ्यावी की न थांबता सरळ घरच गाठावं असा त्यानं स्वतःलाच प्रश्न केला. आपले पाय जणू दगडाचे आहेत की काय असं त्याला जाणवू लागलं होतं. ट्रंक रस्त्यावर पोचल्यावर थोडावेळ बसून विश्रांती घ्यावी असं त्यानं ठरवलं. रात्री बारा वाजतादेखील तो रस्ता सुरक्षित असल्यानं तसं करायला हरकत नव्हती. जरा वेळ विश्रांती घेतली की त्याला पळत घर गाठता आलं असतं.

जरा मोकळ्या जागी तो पोचला. आता वरचे तारे दिसू लागले होते. गडद काळोख



किंवा गर्द वनराजी तिथं नव्हती. आपण ट्रंक रस्त्यावर आलोय हे उमजताच त्याला अत्यानंद झाला. ट्रंक रस्त्याची सारी वैशिष्ट्यं त्या रस्त्यावर होती. आकाशातील स्पष्ट दिसणारे तारे पाहून त्याला हुरुप आला. ते लक्षावधी चमचमते तारे बघताना आनंदानं त्याला गावंसं वाटत होतं, ती भयंकर, अरुंद वाट आता मागं पडली याचं भान आल्यानं त्याच्यात बळ संचारलं. उगाच विश्रांती घेण्यात फुकट वेळ दवडायचा नाही असं त्यानं ठरवलं. पुढं प्रवास चालू ठेवायला हरकत नाही असं त्याला वाटत होतं. पण त्या क्षणी त्याला बेचैन वाटू लागलं. ट्रंक रस्त्याच्या उजवीकडं एक उपरस्ता निघालेला त्याला चांगलं आठवत होतं. पण इथं तर ही वाट सरळच पुढं जात होती. क्षणभर तो बुचकळ्यात पडला मग त्याला वाटलं की, उपरस्ता असा पुढे जात असावा व तो आपल्या लक्षात पूर्वी आला नसावा. काही का असेना, उजवीकडं ट्रंक रस्ता लागायलाच हवा आणि एकदा का आपण तिथं आलो की मग घरी पोहचू असा विचार त्यानं केला, त्यानं डावी उजवीकडं पाहिलं पण तिथं कुठेच रस्ता असल्याची चिन्हे दिसत नव्हती. बहुधा रात्रीच्या काळोखात आपल्याला ट्रंक रस्ता दिसत नसावा असा समज त्यानं करून घेतला. पण तिथं रस्ता असणारच. उजवीकडं वळून त्यानं एक दोन पावलं टाकली तेव्हा गुडघाभर दलदलीत आपण आहोत असं त्याच्या लक्षात आलं. त्यातून वाट काढीत तो पुढं जाऊ लागला. उंच वाढलेलं गवत त्याच्या चेहऱ्याला गुदगुल्या करू लागलं तर कधी त्या गवतात तो हरवूनच गेला. तो मागं फिरला व रस्त्यावर पोचला.

2

आता त्याला आपण कोठे आहोत हे उमगलं. त्या भयंकर वेळी एका दूरवरच्या अज्ञात रस्त्यावर आपण एकाकी आहोत हे त्याच्या ध्यानात आलं. आपण ट्रंक रस्त्याच्या दिशेनं चाललो आहोत या आशेच्या आधारावर तो आतापर्यंत तग धरून होता. पण ती खोटी आशा मावळल्यानं भीतीमुळं तो पांढरा फटक पडला. ट्रंक रस्ता हे भासमय स्वप्नच राहणार या जाणीवेनं त्याच्या पायांनीही चालायला नकार दिला. आपला प्रवास निरर्थक, निरुद्देश आहे याची जाणीव असूनही तो कसाबसा लटपटत चालत राहिला. वातावरण इतकं शांत होतं की एखाद्या पडणाऱ्या पानाचा आवाजही शहारे आणीत होता. आपण कोणत्यातरी भयंकर, भुताखेतांच्या दुनियेतल्या वाटेवरनं चाललो आहोत असं त्याला वाटत होतं.

एखाद्या रिकाम्या पिशवीसारखा तो खाली कोसळला आणि रडू लागला. बाबा, आई, आणि राजम व मणि यांना तो हाका मारू लागला. पुढे दूरवर अंधाऱ्या आकृत्या दिसत होत्या. ती झाडं असावीत, राक्षस असावेत किंवा यमलोकाची प्रवेशद्वारं असावीत. त्याच्या आरोळ्या अंधार भेदीत तिथपर्यंत जात होत्या, आपल्याला इथून बाहेर न्यावं म्हणून आठवतील तेवढ्या देवांची तो प्रार्थना करू लागला. दर शनिवारी दोन नारळ वाहिन असा

नवस तो गणपतीला बोलू लागला, धुळीत उघड्या अंगानं लोळण घेऊन वंदन करीन असं त्याने तिरुपतीच्या बालाजीला सांगितलं. मग तो क्षणभर थांबला. जणू आपण देवांना जे काही देऊ केलं आहे त्यावर विचार करून त्यांनी स्वर्गातून त्याला वाचविण्यासाठी खाली उतरावं म्हणून तो वेळ देत होता.

त्याच्या डोक्यात नाना चित्रविचित्र कल्पनांचं थैमान सुरू झालं. आपल्या मागं पावलांचा दाणदाण आवाज होतोय असं वाटल्यानं त्यानं मागं नजर टाकली तेव्हा काळोखाचा एक प्रचंड तुकडा आपल्या दिशेनं चाल करून येताना त्याला दिसला. आता खूप उशीर झाला होता, त्यानं त्याला पाहिलं होतं. त्याचे प्रचंड सुळे फिकट पांढुरके दिसत होते. तो प्रचंड गर्जना करीत येत होता. वाटेत एका झाडाला त्यानं लपेटलं व गरगरा फिरवीत जमिनीवर आपटलं. त्याला संतापाने पेटलेले त्याचे छोटे लाल डोळे दिसत होते, त्याने सुळे खाली झुकवले, खोडासकट झाड उचलून त्यानं ते आदळण्यासाठी वर उचललं. तो झटकन एका बाजूला झाला व त्यामुळं थोडक्यात वाचला. तो धापा टाकीत निपचीत पडून राहिला. घामानं त्याचे कपडे ओले झाले होते. त्याला दणकट पावलांचा आवाज व भयंकर गुरगुरणं ऐकू आलं, वळून काय आहे हे पाहण्याआधीच त्याच्या कानाजवळ जबड्यांचा आवाज आला व त्यातून निघणारा गरम श्वासोच्छवास त्याच्या मानेला जाणवला. प्रसंगावधान राखून त्यानं डोकं खाली केलं व तो आडवा पडून राहिला. एका मोठ्या पिवळ्या ढाण्या वाघाला त्यानं हुलकावणी दिली होती. आणि आता एक चित्ता, एक सिंह, आणि एक देवमासा देखील, आणि आता तर मोठी गर्दीच झाली, त्यात रानटी हत्ती, वाघ, सिंह, राक्षस यांनी त्याला गराडाच घातला होता. राक्षस कान पकडून त्याला उचलत होते, त्याच्या डोक्यावरचा एकेक केस उपटत होते आणि नखशिखांत त्याची कातडी सोलून काढीत होते आणि आता हे काय आलं? त्याच्या पायाभोवती वेटाळं घालणारं, बिलबिलीत नि थंड? हवेत नांगी वर करून आपल्याकडं आगेकूच करणारा तो विंचू पाहून स्वामिनाथन घाबरूनच गेला, ही जागा काही माणसांसाठी योग्य नाही. आता साप व विंचू त्याच्यापासून अवघ्या इंचभर अंतरावर होते. त्याने आरोळी ठोकली व तो धावत सुटला. तो मागं वळून पाहत होता. विंचू शक्य तितक्या वेगानं त्याचा पाठलाग करीत होता. त्याच्या तावडीतून सुटणं कठीणच होतं. त्यानं श्वास रोखून धरला व सारं बळ एकवटून दुप्पट वेगानं पळू लागला.

...यष्टीना स्पर्श करून तो परतला. दोन धावा. तो बॅट घेऊन उभा होता. वाय, एम.यू. च्या कॅप्टननं चेंडू टाकला व त्यानं षट्कार ठोकला. त्यामुळं झालेल्या टाळ्यांचा आवाज कानठळ्या बसवणारा होता. राजम आनंदात मैदानात सैरावैरा धावत होता, त्यानं भिंतीवरून तीनदा उड्याही मारल्या. पुढचा चेंडू जेव्हा आला तेव्हा तो फटकावण्याऐवजी बॅट दूर फेकून त्यानं तो डोक्यावर झेलला. चेंडू उसळून गोलंदाजाकडं – बोर्ड हायस्कूलचे मुख्याध्यापक – जाऊ लागला, पण स्वामिनाथन चेंडूच्या मागं धावत सुटला, वाटेतच

त्यानं तो अडवून कॅप्टनच्या दिशेनं भिरकावला. तो त्याच्या डोक्यावर वर्मी लागला. एम.सी.सी. चा विजय झाला होता. वाय.एम.यू. च्या संघाला विटा, यष्टी, बॅटी, चेंडू यांच्या सहाय्यानं मैदानाबाहेर पिटाळून लावून त्यांनी हा विजयोत्सव साजरा केला. स्वामिनाथन तर हसून हसून थकला आणि खाली कोसळला.

3

मेम्पी जंगलाच्या या बाजूस पाच मैल अंतरावर असलेल्या आपल्या गावी रंगा हा गाडीवान शनिवारी सकाळी परतत होता. मालगुडीहून तो पहाटे दोन वाजताच निघाला होता व दुपारपर्यंत आपल्या गावी पोहोचू असा त्याचा अंदाज होता. मेम्पी जंगल रस्त्यावर तो वळला, त्यानं बैलांना जुंपलेला कासरा गाडीला बांधला व तो आडवा झाला. बैलांचं एका तालातलं चालणं व त्यांच्या गळ्यातील घंटांचा होणारा मंजुळ नाद यामुळं त्याला लागलीच झोप लागली.

अचानक बैल थबकले. रंगा जागा झाला व जोरजोरानं कासरा ओढत तो हैक हैक करत त्यांना पिटाळण्याचा प्रयत्न करू लागला. बैलांनी जोरजोरांनी माना हलवल्या त्यामुळं त्यांच्या गळ्यातील घंटांचा जोरात आवाज झाला. पण त्यांनी पुढे पाऊल टाकायला मात्र नकार दिला. त्यांच्या या वर्तनानं रंगा आश्चर्यचकित झाला व त्यांना वठणीवर आणण्यासाठी तो खाली उतरला. रस्त्यावर त्याला एक मानवी आकृती पडलेली दिसली. तो ओरडला, "ए, आळशीनंदना ऊठ. झोपायला फार चांगल्या जागेची निवड केलीस बरं ! उठ पाहू, ऐकू आलं का ?" पण तो झोपलेला इसम काहीच हालचाल करेना तेव्हा त्याला वाटेतून दूर करण्यासाठी रंगा पुढं सरसावला.

"अरे ! हा तर छोटा मुलगा दिसतो. तो इथं कशासाठी बरं झोपलाय ?" आ .खी जवळ जात तो म्हणाला, "अरे देवा, हा तर मेलेला आहे !" त्याचे हात, पाय व शरीराचे इतर उघडे भाग हे पहाटेच्या दंवाने दमट झालेले होते. त्यानं त्या मुलाचा शर्ट फाडून छातीवर हात ठेवला आणि अजून धुगधुगी असल्याचं पाहून मोठा सुस्कारा सोडला. या परिस्थितीचं गूढ त्याला सतावू लागलं. त्या मुलाच्या कपड्यावरून तो शहरातला वाटत होता, तो असा इथं दूरवर महामार्गावर जवळ जवळ मृतावस्थेत कसा काय बरं येऊन पडला असेल ? कोण होता तो ? तो कोठून आला असेल ? कशासाठी इथं आला होता ? रंगाच्या मेंदूत अशा अनेक प्रश्नांनी नुसती गर्दी केली होती. माणसांना राक्षस घेऊन जातात व दूरवर नेऊन सोडतात असं म्हणतात. तसं घडलं असेल किंवा नसेलही. हे सर्व प्रश्न स्वतः सोडविण्याचा नाद त्यानं सोडून दिला. जंगलाच्या या बाजूला तीन मैलाच्या अंतरावर असलेल्या डाक बंगल्यात राहणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यावर अशा गोष्टी सोपवणे इष्ट. त्याचं (रंगाचं) काम एवढंच की, मुलाला त्या अधिकाऱ्याकडं नेऊन पोचवायचं. त्यानं हळूच

त्याला उचलून गाडीत ठेवलं.

तो आपल्या जागेवर बसला, कासरा हातात घेतला व त्यानं बैलांच्या पोटात अशी लाथ हाणली की, जणू जर नेहमीची अडखळत चालण्याची संवय सोडून भरधाव निघाला नाहीत तर जळती लोखंडी कांबच पाठीत घालीन असा इशारा तो देत होता, बैल काय ते उमजले आणि महत्वाच्या प्रसंगी उपयोगात आणण्यासाठी राखून ठेवलेल्या भन्नाट वेगानं धावत निघाले.

4

स्वामिनाथन शून्य नजरेनं त्यांच्याकडं पाहत होता. आपण कोणत्या परिस्थितीत आहोत हेच त्याला उमगत नव्हतं. दिवसेंदिवस, वर्षानुवर्षे आपण जिथं घालवली त्या आपल्या घरातच आपण आहोत असं त्याला वाटलं. हळूहळू त्याच्या मनात चित्र स्पष्ट होऊ लागलं व अनेक तुटक तुटक घटना आठवून एकच गोंधळ उडाला. वेगानं डोळयांची उघडझाप होऊ लागली. त्यानं हात पुटं केला खरा पण तो हेलपाटला. आपल्या समोरच्या वस्तूंचं तो बारकाईनं निरीक्षण करू लागला. मन जागरूक ठेवण्यासाठी तो निकरानं झगडत होता. त्यानं भिंतीवरील एका चित्राकडं-की ते कॅलेंडर होतं ? – एकटक पाहयला सुरुवात केली. आपल्या घरी पलंगासमोर जे चित्र टांगून ठेवलंय ते हेच आहे की काय याची शहनिशा तो करून घेत होता. त्यातला प्रत्येक बारीक सारीक तपशील तपासून तो पाहत होता पण अत्यंत थकव्यानं त्याचं मन जड झालं व पुन्हा गोंधळ सुरू झाला. भिंतीवर खरोखरच काही होतं की नाही ? आपल्या मनाचे चाललेले खेळ त्याला बुचकळ्यात टाकत होते. जवळच्याच खुर्चीवर एक मानवी आकृती बसलेली त्याला दिसली. त्या आकृतीनं खुर्ची जवळ ओढली व ती म्हणाली, “मुला, आता बरं वाटतंय का तुला ?” अर्धवट जागृत कानांवर हे शब्द पडले. आपल्या बाबांना तिथं पाहून तो कोड्यात पडला. आपल्या शेजारी ते असे का बसले असावेत हे त्याला उमजेना.

त्या आकृतीकडं पाहून त्यानं हाक मारली, “बाबा.”

“तुला तुझे बाबा भेटतील, काही काळजी करू नकोस,” असं सांगून त्या व्यक्तीनं त्याला काही प्रश्न विचारले. सर्वसाधारण औत्सुक्यापोटी कोणालाही विचारावेसे वाटतील असेच ते प्रश्न होते. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर द्यायला स्वामिनाथनला खूप वेळ लागत होता. पुढं पुढं तर तो असंबद्ध बोलू लागला. त्याची त्या अनोळखी माणसाला आधी गंमत वाटली, पण नतर चीड आली व शेवटी तर त्यानं प्रश्न विचारणंच सोडून दिलं. आपल्या वरील प्रश्नांच्या भडिमारानं स्वामिनाथन क्षीण झाला होता. हा माणूस कोण होता ? ते बाबा होते का ? नसतील तर तो इथं कशासाठी होता ? आणि असले तरी मग इथं कशासाठी ? कोण होता तो ? तो काय म्हणत होता ? तो अधिक मोठ्यानं व स्पष्टपणं

का बोलत नाही ?

बाबा असलेला किंवा नसलेला हा माणूस खोली बाहेर पडला. तो इसम म्हणजे जिल्हा वन अधिकारी एम.पी.एस. नायर होते. मेम्पी जंगलाच्या जवळ ते मुक्काम ठोकून होते. ते दिवसभर जंगलात भटकत होते आणि सायंकाळी सातला डाक बंगल्यावर परतले होते. ते आपले जाडजूड बूट काढत असतानाच त्यांना त्या मुलाबद्दल सांगण्यात आलं होतं. औषधं व खायला दिल्यानंतर त्या मुलाची प्रकृती सुधारली, पण काय उपयोग? नेमकं काय घडलं हे सांगण्याच्या स्थितीत तो नव्हता, मुलाच्या शब्दांवर विश्वास ठेवायचा तर भूगोलतज्ज्ञांना ठाऊक नसलेल्या व ज्याचे नावही उच्चारता येणार नाही अशा गावचा तो होता असं मानावं लागलं असतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगा उठलेला असून खूप हालचाली करत होता असं नायर यांना आढळलं. आवारात एका झाडापासून काही यार्ड अंतरावर तो दगडाच्या राशीजवळ उभा होता. थांबून त्यानं एक दगड उचलला, काही पावलं तो मागे गेला व झाडाच्या खोडावर नेम धरून त्यानं दगड फेकला. एकामागून एक तो असे दगड खोडावर फेकून मारू लागला.

"गुड मॉर्निंग," नायर म्हणाले, "आता कसं वाटतंय तुला ?"

"मी तुमचा अत्यंत आभारी आहे, सर. तुम्ही मला मोठ्या संकटातून वाचवलंत." .

"हं. . . होय. तू फार कामात होतास का ?"

"मी सराव करतोय सर. आम्ही वाय.एम.यू. बरोबर सामना खेळत असून गोलंदाजीच्याबाबतीत राजम माझ्यावर अवलंबून आहे. ते मला 'टेट' म्हणतात. बरेच दिवस मला सराव करायलाच मिळालेला नाही. मी भटकायला बाहेर पडायचा मूर्खपणा केला आणि त्यामुळं सराव राहिला. सामना जवळ येऊन ठेपलाय. आज कोणता वार आहे, सर ?"

"का, कशासाठी तुला ते जाणून घ्यायचंय ?"

"कृपया सांगा ना, सर. सामन्याला अजून किती दिवस उरले आहेत हे मला जाणून घ्यायचं आहे."

"आज रविवार आहे."

"काय ? काय ?" स्वामिनाथन अवाक् झाला.

रविवार ! रविवार ! आपल्या पायाशी असलेल्या दगडांच्या राशीकडं त्यानं पाहिलं.

"काय झालं ?"

"सामना रविवारी आहे." स्वामिनाथन चाचरत म्हणाला.

'मग काय बिघडलं ? तुझ्या हाताशी अजून एक आख्खा दिवस आहे. आज तर शनिवार आहे."

"तुम्हीच आज रविवार आहे असं म्हणालात, सर."

"छे ! छे ! आज शनिवार आहे. हवं तर तू कॅलेंडर पहा."

"बहुधा चुकून म्हणाला असाल."

"सर, काहीही करून मी रविवारी मैदानावर हजर होईन अशी व्यवस्था कराल का ?"

"अगदी खात्रीनं, आज संध्याकाळीच करू. पण तू कुठं रहातोस व तू कोणाचा मुलगा आहेस हे मला सांगितलं पाहिजे."

अठरा

पुनरागमन

1

रविवार दुपारचे साडेतीन वाजले होते. एम.सी.सी. व वाय.एम.यू. यांच्यातील सामना अद्याप चालू होता. वाय.एम.यू. नं नाणेफेक जिंकली होती व दुपारी दोन वाजेपर्यंत सर्व बाद धावा झाल्या होत्या. कॅप्टननं सर्वाधिक म्हणजे 32 धावा काढल्या होत्या. त्याला बाद करणारं एम.सी.सी. कडं कुणी नव्हतं. तो एखाद्या स्वयंचलित यंत्राप्रमाणं उभा होता, डावी उजवीकडं चेंडू फटकावीत होता व सर्व फलंदाजांना दमवीत होता. तो कितीतरी वेळ खेळत होता व दुसरा फलंदाजही फारशा धावा काढीत नव्हता तरी टिकून होता. एम.सी.सी. तील उरली सुरली शक्तीही त्यानं संपवली होती आणि आपल्याकडं चलाख गोलंदाज नाही याची टोचणी राजमला लागली होती.

मधल्या सुटीनंतर खेळ अडीच वाजता पुढं सुरू झाला. एम.सी.सी. नं फलंदाजी सुरू केली. पण त्यांचे लागोपाठ तीन फलंदाज बाद झाले व केवळ आठ धावा झाल्या होत्या, राजम व मणि अजून मैदानात फलंदाजीसाठी उतरले नव्हते. निराश मनानं राजम खेळ पहात होता आणि प्रत्येकाला शिव्याशाप मोजीत होता. सामना बरोबर दोन तासांनी, साडेपाच वाजता संपणार होता. सध्याच्या आठ या धावसंख्येत 78 ची भर पडून सामना अनिर्णित राहिल काय? ही शक्यता फार दूरवरची वाटत होती. धावसंख्या 20 पर्यंत नेण्याआधीच पुढचे सहा फलंदाज बाद होतील की काय असं आत्यंतिक निराशेच्या भरात त्याला वाटलं. अणि मग मी व मणि असे दोघेच असू. आपण चौकार व षट्कार फटकावून प्रत्येकी 40 धावा करू अशी वेडी आशा त्याला वाटून गेली.

कुंपणाच्या भिंतीच्या सावलीत तो इतर खेळाडूंसमवेत बसला होता.

“राजू, एक मिनिट इकडं ये,” वरून आवाज आला. राजमनं वर पाहिलं तेव्हा भिंतीच्यावर त्याला त्याच्या वडिलांचं डोकं दिसलं. “बाबा, अगदी तातडीचं काम आहे का?”

"होय. मी एखाद मिनिटापेक्षा जास्त वेळ तुला थांबून ठेवणार नाही."

उडी मारून तो भिंतीपल्याड वडिलांजवळ गेला तेव्हा त्याच्या हाती एक पत्र देण्यात आलं. ते वाचून तो म्हणाला, "म्हणजे तो सुरक्षित आहे ना ? तो तिथं काय करतोय हे मला समजत नाही." क्षणभर रेंगाळून तो परत जाण्यासाठी वळला.

"मी हे पत्र स्वामिनाथनच्या वडिलांकडं पाठवतो आहे. ते नक्कीच मोटार घेऊन त्या जागी जातील. मलाही त्यांच्याबरोबर जावं लागेल. तुला पण यायचंय का ?"

क्षणभर विचार करून राजम ठामपणं म्हणाला, "नाही."

"तुझ्या मित्राला भेटून त्याला घेऊन यावंसं तुला वाटत नाही ?"

"मला त्याची पर्वा नाही," एवढं म्हणून राजम आपल्या मित्रांमध्ये मिसळला. भिंतीच्या सावलीत आपल्या जागेवर तो परतला. चौथा फलंदाज बरं खेळत होता. राजम मणीच्या कानात पुटपुटला, "हा मुलगा काही वाईट दिसत नाही. त्यानं सहा धावा केल्या देखील. वा. छान ! छान !"

"त्यांनी 50 धावा केल्या तर मग उरलेलं आपण पाहून घेऊ."

राजमनं होकारदर्शक मान हलवली खरी पण त्याच्या मनात सामन्याखेरीज वेगळेच विचार घोळू लागले होते. त्याच्या वडिलांनी दिलेल्या बातमीमुळं त्याच्या मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ उडाला होता. आपण आताच जे ऐकलं ते मणीला सांगावं अशी त्याला जबर इच्छा होत होती. "मणि, तुला ठाऊक आहे. . . स्वामी." असं तो म्हणाला पण मग आपल्याला स्वामिनाथनमध्ये काही स्वारस्य नाही हे आठवून थांबला. मणि ताडकन उठून म्हणाला, "स्वामी, बद्दल काय ? मला सांग, राजम तो सापडला का ?"

"मला ठाऊक नाही."

"ओह ! राजम, राजम. तू त्याच्याबद्दल आता काहीतरी सांगणार होतास."

"काही नाही. मी नाही पर्वा करत."

2

आपली खूप काळजी घेतली जात आहे, आपण सुरक्षित आहोत यामुळं स्वामिनाथनला फार बरं वाटत होतं. आपल्याला भेटायला येणाऱ्यांची संख्या पाहून तो सुखावला होता. त्याची आई व आजी सतत त्याच्या भोवती घुटमळत होत्या. पाळण्यात रडत असलेल्या त्याच्या छोट्या भावाकडं कोणी लक्ष देत नव्हतं. प्रथमच त्याच्याकडं दुर्लक्ष करून आपल्याला महत्व दिलं जातंय याचं समाधान स्वामिनाथनला वाटत होतं.

बाबांचे बरेच मित्र त्याला भेटायला येत होते व त्यांचं वागणं जवळ जवळ एकसारखंच होतं. ते गंमतीनं त्याच्याकडं पाहत, तो परत आल्यानं किती बरं वाटलं हे



सांगत, ठराविक साच्याचे प्रश्न विचारीत, एखाद-दुसरा मजेशीर शेरा मारून निघून जात. बाबा त्यांच्या एका मित्राबरोबर बाहेर गेले होते. जाण्यापूर्वी ते म्हणाले होते, "मी परतेन तेव्हा तुझा पुन्हा शोध घ्यावा लागणार नाही अशी मला आशा वाटते." या उद्‌गारांनी स्वामिनाथन दुखावला गेला. हे उद्‌गार क्रूर व आपला विचार न करणारे आहेत असं त्याला वाटलं.

बाबा गेल्यानंतर त्याला मोकळं, मुक्त वाटलं. आई व आजी यांच्या जुन्या मित्र-मैत्रिणीचा घोळका जमला होता. त्यातले काही वृद्ध गृहस्थ तर स्वामिनाथनच्या वडिलांचा जन्म होण्याआधीपासून त्यांच्या कुटुंबाला ओळखत होते. या घोळक्यात मिसळून जायला आपण अधिक मोकळे आहोत असं त्याला वाटलं.

जो तो स्वामिनाथनकडं निरखून पाहत होता व मोठमोठ्यानं शेरे मारीत होता. या जमावातून स्वामिनाथननं आचाऱ्याला शोधून काढलं व त्याच्याकडं पाहून स्मित केलं. आचाऱ्यानं काहीतरी आनंदोद्‌गार काढले व बाबा, आई व आजी नेहमीप्रमाणं आता जेवू लागतील अशी आशा व्यक्त केली. उत्तरादाखल तो काही सांगणार होता पण एका विधवाबाईंच्या उद्‌गाराकडं त्याचं लक्ष वेधलं गेलं. आकाशाकडं बोट दाखवीत ती म्हणत होती, "त्या ईश्वरानंच पोराला वाचवलं. भयंकर प्राण्यांच्या तावडीतून त्याला वाचवायला जिल्हा वन अधिकारी तिथं असावा हे आधी कोणी जाणलं होतं काय ?" सात पर्वतावरील ईश्वर (बालाजी) हाच मुलगा परत सुखरुप यायला कारणीभूत आहे असा आजीचा ठाम विश्वास होता व त्याला बोललेले नवस फेडायला ती उत्सुक होती.

दरम्यान आई स्वयंपाक घरात गेली आणि भरपूर साखर घातलेली गरमागरम कॉफी व त्याबरोबर थोडा फराळ घेऊन आली. स्वामिनाथननं दोन्हीचाही भराभर फन्ना पाडला. स्वयंपाकघरातून चवदार, नाजुक, सूचक संमिश्र वास दरवळत बाहेर येत होता.

वन अधिकाऱ्यांशी आपण ज्या प्रकारे वागलो त्याची स्वामिनाथनला आता लाज वाटत होती. त्रासलेले वन अधिकारी उपपोलिस निरीक्षकाच्या उत्तराची प्रतीक्षा करत होते. डाक बंगल्यावर एक टॅक्सी आली व त्यातून आई, बाबा राजमचे वडील व एक पोलिस इन्स्पेक्टर उतरले. त्याला पाहताच आईनं काय काय केलं होतं ! आधी त्याला वाटलं की, राजमचे वडील व पोलिस इन्स्पेक्टर आपल्याला बेड्या घालणार, राजमचे वडील किती चांगले होते ! व त्याचे बाबा ही किती असामान्य होते ! त्यांना भेटल्यावर पाच मिनिटांनंतर स्वामिनाथननं भडाभडा आपली कहाणी सांगून टाकली. कवायतीच्या तासाला बुट्टी मारल्यापासून ते आपण कसे गायब झालो याबद्दलचा सर्व तपशील त्यानं सांगितला. त्याच्या या निवेदनात एवढं विनोदी काय होतं ? पण जो तो त्याची कहाणी ऐकून खळखळून हसत होता. त्याची आई प्रत्येक हशानंतर साडीच्या पदरानं आपले डोळे पुशीत होती. या गोष्टी आठवताना त्याला एक गोष्ट मात्र खटकत होती. वन अधिकाऱ्यांचा निरोप घ्यायलाच तो विसरला होता. खरं तर त्या सद्‌गृहस्थानं गाडीचा दरवाजा उघडला व

तिथंच ते उभे होते. प्रसंग आठवून स्वामिनाथनची सद्सदविवेकबुद्धि त्याला बोचू लागली. आपली मोटार निघून जात असताना तिच्याकडं पाहणाऱ्या जिल्हा वन अधिकाऱ्यांचा चेहरा आठवून त्याचा कंठ दाटून आला, ज्याचा जीव आपण वाचवला त्यानं साधा निरोपही न घेता जावं यामुळं त्या प्रेमळ गृहस्थाचं हृदय विदीर्ण झालं असेल असं त्याला वाटलं.

या विषयावरील त्याची मतं आणि स्वामिनाथनवर काय काय संकटं गुदरू शकली असती याबद्दल त्याला भेटावयास आलेल्या लोकांमध्ये चाललेली चर्चा यामध्ये खंड पडला, तो एक जण ओरडत वादळासारखा आत घुसल्यामुळं. "काय ? ओ ! स्वामी," असं तो ओरडतच आला. काहीतरी संमिश्र आरडाओरडा भेटायला जमलेल्यांना ऐकू आला, भरभर हालचाली घडताना त्यांनी पाहिल्या व मग दिवाणखान्यातून स्वामिनाथन व मणि बाहेर पडलेले त्यांना दिसले.

परसदारी निवांत जागी आल्यावर मणि म्हणाला, "मला तर वाटलं की तू मेलास किंवा तसंच काहीतरी तुझं झालं असावं."

"हो, जवळ जवळ मेलोच होतो मी."

"त्या मुख्याध्यापकाला एवढे घाबरून पळून जाण्याचा तुझा मूर्खपणाच होता. राजमनं मला सारं सांगितलं. तू आमच्या शाळेत येऊन मला न बोलवता राजमला बोलवलंस म्हणून तुझं कंबरडं मोडायचा माझा बेत होता."

"मला वेळच नव्हता, मणि."

"ओह ! स्वामी, तुला जिवंत पाहून मला किती आनंद झाला ! मला तुझी खूप-खूप काळजी वाटत होती. तू होतास कुठं ?"

"मला-मला खरंतर नाही सांगता येणार. मी कोठे होतो हे मलाच ठाऊक नाही. कुठंतरी..." त्या भयंकर रात्रीची कहाणी व त्यानंतरच्या घटना त्यानं याच शैलीत ऐकवल्या.

"माझ्या माहितीतील सर्वात घाबरट इसम तू आहेस असे मी म्हणत नसे का ? जर तू डोकं शांत ठेवलं असतंस व सरळ रस्त्यानं आला असतास तर घरी पोचला असतास. पण तू भलभलत्या कल्पना करीत बसलास."

त्याचं बोलणं निमूटपणं ऐकून घेत स्वामिनाथन म्हणाला, "मला त्या बैलगाडीवाल्यानं उचलून आणलं यावर माझा विश्वास बसत नाही. मला तर ते मुळीच आठवत नाही."

त्यावर मणीनं सल्ला दिला, "समजा दिवाळी किंवा पोंगल या सणाच्या दिवशी तो आलाच तर कंजूषासारखं वागू नकोस. त्याला तर सोन्याची थैलीच द्यायला हवी. त्यानं जर तुला उचलून घेतलं नसतं तर कदाचित वाघानं तुझा फडशा पाडला असता."

"मी आणखी एक चूक करून बसलो," असं सांगून स्वामिनाथन म्हणाला, "मी तेथून निघून येण्यापूर्वी वन अधिकाऱ्यांचे आभार मानले नाहीत, त्यांना 'गुडबाय' केलं नाही. ते माझ्या मोटारीजवळच सारा वेळ उभे होते."

"ते जर एवढ्या जवळ होते तर मग तुझी वाचा का बंद होती ?"

"मोटार अर्ध्या रस्त्यावर येईपर्यंत मला ते जाणवलंच नव्हतं."

"तू म्हणजे इतका निष्काळजी आहेस ना ! तू त्यांचे आभार मानायलाच हवे होते."

"पण आता मी काय करू ? त्यांना पत्र लिहू काय ?"

"हो. पण तुला त्यांचा पत्ता माहीत आहे का ?"

"बहुधा माझ्या बाबांना ठाऊक असेल."

"तू काय लिहशील ?"

"त्यांना सांगेन की, मला नाही ठाऊक, मला बाबांना विचारावं लागेल. एखादं छानसं पत्र लिहेन. सामन्याच्या वेळेच्या आत मला इथं आणून सोडण्यात त्यांचा फार मोठा वाटा असून मी त्याबद्दल कृतज्ञ आहे."

"काय म्हणतोस काय तू ?" मणीनं विचारलं.

"तू काय बहिरा आहेस की, काय ? बाबांना छानसं पत्र लिहायला सांगितलं पाहिजे एवढंच मी म्हणत होतो."

"ते नाही रे, तू काही तरी सामन्याबद्दल म्हणालास ना ? काय म्हणालास ?"

"हो."

"सामन्याच्या दृष्टीनं आपण वेळेत पोचलो हा तुझा समज वेडेपणाचा आहे." असं सांगून त्यानं वाय.एम.यू. शी दिवसभर द्याव्या लागत असलेल्या झुंजीची व निराशाजनक कामगिरीची स्वामिनाथनचा माहिती दिली. एम.सी.सी. च्या या स्थितीत स्वामिनाथनला किती वाटा आहे हेही त्यानं सांगितलं.

"पण आज सामना का बरं खेळला जात आहे ?" त्यानं विचारलं.

"आज का नाही ?"

"आज तर शनिवार आहे ना. . ."

"कोण म्हणतं ?"

"वन अधिकाऱ्यानं सांगितलं की आज शनिवार आहे म्हणून. . ."

"तू त्याला जाऊन सांग की, तो महामूर्ख आहे," मणि म्हणाला.

तेव्हा आज रविवार असणंच शक्य नाही असं स्वामिनाथन वारंवार सांगू लागला. मणि चिडला. तुला खाली आडवा पाडून, तुझ्या छाताडावर बसून तुझा कोथळाच बाहेर काढीन अशी त्यानं धमकी दिली तेव्हा कुठं स्वामिनाथन थांबला. "त्यानं मला फसवलं. मी नाही पाठवणार त्याला ते पत्र," असं तो म्हणाला.

"कोणाला ?"

"वन अधिकाऱ्याला. . . आणि राजम काय म्हणाला माझ्याबद्दल ?"

"राजम खूप काही म्हणाला पण त्याचा पुनरुच्चार करायची माझी इच्छा नाही. पण तुला एक बजावून ठेवतो. त्याच्यासमोर कधी जाऊ नकोस. तुझ्याशी तो एक शब्दही

बोलणार नाही. तुला पाहताच तो कदाचित गोळीही घालील."

"का? मी काय केलंय?" स्वामिनाथननं विचारलं. "तू एम.सी.सी. चा सत्यानाश केलास. तुला घाबरून पळच काढायचा होता तर तू आम्हाला वचनच द्यायला नको होतं. निदान तू निघून जातो आहेस हे तरी आम्हाला सांगायचस. राजमला तू आमच्या शाळेला येऊन भेटलास तेव्हा ही गोष्ट का दडवून ठेवलीस? राजमला ते जाणून घ्यायचंय."

स्वामिनाथनला रडू कोसळलं. "तू राजमची समजूत काढ, काय घडलं हे त्याला सांग, मला तो किती आवडतो हे सांग," असं तो मणीला काकुळतीनं सांगू लागला. पण मणीनं हस्तक्षेप करायला नकार दिला.

"तुला राजम ठाऊक नाही. तो फार चांगला आहे पण कधी कधी त्याच्या बरोबर जमवून घेणं कठीण आहे."

त्यावर उसनं अवसान आणून स्वामिनाथन म्हणाला, "मला त्यानं पाहिलं की सारं ठीक होईल. मी उद्या सकाळी त्याला भेटेन."

मणीला विषय बदलायचा होता. तो म्हणाला, "तू पुन्हा शाळेत जाणार आहेस का?"

"हो. पुढच्या आठवड्याला. माझे बाबा मुख्याध्यापकांना भेटले व त्यामुळे आता शाळेचं सारं ठाकठीक होईल असं दिसतंय. बोर्ड स्कूल मध्ये घडलेलं त्यांना सर्व ठाऊक आहे."

"होय, मी व राजमनं त्यांना सारं सांगितलं."

"काहीही झालं तरी मला बोर्ड हायस्कूलमध्येच परत जायला हवं. आता मला शाळा बदलता येणार नाही असं बाबांचं म्हणणं आहे."

एकोणीस

निरोप घेतेवेळी

1

दहा दिवसांनंतर मंगळवारी पहाटे पाच वाजता स्वामिनाथन मोठ्या कष्टानं अंथरुणातून उठला. राजमला कायमचंच घेऊन जाणारी रेल्वे मालगुडी स्टेशनवर यायला अजून एक तास होता.

असं काही घडणार याची स्वामिनाथनला आधी काही कल्पना नव्हती. आदल्या दिवशी रात्री दहा वाजता त्याला मणीनं येऊन सांगितलं होतं की, राजमच्या वडिलांची त्रिचनापल्लीला बदली झाली असून दुसऱ्या दिवशी सारं कुटुंब मालगुडी सोडून जाणार आहे. आपल्याला हे आठवडाभर आधी ठाऊक होतं पण स्वामिनाथनला सांगायच नाही अशी सक्त ताकीद राजमनं दिली होती असंही मणीनं सांगितलं. पण त्याला राहवलं नाही व राजमची आज्ञा मोडून त्यानं स्वामिनाथनला हे सांगितलं होतं.

स्वामिनाथनला अचानक उदास वाटू लागलं. सारं जग एकाएकी शून्यवत वाटू लागलं. राजमशिवाय लॉली एक्स्टेंशन ही कल्पनाच त्याला असह्य होऊ लागली. तिथं पुन्हा पाऊल टाकायचं नाही अशी मनोमन शपथ त्यानं घेतली. मणीशी तो वेड्यासारखं बरळू लागला. मणीनं ते सहन केलं. राजमविना जगाची कल्पनाच स्वामिनाथन करू शकत नव्हता. तो संध्याकाळी काय करणार? सुटीमधल्या दुपारच्या वेळा कशा घालवणार? दुसऱ्या कोणाचा मित्र म्हणून विचार करणार? अपराधी भावनेनं त्याला घेरलं. घरी परतल्यावर तो राजमला जाऊन भेटत नव्हता. भीती, शरम, आणि अनिश्चिततेची भावना यामुळं राजमला भेटणं तो एकेक दिवसानं पुढे ढकलत होता. दोनदा तो राजमच्या घराच्या फाटकापर्यंत गेला होता पण शेवटच्या क्षणी त्याचं अवसान गळून पडल्यानं तो माघारी आला होता. उद्या राजमला भेटू असा तो दररोज विचार करत असतानाच मणीनं येऊन ही हादरा देणारी बातमी दिली होती. त्या क्षणी राजमच्या घरी पळत जावं व त्याच्यावर आपला हक्क सांगावा अशी स्वामिनाथनला अनिवार इच्छा झाली. पण त्याला तसं करणं

अवघड वाटलं. उद्या सकाळी स्टेशनवरच जावं. गाडी सहा वाजता सुटणार होती. पाच वाजताच स्टेशनवर जायचं त्यानं ठरवलं.

"मणि, तू मला उद्या सकाळी पाच वाजता उठवशील ?"

"नाही. मी राजमच्या घरीच झोपायला जाणार असून तिथूनच स्टेशनवर जाणार आहे !"

क्षणभर स्वामिनाथनला मणीचा खूप मत्सर वाटला. मणि राजमच्या घरी झोपायला जाणार, शेवटच्या क्षणापर्यंत त्याला सोबत देणार, मध्यरात्रीपर्यंत ते हसणार, खिदळणार, गप्पा मारणार व त्याला मात्र दूर ठेवणार ! त्याला वाटलं मणीला घट्ट पकडून ठेवून जाऊच देऊ नये.

मणि गेल्यावर स्वामिनाथन आत जाऊन आपली देवदाराची पेटी उघडून त्यात डोकावू लागला. उद्या सकाळी राजमला भेट देण्यासाठी त्याला एखादी वस्तू निवडायची होती. त्या पेटीत नाना प्रकारच्या वस्तूंचा ढीग होता, त्यात स्वामिनाथनला एकेकाळी आवडलेला पुठ्ठयाचा खोका होता, खेळण्यातलं घड्याळ होतं, कॅटलॉग होता, चित्रांची पुस्तकं होती, खिळे, स्क्रू, निकामी झालेल्या यंत्राचे काही भाग अशा बऱ्याच वस्तू व झाडूही होता. अर्धा तास तो त्या वस्तू खालीवर करत राहिला पण राजमला देण्यास योग्य अशी एकही वस्तू त्याला सापडेना. त्यातल्या त्यात एकमेव चांगली वस्तू म्हणजे राजमनंच त्याला वर्षापूर्वी दिलेलं हिरवं इंजिन होतं. चेपलं गेलेलं ते इंजिन रिकाम्या दोऱ्याचे रीळ व फुटलेली चिनी मातीची फुलदाणी यांच्यामध्ये पडलं होतं. ते पाहून जुन्या आठवणी त्याच्या मनात तरळू लागल्या. राजम व आपण आता मित्र राहिले नसल्यानं हे इंजिन परत करावे लागेल की काय असा प्रश्न त्याला पडला. राजमला परत करण्यासाठी त्यानं ते इंजिन उचललंही पण फेरविचार केल्यावर त्यानं ते परत ठेवून दिलं. एकतर त्याला ते इंजिन आवडत होतं व दुसरे म्हणजे एखाद्यानं भेट दिलेली वस्तू एवढ्या काळानंतर परत करणं म्हणजे अपमानकारक ठरलं असतं. राजमला खूप वाचायची संवय होती. तेव्हा त्याला एखादं पुस्तक द्यावं असं स्वामिनाथननं ठरवलं. कोणतंही क्रमिक पुस्तक त्याला देता येणार नाही हे उघड होतं. त्याला आवडणारं एकमेव पुस्तक (त्यानं ते क्रमिक पुस्तकापासून वेगळं, देवदाराच्या पेटीत ठेवलं होतं. या वरूनच त्याबद्दल त्याच्या मनात असलेलं आदराचं स्थान स्पष्ट होत होतं) त्यानं बाहेर काढलं, काही वर्षापूर्वी मद्रासहून त्याच्या बाबांनी आणलेलं अँडरसनच्या परीकथांचं ते पुस्तक होतं. त्याला ते कधीच संपूर्ण समजलं नव्हतं. त्यात उच्चार करतादेखील येणार नाहीत असे कितीतरी, अनोळखी इंग्रजी शब्द होते. हे पुस्तक राजमला द्यायचं त्यानं ठरवलं. टेबलावर जाऊन पुस्तकाच्या पहिल्या पानावर त्यानं लिहिलं, "प्रिय मित्र राजम यांस. . ."


MALGUDI

2

अँडरसनच्या परीकथांचा छोटा खंड हातात घेऊन स्वामिनाथन मालगुडी स्टेशनवर पोचला तेव्हा तिथं अर्धवट काळोख होता. स्टेशन मास्तर नुकतेच उठले होते व घासलेटच्या दिव्याच्या उजेडात टेबलाशी काम करीत बसले होते. संदेश पाठवणाऱ्या तारायंत्राच्या सतत चालू असलेल्या कडकट्ट आवाजाकडं त्यांचं लक्ष नव्हतं.

बाहेर एक मोटार येऊन थांबली. गाडीतून उतरताना राजम, त्याचे आई, वडील, कोणीतरी एक अनोळखी माणूस व मणि यांना स्वामिनाथननं पाहिलं. राजमला पाहताच स्वामिनाथनचं अवसान गळालं. एखाद्या युरोपिअन मुलासारखा पोशाख केलेला कॅप्टन फलाटाकडं जाताना पाहून त्याचा निश्चय विरघळला. त्याच्या पोशाखानं, नीट नेटकेपणानं स्वामिनाथनला आपण क्षुद्र आहोत असं वाटू लागलं. तो मागे सरकला आणि आपल्याकडं कोणाचं लक्ष जाऊ नये असं त्याला वाटू लागलं.

फलाटावर एकदम पोलिस आणि पोलिस अधिकारी दिसू लागले. राजमपाशी पोचणं कठीण होतं. गणवेशातील लोकांच्या गराड्यात तो वडिलांच्या शेजारी उभा होता. दोन पोलिसांच्या मधून त्याला फक्त राजमचा डावा पाय दिसत होता. आणखी कुठून काही दिसतंय का याचा शोध घेत स्वामिनाथन राहिला.

गाडी येताना दिसू लागली. फलाटावर एकदम गडबड सुरू झाली. झुकझुक करीत गाडी फलाटावर येऊन थांबली. हालचाली एकदम वाढल्या. राजम व त्याच्या समवेतचे सारे जण फलाटाच्या टोकाशी आले. डझनभर पोलिस घाईघाईनं सामान दुसऱ्या वर्गाच्या एका डब्यात चढवू लागले. राजमची आई डब्यात चढली. राजम व त्याचे वडील डब्याच्या बाहेर उभे होते. पोलिसांनी त्यांना घेरलं होतं, ते त्यांना निरोप देत होते, हार घालीत होते. गळ्यात गुलाबांचा हार घातलेला राजम त्याला क्षणभर दिसला.

स्वामिनाथननं मणि कुठं दिसतोय का याचा शोध घेतला. तो सापडल्यावर स्वामिनाथन म्हणाला, "मणि, राजम दूर चालला. . ."

"हो, स्वामी तो जातोय."

"मणि, राजम माझ्याशी बोलेल का ?"

"हो, का नाही ?" मणीनं विचारलं.

राजम व त्याचे वडील डब्यात चढले. दरवाजा बंद झाला व दरवाज्याची मूठ वळवून तो लावून घेण्यात आला.

"मणि, हे पुस्तक राजमला द्यायलाच हवं," स्वामिनाथन म्हणाला, आता वेळ दवडता कामा नये हे मणीला उमगलं. घंटा झाली. ते दोघे गर्दीतून वाट काढीत एका खिडकीपाशी जाऊन पोचले. स्वामिनाथनला वरचं काहीच दिसत नव्हतं. दरवाज्याच्या मुठीपाशी त्याचं डोकं जेमतेम पोचत होतं. मागच्या बाजूनं गर्दी रेटत होती. मणि डब्यात डोकावत ओरडला,

"इथं स्वामी तुला निरोप द्यायला आलाय." स्वामिनाथन टाचा उंचावून उभा राहिला, खिडकीतून एक डोकं बाहेर आलं व म्हणालं, "गुड बाय मणि. मला विसरू नकोस. मला पत्र पाठव."

"गुड बाय, दोस्ता. . . इथं स्वामी आलाय," मणि म्हणाला. राजमनं मान पुढं काढली. वर पाहत असलेल्या स्वामिनाथनची व त्याची नजरा नजर झाली. तो परिचित चेहरा पाहून स्वामिनाथन म्हणाला, "ओह ! राजम ! राजम. . . तू दूर चाललास ना ? दूर. . तू परत कधी येशील ?" राजम एकही शब्द न बोलता त्याच्याकडं पाहत राहिला आणि नंतर (निदान स्वामिनाथनला तरी तसं वाटलं) त्यानं काहीतरी बोलायला तोंड उघडलं इतक्यात गार्डचा आवाज व इंजिनाची शिटी कानी पडली. साखळ्यांची काहीशी खळखळ ऐकू आली व मग जोरात फुस्कारा झाला. गाडी सुरू झाली. तोंडातच शब्द राहून गेलेला राजमचा चेहरा दूर जाऊ लागला. स्वामिनाथन अधीर झाला व ओरडला, "ओह ! मणि, पुस्तक त्याला द्यायलाच हवं." त्यानं ते पुस्तक मणीच्या हातात खुपसलं व मणि फलाटावरून धावत गाडीबरोबर निघाला. गाडीच्या आवाजाहूनही जोरानं ओरडत म्हणाला, "गुडबाय राजम. स्वामीनं तुला हे पुस्तक दिलंय." राजमनं पुढं हात करून पुस्तक घेतलं व हात हलवून निरोप दिला. स्वामिनाथनही जोरजोरानं हात हलवून निरोप देत होता.

स्वामिनाथन व मणि जेथे होते तेथेच खिळून उभे राहून आगगाडीकडं पाहत होते. शेवटच्या डब्याचा लाल दिवा कितीतरी वेळ दिसत होता, आणि एका वळणावर तो दिसेनासा झाला. धावत्या गाडीची धडधड, फुत्कार, झणत्कार, हे ती जशी दूर गेली तसं थांबलं. स्वामिनाथन म्हणाला, "मणि, त्यानं पुस्तक घेतलं याचा मला आनंद होतो. मणि, तो माझ्याकडं पाहून हात हलवीत होता, तो मला काहीतरी सांगणार होता, इतक्यात गाडी चालू झाली. मणि, त्यानं माझ्याकडं पाहून हात हलवला, फक्त माझ्याकडंच पाहून, हे तू नाकारू शकत नाहीस."

"हो, हो," मणीनं होकार दिला. स्वामिनाथनला रडू कोसळलं. तो हुंदके देऊ लागला. मणि म्हणाला, "स्वामी, मूर्खासारखं वागू नकोस."

"आता तो कधी माझा विचार करील का ?" स्वामिनाथननं स्फुंदत विचारलं.

"हो," मणि म्हणाला. क्षणभर थांबून तो पुढं म्हणाला, "काळजी करू नकोस. तो तुझ्याशी बोलला नाही तरी तो तुला पत्र पाठवील."

"म्हणजे ?" तुला काय म्हणायचंय ?"

"त्यानं मला तसं सांगितलं," मणि म्हणाला.

"पण त्याला माझा पत्ता ठाऊक नाही."

"त्यानं मला विचारला होता व मी तो दिला," मणि म्हणाला.

"नाही. नाही. तू खोटं बोलतो आहेस. सांग पाहू माझा पत्ता काय आहे ?"

"अं, अं. . . काय बरं. . . बरं. काही का असेना. . . मी तो राजमला दिला आहे."

मणि थट्टा करतो आहे की, खरं बोलतो आहे हे जाणून घेण्यासाठी स्वामिनाथननं त्याच्या चेहऱ्याकडं रोखून पाहिलं. पण मणीच्या चेहऱ्यावरून काही थांगपत्ता लागणं प्रथमच अशक्य होऊन बसलं होतं.

Lasertypeset at M/s Fine Impression, Punjabi Bagh, New Delhi and Printed at M/s India International Press, Naraina, New Delhi-28